# भोवरा

इरावती कर्वे

# भोवरा

इरावती कर्वे

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. पुणे

पहिली आवृत्ती : १९६०
दुसरी आवृत्ती : १९७३
तिसरी आवृत्ती : १९७३
चौथी आवृत्ती : १९७५
पाचवी आवृत्ती : २००५
पुनर्मुद्रण : २००९

**संस्थापक :**
रा. ज. देशमुख
डॉ. सुलोचना देशमुख

**प्रकाशक :**
देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.,
पुणे ४११ ०३०

**मुखपृष्ठ :**
रवी पांडे

© जाई निंबकर

**किंमत :**
२००/- रुपये

**अक्षर रचना**
एस. एम. इंटरप्रायसेस
श्री. सुरेश माने
गोकुळनगर, कोंढवा रोड, पुणे ४८.

**मुद्रक :**
साधना प्रेस
पुणे ४११ ०३०.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | भोवरा | ५ |
| २. | यात्रा | ९ |
| ३. | तितिक्षा | ४२ |
| ४. | कुंकवाची उटाठेव | ४५ |
| ५. | खिडक्या | ४८ |
| ६. | आजोबा | ५५ |
| ७. | द्वारका | ७९ |
| ८. | भोकं राहिली | ८४ |
| ९. | सुटका | ९१ |
| १०. | किती घेशील दो कराने | ९९ |
| ११. | भ्रमंती | १०७ |
| १२. | युगांतर | ११२ |
| १३. | डार्विनचा सिद्धांत | १२३ |
| १४. | मल्हार | १२८ |
| १५. | सत्याचा शोध | १३६ |
| १६. | विनाशाची सुरुवात? | १४७ |
| १७. | भटके | १५८ |
| १८. | दोन टोकं | १६३ |
| १९. | कोडगूंच्या प्रदेशात | १७२ |
| २०. | प्रवास संपला. | १८२ |

१

# भोवरा

"कालच नाही का मी तुम्हांला हात हालवला? आणि बरेच दिवसांत भेटला नाही असं कसं म्हणता?"

"मला तर काल कुणी भेटल्याचं आठवत नाही. मी कुणाकडं गेले नव्हते, कुणी माझ्याकडं आलं नव्हतं."

"अहो!" ती बाई हसत म्हणाली, "काल संध्याकाळच्या तुम्ही युनिव्हर्सिटीमध्ये वाचनालयाच्या मागच्या रस्त्यावरून चालला होतात ना, तेव्हा मी मोटरने त्या रस्त्यावरून गेले— जाता जाता तुम्हांला पाहिलं व तोंड बाहेर काढून हात हालवला की! तुम्ही पाहात होतात माझ्याकडं."

"खरंच की!" मी उत्तर दिले. जरा वेळ विचार केल्यावर मला तो प्रसंग आठवला. कुणी हात हालवला, ते काही मी ओळखले नव्हते व मोटर इतक्या वेगाने गेली की 'असेल दुसऱ्या कुणासाठी', असेच मला वाटले होते. एकमेकांना न ओळखता, भर्रकन निरनिराळ्या दिशांनी निघून जाण्याला जर ही बाई 'भेट' म्हणत असेल तर म्हणू दे—पण माझ्या अनुभवात तरी त्याला भेट म्हणायला मी तयार नव्हते.

पुण्याच्या रस्त्यांतून जाताना समोरून कोणी आले-क्षणभर थांबले, दोन शब्द बोलले तर ती भेट होईल का? त्या माणसाचा आवाज ऐकायला मिळेल, डोळ्यांत पाहायला मिळेल, कदाचित शब्दांना अर्थही असू शकेल. क्षणभरात का होईना, माझे कान व डोळे कितीतरी गोष्टी टिपून घेतील. भेटीची उत्कटता पळावर वा तासावर मोजण्याचा प्रयत्न करणे वेडेपणाचे नाही का? खरे म्हणजे भारतात असताना असा तासा-मिनिटांचा विचारच माझ्या मनात आला नसता, पण इथे अमेरिकेत मात्र सारखा येतो.

भारतामध्ये सगळे कसे शांत व स्थिर असते. तेच रस्ते, तीच नदी, तीच ओळखीची माणसे-फक्त आपल्या नात्यातलीच नव्हेत तर इतरही. पुण्यातला टांगा चालवणारा बाबू सगळयांच्या ओळखीचा; वीस वर्षे ओळखीचा, माळीणबाईची ओळख तिच्या मरणाने तुटली, कॉलेजात ज्यांनी शिकवले ते गुरुजन, आजचे सहाध्यापक, तीच शेजारीण माझ्याबरोबरच हळूहळू म्हातारी झालेली, तीच माझी व शेजाऱ्यांची मुले हळूहळू मोठी होता होता बरोबरीची झालेली. शाळेतल्या मैत्रिणी दहा ठिकाणी पांगल्या तरी भेट झाली की तीच ओळख पुढे चालू होते. सगळे संबंध स्थिर, रुजून मुळ्या धरून बसलेले, मागच्या कित्येक जन्मांचे, पुढे कित्येक जन्म चालू राहणारे. इथे मात्र सगळेच काही विलक्षण गतिमान, क्षणाक्षणाला बदलत जाणारे. पावसाळ्यातील वादळी वाऱ्यात बोट मुंबईहून निघाली होती. सारखी डचमळत होती. माझ्याबरोबर केबिनमध्ये एक बिचारी बाई होती. तिला भयंकर बोट लागली होती. तिला मी परत परत विचारी, "काय करू बरं? कशानं आराम वाटेल तुम्हांला?" ती म्हणायची, "एक पळभर– खरंच अगदी पळभरच– बोट स्थिर थांबवायला सांगा हो." मला कित्येकदा त्या बाईची आठवण व्हायची. अमेरिकेतील वेगवान धावणाऱ्या आयुष्यात-माणसाला, निदान मला तरी, मी स्वतः धावते आहे असं वाटायचं नाही. काहीतरी जोरानं फिरत आहे, आणि आपण त्या काहीतरीत असल्यामुळे अनिच्छया फिरत आहोत असं मला होई. सान्‌फ्रान्सिस्कोला जाताना मधे प्रचंड मोठ्या पुलावरून जावे लागे. एका बाजूने अविरत, न थांबणाऱ्या समोरून येणाऱ्या मोटरींचे पांढरे दिवे, तर स्वतःच्या बाजूला तितक्याच वेगाने धावणाऱ्या लाल दिव्यांची माळ! एका प्रचंड कारखान्यात दोन समांतर पट्टे विरुद्ध दिशेने फिरत आहेत-एकावर जाणारा माल, एकावर येणारा माल आणि त्यातलाच मी एक मालाचा पुंजका. माझी गती माझी नव्हती. माझे डोके फिरावयास लागायचे.

"एक पळभर–खरंच, पळभर थांबवा हो हा पट्टा" माझे मन सारखे ओरडायचे.

युनिव्हर्सिटीत विद्यार्थी व शिक्षक सगळेच बदलत असतात. कोण कधी, केव्हा, कुठे जाईल ह्याचा नेम नाही. पटत नाही म्हणून जातात असेही नव्हे. काहींना पगार जास्ती मिळतो, काहींना शिष्यवृत्ती मिळते,

म्हणून जातात; पण बरेचसे कुठेतरी निराळ्या ठिकाणी जायचे म्हणून, बदल हवा म्हणून जात असतात.

रस्त्याने फिरायला गेले की कितीतरी घरांवर व दुकानांवर पाट्या दिसायच्या, "विकाऊ आहे." मला दर वेळीं वाटायचे– "अरेरे! फारच डबघाईला आला बिचारा. दुकान, घर विकावं लागत आहे." काही दिवसांनी मला कळले की पैशाची खोट आली म्हणून काही लोक घरे आणि दुकाने विकीत नाहीत; तर त्यांना एके ठिकाणी राहण्याचा कंटाळा आला म्हणून. आठ वर्षांपूर्वी भेटलेल्या माणसांपैकी एक की दोन त्याच गावात, त्याच घरी, त्याच नोकरीत होती. बाकी सर्व इकडची तिकडे झाली होती.

सगळ्यांत मौज म्हणजे स्वतःच फक्त हिंडायचे व मग जावे त्या ठिकाणी नवे घर बघायचे, नवे साहित्य विकत घ्यायचे, नव्याने घर सजवायचे. त्या भानगडी नकोत म्हणून ह्या लोकांनी घरांनाच चाके बसविली आहेत. काही काही घरे साठ फूट लांब व वीस फूट रुंद असतात. त्यांना आठ किंवा दहा चाके, अशी घरे प्रचारात आली की त्यांना ओढून नेणाऱ्या मोटरगाड्या तयार होतात. कंपन्या निघतात. एका गावाहून दुसरीकडे जायचे म्हणजे घरासकट जायचे! माणसे हिंडतात, त्यांची घरे पण हिंडत असतात.

लाइबनिट्झ म्हणून एक प्रख्यात तत्त्ववेत्ता होता. विश्वरचनेबद्दल त्याची मोठी मजेदार कल्पना होती. सर्व विश्व अणुमय आहे. अणूचे नाव मोनाड. पण हे अणू निर्जीव, निरात्म नाहीत, हे आत्माणू सर्वथैव स्वतंत्र, स्वयंसिद्ध व स्वयंपूर्ण असे आहेत, असे त्याचे म्हणणे होते. ह्या संख्यातीत, स्वतंत्र आत्म्यांचे मिळून विश्व बनले कसे? एकमेकांशी त्यांचा संबंध मुळीच नाही का? लाइबनिट्झच्या मते संबंध फक्त एवढाच होता की, ह्या प्रत्येक बंदिस्त आत्मारूपी अणूला एक एक खिडकी असते व त्या खिडकीत इतर सर्व अणू प्रतिबिंबित झालेले असतात. हाच एका मोनाडचा दुसऱ्या मोनाडशी संबंध.

कधी जुन्या काळी कॉलेजात शिकलेल्या ह्या सिद्धान्ताची मला राहून राहून आठवण येई. एक मोठा भोवरा फिरत आहे. त्याच्या तळाशी गती इतकी थोडी की स्थिरत्वाचाच भास व्हावा. तिथे आम्ही वर्षानुवर्षे, जन्मच्या जन्म, एकमेकांजवळ घालवतो तरी आत्म्याला आत्मा मिळत नाही

म्हणून तळमळतो. लाइबनिट्झच्या मोनाडांप्रमाणे जोपर्यंत प्रत्येक आत्मा वेगळाला राहतो तोपर्यंत भेट होणे शक्यच नाही असे मानतो. ज्या दिवशी देहात, अस्मितेत कोंडलेला आत्मा सुटेल, त्या दिवशी अनंताच्या जाणिवेत वेगळेपण विरलेलेच असणार. पण तोपर्यंत ही निराळेपणाच्या विरहाची हुरहूर आमच्या मनात कायमच राहते. पण त्याच भोवऱ्याच्या वरच्या कडेला सर्व इतके गतिमान आहे की कोणताही एक बिंदू कोणत्याही एका बिंदूशेजारी फार वेळ राहूच शकत नाही. फिरण्याची कक्षा म्हणजे एक लांबच लांब प्रचंड मोटर रस्ता आहे. त्यावर असंख्य मोनाड निरनिराळ्या दिशांनी जात येत आहेत. प्रत्येक मोनाड आपल्या खिडकीतून इतरांकडे पाहातो, हात हालवतो व म्हणतो "झाली हं आपली भेट!"

१९६०

*

## २

# यात्रा

आम्ही भगवतीच्या देवळाजवळ उभे होतो. प्रवास करता करता भारताचे दक्षिण टोक गाठले होते. नकाशात लंका किती जवळ दिसते; पण येथून काही लंकेचा किनारा दिसत नव्हता! जिकडे पाहावे तिकडे समुद्र पसरला होता. पलीकडे काही जगाचा भाग असेल; तिथे माणसे राहात असतील, अशी कल्पनासुद्धा करणे जड वाटत होते. जमीन पायांखाली असेल तोपर्यंत चालत राहायचे. देशच्या देश, खंडच्या खंड पालथे घालायचे हे जरी कठीण असले तरी कल्पनेला समजण्यासारखे आहे. असेच चालत चालत नागड्याउघड्या रानटी मानवाने सारी पृथ्वी पादाक्रांत केली, पण जमिनीवरून अनंत सागरात माणसाने होडी लोटली तरी कशी ह्याचे मात्र आश्चर्य वाटते! कदाचित किनाऱ्याकिनाऱ्याने जाणाऱ्या होड्या वादळाने भडकून लांब गेल्या असतील, काही बुडाल्या असतील व काही दुसऱ्या किनाऱ्याला लागल्या असतील; मनुष्याला उमगले असेल, की आपली जन्मभूमी एवढीच काय ती पृथ्वी नसून अनंत समुद्रात ठिकठिकाणी भूमी विखुरलेली आहे. मनुष्य भविष्यकाळात काय करील हे चित्र रंगवायला जितकी मौज वाटते, तितकीच त्याने पूर्वी काय केले असेल याची कल्पना करण्यातही वाटते.

आम्ही त्या शांत, निर्मनुष्य किनाऱ्यावर किती वेळ उभे होतो कोण जाणे, एकदम माझ्याकडे वळून तो म्हणाला, "आपण एकदा हिमालयात गेलं पाहिजे."

"हो खरंच, कधी बरं जाऊ या?" व मग समोरच्या सपाट पसरलेल्या समुद्राकडे पाहातपाहात आम्ही उत्तुंग हिमालयाचे चित्र रेखाटले व जायचे बेत केले.

किती वर्षे झाली त्या गोष्टीला! हिमालयाला जाण्याची कल्पना आम्ही सोडून दिली नव्हती; पण जमत नव्हते खरे! तेवढ्यात आई बद्रीकेदाराला जाऊन आली व आम्ही पण तिकडेच जायचे नक्की केले; पण घरातून पाय निघेना! त्याची-माझी सुट्टी जमेना. दर सुटीत काही ना काही काम व सुटी मोकळी मिळाली, तर इतक्या लांबच्या प्रवासासाठी लागणारी रोकड नाही! बाकी सर्व आहे तर मुले व घर कोणावर सोपवावे ही पंचाईत. शेवटी एक वर्ष असे उजाडले, की काही झाले जायचेच असा निश्चय केला; कोठचेही काम सुटीत घ्यायचे नाही असे ठरवले; आईने मुले, घर, मामंजींना सांभाळण्याचा पत्कर घेतला व आम्ही एकदाचे निघालो. बरोबर माझ्या सत्तर वर्षांच्या एक वन्सं पण होत्या.

निधर्मी राज्यव्यवस्थेमुळे पुणे ते हृषीकेश व हृषीकेश ते पुणे अशी स्वस्त दराची तिकिटे मिळाली नाहीत. पुणे ते डेहराडून व परत अशी तिकिटे मिळाली—का, तर म्हणे कोठच्याही थंड हवेच्या ठिकाणी जाण्यास स्वस्त तिकिटे मिळतात. पण यात्रेला मिळत नाहीत!

शेवटी एके दिवशी सकाळी प्रवासास सुरुवात झाली. युगानुयुगे प्रवास चालला होता, मला वाटते. सह्याद्री, सातपुडा, विंध्य ह्यांच्या तापलेल्या भिंती ओलांडून आग ओकणारे गंगायमुनांचे सपाट खोरे लागले. दिवस वा रात्र, उकाड्यात काहीच फरक नव्हता. दिवसा उन्हात पळणारे मृगजळ दिसे. रात्री काळ्याकुट्ट काळोखात काही दिसत नसे. लोखंडाची भट्टी खालून तापली होती, वर आकाशाची कढतकढत काळीशार कढई पालथी घातली होती व मध्ये माणसे की बिस्किटे भाजून निघत होती! अधूनमधून भट्टीचे दार उघडे. खुसखुशीत भाजलेले जिन्नस बाहेर निघत व नवेनवे कच्चे जिन्नस आत येऊन रिकाम्या जागेवर बसत व भट्टीचे दार धाडकन् बंद होई! रात्रभर असे चालले होते. मी म्हणे, "एवढी कुणाची मेजवानी आहे की अजून हे केक-बिस्किटांचं भाजणं संपत नाही!" एवढ्यात गार वाऱ्याची झुळूक आली. "छे! छे! बिघडली सारी भट्टी! तापलेल्या मालावर अशी गार हवा लागून कसं चालेल?" आणखी एक गार झुळूक आली व ग्लानीने मिटलेले डोळे मी उघडले. उत्तर भारताचे मैदान संपून आगगाडी हिमालयाच्या टेकड्यांवर आली होती. दोन्ही बाजूंनी जंगल होते व सकाळच्या प्रहरी झाडे टवटवीत दिसत होती. आम्ही डेहराडूनच्या वाटेला लागलो होतो.

डून नावाप्रमाणे खरोखरीच एक द्रोण आहे. चारी बाजूंनी पाच ते सात हजार फूट उंचीचे पर्वत आहेत; व मध्ये रानात वसलेले गाव आहे. हिवाळ्यात म्हणे ह्या पर्वतांच्या माथ्यावरून बर्फ असते. आता उन्हाळ्याच्या धुंद वातावरणात पर्वतांची भुते छायेसारखी भोवताली दिसत होती व त्यांची रूपरेषा स्पष्ट दिसली नाही तरी त्यांची आग मात्र चांगलीच जाणवत होती. फरक एवढाच, की उत्तर भारताच्या सपाट मैदानात पांढरी आग होती आणि येथे हिरवा उन्हाळा होता; त्यामुळे निदान डोळे तरी निवत होते.

डेहराडून ते हृषीकेश, हृषीकेश ते देवप्रयाग, देवप्रयाग ते कीर्तिनगर, कीर्तिनगर ते श्रीनगर (काश्मिरातले नव्हे, गढवालची जुनी राजधानी), श्रीनगर ते रुद्रप्रयाग हा सबंध प्रवास अगदी स्पष्ट आठवतो; पण त्या आठवणी काही विशेष सुखदायक नाहीत. गर्दी, धूळ, उकाडा, भिकाऱ्यांचा आणि पंड्यांचा ससेमिरा, यात्रा कंपन्यांची निरनिराळी लबाडी, काही चारदोन देवळे सोडल्यास गलिच्छ भिकारी, देवळे व त्यांचे लोचट दलाल, बस-कंपन्यांची बेपर्वाई व त्यांच्या नोकरांचा उद्धटपणा- ह्या सर्वांना तोंड देऊन यात्रा पुरी करणाऱ्या लोकांच्या धीमेपणाचे, सोशिकपणाचे व श्रद्धेचे कौतुक करावे तेवढे थोडे! आणि शेपूट तुटलेल्या कोल्ह्याच्या मुत्सद्देगिरीने नव्हे, तर अगदी मनापासून सांगते, की एवढा सर्व त्रास सोसूनही बद्री व केदारला जाणे शक्य असेल तर माणसाने आयुष्यातून एकदा तरी जाऊन यावे.

ज्या कंपनीच्या मार्फत प्रवास केला त्यांनी आमच्याबरोबर स्वैपाक करण्यासाठी चंडीप्रसाद म्हणून एक ब्राह्मण व धनसिंग आणि वीरसिंग म्हणून दोन बोजेवाले दिले. 'सामानाचं वजन करा, म्हणजे जास्ती वजन भरल्यास सामान काढून ठेवू' म्हणून तीनतीनदा सांगूनही तसे न करता, 'सर्व ठीक आहे; तुम्ही चालू लागा' असा इशारा मिळाला व आम्ही चालू लागलो. रुद्रप्रयागला बस सोडून पायी प्रवासाला सुरुवात झाली तो, 'साहेब, सामानाचं वजन करा,' म्हणून धनसिंगाची भुणभूण सुरू होती. रुद्रप्रयागाला कुलीचे एक ऑफिस आहे, तेथे थांबून सामान वजन केले, आमच्या मॅनेजरने कुलीजवळ कराराचा कागद दिला होता. त्यात वजन बरेच कमी लिहिले होते व अर्थात मजुरीही कमी लिहिली होती. तेव्हा त्या

ऑफिसात नवा कागद केला व जास्ती पैसे देण्याचा करार केला, धनसिंगाने आमच्यावर विश्वास आहे म्हणून सांगितले. परस्परांवरचा विश्वास उडावा असे वर्तन शेवटपर्यंत आमचे झाले नाही; व ह्या मजुरांच्या व चंडीप्रसादच्या बरोबर प्रवास फार संतोषाने झाला. एकंदर प्रवासी कंपन्यांचा अनुभव घेता एवढे मात्र पक्के मत झाले, की त्यांच्या वतीने प्रवास करू नये. प्रवासी व मजूर सगळ्यांनाच बुडवून पैसे काढण्याचा त्यांचा बेत असतो.

रुद्रप्रयागला मंदाकिनीच्या तीराने पायी चालावयास सुरुवात केली. हिमालयाची सर्वच वनश्री अगदी नवीन होती, म्हणून पाहातपाहात फोटो काढीत, पक्षी दिसला की दुर्बीण लावून न्याहाळीत, नवीन फुले दिसली की ती गोळा करीत, निरनिराळे दगड खिशांत घालीत, आम्ही वीस दिवस चालत होतो. कोठेही एका दिवसापेक्षा जास्त मुक्काम केला नाही. एकंदर १८० मैल चाललो. पहिला व केदारचा अशा दोन मुक्कामात जरा कमी चाललो; एरवी साधारणपणे रोज दहा ते अकरा मैल चालत होतो. रमतगमत पाच ते सात तास चाल होई. होता होईतो सकाळचेच चालत असू. पण कधीकधी दुपारचीही चाल झाली. केदारच्या वाटेवर रोज बाराच्या पुढे गडगडायला लागून जोराचा पाऊस यायचा. धनसिंग म्हणायचा, "बाई, अशनी पडल्या तर मरायला होईल!" पण आम्हांला चार-पाचदाच गारा पडलेल्या दिसल्या. पाऊस जरी बाराच्या पुढे यायचा तरी ढग दहापासूनच जमायला लागायचे. आम्ही मोठ्या हौसेने रंगित फिल्मस् घेतल्या होत्या; त्यांचा उपयोग लख्ख ऊन असले तरच करायचा. सूर्य लौकर उगवे. पण दोन्ही बाजूंच्या उंच पहाडांतून वर येऊन खालच्या दरीत स्वच्छ प्रकाश पडायला साडेआठ वाजायचे, म्हणजे दिवसाकाठी फोटो घेण्यास फारफार तर दोन तास मिळत.

रोज दहा मैल चाल म्हणजे नीट कल्पना येत नाही. त्या दहा मैलांत एखादा तरी दोनतीन हजार फुटांचा चढ व तितकाच उतार असे. शिवाय रुद्रपयागपासून केदारपर्यंत आम्ही जवळजवळ दहा हजार फूट उंच चढलो. रुद्रपयाग असेल जेमतेम २००० फूट व केदार आहे ११,७५० फूट. केदारहून मागे परतून नाला चट्टीवर आल्यावर पाच हजार फुटांवर खाली दोन हजार फूट उतरून मंदाकिनी ओलांडून परत पाच हजार फुटांवरून

उर्खीमठला जायचे व तेथून तुंगनाथला बारा हजार फुटांवर चढावयाचे; परत चमोलीला २००० च्याही खाली उतरायचे– असा सारखा चढउताराचा मार्ग आहे. रस्ता सुरेख आहे–म्हणजे केदारचा. बद्रीचा इतका रम्य नाही. वाटेने सारखे यात्री चाललेले असतात व समोरून येताना प्रत्येक जण 'जय केदारजीकी', 'जय बद्रीविशालजीकी' अशा घोषणेने स्वागत करतो व आपण तेच उच्चारून प्रतिनमस्कार करावयाचा अशी रीत आहे.

आम्ही वाटेवर भेटणाऱ्या लोकांना 'तुमचा जिल्हा कोणता?' म्हणून विचारीत असू. हिंदुस्थानच्या सगळ्या प्रांतातलेच नव्हे, तर जवळजवळ सगळ्या जिल्ह्यांतले लोक आम्हांला भेटले. महाराष्ट्राचा तर कोंकण, देश, वऱ्हाड-नागपूर व मराठवाडा ह्या चार विभागांपैकी अगदी प्रत्येक जिल्ह्यांतला माणूस आम्हांला भेटला. उत्तर प्रदेश, पंजाब, राजपुताना, गुजरात व काठेवाडमधून, त्याचप्रमाणे बिहार व बंगालच्या सर्व जिल्ह्यांतून माणसे आली होती. दक्षिणेकडूनही लोक आले होते. ओरिसाच्या कटक व गंजम विभागातले लोक भेटले. प्रत्येक प्रांतातली भाषा वेगळी, पोषाख वेगळा, गाणी वेगळी, खाणे वेगळे. ही यात्रा म्हणजे भारताचे नित्य नवे दर्शन होते, ओरिसा व दक्षिण हिंदुस्थानच्या लोकांना भाषेमुळे बरीच अडचण पडे. बाकीच्यांना मोडकीतोडकी हिंदी येई व त्यावर निभावून जाई. सिमल्याच्या बाजूचे पहाडी लोक भेटले. त्यांचा बायकापुरुषांचा पोशाख सारखाच. म्हणजे लोकरीची विजार व वरपर्यंत गुंड्या असलेला कोट असा होता, पंजाब्यांची सलवार व खमीस, रजपुतान्यांतल्या बायकांचे घेरदार रंगीबेरंगी घागरे, वर काचोळ्या, डोक्यावर घोंगडी, अधूनमधून तीच पदरासारखी पुढे ओढलेली, असे निरनिराळे पोशाख होते. बंगाली लोक गटागटाने आलेले दिसले. त्यांत मुंडन केलेल्या काही विधवा बायका व काही वेणीदान केलेल्या सधवा बायका खूप होत्या. अगदी तरुण बायकांनी सुद्धा मुंडन केलेले दिसले. शिवाय त्यांतल्या बऱ्याच जणी डोक्यावर पदर वगैरे घेण्याच्या भानगडीत पडत नसत. त्यामुळे पहिल्यापहिल्याने फार चमत्कारिक वाटायचे; पण एकदा अंगवळणी पडले म्हणजे त्याचे काही वाटत नाही. सोवळ्याओवळ्याचे बंडही त्यांचे मुळीच दिसले नाही. भूक लागली की सगळा तांडाच्या तांडा जिलब्या विकत घेई व रस्त्याच्या कडेला बसून हसतखिदळत, मजेत गप्पागोष्टी करीत खाई.

वर्सना हे त्यांचे वर्तन फार चमत्कारिक वाटे; कारण महाराष्ट्रात मुंडन केलेली विधवा म्हणजे एक जिवंत प्रेत वावरत असते; पण ह्या बायांना जगण्यात–निदान ह्या यात्रेपुरता तरी-आनंद होता हे निर्विवाद. या त्यांच्या हसण्यात मलाही फार आनंद वाटे.

ह्या यात्रेला एक मोठे गालबोट म्हणजे भिकाऱ्यांचे. वाट डोंगरी व रोजची चाल असल्यामुळे पंढरपूरच्या यात्रेसारखे भिकार लोटत नाही, पण दर गावाशी लहान मुले व मुली भिक्षा मागतात. यात्रेकरू पाहिले की हातातले काम टाकून भीक मागायला यायची. कधीकधी कामाला जाणाऱ्या पहाडी बायका भीक मागत. ह्या भीकमागेपणाचा आम्हांला फार राग येई. ही सर्व शेतकऱ्यांची मुले व बायका; ह्यांनी भीक मागू नये असे वाटे. यात्रेकरूंनीच त्यांना भीक मागायला शिकवले असे वाटते. ही एक महायात्रा असल्यामुळे निरनिराळ्या मार्गांनी पुण्य जमा करण्याचा खटाटोप चाललेला असतो.

सर्वांत मजेदार व स्वस्त उपाय म्हणजे दोऱ्याची काही रिळे विकत घेऊन प्रत्येक भिकाऱ्याला काही वाव लांब दोरा द्यावयाचा. त्या दोऱ्यासाठी मुले-बाया सारखी कटकट करतात. 'सुई-धागा, सुई-धागा' म्हणून मागे लागायची. पहिल्याने हा प्रकार काय ते आम्हांला कळेचना. मग पाहिले तो एके ठिकाणी एक लठ्ठ वाणी रीळ हातात धरून मुलाच्या हातात दोऱ्याचे टोक देई व त्याला लांब जावयास सांगे व वीसपंचवीस पावलांवर दोरा तोडी. त्याचप्रमाणे वाटभर तो दोरा वाटीत होता. 'सुताला धरून स्वर्गाला जायचा' त्याचा दृढनिश्चय झालेला होता ह्यात शंकाच नाही. आंधळा, अपंग, महारोगी अशा माणसांखेरीज कोणासही काही द्यावयाचे नाही, हा आमचा निश्चय. जेवावयास करून, ताट वाढून घास घेणार तो रोज भगवी वस्त्रे परिधान केलेले लोक 'माई, जेवण वाढा' म्हणून तयार. आम्ही त्यांना काहीही दिले नाही, म्हणजे चंडीप्रसाद फार कष्टी होई. सर्व तऱ्हेच्या भिकाऱ्यांवर आमची टीका चालली असताना एकदा तो रागारागाने म्हणाला, "तुम्हांला एवढं कसं कळत नाही? तुम्ही भिकाऱ्यांवर उपकार करीत नसून ते तुमच्यावर करीत असतात! पुण्य गाठी बांधायची ही सुवर्णसंधी तुम्ही घालवलीत तर नुकसान तुमचंच आहे!" धनसिंग-वीरसिंगना मात्र आमचे म्हणणे पटे. ते म्हणत, "बाई, ह्यातला एखादा

महात्मा असेल; पण बाकी सारे भोंदू आणि किसानांच्या मुलांनी मुळीच भिक्षा मागता कामा नये. माझ्या घरी पोरांनी भीक मागितली तर त्यांना सपाटून मारून काढू!" असा रोज काही ना काही वाद चाले. रंगात आला म्हणजे धनसिंग आपल्या गावच्या गोष्टी सांगे. "तुम्ही आमच्या गावी या. सहा महिने राहिलात तरी पोटभर जेवायला घालीन, आणि पै घेणार नाही."

"अरे, मग हा एवढ्या कष्टाचा हमालीचा धंदा का करतोस?"

"आम्हांला भांडी व कपडे विकत घ्यावे लागतात. त्यांसाठी रोख पैसे लागतात. वर्षांतून महिनाभर मजुरी करून पन्नास-पाऊणशे रुपये मिळवले की वर्षाची गरज भागते."

रोजच्या बाजारात आम्हांला मीठ कमी पडायचे. चार आण्यांचे मीठ लागे, चंडीप्रसाद म्हणे, येथे मीठ फार महाग. आणि धनसिंग-वीरसिंग पण सैंपाक करताना रोज मीठ मागायचे. चंडीची रोजची खळखळ. मी म्हणाले, "दे रे मीठ, काय एवढ्या मिठासाठी भांडतोस?" तो म्हणे, "भिकाऱ्यांना काही द्यायचं नाही आणि ह्यांनी चोपून हमाली घेऊनही ह्यांना मीठ द्या म्हणता! कंपनी माझं साल काढील!" मिठावरून गोष्टी निघाल्यावर धनसिंगाने म्हटले, "बाई, आमच्या मुलखात मिठाची फार चणचण. वर्षाकाठी नाहीतर दोन वर्षांनी एकदा भोटिये लोक मीठ, जनावरांची कातडी, कस्तुरी वगैरे घेऊन येतात. असा व्यापारी आला म्हणजे आम्ही त्याला सामोरे जाऊन भेटतो व घरी घेऊन येतो. मग दोनतीन दिवस तो व्यवस्थित खातो, पितो, आराम करतो व मग मीठ विकत देतो."

"मिठाची किंमत काय रे?"

"एक माप मिठाला दोन मापं तांदूळ देतो बाई!"

हा तांदूळ मिठाचा भाव ऐकून आम्हा सर्वांनाच फार गंमत वाटली. "अरे, जेवणाखाणाचे काही कापून घेतोस का नाही त्या भोटियाकडून?"

"छे छे, हे व्यापारी आमचे पिढीजाद मित्र असतात. हल्ली मी ज्यांच्याकडून मीठ घेतो त्यांचाच बाप माझ्या बापाला मीठ विकीत असे. असा किती लांबून शेकडो मैलांचा प्रवास करून, पहाड ओलांडून येतो. जायला निघाला की आम्हांला वाईट वाटते."

ह्या व्यापाराची आणखी विलक्षण गोष्ट अशी, की भोटियांची भाषा ह्यांना येत नाही व ह्यांची भोटियांना येत नाही. काहीतरी मोडकेतोडके

एकमेकांशी बोलतात. नेपाळी भाषा संस्कृतोद्भव, तर भोटिया तिबेटीच्या पोटातली. पोषाखातही खूप फरक असतो. पण त्या पाहुण्यांची वाट नेपाळी लोक वर्षभर चातकासारखी पाहतात!

उतरायच्या मुक्कामला चट्टी म्हणतात. काही ठिकाणी धर्मशाळा आहेत; पण इतर ठिकाणी चट्टी म्हणजे कोणाच्या तरी मालकीची उघडी पडवी असते. पडवीच्या भिंतीशी चुली असतात. एका बाजूला मालकाचे दुकान असते. उतरायचा नियम असा, की मालकाकडून डाळ, तांदूळ, तेल, तूप, दिवेल, सरपण विकत घेतले पाहिजे. सर्व जिन्नस बरेच महाग असतात. रुपया सवा रुपया शेर तांदूळ, पण तांदूळ बारीक व स्वादिष्ट असतो. तसेच रुपया शेर गव्हाचे पीठ. गव्हाचा रवा मागितला तरी तोच भाव! 'टका शेर खाजा, टका शेर भाजा!' काय हवे ते घ्या. मसूर व तुरीची डाळ मिळते. मसूर मजुरांचे व गरिबांचे खाणे समजतात. पण तीनचार हजार फुटांपर्यंत चढले म्हणजे तूर शिजत नाही; म्हणून आम्ही मसूरच खात असू. भाजी वगैरे काही मिळत नाही. बटाटे, दूध मिळते. दही दोन ठिकाणीच मिळाले. बरोबर किती घ्यावे, हा प्रश्न प्रत्येकाला पडतो; पण सामानवहातुकीची मजुरी एवढी पडते. की शक्य तो दुकानात विकत घ्यावे असे आम्हांला वाटले. शिवाय जिन्नस विकत घेतले म्हणजे दुकानदारही खुशीने राहण्यास जागा देतो. धनसिंग-वीरसिंग पण रोजचा शिधा विकत घेत; पण त्याच पदार्थांना त्यांना किंमत कमी पडे. आम्हांला रुपया शेर तांदूळ मिळाला तर त्यांना बारा आण्यांना मिळे. दुकानदाराने सांगितले, की "ते मजूर; त्यांना बिचाऱ्यांना एवढा भाव कसा परवडणार? बिचाऱ्यांची मजुरी खाण्यातच संपायची! म्हणून त्यांना व तुम्हांला भाव निरनिराळा." ही व्यापाराची तऱ्हा अगदीच नवी, पण त्यातील तत्त्व आम्हांला मान्य झाले. केदारच्या वाटेवरच्या चट्ट्या स्वच्छ, प्रशस्त व मालक अगत्यशील होते, तर बद्रीवर लोकांना मुळीच अगत्य नाही. वन्संचे जेवण एवढेसे, चंडीप्रसाद व आम्ही दोघेही फार जेवणारे नव्हेत, म्हणून बद्री वाटेवरचे मालक रोज आम्हांला जागा देताना कुरकूर करायचे. "अरे, तुम्ही भाड्याचे पैसे घ्या." म्हटले तर त्यांना पटत नसे. बरे, एका चट्टीवर जास्त विकत घेतले, तर पुढच्या गावाला रस्त्यावरच निजायची वेळ यायची!

चट्टीवर आले म्हणजे आज शेजार कोणाचा, म्हणून जरा कुतूहल

वाटे, बंगाली शेजारी आले म्हणजे त्यांचे खाणेपिणे, बोलणे निराळे. ही मंडळी वाटभर फक्त भात-भाजी शिजवून खात. उत्तर प्रदेशातील लोक किंवा पंजाबी असले म्हणजे ते गव्हाचे रोट करीत. कधी भात व वरण. रोटांबरोबर नेहमी वरण असायचे. शिवाय हे लोक एकदा रोट करून ठेवीत व वेळ मिळेल तसे दुधाबरोबर खात. ओरिसाचे लोक पण भातखाऊ. उत्तर रजपुतान्यातून बरेच जाट व रजपूत आले होते; ते बहुतेक रोटच खाणारे. शिवाय मोठा मुक्काम असला म्हणजे बरेच जण पुरी, भाजी, भजी, जिलबी घेऊन खात. रोजच्या कटकटी व्हायच्या, दक्षिणेकडील लोकांच्या. देवप्रयागाला पहिले भांडण झाले. एक म्हातारा मराठा वारकरी पाण्यासाठी थांबला होता. नळावर लोकांची झिम्मड होती. मी जरा रदबदली करून त्याला नळावर जागा करून दिली. त्याने बादली लावली व कोणाचा शिंतोडा उडाला म्हणून सबंध पाणी ओतून टाकले! सगळ्यांना फार राग आला. त्यांची समजूत घालता घालता पुरेवाट! वऱ्हाडकडचे एक कोष्ट्याचे कुटुंब आले होते. तो मनुष्य म्हणे, "म्हाताऱ्या, तुला सोवळंओवळं करायचं तर आलास कशाला इकडं? घरीच का नाही बसलास?" काही हिंदीत, काही पंजाबीत, काही बंगालीत सगळेच जण म्हाताऱ्याची टिंगल करीत होते. "नारायणा, विठ्ठला! तुला नाही रे दया येत!" म्हणत, एकीकडे सर्वांना रागावत तो बाजूला उभा होता. "म्हाताऱ्याचा आत्मा भुकेनं तळतळत नका ठेवू, घेऊ द्या त्याला पाणी" म्हणून विनंती केल्यावर सगळे दूर होऊन त्याला पाणी मिळाले, पण यात्राभर त्याला खास त्रास झाला असेल.

अशीच एक कानडी बाई दोनतीनदा दिसली. ती अंग धुऊन धाबळी नेसून सोवळ्याने स्वयंपाकाचे पाणी नेण्यासाठी कुडकुडत उभी असायची. सगळ्यांचे आटोपले की हिला पाणी भेटायचे. ती पाणी भरायला लागली की आंचवणारे येत, मग तर तिची धांदल उडून जाई. सगळ्या यात्रेकरूंचे खाणे आटपून, चुली विझून भांडी घासून झाली, तरी हिचा स्वैपाक चाललेला असे! शेवटच्या शेवटच्या मुक्कामांत इतकी थंडी होती, की सगळे कपडे चढवूनही अंगात ऊब येईना. ही म्हातारी धाबळी नेसूनच पाणी भरायला येते का, ते मला पाहायचे होते; पण ती मागे राहिली होती.

मंदाकिनी, अलकनंदा वगैरेंच्या तीराने जाऊनही पाण्याची टंचाई

असे, कारण ह्या नद्या बऱ्याच ठिकाणी 'पाताळगंगा' झालेल्या आहेत. वाट चालणारा असतो नदीपासून तीन साडेतीन हजार फूट उंच. नदीचा आवाज ऐकू येतो; नदी फेसाळत जाते ते दिसत असते; पण पाणी मात्र हाताला लागत नाही! शिवाय ज्या ठिकाणी नदी जवळ असते तिथे पाणी पिण्याला योग्य नसते. उन्हाळ्यात बर्फ वितळून नद्यांतून जे पाणी वाहते ते सिमेंट कालवलेल्या पाण्यासारखे काळसर, धूसर असते. वरून डोंगरावरची राखेच्या रंगाची बारीक माती धुपून येत असते; त्यामुळे वस्त्रातून गाळूनही पाणी स्वच्छ मिळत नाही. उत्तर प्रदेश सरकारने डोंगरमाथ्यावरूनच्या स्वच्छ झऱ्यांचे पाणी ठिकठिकाणी दर दोनचार मैलांवर पिण्यासाठी बांधून आणले आहे. ह्या नळ्या रात्रंदिवस स्वच्छ पाण्याने वाहात असतात व तिथेच सर्वांची पाणी पिण्याची गर्दी उसळलेली असते. तेथे जात नाही, पात नाही, बाई नाही, पुरुष नाही, ज्याला जशी वेळ मिळेल. तसे जाऊन पाणी घ्यावे लागते.

ह्या सगळ्या गर्दीत कुठे असभ्यपणा इतकाही आढळला नाही. एकाच ओढ्यात आंघोळ करून, भराभर वस्त्रे धुऊन वाळवायची गर्दी असे. स्त्रियांच्या पुरुषांच्या आंघोळी चालत; पण कोणी बायकांची चेष्टा केली असे आढळले नाही. स्त्रीपुरुषांचे मिश्र घोळके विश्रांतीस बसत. स्त्रिया पदर काढून मुलांना प्यायला घेत. पण येणाराजाणारा वाटसरू कधी वाकड्या नजरेने बघत नसे. बऱ्याच स्त्रिया तरुण व सौंदर्यवती होत्या; पण त्यांच्याकडे पाहून टक लावणे, फिदिफिदी हसणे किंवा अश्लील हावभाव दिसले नाहीत. तुंगनाथवर एक वयस्कर बाई अंग धुऊन विवस्त्र होऊन मुलाच्या हातून लुगडे घेत होती. मोठा समाज भोवती होता; पण कोणी ह्या गोष्टीची दखल विकृतपणे घेतली नाही. शिक्षण व सुसंस्कृतपणा ह्यांची फारकत लक्षात येऊन मन परत परत विषण्ण होई. पुण्यामध्ये कॉलेजात शिकणाऱ्या मुलींना जी हीण वागणूक मिळते; प्रत्येक गॅदरिंग किंवा सभेच्या वेळी मुलींना उद्देशून जे अचकटविचकट शब्द व हावभाव ऐकू येतात व दिसतात, त्यांची आम्हा दोघांना आठवण होई. पण नको, हा प्रदेश त्या आठवणीने विटाळायचा, ह्या बुद्धीने आम्ही त्याबद्दल फारसे बोलायचेसुद्धा नाही, असे ठरवले; तरीही पदोपदी ह्या विरोधाची जाणीव व्हायचीच.

आम्ही अगस्ती कुंडाजवळ पोचलो. तिथे नदीचे पात्र रुंद होते. समोर

केदारची रांग स्वच्छ दिसत होती. येथे जरा वेळ बसावे असे वाटत होते; पण भिकाऱ्यांमुळे तिथे उभे राहणे शक्य नव्हते. नेहमीच्या भिकाऱ्यांखेरीज पावती फाडून वर्गणी गोळा करणारेही आता भेटू लागले. ठिकठिकाणच्या प्राथमिक शाळांचे चालक वाटेतच टेबल मांडून बसत व शाळेसाठी पैसे मागत. इतक्यांना पैसे कोठून द्यावे व का द्यावे हा मोठा प्रश्न पडे. आम्ही हिशेब केला. दर वर्षी ५० हजार ते एक लाख यात्री बद्री व केदारला येतात. अगदी पन्नास हजारांचाच हिशेब धरला तरी प्रत्येक यात्रेकरू यात्रेसाठी अगदी कमीत कमी शंभर सवाशे रुपये खर्च करीत असणार. त्यातले पन्नाससाठ मजुरांचे गेले तरी निदान माणशी पन्नास रुपये या दोन अरुंद विरळ वस्तीच्या खोऱ्यात तो खर्च करतो. म्हणजे एप्रिल ते ऑगस्टपर्यंत पंचवीस लाख रुपये येथल्या लोकांना-चट्टीवाले, दुकानदार, पंड्ये वगैरे लोकांना—मिळतात. ह्या पैशांवर स्वतःच्या जिल्ह्याची स्थिती का सुधारता येऊ नये? प्रतिवर्षी एवढे उत्पन्न पाच महिन्यांत-खरोखर तीन महिन्यांतच जास्त उत्पन्न असते-मिळत असताना अशी हीनदीन भिकारी वृत्ती का? वाटेवर भेटलेल्या प्रत्येक मुलाने भीक का मागावी? महाराष्ट्राच्या मानाने ह्या लोकांचे खाणे सकस; शेती कष्टाची खरी, पण वस्ती विरळ व दर वर्षी हुकमी उत्पन्न. काहीतरी चुकते आहे! आमचा हिशेब चुकत असला पाहिजे, की हिंदू लोकांना भीक मागण्याची लाजच नाही?

अगस्ती कुंडाजवळून दरीचा एक फोटो काढला आणि पाठीमागे लागलेल्या मुलांना चुकवीत पुढे चालू लागले. चंडीप्रसादला पकडून कॉलऱ्याची टोच दिली म्हणून पुढे एक दिवस मला सैंपाक करावा लागला. यात्रा-कंपनीने ही व्यवस्था आगाऊ करून ठेवावयास पाहिजे होती.

गाव संपल्यावर शांतपणे परत प्रवासास सुरुवात झाली. तेथून तीनचार हजार फूट चढून गुप्त काशीला जावे लागते. तेथे थांबून वन्संना दर्शन करवले व पुढे निघालो. तेथून केदारपर्यंतचा प्रवास फारच आनंदाचा झाला. रोज दुपारी पाऊस पडायचा. पायांखाली रस्ता ओलसर व थंड असे. हवेत धूळ मुळीच नाही. हिमालयाची दरी रोज नवी दृश्ये दाखवी. रोज नवीनवी फुले, वृक्ष दिसत. थोडे आम्हांला ओळखता येत. बहुसंख्य माहीत नसलेले होते. गवतावर रानटी स्ट्रॉबेरीची फुले व फळे आलेली होती.

व्हायोलेटना तोटा नव्हता; पण फूल मोठे असूनही वास नव्हता आणि रंगानेही गडद नसून आल्प्स् पर्वतातल्या व्हायोलेटप्रमाणे निळे पांढुरके होते. ऱ्होडोडेंड्रॉनच्या वृक्षांना बहर येऊन गेला होता. सुकलेली फुले मात्र दिसत होती, म्हणून हळहळ वाटली. पण जसजसे वरती गेलो तसतसे फुलांच्या बहारातलेही वृक्ष दिसले. रोज नवे नवे पक्षी दिसत होते, शांतपणे रस्त्यावर उभे राहून दुर्बिणीने त्यांना न्याहाळता येत होते. फुले गोळा करावयाची हा तर रोजचाच उद्योग होता. ती एका लहानशा रोजनिशीत दाबून ठेवली होती व मग डेहराडूनला गेल्यावर एका वनस्पतिशास्त्रज्ञाकडून त्यांची ओळख पटवून घेतली. काही नानाफुलांचे कंद उकरून बरोबर घेतले व ते पोस्टाने पुण्यास धाडून दिले. त्यांतल्या काही वनस्पती जगल्या आहेत; पण हिमालयातल्या झाडाला पुण्यात फुले धरतीलसे वाटत नाही.

वाट चालताना कधी परस्परांत, कधी यात्रेकरूंबरोबर संभाषण होई, तर बरेच वेळा काही न बोलताच तासन् तास चालत असू. एकदा असेच चालताना मी सहज विचारले, “समुद्राच्या तळाशी काय असतं, कधी पाहिलं आहेस?” तो फक्त हसला व त्याने भोवतालच्या देखाव्याकडे हात दाखवला. आमच्या दोघांच्याही मनात तेच विचार चालले असले पाहिजेत. सध्या हिमालय आहे तेथे फारफार पूर्वी एक मोठा समुद्र होता. पृथ्वीच्या पोटात व त्यामुळे पाठीवरही भयंकर उलथापालथ होऊन समुद्राचा तळच्या तळ उचलला गेला व तो हिमालयपर्वत! हिंदुस्थानातला हा सगळ्यांत नवा पर्वत. हे बाळ अजून उंचउंच वाढत आहे! ह्या उलथापालथीच्या वेळी पोटातली आग उसळून वरती येत होती व तिचा निरनिराळ्या थरांशी संबंध येऊन निरनिराळ्या तऱ्हेचे रूपांतरित दगड बनत होते. ह्या दगडातूनच अग्निरसात भस्म झालेल्या द्रवाची राख सगळीकडे दिसून येते. हीच हिमालयातली राखट रंगाची माती. ही ठिसूळ असते व पावसाळ्यात दगडांचा ढिगारा घेऊन कोसळते. असे कोसळलेले कडे ठिकठिकाणी दिसून येतात. दरवर्षी कडे कोसळल्यामुळे ठिकठिकाणी पूल व रस्ता कोसळतो व तो दर वर्षी यात्रेच्या आधी दुरुस्त करावा लागतो. काही वर्षांपूर्वी कोसळलेल्या टिकाणातून अरुंद वाट गेलेली असते. कोसळलेला कडा एखाद्या थिजलेल्या प्रवाहासारखा दिसतो. ठिकठिकाणी प्रचंड शिळा अर्धवट खाली येऊन वरच्यावर लोंबत असतात. कधी डोक्यात पडतील ह्याचा नेम

नाही. उन्हाळ्यात त्या पडण्याचा फारसा संभव नसतो; पण पाऊस रोजचाच असल्यामुळे एखाद्या वेळी कडा कोसळला तर नवल नाही. इकडचे लोक हिमालयाला कच्चा पहाड म्हणतात ते यामुळेच.

यात्रेला उन्हाळ्यात जावे का पुढे जुलै-ऑगस्टमध्ये जावे, ह्याबद्दल पुष्कळ मते ऐकली होती. एप्रिलमध्यापासून जूनमध्यापर्यंत अतिशय गर्दी होते. पुढे मुख्य यात्रा संपून निवांतपणा मिळतो. झाडांना दाट पाने येऊन सगळीकडे हिरवेचार दिसते. पण पावसामुळे वाट ठिकठिकाणी कोसळायचा संभव असतो. साधारणपणे एप्रिल बारातेराच्या सुमाराला केदारला पोचण्याचा बेत ठेवला तर गर्दी नसते. थंडी वरतीवरती बरीच लागते; पण हे दिवस ऐन वसंतऋतूचे असल्यामुळे ज्याला गवतातली फुले, ऱ्होडोडेंड्रॉन वगैरे शोभा पाहावयाची त्याला उत्तम. शिवाय वसंतऋतूत पक्षी हिमालयात यावयास सुरुवात करतात. झाडांना पाने फारशी नसल्यामुळे दुर्बिणीतून ते नीट पाहता येतात. हिवाळाभर निजलेली सृष्टी वसंतात हळूहळू डोळे उघडते, ते दृश्य फार मनोवेधक असते. एकीकडे हिवाळ्याचे बर्फ पडलेले असते; तर बर्फाच्या कडेला झरणाऱ्या पाण्यातून असंख्य रानफुले उमललेली असतात. आम्हांला तरी हिमालयातील वसंतऋतू हृद्य वाटला.

सारखे 'हिमालय हिमालय' म्हणते आहे; पण खरे म्हणजे आम्ही हिमालयात प्रवेश केला नाहीच. केदारनाथाशी हिमालयाच्या एका पर्वताचे जवळून दर्शन झाले. तुंगनाथावरून हिमालयाच्या रांगा दुरून पाहिल्या प्रत्यक्ष हिमालयावरील अक्षय हिमाच्छादित शिखरावर आम्ही पाऊल ठेवले नाही. आम्ही फक्त दारापर्यंत जाऊन डोकावून आलो, इतकेच. ह्या डोंगरांना शिवालकचे डोंगर म्हणतात. शिवालक म्हणजे शिवाचे केस. शिवाचे डोके कुठे उंच आकाशात असेल! पर्वताच्या ह्या लांबलांब रांगा म्हणजे जाडजाड जटा व त्या बटाबटांतून मंदाकिनी, अलकनंदा, भागीरथी वगैरे अनंत प्रवाहांनी गंगा झरत खाली येते... मला वाटते, आपले अनुभव सांगण्यासाठी तोंड उघडू नये, लेखणी हाती धरू नये. ज्यांनी हिमालयाच्या दृश्यावर भगीरथाची कथा रचली; ज्यांनी ह्या डोंगरांना शिवालक म्हटले, त्या प्रतिभासंपन्न लोकांपुढे इतर कुठलाही प्रयत्न क्षुद्रच ठरणार! जसजसे केदारच्या जवळजवळ जात होतो, तसतसा देखावा जास्तजास्त भव्य होत होता. झाडी पण दाट झाली. ठिकठिकाणी डोंगरांवरून बर्फ दिसू लागले.

एके ठिकाणी सबंध घळ बर्फात बुडालेली होती व त्यातूनच वाट गेली होती. ती पंचवीस पावले बर्फातून जायला सर्वांनाच मोठी हौस वाटली. धनसिंग-वीरसिंगनी मुठीमुठी घेऊन बर्फ खाल्ले! हे बर्फ म्हणजे मोठेमोठे खडे नव्हते, तर बारीक रव्यासारखी भुकटी होती व ती चिमटीने किंवा मुठी भरून उचलता येई. मोठा चढ चढून रामवाड्याला आलो. हे ठिकाण जवळजवळ नऊ हजार फूट उंच आहे. येथे गावाबाहेरच्या डोंगरावर ठिकठिकाणी बर्फ पडले होते. थंडीही खूप होती; पण यात्रेकरू आनंदात होते. केदारनाथाचा घोष जोरात होई. जसजसे पुढे जात होतो तसतसे परतणारे लोक भेटत होते. परतताना ते बद्रीनाथाचा पण जयजयकार करीत. आम्ही केदारबाबाचेच नाव घेत असू. मौज अशी, की चालणारे लोक मोठ्या आनंदात असायचे. दमले की कडेला बसायचे, दम खायचा, गप्पा मारायच्या, भूक लागली असल्यास खायचे, येईलजाईल त्याला देवाच्या नावाची ललकारी द्यावयाची, अशी चालणाऱ्यांची रीत होती; तर मेण्यातले व कंडीतले लोक फारसे हसतमुख दिसायचे नाहीत की कधीं कोणाला अभिवादन करावयाचे नाहीत. मला वाटते हिमालयाची शोभा त्या बिचाऱ्यांना फारशी दिसतच नसेल. एकदा आमच्यापुढे मेण्यात बसून एक तरुण मुलगी चालली होती व वरखाली इकडेतिकडे न पाहता सारखी पुस्तके वाचीत होती. जाताजाता पाहिले तो मराठी कादंबरी दिसली! एकदा एक मनुष्य दिसला, त्याच्या हातात गजराचे घड्याळ होते. चट्टीवर पांचच्या पुढे निजू म्हटले तरी शक्य नसते, इतकी सर्वांची गडबड व धांदल असते; मग ह्याला गजराचे घड्याळ कशाला लागत होते कोण जाणे!

केदारच्या वाटेवरचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे ह्या रस्त्यावर शेळयामेंढ्यांची वाहतूक कमी प्रमाणात असते. बद्रीच्या वाटेवर माणसांइतक्याच शेळयामेंढ्या जातात. बद्रीवरून व जोशीमठावरून दोन वाटा तिबेटात गेल्या आहेत व म्हणून भारत व तिबेटातील व्यापाऱ्यांची ये-जा ह्या मार्गाने अतिशय आहे. शेळया, मेंढ्या, घोडी व याकसारखी दिसणारी केसाळ ठेंगणी जनावरे सारखी माल वाहून नेतांना दिसतात. शेळ्या-मेंढ्या आपल्याकडील जनावरांपेक्षा दिढीने तरी उंच असतात व त्यांच्या पाठींवर उजव्या-डाव्या बाजूंना पाच ते दहा शेर धान्य किंवा बटाटे भरलेल्या लोकरीच्या पिशव्या असतात. पहिल्यापहिल्याने ह्या कळपांचे

नावीन्य व कौतुक वाटते; पण पुढेपुढे त्यांचा फार अडथळा होतो. एकदा त्यांची लांबलचक रांग लागली म्हणजे संपत नाही! त्यांना व त्यांना हाकणाऱ्यांना यात्रेकरूंचा उपद्रव वाटे व आम्हांला त्यांचा वाटे.

रामवाड्याच्या पुढे तीन मैल खडा चढ आहे. वाट नदीच्या तीरातीराने सारखी वर गेलेली, अरुंद, ठिकठिकाणांहून पाझरणाऱ्या झऱ्यांपुढे चिखल झालेली अशी आहे; पण थंडी असल्यामुळे चालण्याचे श्रम वाटत नव्हते. जसजसे उंच चढलो तसतसे वृक्ष नाहीसे झाले व सगळीकडे गवताचा गालिचा अंथरला गेला. त्या गवतावर सगळीकडे पाण्याचे ओहोळ वाहत होते व असंख्य फुले उगवली होती. केदारनाथाच्या पूजेला हीच फुले आम्हांला मिळाली. मंदिराचा कळस लांबून दिसतो. अर्धा मैल एक अरुंद खोरे चालून जावे लागते. गवतातून घाटी बांधून मार्ग केला आहे. मंदाकिनीचा पूल ओलांडून दुसऱ्या तीरावर उन्हाळ्यापुरते गाव वसलेले आहे. भाविक लोक त्या बर्फाच्या पाण्यात अंग धूत होते. आम्ही पंड्याने दिलेले ऊन पाणी घेऊन उघड्यावरच आंघोळ केली. त्याने ऊब नाहीच आली; पण निदान अतिशय गारठलो नाही. सर्वजण देवळाकडे गेलो, देवळाच्या मागेच वीस हजार फूट उंचीचा हिमपर्वत उभा आहे व सतोपंथ नावाची हिमनदी आहे. ह्याच मार्गाने पांडव वर चढत गेले असे म्हणतात.

देवळात स्वयंभू पिंडी म्हणजे एक प्रचंड ओबडधोबड शिळा आहे. तिला दोन्ही हातांनी कवटाळून भेट द्यावयाची असते. भेटीआधी पिंडीवर तूप लावावयाचे असते. दर्शन घेऊन परत आलो. घरांच्या छपराखाली आदल्या हिवाळ्यातील बर्फाच्या शिळा अजून पडल्या होत्या. आकाश पहिल्याने निरभ्र होते, पण मग ढग यावयास लागले. काही खाऊन मग परतावे असा विचार केला, पण जिन्नस अगदीच वाईट होते. दिनूचे डोके भयंकर दुखू लागले; म्हणून फारसे इकडेतिकडे न करता उतरलो. अर्धी वाट उतरल्यावर डोके दुखणे अजिबात थांबले. इतक्या उंचीवर गेल्याचाच तो परिणाम असावा. मला व वन्संना वरती काही झाले नाही; पण खाली आल्यावर मात्र कसेसेच व्हावयास लागले. ताजे जेवण कसेबसे खाल्ले व मग मात्र बरे वाटू लागले. हा अनुभव पुढे तुंगनाथला किंवा बद्रीला आला नाही. मला वाटते, तोपर्यंत आम्हांला हिमालयाच्या उंचीची सवय झाली.

परतताना अर्धी वाट जाऊन मंदाकिनी ओलांडून अलकनंदेच्या

खोऱ्यात जावयाचे असते. वाटेत तुंगनाथाचे शिखर ह्या यात्रेत सर्वांत उंच असे आहे. तेथे जायचे आम्ही ठरवले. तिकडे जाताना काही पंजाबी मंडळी भेटली. ह्यांच्यातली एक बाई फार गोड बोलणारी होती. ती सर्व बद्रीला पोचेपर्यंत आमच्या थोडी पुढेमागे असत व रोज भेटत. ती बाई म्हणत होती, "कोई यात्रा धनसे करते हैं, कोई मनसे, और कोई तनसे." "म्हणजे काय?" महामंडलेश्वर यतींचा लवाजमा त्याच वेळी केदारच्या वाटेवर चालला होता व आम्ही कडेला उभे राहून त्या मेण्यात बसलेले श्रीमान धनी व शिष्यमंडळी पाहात होतो. त्यांच्याकडे बोट दाखवून ती म्हणाली. "ही पाहा धनाच्या जोरावरची यात्रा. तुम्ही व आम्ही शरीरबळ व थोडे द्रव्य ह्या बळावर करतो आहोत आणि ज्या बिचाऱ्यांना धनही नाही आणि तनही नाही ते घरीच बसून मनाने यात्रा करीत असतात." ती रोज गमती-गमती सांगायची, गाणी पण खूप म्हणायची. मला आता एकच आठवते. त्याची सुरुवात होते- "गंगा महाराणी मय्या" महाराणी आणि आई ही संबोधने एकाच गंगेला दिलेली ऐकून मला गंमत वाटली.

दुसरी एक बाई कर्कश गळ्याने आमच्या चट्टीत भजन करीत होती- "मन मोथनु भवु तारो." सर्वच आकारान्त शब्द उकारान्त करण्याची लकब पाहून मला नवल वाटले. ती पूरबियांपैकी होती. पूर्वेकडील हिंदी जिल्ह्यांत अशी बोली आहे की काय कोण जाणे. एक दिवस आमच्या ह्या वाटेवर केदाराकडे जाणारी एक बाई दिसली. तोंडाने ती 'जय सीयाराम' जय सीयाराम' असे म्हणत चालली होती; तुलसीदास रामायणात सीता शब्द सीया ह्या रूपात मी वाचला होता; पण बोलभाषेतही तो असेल, अशी जाणीव त्या वेळी मला झाली नव्हती.

हिंदूंची दैवते निरनिराळी, भाषा निरनिराळ्या; पण यात्रेच्या ठिकाणी एकाच भावनेने सर्व गोळा होतात. सबंध भारतावर इंग्रजांआधी कधीही एकछत्री राज्य नव्हते; पण भारताच्या एकपणाची जाणीव व भारताच्या सीमा हजारो वर्षे ठरवल्या गेल्या होत्या. हा एकपणा व या सीमा एकराज्याच्या निदर्शक नसून एका संस्कृतीच्या- हिंदू संस्कृतीच्या-निदर्शक आहेत. त्या सीमांवर सर्व हिंदूंना पूज्य अशी देवस्थाने आहेत; आणि त्यांचे संबंधही मनात इतके रुजले आहेत, की, हिमालयावर गेले की कन्याकुमारीची वा रामेश्वराची आठवण येते. जगन्नाथला गेले की द्वारकेला

जावेसे वाटते. भाषांचा, वंशांचा, पोशाखांचा भिन्नपणा कधीही ह्या एकत्वाच्या जाणिवेच्या आड येत नाही. उलट अनेकांतून एकत्व, विविधतेतून साम्य हा आमच्या संस्कृतीचा गाभा आहे. हल्ली मात्र राजकारणी पुरुषांना अनेकत्वाची व विविधतेची भीती वाटू लागली आहे! सांस्कृतिक आयुष्याच्या सर्व क्षेत्रांत केंद्रीकरण करण्याची धडपड चालू आहे. ही धडपड सांस्कृतिक मूल्यांसाठी नसून सत्तेचे केंद्रीकरण करण्यासाठी आहे, असे वाटते.

मंदाकिनी ओलांडून पोथीवासाला येऊन पोचलो, तेव्हा दिवस चांगला वर होता, दिवसभर जरा निर्जल प्रदेशातून चाललो होतो. त्यामुळे पोथीवासा फार रम्य वाटले. गावाच्या तीनही बाजूंना उंच डोंगर, मधल्या खबदडीत सर्व बाजूंनी खळखळ झरे वाहत होते व त्यांतच गाव बसले होते. खाली असते तर कदाचित उकडले असते; पण आम्ही बऱ्याच उंचावर— सात-आठ हजार फुटांवर तरी आलो होतो; म्हणून गारवा चांगला होता. गावात शिरल्यावर रात्रीच्या मुक्कामासाठी आधी जागा शोधली. एक लांबच लांब घर मिळाले. आधी आलेली मंडळी मराठीच होती व एका कोपऱ्यात आम्हापुरती जागा होती. तिथे मालकी शाबीत करण्यापुरते गाठोडे टाकले. समोरच्या घरवाल्याच्या दुकानात चहा-कॉफी प्याल्यावर शीण गेला. तेथून घोडी घेऊन तुंगनाथला जायचा बेत केला होता.

गावाला वेढा देऊन जे डोंगर उभे होते तेच आम्हांला उद्या चढायचे होते. म्हणजे पाणलोट ओलांडून आम्ही अलकनंदेच्या खोऱ्यात पोचणार. अजून तरी इथले ओढे-नाले मंदाकिनीला मिळणारे होते. आम्ही केदारनाथच्या राज्यातच होतो.

वरून रिकामी घोडी खाली येत होती; पण कोणी घोडेवाला दुसऱ्या दिवसाचा वायदा करावयास तयार होईना. पोथीवासाहून तुंगनाथ सारा साडेचार मैल होता व तेवढ्याचे पैसेही फार मिळायचे नाहीत. सर्वांची आशा ग्वालियाबगड किंवा उखीमठ येथून स्वाऱ्या मिळाल्या तर पाहाव्यात. रात्र पडू लागली. वन्सं व हमालही येऊन पोचले; आणि बाहेर थंडी पडू लागली म्हणून शेवटी घरात गेलो. चंडीप्रसाद बड्या माताजींसाठी चहा आणायला गेला. तो म्हणाला, "मी बघतो घोडी, तुम्ही स्वस्थ असा." आज चाल मोठी व चढाची झाली म्हणून गडी पण दमले होते. ऊन लागूनलागून

वन्संही हैराण झाल्या होत्या; म्हणून दूध पिऊन व फराळाचे खाऊन निजायचा बेत केला. गड्यांनी खिचडी करून खाल्ली. शेजारच्या मंडळींचा स्वयंपाक चालला होता; त्यांच्याशी गप्पागोष्टी सुरू झाल्या. ती वऱ्हाडची होती. दोनतीन कुटुंबे सोबतीने आली होती. त्यांच्या पलीकडे आणखी दोघे प्रवासी होते. बायको मलेरियाने आजारी होती. ताप नसेल त्या दिवशी पॅल्युड्रिन घ्यावयाचे व पुढे जायचे; ताप भरला म्हणजे धर्मशाळेत पडून राहावयाचे, असा त्यांचा क्रम चालला होता. बाई मला फारच थकलेली दिसली. केदार करून आमच्याप्रमाणेच मंडळी बद्रीला चालली होती. शेवटी यात्रा पूर्ण केली की नाही कोण जाणे! बहुतेक केली असेल; कारण 'देह जावो अथवा राहो, यात्रा पार करायचीच,' असा ह्या लोकांचा निर्धार असतो.

इतर मंडळी बरीच बोलकी होती. यात्रा असली म्हणजे मनुष्य काय काय करतो याबद्दल गोष्टी निघाल्या. वन्सं म्हणत होत्या. "घरी चहा फार तर दोनदा घेत असे; पण इथं शोष पडतो. मुलं म्हणतात, चहा घे- पेला भरभरून पुढं करतात, घेते मग. मुक्कामाला आलं की रोज तेलानं पाय चोळायचे बसल्या बसल्या. घरी का कुणी देहाचे एवढे उपचार करतं!" त्या बायांनी व पुरुषांनीही होकार भरला. "अंगात गरम लोकरीचं, डोकीला गरम पट्टा असं पुरुषांच्या बरोबरीनं कधी कुणी गावात जाईल का? पण इथं तर आता तो प्रकार रोजचाच!" त्या बाया म्हणाल्या.

एकीने सर्वांचे बूट आवरता आवरता म्हटले, "अहो उभ्या जन्मात कधी बूट घालून जाईन असं स्वप्नातसुद्धा आलं नव्हतं. पण आता आपलं पुरुषासारखं बूट-मोजे घालून रोज चालतो. ते बूट घालायचे कसे हेसुद्धा माहीत नव्हतं. अन् अजून पण रोज घोटाळा होतो!" आम्हांला सर्वांनाच हसू आले. यात्रेत प्रत्येकाच्या पायांत बूट, पण घालण्याच्या तऱ्हा मात्र निरनिराळ्या. उजव्या पायाचा डाव्यात, डाव्याचा उजव्या पायात असे बूट घालणारे आम्हांला आढळले होते. उत्तर हिंदुस्थानचे लोक बूट नीट घालीत; पण दक्षिणेकडच्या व बंगाली बायांना व माणसांना ते जमत नसे. शेवटी त्रासून बूट फेकून द्यावयास निघालेली बाई दिसली. एका यात्रेकरूने अंगठ्याजवळचे कापड फाडून अंगठ्याला मोकळीक करून दिली होती, तर एकाने अंगठा व शेजारचे बोट ह्यांमध्ये एक पट्टी ठेवून पुढचा सबंधच बूट

वरून कापून काढला होता! बुटाचे बंद बरेचजण बांधीतच नसत. यात्रेला निघाले की हृषीकेशला काठ्या व बूट खरेदी करीत. त्यांतल्या बहुतेकांनी तोपर्यंत कधी बूट पायात घातलेलेच नसत व मग अशी त्रेधा होई!

रात्री पाऊस पडत होता, थंडी पण बरीच पडली होती. आम्ही उतरलो होतो ती धर्मशाळा नेहमीप्रमाणे पडवी नसून चांगले पक्के बांधलेले लाकडी दरवाजाचे घर होते. दार घट्ट लागले तेव्हा बरी ऊब आली. दुसऱ्या दिवशी पहाटे उठलो. चंडीप्रसादने सांगितलेले दोन्ही घोडेवाले आपापल्या जनावरांना घेऊन येऊन तणतणत भांडत होते. शेवटी त्यांना तसेच सोडून आम्ही दोघे झपाट्याने पुढे निघालो. त्यांच्या भांडणामुळे निघायला जवळजवळ तासभर उशीर झाला. "नाही तुंगनाथ पाहिला म्हणून काही एवढं बिघडत नाही. जे पाहिलं आहे तेसुद्धा असामान्यच नाही का?" असे मी म्हटले; पण मनातून मी फार खट्टू झाले होते, तो काहीच बोलला नाही.

दाट रानातून मार्ग होता. पक्षी सारखे बोलत होते; पण एखादाच क्वचित दृष्टीस पडे. दोन पक्षी सारखे एकमेकांना साद देत होते. त्यांच्या बोलांवरून कोकिळेच्या जातीचे (परभृत) असावेत असे वाटले; पण प्रयत्न करूनही दृष्टीस पडेनात. सबंध रान मात्र त्यांच्या बोलांनी निनादून गेले होते. वाटेत एक पहाडी इसम भेटला. त्याला विचारले, "हा बोलतो आहे तो पक्षी कोण?" त्याने जरा कान देऊन ऐकले व म्हटले, "कुणा बिचाऱ्या मेलेल्याचा आत्मा आक्रोश करतो आहे!" ही कल्पना ऐकून मी चकितच झाले. त्याला आणखी काही विचारीन तर तो कधीच झपाट्याने पुढे गेला होता! पोथीवासाभोवतालची डोंगराची साखळी आम्ही जवळजवळ ओलांडली होती तो वरून खाली रिकामे घोडे येताना दिसले. "येणार का तुंगनाथाला? काय घ्याल?" "चार रुपये." "ठीक, चला" आम्ही घोड्यावर स्वार होऊन पुढे सटकलो. आता खास तुंगनाथ भेटणार ह्या विचाराने आमची मने हिमालयापेक्षाही उंच झाली!

काही मिनिटांतच चढ चढून वर एका पठारावर आलो. समोर तुंगनाथाचा डोंगर तीन हजार फूट उंच उभा होता. त्याच्या पायथ्याला वळसा घालून चमोलीची वाट गेली होती. वन्सं मागे होत्या. त्या त्या वाटेने जाणार होत्या. आम्ही तुंगनाथ चढून, दुसऱ्या बाजूने उतरून त्यांना मिळणार होतो. पायथ्याच्या-आम्ही उभ्या असलेल्या बाजूच्या गावाचे नाव चौपता.

येथे आम्हांला हिमालयाची एक सबंध रांग पहिल्याने दिसली. सूर्य नुकताच वर आला होता. हिमाच्छादित शिखरे गुलाबी रंगली होती. हिमनद्या चमकत होत्या व साधारण बारा-चौदा हजार फुटांवर आल्या की बर्फ वितळून त्यांच्यातून हजारो ओहोळांनी पाणी खाली धावत होते. किती पाहिले तरी पुरे वाटत नव्हते! शेवटी उशीर होईल म्हणून निघालो व एका रम्य राईतून चढणीला आरंभ केला. इतक्या उंचीवर झाडांचे शेंडे हिमाने कोळपून काळे पडतात. खाली वसंतऋतूतील हिरवी-पोपटी पालवी व वरती काळा झालेला, शेवाळलेला, वेडावाकडा वाकलेला झाडाचा शेंडा असे दृश्य दिसत होते. खालच्या हिरवळीत नाना तऱ्हेची फुले उमललेली होती; पण आज आम्ही घोड्यावर असल्यामुळे ती तोडणे शक्य नव्हते.

हळूहळू मोठ्या पानांची झाडे जाऊन चाडसारखी सूचिपर्णी झाडे आली. चढ एवढा झाला, की घोडी दर वीस-पंचवीस पावलांनी विसावा घेण्यास थांबू लागली. अर्धी वाट चढल्यावर उतरून घोड्यांना विश्रांती दिली. झाडांचा प्रदेश संपला होता. आता फक्त हिरवे गवत व झुडुपेच होती. खालच्या उतरणीवर ऱ्होडोडेंड्रॉनचे वृक्ष होते. त्यांना फुले येऊन गेली होती व कुठे चार-दोन ताजी फुले शिल्लक राहिलेली व बाकीची सुकलेली, म्हणून आम्ही अगदी हळहळत होतो. पण येथे साडेदहा अकरा हजार फुटांवर गेलो तो ऱ्होडोडेंड्रॉनची झुडुपेच दिसली व सर्व ताज्या टवटवीत फुलांच्या गुच्छांनी भरली होती! खाली फुलांचा रंग गडद तांबडा, तर येथे निळसर जांभळा व पांढुरका असा होता. आणखी वर गेलो तर झुडुपेही नाहीशी झाली! काळेभोर दगड जिकडेतिकडे पसरलेले होते पोथीवासापासून तुंगनाथाला येईपर्यंतच्या चार मैलांवर दोन ऋतू व पृथ्वीवरील निरनिराळे अक्षांश ह्यांचे दर्शन पुन्हा एकदा झाले. वर प्रदेश निर्वृक्ष होता तरी निर्जल नव्हता. प्रत्येक कपारीतून खळखळ पाणी वाहात होते. काही ठिकाणी चिखल झाला होता.

पर्वताच्या माथ्याजवळ जाऊ लागलो, तसतसे यात्रेकरू वाटेवर बसून एकावर एक दगड रचताना दिसले. येथले दगड गोटे नसून सपाट कपच्या कपच्या निघालेले असे होते. त्यातील दोन उभे करून त्यांवर तिसरा आडवा ठेवायचा, अशी लहानलहान एक किंवा दुमजली घरकुले लोक बांधीत होते. हे काय म्हणून विचारता त्यांनी सांगितले, 'पितरांसाठी घरे!' तुंगनाथवर पितरांसाठी घर बांधावे व दान करावे असे आहे. पाहिले तो वाटेच्या दोन्ही

बाजूंला पितरांची चिमुकली घरे हारीने उभी होती! कोणाकोणाची पितरे बसली होती कोण जाणे! आम्ही जिवंत माणसे ह्या मेलेल्यांच्या नगरीतील राजमार्गाने चालले होतो. पूर्व भारतातील जंगलात राहणाऱ्या काही जमाती मृतांचे अशा तऱ्हेचे स्मारक प्रचंड शिळा उभारून करतात. अशी स्मारके करणारे लोक पूर्वी युरोपपासून भारतापर्यंत पसरलेले होते असा संशोधकांचा दावा आहे, त्यांचेच तर हे अवशेष नसतील ना? एका मराठी लोकगीतात दगडांची रास करण्याचा उल्लेख आहे– "असा पुतूर इमायनी, रची दगडाच्या टिमायनी." का रचीत होता कोण जाणे! एकदा मी जेजुरीला गेले होते. तिथे कडेपठाराच्या देवळाला जाताना वाटेत दगडांची रास आहे, त्यावर प्रत्येकाने दगड टाकायचा असतो; म्हणून मी व माझ्या बरोबरच्या बाईने दगड टाकलेले आठवतात. ह्या राशी का रचायच्या, ह्याबद्दल मात्र कोणी काही सांगितले नाही.

रोजच्याप्रमाणे ढग यायला सुरुवात झाली. वाटेत वेळ मोडणे शक्य नाही म्हणून पितरांच्या घरांचा फोटो काढण्याचे मनात असूनही पुढे सटकलो. लौकरच देवळाजवळ पोचलो. एका पंड्याच्या अंगणात घोडी उभी राहिली. आम्ही उतरलो व पंड्याला सांगितले, की फोटो काढून मग पुढचे बोलू. तसे त्याने फोटो काढण्यास योग्य अशा एका उंचवट्यावर आम्हांला नेले. आम्ही हिमाच्छादित रांगांपासून जरा दूरवर असलेल्या एकाकी शिखरावर उभे होतो व समोर गंगोत्रीपासून बद्रीनाथपर्यंत लांबच लांब पसरलेली पर्वतांची रांग दिसत होती. तेरा ते चौदा हजार फूट उंचीचे लांबच लांब एक पठार होते. त्यावर दाट बर्फ पडलेले होते व त्यातील घडीतून हिमनद्या वाहात होत्या. त्या खाली आल्या की काळ्याभोर दगडांतून पाण्याच्या प्रवाहरूपाने शतधारांनी वर्षत होत्या. बर्फाच्छादित पठारावर अधूनमधून उंच उन्हात चमचमणारी वीस ते बावीस हजार फुटांपर्यंत गेलेली प्रचंड शिखरे दिसत होती. केदार, चौखंबा, नीलकंठ अशी त्यांची नावे. चौखंबा हा चार शिखरे मिळून बनलेला एक हिमपर्वत आहे, एखाद्या देवळासारखा दिसतो. पांढरेशुभ्र चमकणारे हिमाच्छादित पर्वत, खालच्या कडेला भयानक, काळेभोर, गवताचे पानसुद्धा नसलेले मोठेमोठे कडे, त्याच्या खाली हिरव्या गवताने अंथरलेल्या वरच्या उतरणी, त्या खाली वृक्षराजींनी झाकून टाकलेल्या

पर्वताच्या खालच्या उतरणी व सर्वांच्यावर चमचमणारे, स्वच्छ निळे आकाश डोळ्यांत साठवले. फोटो काढता काढता भराभर ढग येऊन समोरचे दृश्य नाहीसे झाले. अधूनमधून एखादा पर्वत दिसे; पण चित्रांतला बारकावा नाहीसा झाला. आणखी फोटो काढणे शक्य नव्हते, म्हणून कॅमेरा बंद केला.

"आपले फोटो काढून झाले; आता ज्या स्थानी आलात, त्याचा आदर करणे योग्य नाही का?" आमच्याबरोबरच्या पंड्याने विचारले. "ठीक आहे; पण काय तुमचे विधी असतील ते लौकर आटपा; आम्हांला पुढे दहा मैलांची चाल आहे." "चला तर मग माझ्याबरोबर; आधी कुंडात हातपाय धुऊन शुद्ध होऊ." जाताजाता त्याने ताजी पुरीभाजी करण्याचा निरोप घराशेजारच्या दुकानदाराला सांगितला व आम्ही कुंडाशी गेलो. हातपाय, तोंड धुतले तर कळा लागण्याइतके पाणी थंड होते. तरी भाविक लोक स्नान करीत होते व स्नान करून गारठलेल्या यजमानांना हात धरून पंडे लोक रसरसलेल्या शेगड्यांशी नेऊन बसवीत होते. पंड्याने संकल्प सांगितला व आम्ही दक्षिणा देऊन देवळाच्या वाटेला लागलो.

पंड्याने सांगितल्याप्रमाणे देवांच्या पुढे पैसापैसा टाकीत मुख्य देवळात जाऊन दर्शन केले. देऊळ अगदी लहान होते. बाहेर चौथरा होता; त्यावर येऊन उभे राहिलो व परत एकदा चौफेर नजर टाकली. उत्तरेकडे हिमालयाच्या रांगा पसरल्या होत्या; दक्षिणेकडे, पश्चिमेकडे, पूर्वेकडे, पहावे तिकडे पर्वतच पर्वत, अगदी क्षितिजाच्या वाटोळ्या धारेपर्यंत पर्वतांच्या रांगाच रांगा पसरल्या होत्या. पंड्या परत परत काहीतरी सांगत होता. माझे लक्षच नव्हते. शेवटी त्याने मला हालवले,

"माताजी मनाची काय इच्छा आहे?"

मला त्याच्या बोलण्याचा अर्थच समजेना. त्याने परत प्रश्न केला, "कोणता हेतू मनात धरून यात्रेला आलात?" हेतू? इच्छा? छे, काही नाही. माझे मन– मला निराळे असे मनच राहिले नव्हते. वरच्या निळ्या आकाशाला काही इच्छा होती का? काळे फत्तर काही हेतू मनात धरून का स्त्रवत होते? त्या अफाट पसरलेल्या पर्वतांच्या रांगा कोठच्या कामनापूर्तीसाठी का थिजून उभ्या होत्या? मी त्यांच्यातलीच झाले होते. मीच ते निळे आकाश, ते कडे, ते डोंगर, ते अनंत अमर्याद चैतन्याने

स्फुरणारे आकाश झाले होते. पंड्याने परत म्हटले, ''माताजी– आपली इच्छा मनातच ठेवा; मला सांगण्याची गरज नाही. मी संकल्प म्हणतो.'' इच्छापूर्तीचा मंत्र म्हणून त्याने सूर्याकडे उदक उडवले. ''चला, आता फराळ करा, लौकर उतरायला लागा; नाहीतर मुक्कामाला पोचणार नाही,'' असे म्हणून त्याने आम्हांला आपल्या घरी चालवले. आम्ही पण त्याच्या मागोमाग निःशब्द गेलो. त्याच्या अंगणात बसून एका ताटात आणलेल्या गरम पुऱ्या व भाजी खाल्ली. दक्षिणा देऊन त्याची तृप्ती केली व देवळाच्या डाव्या कडेने पलीकडच्या उतरणीला लागलो.

वाट अरुंद आणि दगडधोंड्यांनी भरलेली होती. आलो तो चढ बरा, इतका कठीण उतार होता. इकडेतिकडे, वर, चौफेर पाहात चालणे शक्यच नव्हते. शंभर पावले चालल्यावर थांबलो, आलेल्या वाटेकडे दृष्टी टाकली व सुस्कारा टाकून, तिच्याकडे पाठ फिरवून उतरावयास आरंभ केला. निर्वृक्ष उतरण. काही हजार फूट उतरल्यावर चांगले दाट रान लागले व सूर्याचा ताप भासेनासा झाला. ह्या रानात फुले केदारच्या वाटेवरल्यासारखीच होती; मात्र एक नवा वेल दिसला क्लेमाटिसचा. बागेतल्या क्लेमाटिसच्या तिप्पट मोठे फूल होते. पण वास नव्हता. हिमालयातल्या व्हायोलेटलाही वास नव्हता. जाई, कुसरी व गुलाबांना मात्र मंद सुवास होता. तरी वास अगदी दरवळून जाईल अशी फुले मात्र दिसली नाहीत. बद्रीच्या वाटेवर तमाल आढळला, पण तोही वासाला आपल्या महाबळेश्वराच्या किंवा आणखी दक्षिणेकडील कूर्गच्या रानातील तमालपत्राइतका सुवासिक नव्हता. हिमालयातील सगळीच पाने-फुले अशी का? हा उंचीचा गुण की काय, कोण जाणे.

उतरताना खाली जंगलचट्टी दिसली. तिथल्या माणसांचे आवाजही ऐकू येऊ लागले. संपला वाटते उतार. पण छे, अजून अर्धी वाट काटायची होती. वातावरणात धूळ अगदी नसते म्हणून व विशेषतः धुके नसले म्हणजे लांबवरचे इतके स्पष्ट दिसते, की हातावर आहे, असा भास होतो. त्याचप्रमाणे शहरी जीवनातला गोंगाट, निरनिराळे यांत्रिक आवाज मुळीच नसल्यामुळे लांबचा शब्दही स्पष्ट ऐकू येतो. ह्यामुळे हिमालयात पुष्कळदा पहाड, झाडे, माणसे दूरवर असूनही अगदी जवळ आहेत असे वाटते, चालताना वाट लांब आणि जायचे ठिकाण तर चारपाचशे फुटांवर असे

होते! ह्याचे आणखी कारण म्हणजे जवळजवळ सर्व वाट वळणावळणांनी गेलेली आहे. पर्वताच्या कडेने जाताना दोन पुढे आलेल्या टोकांवरचा रस्ता असा अगदी आपल्यापुढेच आहेसे दिसते– तो खरोखर तसा असतोही–पण फक्त उडता येणाऱ्या पक्ष्याला! रस्त्याच्या दोन टोकांमध्ये एखादा लहानसा ओढा वा नदी खळखळत असते व आपण उभे असतो तेथून हजार दोन हजार फूट उतरून परत तितकेच चढावे तरी लागते किंवा वरच्या वरून रस्ता असला तर डोंगर माथ्यावर असलेला एखादा लहानसा पूल ओलांडून परत पलीकडच्या बाजूला तितकेच अंतर चालावे लागते!

दोन टोकांमधले अंतर, हे प्राण्याचा आकार व प्राण्याच्या हालचालीचा प्रकार ह्यांवरच अवलंबून असणार. डोंगराच्या दोन टोकांतले अंतर बंदुकीच्या गोळीला त्या टोकांना सांधणाऱ्या सरळ रेषेइतके असेल; पक्ष्याला लहान-मोठ्या वक्राकार उलट्या किंवा सुलट्या कमानीइतके असेल; तर पायी चालणाऱ्या मनुष्याला अगदी वेड्यावाकड्या खालवर गेलेल्या, भूमितीच्या कोणत्याच सुरेख आकृतीत न बसण्यासारख्या रेषेसारखे ते असते. मनुष्याच्या पायांना लहानमोठे खाचखळगे व दगड-धोंड्यांचे उंचवटे सरळ ओलांडून तरी जाता येतात; पण मुंगीच्या चिमुकल्या पायांना प्रत्येक खळगा व प्रत्येक धोंडा म्हणजे एक प्रचंड दरी व प्रचंड पर्वत वाटत असेल, व आपण ज्यांना दरी व पर्वत म्हणतो त्यांचा आकार बिचारीला अगम्यच असणार!

जंगलचट्टीला पोचलो तो वन्सं पण तिथेच. त्यांना म्हणालो, "आता इथे थांबायचं नाही, पुढच्या मुक्कामाला जाऊ," व तसेच पुढे निघालो. तासाभरात मुक्कामाला आलो. वन्सं भयंकर थकल्या होत्या. लोकांना दिसायला दिसते, की माणूस छान दुसऱ्याच्या पाठीवर बसून येत आहे; पण त्या माणसाला काही फारसे सुखाचे वाटत नाही. जरा थोडी हालचाल केली की खालचा माणूस बजावीत असतो, "माताजी, निश्चळ बसा." माणसाच्या चालीने टोपली खालीवर होते, त्याने बरेचदा गचके बसतात. वरून रणरण ऊन लागते. तरुण माणसाला इतके कष्ट वाटणार नाहीत; पण त्यांना यात्रा कष्टाची झाली.

थोडा वेळ थांबून उतरावयास सुरुवात केली. आजचा प्रवास दाट रानातून होता. ऊन मुळीच लागत नव्हते. रोज मंदाकिनीचा खळखळ

आवाज ऐकू येण्याची इतकी सवय झाली होती, की आज अगदी चुकल्याचुकल्यासारखे वाटत होते. जसजसे खाली येत होतो, तसतसा तुंगनाथाचा डोंगर जास्त उंच वाटत होता. पलीकडच्या बाजूने सातआठ हजार फूट चढून आले की तुंगनाथ पुढे चार हजार फूट उंच दिसतो. त्या बाजूने तुंगनाथावरून उतरले की माणूस थेट अडीचतीन हजार फुटांवर येऊन ठेपतो. म्हणजे तुंगनाथाची प्रचंड भिंत जवळ जवळ दहा हजार फूट डोळ्यांपुढे दिसते! उतरून उतरून पायाचे तुकडे पडले. जरा सपाटीवर चालायला मिळाले तर किती बरे होईल, असे सारखे वाटायचे. शेवटी अगदी संध्याकाळी मंडलचट्टीशी येऊन ठेपलो. तासा दीडतासाने वन्सं पण येऊन ठेपल्या. सगळीजणे इतकी दमली होती, की जवळचे फराळाचे खाऊन, दूध पिऊन लौकरच निजलो. आम्ही पाणलोट ओलांडून अलकनंदेच्या खोऱ्यात येऊन पोचलो होतो. एक लहानशी नदी तुंगनाथ, रुद्रनाथ वगैरे पहाडांतून येऊन वाहात होती व रोजच्याप्रमाणे आमच्या यात्री जीवनाचे पार्श्वसंगीत परत ऐकायला मिळत होते.

दुसऱ्या दिवशी पहाटे निघालो. मार्ग सोपा व रम्य होता. सगळीकडून ओढे वहात होते व त्यांच्या पाण्यावर भात व गहू लावला होता. प्रत्येक ओढ्याने मोठमोठे दगडधोंडे वाहून आणले होते. त्यांचे गडगे शेताला व शेळ्या-मेंढ्यांच्या बसायच्या जागांना घातल्यामुळे खोरे दगडाने भरलेले दिसत होते. तरी जिथे जिथे माती होती तिथे झुडपे उगवून आली होती.

पक्षी पण खूप पाहावयास मिळाले. एक मोठी गंमत पाहिली. एका घारीच्या मागे कोतवाल पक्ष्यांचे एक जोडपे लागले होते व घार त्यांना चुकवण्याचा प्रयत्न करीत होती. दोनचारदा तरी कोतवालाने घारीला टोचले व शेवटी घार हार खाऊन पळून गेली. कोतवाल आकाराने लहान, पण मोठा धीट असतो व कावळा, घार वगैरे दरवडेखोरांवर तुटून पडतो. कावळादेखील घारीचा पाठलाग करताना आम्ही पुढे एकदा पाहिला. घारीला वरून जोराने खाली झडप घालता येते, पण चटकन् दिशा बदलून पलटी खाणे तिला जमत नाही. एकदा ती उंचावर गेली म्हणजे इतर बारक्या पक्ष्यांना तिचा पाठलाग करता येत नाही; पण ती खाली असली म्हणजे कोतवाल व कावळा तिच्या भोवती फिरतात व पटकन् वर जाऊन

तिला टोचतात व हैराण करतात. घारीसारख्या बलाढ्य दरोडेखोराशी यशस्वी लढाई दिल्याबद्दल मी त्या चिमुकल्या कोतवालांचे अभिनंदन करून शुभ शकुन झाला अशा आनंदात पुढे चालू लागले.

दोन-अडीच तास चालल्यावर चमोलीला आलो. वाटेत दोनतीन देवळे होती. काही पावती फाडून देणारे व काही नुसतेच हात पसणारे भिकारी होते. त्या सर्वांच्या त्रासातून सुटका करून घेत चाललो होतो.

ह्या वाटेवर पुढे थेट बद्रीपर्यंत अधूनमधून संगमरवराचा दगड दिसला. मोठा उंची संगमरवर नव्हता; पण पुष्कळ होता. चमोलीला लोक डोंगरातील दगड फोडून लहान लहान घरे बांधीत होते. त्यात बराचसा पांढरा, पिवळा व लालसर संगमरवर होता. पुढे बद्रीच्या वाटेवर एका अरुंद जागी माती वारंवार ढासळते म्हणून दगडाची घाटी जवळजवळ अर्धा मैल बांधलेली आहे. त्यातसुद्धा ह्याच उंची दगडाचे प्रमाण बरेच दिसले. शंकराच्या देवळाची वाट सोडून धनाढ्य विष्णुमंदिराची वाट चालू लागलो त्याचीच ही निशाणी होती.

सुदैवाने त्याच दिवशी मोटर मिळाली आणि पीपलकोठीला पोचलो. पीपलकोठीमध्ये रणरण ऊन, वैराण प्रदेश, सर्वत्र धूळ, माणसांची वर्दळ व लाउडस्पीकरचा आवाज यांनी आम्हांला नकोसे झाले! दुपारचे दोन वाजले होते. आकाशात ढग आले होते, गडगडत होते तरी आम्ही तेथून सुटण्याकरिता तसेच पुढे निघालो. कोठेही पाणी नव्हते. रस्ता धुळीचा होता; पण सुदैवाने ढगांमुळे ऊन लागत नव्हते. दरी अरुंद व पर्वत म्हणजे हजारो फुटांचीं दगडाची भिंत उभी होती. आम्ही नदीपासून तीनचारशे फुटांपेक्षा उंचीवर चालत असूनही नदीचा खळखळाट सारखा ऐकू येत होता. नदीच्या पात्राच्या दोन्ही बाजूंना ज्वालामुखीच्या पोटात रूपांतर पावलेले थराचे दगड निरनिराळे कोन करून पर्वताच्या उतरणीवर दिसत. खालच्या जमिनीशी कोणता कोन करून डोंगर उभे होते ते दिसावे म्हणून एक फोटो घेतला; पण तो काही तितका चांगला आला नाही. दगड फोडून रस्ता काढलेला होता. हे दगड बहुतेक स्लेटचे होते व त्यांचेच पातळ चिरे इकडल्या घरांवर कौलांसारखे घालतात. ह्या दगडांत अगदी पातळ पातळ पापुद्रे एकावर एक असतात व एकदोन ठिकाणी फारच मजेदार पापुद्रे आढळले. साधारणपणे पापुद्रे सपाट होते, पण एकदोन ठिकाणी ते

लाटांच्या आकाराचे किंवा छपरावर जस्ताचे पत्रे असतात. त्या आकाराचे होते. मात्र उंचवटे व खळगे उथळ होते.

हा दगड मूळचा मातीचा गाळ समुद्राच्या व सरोवराच्या तळाशी साठल्यामुळे तयार होतो. दर ऋतूतील गाळाचा एकएक पापुद्रा म्हणता येईल. उथळ पाण्यात पाण्यावरील लाटांचे स्वरूप त्याला येते. ह्या थरांचा अग्नीशी संयोग झाला की स्लेटचा दगड होतो. स्लेटच्या दगडात पूर्वकालीन प्राण्यांचे अवशेष सापडतात; पण ह्या विभागात पुष्कळदा पाहूनसुद्धा ते सापडले नाहीत. पुढे मला कळले, की हिमालयाच्या ह्या विभागात असले अवशेष सापडत नाहीत म्हणून.

एकंदरीने केदारच्या मानाने बद्रीची वाट रूक्ष वाटली. जंगल खात्याने चीड वृक्षाच्या राया ठिकठिकाणी लावल्या होत्या; पण त्यासुद्धा पुरेशा हिरव्यागार वाटत नव्हत्या. देखावा भव्य होता, पण रौद्र होता. अलकनंदेच्या खोऱ्यापलीकडे सर्व पर्वतांवर डोके काढून उभा असलेला कामेट पर्वत मात्र फारच सुंदर दिसे. परत येताना शुभ्र चांदण्यात किंवा अगदी पहाटे तर तो फारच रमणीय दिसे. कामेटचा एक फोटो काढला. पण सगळेच फोटो पाहिलेल्या दृश्यांच्या मानाने फिके वाटतात. स्मृती मंदावली म्हणजेच फोटोची मजा वाटते; पण स्मृती ताजी असेपर्यंत फोटोतली प्रतिकृती मनाचे समाधान करू शकत नाही, असा माझा नेहमीचा अनुभव आहे. काही देखावे मात्र प्रत्यक्षापेक्षा फोटोत चांगले दिसतात; पण हिमालयाची शोभा तशापैकी नव्हे.

एक दिवस, मला वाटते गरुडगंगेहून निघालो त्या दिवशी, दोन वयस्क पुरुष बोलताना ऐकले. मराठी भाषण ऐकून त्यांना ठरल्याप्रमाणे विचारले, तुम्ही कुठले म्हणून. एकाने सांगितले, की मी अकोल्याजवळच्या गायगावाचा. एवढ्यात त्याला खोकल्याची उबळ आली म्हणून तो खाली बसला. आम्हीही त्याच्याजवळ बसलो व मग त्याला विश्रांती मिळाल्यावर बरोबरच चालू लागलो. म्हातारा बोलका होता. शेवटपर्यंत आमची गाठ पडत होती. त्या दिवशी त्याने आपली प्रवासाची हकीकत सांगितली, "एक महिना झाला मला घर सोडून." मी म्हटले, "काय, अकोल्याहून इथपर्यंत यायला एक महिना लागला! का यात्रा करीत करीत आलात?" थोडेसे हसून तो म्हणाला, "त्याचं असं झालं, ही फिरतीची तिकिटं निघाली नव्हती

का? मी म्हटलं जावं काशीला; दिल्ली, आग्रा, मथुरा बघावं व घरी यावं. मुलगे, जावई पण म्हणाले, खुशाल जा, काही काळजी करू नका. मग सामान बांधलं न् बैलगाडीनं येऊन अकोल्याला रेलगाडीत बसलो. गाडी झाली लेट. भुसावळेला पोचलो तर दिल्लीची गाडी निघून गेलेली! आता काय करावं? रात्रभर फलाटावर माशा मारीत बसायचं मनास येईना. पुढचीच गाडी मुंबईची होती; मग तिच्यातच बसलो झालं!''

... ''मग यात्रेचं काय झालं?'' मी कुतूहलाने विचारले. ''अहो, काशी नाही तर पंढरपूरला गेलो! तिथून येताना शिंगणापूर, जेजुरी केली. परतताना काही मंडळी भेटली बद्रीला जाणारी. तेव्हा त्यांच्याबरोबर निघालो. आग्रा, दिल्ली मथुरा, काशी, प्रयाग करून हृषीकेशला आलो नि आजारी पडलो. ती मंडळी पुढे गेली; मी मागेच. मनात विचार केला ही काही खरी सोबत नव्हे. बरं वाटलं की एकट्यानंच पुढं जावं; पण ताप हटेना. मग पुढं न जाता घरी गेलो. घरी गेल्यावर आराम वाटला व पडूनच होतो तो एके दिवशी जावई आले. ''मामा, बद्रीकेदारला जायचं आहे का? आपल्याकडचीच दहा-पंधरा माणसं जाताहेत.' हृषीकेशहून परत आल्यापासून मला पण बघा चैन पडत नव्हतंच. लगेच जावयाबरोबर गाडी जोडून शेजारच्या गावी गेलो, तर कळलं की सगळी माणसं अकोल्याला गेली. मग तसाच अकोल्याला गेलो. लेकीनं गायगावला जाऊन बांधाबांध केली; गावकऱ्यांनी दुसरी गाडी दिली; ती जोडून ती माझं सामान घेऊन अकोल्याला आली. तिथे चौकशी करीतकरीत मंडळी उतरली होती त्या ठिकाणचा पत्ता लागला. मग जावयानं विचारलं, ''मामा म्हातारे, आत्ताच ताप येऊन गेलेला, कसं व्हायचं?' सगळ्यांनी सांगितलं, 'काळजी करू नका. दादा आमचेच आहेत, संभाळून नेऊ.' मग त्या माणसांसंगं आलो. परत ताप आला नाही. आपल्या माणसांत यात्रा पण सुखाची होते आहे. देवाच्या मनात दर्शन द्यायचं आहे असं दिसतं.''

बोलताबोलता आम्ही पाताळगंगेशी पोचलो होतो. म्हाताऱ्याची माणसे तिथेच रस्त्याच्या कडेला बसली होती. त्यांच्यात म्हाताऱ्याला सोडून, रामराम करून पुढे निघालो. मी म्हटले, ''दहा वर्षे बद्रीला जायचं घोकता घोकता यंदा निघायचं तर कोण जिवाचा आटापिटा! आणि हा म्हातारा पाहा. मनात आलं; निघाला यात्रेला.''

"अग, त्यानं यात्रेला जायच्या आधी घरचं पाहतापाहता जन्म गेला. आता मुलगेमुली मोठी झाल्यावर तो निघाला; म्हणून त्याला काळजी नाही. त्याला आपल्यासारखी घाई नव्हती सुटली." "अरे, पण आपल्यापेक्षा कितीतरी तरुण माणसं निघाली आहेत की यात्रेला!" "पण त्यांना किती यातायात पडली, तुला कुठं माहीत आहे?"

आणि म्हाताऱ्यासारखे मनात आले निघाले, अशी माणसे विरळा. बहुतेकांची तऱ्हा तुकारामाच्या अभंगातल्या 'आवा चालली पंढरपुरा। वेशीपासुनी आली घरा।' अशीच.

जोशीमठापासून दीडदोन मैल सारखी उतरण आहे. थेट नदीच्या पात्राशी पोचेपर्यंत दीडदोन हजार फूट उतरावे लागते. येथे अलकनंदा एका प्रचंड पर्वताला वळसा घालून येते व आपल्याला तिच्या काठाकाठाने जावयाचे असल्यामुळे ती करील ते आपल्याला करावे लागते. एका बाजूने खळखळत विष्णुगंगा तिला येऊन मिळते; दोन नद्या मिळतात तेथे उंच लाटा असतात. नदीचे पात्र अरुंद, उभ्या पर्वतांच्या भिंतींतून गेलेले व रस्ता खडकांतून कापून काढलेला व अरुंद असा आहे. ह्या घाटातून जाताना मधूनमधून पर्वताच्या उतरणीवर बर्फ होते व समोर, मागे, बाजूला असलेली पर्वत-शिखरे अधूनमधून दिसत होती. पर्वत कापून कापून, वळसे घेत, उड्या मारीत, प्रचंड नाद करीत नदी चालली होती. दिवस वर आला असूनही पर्वतांच्या उंचीमुळे दाट सावली होती, वर गडद निळ्या आकाशाची धांदोटी दिसत होती आणि आम्ही मजेत एकमेकांच्या संगतीने वाट काढीत होतो.

मला थोडे पडसे झालेसे वाटत होते, आवाज बसला होता. विनायकचट्टीशी मुक्काम केला, त्या दिवशी माझा आवाज पार गेला. बोलताच येईना! दुसऱ्या दिवशी बद्रीला जायचे. सकाळी उठले तो ताप पण होता. पण मिळाल्यास घोडे करावयाचे असा बेत करून गरम कपडे घालून तसेच निघालो. नेहमीसारखे चालवत नव्हते; चढ आला की श्वासोच्छ्वास करणे जड जाई. घोडे काही मिळेना. हळूहळू चालत होतो. त्या दिवसाचे आठ मैल व चार हजार फुटांचा चढ व पुढच्या दोन दिवसांची परतीची चाल मी कशी केली, ह्याचेच मला आश्चर्य वाटते. हवा उत्तम होती. पुढची वाटही रानामुळे रम्य होती; पण बद्रीचा चढ खडकाळ व उभा होता.

बद्रीपासून मैल दीड मैलावर एक घोडे मिळाले; चढ जवळजवळ संपला होता; पण तरी ते केले व मी घोड्यावर बसून विश्रांती घेऊन पुढे गेले.

बद्रीनाथाचे देऊळ चांगले प्रशस्त असूनही गर्दीत बसले असल्याने त्याला केदाराची शोभा येत नाही. आता एक एक देवस्थान नेमलेल्या कमिटीच्या पंचांच्या ताब्यात जात आहे. देवळाची जागा बळकावून घरे व बाजार वसवलेली जमीन त्यांनी जर मोकळी केली व देवस्थाने पूर्वी होती तशी प्रशस्त अंगणात परत आणली, तर काही पंडे, बडवे, पुजारी इत्यादी देवाच्या दलालांशिवाय इतर सर्व हिंदू त्यांना दुवा देतील. काही देवळांतून दुकाने इतकी आहेत की, देऊळ उठवायचीच वेळ आली आहे! काही देवळांच्या भोप्यांनी देवळाची जमीन बळकावून सबंध भोवतालून आपले वाडे बांधले आहेत व आता या देवळात जायला मोकळा मार्गच उरलेला नाही. जायचे तर पुजाऱ्यांच्या वाड्यातूनच जावे लागते. काही देवळांत श्वासकासारी व शिलाजिताच्या जाहिराती लागल्या आहेत! हिंदूंच्या देवळाइतकी अनास्था दुसऱ्या कोणाच्याही धर्माच्या पूजास्थानांची दिसून येत नाही. बद्री, केदार व तुंगनाथ वर्षाचे आठ महिने बर्फाच्छादित असल्यामुळे ह्या देवळांची फारशी विटंबना होत नाही, हे यात्रेकरूंचे नशीब!

वन्संनी गरम कुंडावर स्नान केले. मी अंगात ताप असल्याने फक्त हातपाय धुतले. तोच तोच संकल्प ऐकून मी कंटाळले होते. "पापोऽहम्! पापकर्माऽहम्!" छेः, मी पापात्मा आहे हे मला पटतच नव्हते-शिवाय येथील पंड्यांचे संस्कृत उच्चार पण आपल्या कानाला कसेसेच वाटतात. शेवटी माझे 'ग्यातं अग्यातं' पाप सर्व नाहीसे करण्याची विनंती करून आम्ही तेथून निसटलो. पूर्वी पंडे संकल्प सांगताना यात्रेकरूंकडून नाडून पैसे काढीत, आता तसे होत नाही. देऊळ दुपारचे बंद झाले होते म्हणून कशीबशी घरी येऊन पडले. पंड्या काही केल्या प्रसाद आणीना व सर्वांना भूक लागलेली; मग चंडीप्रसादाने ब्राह्मणाच्या दुकानची पुरी-भाजी आणली व ती खाऊन आम्ही परत कुडकुडत रजया पांघरून पडलो. दोन तासांनी पंड्या प्रसाद घेऊन आला; बाकी कोणाला भूक नव्हती, म्हणून त्यांनी उगीच थोडा थोडा खाल्ला. मला मात्र परत सपाटून भूक लागली होती व मी वरणभात, मालपुवा वगैरे यथास्थित खाऊन घेतले व परत पडून राहिले.

संध्याकाळी नैवेद्याचे ताट घेऊन दर्शनास गेलो. गर्दी फार होती; पण पुरुषांच्या व बायकांच्या निरनिराळ्या बाऱ्या असल्यामुळे दर्शन झाले व प्रसाद घेऊन परत आलो. अंगात बराच ताप असावा; कारण उभे राहणे व चालणे जडच जात होते. वन्संना पंड्याला दक्षिणा द्यावयाची होती; पण त्याने तोंडच दाखवले नाही. दोन दोन निरोप पाठवले तरी पत्ता नाही. दुसऱ्या दिवशी पहाटे निघावयाचे होते, म्हणून शेवटी जिथे उतरलो होतो तिथल्या मुलांच्या हातांवर खाऊसाठी पैसे देऊन पुढे गेलो. त्या दिवसाच्या सबंध मुक्कामात कोणाचे काही हिंडणे-फिरणे झाले असेल तर दिनूचे. पाऊस पाच वाजल्यापासून पडत होता. आपल्याकडे हिवाळ्यातही नाही अशी कडक थंडी पडली होती. वन्संचे व त्याचे पंड्याबद्दल बोलणे चालले होते. मला बोलता येत नव्हते व तापामुळे बोलण्याची इच्छाही नव्हती, म्हणून मी ऐकत होते. पंडे बरेचसे अशिक्षित असतात; मंत्रोच्चार धड करीत नाहीत; पैशाचे भयंकर लोभी असतात, हे सर्व खरे. पण यात्रेच्या ठिकाणी यात्रेकरूंच्या राहण्याजेवण्याची सोय होते; थंडीसाठी रजया मिळतात, हे काय कमी आहे? आम्ही देवळात दक्षिणा भरपूर ठेवली होती व पंड्याला पंधरा रुपये द्यावयाचे ठरवले होते; पण आम्ही काही धार्मिक विधी करणार नाही, म्हणून तो इतर यजमानांच्या बडदास्तीत होता. शेवटी ते पंधरा रुपये पुण्यास परतताना आम्ही आमच्या चंडीप्रसादला दिले. पंड्याला माणशी पाच ते दहा रुपये रोजी द्यावयास यात्रेकरू खुशीने तयार असतो; पण पंड्या भांडण काढतो व मग सर्वांचाच विरस होतो. येथे येणारी काही यात्रा श्रीमंतांची असली तरी बहुसंख्य बरेच गरीब असतात व त्यांच्या भोळ्या भावाचा फायदा पंड्यांना मिळतो. हा व्यवहार थोडा कमी लोभ ठेवून झाला, तर दोन्ही पक्षांना संतोषकारक होईल.

दुसऱ्या दिवसासाठीही घोडे मिळाले नाही म्हणून पायीच निघालो, पहाटे पाचला धर्मशाळेतून निघून नदीच्या पुलावर येऊन पोचलो. परतताना एकदा डोळे भरून सर्व दृश्य बघून घेतले. मंदाकिनीला केदारपाशी फारशी मोठी दरी नाही. येथे मात्र बरेच लांब खोरे आहे. काहीसे कृष्णेच्या जोरखोऱ्यासारखे, मात्र दोन्ही बाजूंचे पर्वत महाबळेश्वरपेक्षा चौपट तरी उंच, व सर्व उंच शिखरांवर बर्फ होते. झाडी मुळीच नाही. बद्रीपलीकडे काही मैल गेल्यावर वसुंधरा नावाचा धबधबा लागतो व त्यापलीकडे

भारताच्या हद्दीतील शेवटचे खेडे माना ह्या नावाचे लागते. तेथपर्यंत जायचा आम्ही बेत केला होता; पण माझ्या तापामुळे शक्य झाले नाही. आम्ही उभे होतो ती दरी अर्धवट काळोखात होती. पायाखालचे दिसायला लागले होते. वर नजर टाकली तर पर्वतांची बर्फाच्छादित शिखरे प्रकाशाने उजळली होती. काळेभोर, गवताची पातही नसलेले, सावलीने झाकळलेले डोंगर व त्यापलीकडे उन्हांत चमकणारी शिखरे फारच रम्य दिसत होती. अलकनंदेच्या सर्वच प्रवासात छायाप्रकाशाची ही मौज दिसावयाची. पण आज बर्फाची शिखरे बरीच असल्यामुळे छायाप्रकाशाचा विरोध विशेष उठून दिसत होता. कॅमेऱ्यात रंगीत फिल्म असल्याने ह्याही वेळी आम्हांला फोटो काढता आला नाही.

हळूहळू आठ मैल चालत गेल्यावर माझा तापही उतरला; आवाज थोडथोडा परत आला व हुशारी वाटू लागली. परतीची वाट आम्ही झपाट्याने काटली. वाटेत महामंडलेश्वर यतींची राजविलासी यात्रा परत भेटली व ह्या मंडळींना यशस्वी रीत्या टाळता येऊन त्यांच्यापुढे राहता आले ह्याबद्दल श्रीबद्री, केदार व तुंगनाथ ह्या त्रयीचे उपकार मानून पुढे सटकलो.

गरुडगंगेला शेवटची रात्र काढली. मोठ्या शिकस्तीने जागा मिळाली. जसजसे दिवस जात होते, तसतशी यात्रेतील प्रसन्नता कमीकमी होत होती. यात्रेची गर्दी इतकी वाढली होती, की जागा मिळायला मोठी पंचाईत पडे. रस्त्यात धुरळाही फार झाला होता. सकाळी उठून चालू लागलो तेव्हा परत एकदा हिमालयाच्या जादूने आम्हांला भारले. पहाटेच्या चांदण्यात दूर अंतरावर कामेट चमकत होता; आकाश निरभ्र, गडद, काळेनिळे होते. कितीतरी पक्षी उठून अर्धवट अंधारातच किलबिलू लागले होते. खाली अलकनंदा खळखळत होती. जड अंतःकरणाने ह्या सगळ्यांना निरोप देऊन चालू लागलो व पीपलकोठीला आलो.

मोठ्याथोरल्या पत्र्याच्या छपरात सामान टाकून बसलो व आज पुढे जाण्याची तिकिटे मिळतील का नाही, ही विवंचना सुरू झाली. धनसिंग, वीरसिंग, चंडीप्रसाद, वन्सं व आम्ही दोघे एकत्र बसलो होतो. धनसिंग क्षणांत घरच्या गोष्टी बोले, तर क्षणांत आमची संगत सुटणार म्हणून त्याचे डोळे भरून येत. अर्ध्या अर्ध्या तासाने मोटरी येत होत्या व सुटत होत्या; त्यांचे भोंगे, उतारूंची धावपळ, खाद्यपदार्थ विकणाऱ्यांचा ओरडा

व सारखा न थांबता चाललेला लाउडस्पीकरचा आवाज आम्ही आमच्या रोजच्या जगात पोचल्याची जाणीव वेदनापूर्वक देत होते. आमची सर्वांचीच संगत सुटणार होती. धनसिंग-वीरसिंग पंचवीस दिवसांच्या वाटेवर कुठे नेपाळात उंच डोंगरात बसलेल्या त्यांच्या गावी जाणार होते. चंडीप्रसाद आम्हांला हृषीकेशपर्यंत पोचवून गढवालमधल्या आपल्या गावी जाणार. वन्सं आपल्या घरी व आम्ही एकाच घरी, तरी संसाराच्या आटापिटीत पोटाच्या पाठीमागे एकमेकाला दुरावणारच होतो. हिमालयाच्या देवभूमीत, सर्व देवांच्या सहवासात वीस दिवस आम्ही रात्रंदिवस एकमेकांच्या सहवासात घालवले; आयुष्याचा एकच क्षण का होईना पण तुंगनाथच्या शिखरावर मी अनंतत्वाचा अनुभव घेतला. हे सुवर्णक्षण आयुष्य उजळायला पुरेसे नाहीत का?

१९५४

*

# ३
# तितिक्षा

"बाबूजी, बेहनजी! जरा आगे बढो-आगे बढो-" तेच तेच वाक्य तो परत परत उच्चारीत होता. पण आत शिरल्याबरोबर जरा इकडे तिकडे पाहून, जागा रिकामी आहे असे दिसताच मी दाराशेजारच्याच एका बाकावर जागा धरली व इतर बाबूजी-बेहनजींना पुढे जाण्यासाठी वाट मोकळी केली.

एकामागून एक माणसे भरत होती. बसायच्या जागा संपल्यावर लोकं उभे राहू लागले. पहिल्यापहिल्यानेच आत शिरलेले दोघेजण सारखे घड्याळाकडे बघत होते. शेवटी न राहवून एकजण ओरडला, "काय रे, माणसं आत येण्याचं संपणार आहे का आज?" कंडक्टरने नुसते ओरडणाऱ्याकडे पाहिले व परत दाराकडे वळून "बाबूजी, माईजी, आगे बढो" हा मंत्रोच्चार करून काही जणांना हाताने जरा पुढे रेटून, खालच्या लोकांसाठी जागा केली. रांगेतली माणसे मला वाटते पन्नास असावीत-घेतल्यावर गाडी रें रें करीत चालू लागली. दर मुक्कामाला गाडीतील एखाददुसरे माणूस उतरले तर चारपाच तरी आत चढत होती.

दोन दिवसांच्या धो धो पावसाने हवा निवळण्याऐवजी जास्तच कुंद व दमट झाली होती. साचलेली पाण्याची डबकी, मधूनमधून वस्ती नसलेल्या भागांत साचलेले पाणी व बसमध्ये गर्दीत घामावलेली माणसे ह्या सगळ्यांमुळे काही विचित्र उग्र दर्प हवेत भरून राहिला होता. कंडक्टर गर्दीत शिरून तिकिटे फाडीत होता. पैसे घेत होता व दर पाच मिनिटांनी मुक्काम आला की दाराशी जाऊन आतील उतारूंना उतरवीत होता व नव्यांना चढवीत होता. परत एकदा घड्याळवाला उद्धटपणे ओरडला, "काय, जागेवर पोचवण्याचा विचार आहे तुझा, का इथंच कुजवणार आहेस आज?" दाराजवळून आत परतणाऱ्या कंडक्टरने तिकिट फाडता फाडता

म्हटले, "बाबूजी, त्यांना पण घरी जायचं आहे." "उद्धट लेकाचा!" घड्याळवाला आपल्याशीच पण लोकांना ऐकू येईल असे पुटपुटला. एक क्षणभर तिकिटांच्या पानांची चवड हातांत धरून कंडक्टरने वर पाहिले– परत भोके पाडण्याचा चिमटा हाती घेतला व तो खाली पाहून तिकिटे फाडू लागला.

त्याच्या डाव्या हातात वीतभर लांब व चार बोटे रुंद अशी निळ्या-पांढऱ्या रेघांची सुती कापडाची पिशवी होती. तिचे बंद आंगठा व शेजारचे बोट ह्यात ताणून धरून, तोंड उघडे राहील अशी ती धरली होती. उरलेल्या तीन बोटात नोटांच्या घड्या उभ्या घट्ट दाबून धरल्या होत्या. कुणी नोट दिली की तो तिची उभी घडी करून त्या बोटात धरी व उजवा हात पिशवीत घालून नाणी काढून मोड देई. त्याच्या तीन बोटांत नोटा तरी किती मावणार, हा प्रश्न माझ्या मनात आला, तोच त्याचे उत्तर मिळाले. मधे क्षणभर फुरसत मिळाली. तेवढ्यात त्याने बोटातल्या नोटा काढून खिशात ठेवल्या व परत आपले काम सुरू केले. बस शेवटच्या मुक्कामाला जाईपर्यंत नाण्यांच्या भाराने पिशवी फाटत कशी नाही, किंवा त्यात दुसरा कोणी पटकन हात का घालीत नाही, ह्या दोन प्रश्नांचे उत्तर मात्र मला मिळाले नाही.

बस सब्जी मंडीशी आली. सरकारी कचेऱ्यांजवळ लोक रांग करून उभे होते व एकएकजण आत चढला होता; इथे रांग वगैरे करण्याची बात नव्हती. गाडी थांबल्याबरोबर वीस पंचवीसजण धावत दाराशी आले. चौघे-पाचजण आत शिरल्यावर जागा भरली व कंडक्टरने दाराला आडवा हात लावून आता जागा नाही म्हणून सांगितले. काहींनी आर्जवे केली, काहींनी शिव्या दिल्या. एक वयस्क लठ्ठ बाई एक पोर बखोटीला मारून सर्वांना बाजूला सारीत दाराशी आली व कंडक्टरला बाजूला सारून आत शिरू लागली. बाहेरून एकच गिल्ला झाला. "ही कोण मागून येऊन आत शिरणार? तिला बरा आत येऊ देतोस? आम्ही काय म्हणून बाहेर राहाणार?" लोकांची दाराशी झिम्मड झाली. तेवढ्यात ही बाई पायरी चढून आली– तिने एक पाय बसच्या आत घालण्यास उचलला. "बाई, आत जागा नाही." बाईचे तोंड अखंड चालू होते. तिच्या अंगावरचे पांढरे फडके बाहेर कोणाच्या तरी पायाखाली अडकले होते ते धरून मागे वळून तिने चार सणसणीत शिव्या मोजल्या, तशी फडके मोकळे झाले पण पदर घसरून तिच्याच पायाखाली आला. कंडक्टरच्या हाताला घट्ट लोंबकळून ती चढत होती. अर्धी साडी ढुंगणाखाली घसरली होती, आतला

परकर दिसत होता– पदर कधीच पडला. शेवटी तिने हिसडा दिला, "ही गाडी चुकली तर सत्संग चुकेल, हरिकीर्तन चुकेल. तुला गाढवाला त्याची काय पर्वा?" असे तोंडाने चाललेच होते. ती आत आली. साडी सबंध सोडून एका हाताला घेतली , पोराला सावरले व शिव्या देत देत दोन्हीकडच्या बाकांतून पुढे गेली. कंडक्टरने घंटी दिली– दाराला हाताचा अडसर केला व आत घुसणाऱ्या लोकांना मोठ्या मिनतवारीने निवारले. गाडी चालू झाली.

दारापाशी खूप दाटी झाली होती. "बाबूजी, माईजी, आगे बढो!" त्याने परत घोषणा केली व तिकिटे द्यावयाचे काम सुरू केले. "कुठे जायचे?" "कुठून बसलात आपण? अडीच आणे."…. "नाही नाही, कदापि नाही. दोनच आण्यांचं तिकिट आहे. तू लुच्चा आहेस."

शेजारची दोन तीन माणसे म्हणाली, "असेच असतात हे कंडक्टर. दर बघत नाहीत, काही नाही. तोंडाला येईल ते सांगतात. इथून तिथून लुबडण्याचा धंदा!"

"नाही, अडीच आण्याचाच दर आहे बाबूजी. हे बघा… " पलीकडचे दोघेतिघे ओरडले– "पुढच्या स्टॉपवर आम्हांला उतरायचंय. अजून तिकिटं दिली नाहीत; अशी हुज्जत घालीत बसणार आहेस, का आमची तिकिटं फाडणार आहेस?"

कंडक्टरने पहिल्या माणसाचे तिकिट फाडले व ह्या दोघातिघांचे पैसे घेऊन त्याने यांचीही तिकिटं फाडली, तो मुक्काम आला. बस थांबली. लोकं उतरू लागले. कंडक्टर घाईघाईने दरवाजाशी गेला. काहीजण उतरता उतरता पैसे देऊन तिकिटे घेऊन जात होते. दोघे विद्यार्थी उतरू लागले. "बाबूजी, तुमची तिकिटं?" "का नाही आत असताना फाडलीस? आता देतो आहे होय पैसे? विसरा बच्चंजी." दोघेही कशी फजिती केली म्हणून फिदीफिदी हसत उडी मारून पसार झाले.

क्षणभर कंडक्टरने मान वर केली; उजवा हात लांबवला. मला वाटले तो त्या विद्यार्थ्यांच्या पाठोपाठ उडी मारून त्यांना मागे ओढणार. पण छे! सहनशीलतेची– तितिक्षेची-परिसीमा गाठण्यास शिकणे यासाठी कंडक्टरचा जन्म घेतलेल्या त्या भावी बुद्धाने तसे काही केले नाही. नवी माणसे आत येत होती. तो जरा बाजूला झाला व म्हणाला, "भाईजी, जरा आगे बढो…!"

*

४

# कुंकवाची उटाटेव

उमार मठाच्या प्रशस्त वाचनालयात मी सकाळपासून मापे घेत होते. खाली जगन्नाथ मंदिराच्या प्रचंड पटांगणात माणसांची सारखी ये-जा चाललेली होती. सकाळ, संध्याकाळ, रात्र-केव्हाही पाहा, चौकात माणसे नाहीत असे होत नाही. सगळ्या प्रांतांचे यात्रेकरू दिसत होते. तरी मी ऐन यात्रेच्या दिवसांत गेले नव्हते. जसा दिवसाच्या चोवीस तासांत एकही तास सुना जात नाही, तसा वर्षाच्या तीनशे पासष्ट दिवसांत एकही दिवस इथे यात्रेकरू नाही, असे होत नाही. माझ्या मनात आले की मी एक वर्षभर पुरीला राहिले; आणि मला रक्त दिल्याशिवाय यात्रा सफळ होणार नाही अशी कोणी यात्रेकरूंची समजूत करून दिली, तर सर्व भारताच्या रक्ताचा नमुना मला विनासायास मिळेल! खालच्या पटांगणातील सर्वच नाही पण काही काही मंडळी वर येऊन मला मापे देऊन चालली होती. त्यांना वर घेऊन यायचे काम पुरीतलीच काही विद्वान् मित्र निष्काम बुद्धीने करीत होते.

"हे गृहस्थ श्री.... प्रसाद. येथील सामन्तकरण. " मला मदत करणाऱ्या शास्त्रीबोवांनी सांगितले. "सामन्तकरण नाही, सम्राटकरण– सर्व करणांचे मुख्य." त्या गृहस्थांनी शास्त्रीबोवांची चूक सुधारली. "सम्राट की सभ्रान्त?" असे पुटपुटत शास्त्रीजी खाली गेले व मी त्या गृहस्थाची मापे घेऊ लागले. त्या गृहस्थाची मापे झाल्यावर दुसरा काही उद्योग नसल्याने ते तेथेच बसले व मी काय करते ते पाहात पाहात मला त्यांनी आपल्या कुळाची हकीकत सांगितली; व माझ्या कामाबद्दल माहिती विचारली. कारण म्हणजे कायस्थ. पुरीच्या देवालयाचे पुजारी जसे निरनिराळे हुद्देवाले, तसेच

जमाखर्च पाहणारेही निरनिराळ्या हुद्द्याचे. रोजचा खर्च लिहिणाऱ्या कारकुनापासून तर सर्व संस्थानाचा हिशेब पाहणारे करणांचे सम्राट अशी निरनिराळी घराणी होती. त्यांतील त्यांचे घराणे मुख्य. कोणी मंडळी आली की त्यांची मापे घ्यावी, परत बसून बोलणे सुरू करावे, असे आमचे संभाषण चालले होते.

"तुम्ही कॉलेजात शिकवता म्हणे?" मी मानेनेच होय म्हटले. हे गृहस्थ माझ्याशी बोलताना तोंडाशी उपकरणे धरून बोलत होते. मला मागून कळले की तोंडापुढे कापड धरून बोलणे हे दरबारी पद्धतीने आदर दाखवायची रीत आहे म्हणून. पण त्या वेळेला मला हा प्रकार माहीत नसल्यामुळे मला ते भारी अवघड वाटले. मला उडिया येत नव्हते, तरी सावकाश बोलले की थोडेसे समजे. त्यांना मोकडेतोडके हिंदी येत होते; तेव्हा अर्धवट हिंदी, अर्धवट उडिया असे आमचे भाषण चालले होते. "तुम्ही विलायतेला पण गेला होता वाटतं?" मी परत मानेनेच होकार दिला. "तुम्ही पोशाखात काही फरक केलेला दिसत नाही. हातांत बांगड्या, कपाळाला मोठे कुंकू, आपल्याकडचे लुगडे वगैरे दिसते आहे." सम्राटकरण परत म्हणाले. माझी मदतनीस चेहरा गंभीर ठेवून आपल्या वहीवर रेघोट्या ओढीत होती. मी अर्थात् काहीच उत्तर दिले नाही...

"अहो, तुम्ही मानसशास्त्र शिकला म्हणता, मग सिंदूर का लावतात ते सांगा पाहू?" थोड्या वेळाने करणराजांनी मला विचारले. "मला नाही बुवा माहीत." मी प्रांजलपणे कबुली दिली. गृहस्थ किंचित् हसले व विजयी मुद्रेने त्यांनी पुन्हा विचारले, "सिंदूर कोण कोण लावतात सांगा पाहू?" कुमारी व सधवा." मी ताबडतोब उत्तरले. "आमच्यात कुमारिका नाही सिंदूर लावीत. मी त्याबद्दल नाही विचारले. बायकांखेरीज आणखी कोण लावतात सिंदूर?" "मला नाही माहीत.", मी परत माझे अज्ञान प्रकट केले. "तुम्हांलाच काय, फारच थोड्यांना हे माहीत आहे. पूर्वी लोकांना माहीत होतं. पण हल्ली कुणालाच ठाऊक नाही. मी तुम्हांला सांगतो."

मी मनात पुस्ती जोडली– "ही कथा शंभूने सत्ययुगात कैलास पर्वतावर पार्वतीला सांगितली. ती सनत्कुमाराने ऐकली. त्याच्यापासून नारदाला मिळाली. ती ह्या कलियुगात नष्ट झाली. पण आज संतुष्ट होऊन ही गुह्यतम कथा मी तुला सांगत आहे."–

करणबाबू पुढे सरसावून खालच्या आवाजात बोलू लागले. "शक्तिपूजक, राजा व सुवासिनी आपल्या दोन भ्रुकुटींमध्ये सिंदूर लावतात. सांगा पाहू ह्या तिघांनीच का असं करावं?"

मी परत मान हलवली. "शक्तिपूजक शक्तीची उपासना करतो. त्याच्या भालप्रदेशी मोठा सिंदुराचा टिळा असतो. कोणाचीही दृष्टी तिकडे गेली म्हणजे तिथेच खिळून राहाते. मग तो आपल्या डोळ्यांनी त्या माणसाचे अंतःकरण बांधून ठेवतो व त्याला वश करतो. अशा तऱ्हेने तो आपले बळी मिळवतो. राजाही शक्तिमान् असावा लागतो. त्याच्या सर्वालंकारभूषित शरीरावरून मुखावर दृष्टी गेली की दोन भुवयांतील सिंदुराच्या ठिपक्यावर ठरते व अंतःकरण त्यात गुंतून राहते. मग राजा आपल्या रहस्यभेदी डोळ्यांनी त्या व्यक्तीला वश करून टाकतो. अशा व्यक्तीला राजद्रोह करणे शक्य होत नाही. पुरुषाचे अंतःकरण भटके असते. स्त्री जेव्हा पतीला भेटते तेव्हा पती तिची हनुवटी उचलून तिच्या मुखाकडे बघतो व त्या तेजस्वी मुखात, दोन भुवयांतील रक्ताचा थेंब जणू, अशा सिंदूरतिलकाकडे त्याची दृष्टी खिळते. त्याचे भटकणारे अंतःकरण स्त्री अशा तऱ्हेने काबीज करून ठेवते आणि म्हणूनच साध्वी स्त्रिया वर मान करून परपुरुषांकडे पाहात नाहीत. आता समजले सिंदूर का लावतात ते?" मी मानेनेच होकार दिला व इतका वेळ गोष्ट ऐकण्याच्या भरात उत्सुकतेने करणबाबूंकडे लावलेली दृष्टी मुकाट्याने माझ्या पायांकडे वळवली.

*

५

# खिडक्या

"सगळं पाणी इथून तिथून एक; पाण्याला पाणी मिळालं की मग हे एक, हे दुसरं असं कसं राहील?" एक जण ठसक्यात म्हणाली.

"काय हो वैनी, सगळे डोंगरसुद्धा एकच की. हा खंडोबाचा, हा बद्रीचा, हा केदाराचा, असं कसं म्हणायचं?" दुसरीने शंका काढली.

"वा! वा! तुमचं आपलं काहीतरीच. डोंगराडोंगरांत अंतर असतं. एक डोंगर संपतो नि...... "एवढे शब्द कानावर पडतात तो बोलणाऱ्या बाया विरुद्ध दिशेने ऐकण्याच्या टप्प्याआड निघूनसुद्धा गेल्या. मागे फिरून त्यांच्या बरोबर जावे, त्यांचे बोलणे ऐकावे व ह्या मजेदार वादाचा शेवट कसा होतो ते अनुभवावे, असे मनात आले; पण ते करणे शक्य नव्हते. आम्ही बद्रीच्या वाटेवर, तर त्या दर्शन करून परत निघालेल्या. दोघांनाही वाट काटायची घाई व दुसरे म्हणजे ओळखदेख काही नाही. त्यांचा मराठी पोषाख, हातवारे करून बोलणे ह्यांनी लांबूनच माझे कुतूहल जागृत झाले होते, त्यात त्यांचे हे बोलणे कानांवरून गेले म्हणून जास्तच जिज्ञासा वाटली पण ती पुरी करणे शक्य नव्हते. यात्रेत वारंवार असा अनुभव यायचा. यात्री रात्रंदिवस एका अरुंद रस्त्यावरून जात येत होते. कोणाची कोणास ओळख नाही; पण भेट मात्र काही क्षणांची व एकदाच, कधी परत परत मुक्कामा-मुक्कामाला, कधी काही तास अशी होई. अशा भेटीत काही बोलणे होई, कधी नुसते दर्शनच आणि तेवढ्यातच फक्त बाहेरचेच दर्शन नाही तर अभावितपणे अंतरंगाचेही दर्शन होई. बहुधा हे दर्शन ओझरतेच होई. एखाद्याच्या तोंडचे एखादे वाक्य त्याच्या मनाच्या कोपऱ्यावर लहानसा किरण टाकून जाई. कधी वाटे, उगीच ह्या खिडकीत डोकावलो. कधी कधी

अंतर्मनाचा आविष्कार मोठा हृद्य वाटे आणि कधी गोष्टी दिसत असूनही बोध न होता गुंतागुंत वाढे मात्र.

माझ्या गळ्यात दुर्बीण अडकवलेली असे. मी ती बहुधा पक्ष्यांचे निरीक्षण करावयास उपयोगात आणीत असे. पण मधूनमधून लांब दिसणाऱ्या हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांवरून मी दुर्बिणीतून नजर टाकी. एकदा अशीच उभी असताना शेजारी कोणीतरी आल्याचा भास झाला म्हणून पाहिले, तो धनसिंग, आमचा ओझेवाला, एकाग्रपणे माझ्याकडे पहात होता. "काय रे धनसिंग काय हवं आहे?" "बाई, तुम्ही त्या नळ्यांतून काय बघता?" मी दुर्बिणीचे मळसूत्र कसे फिरवायचे हे त्याला समजावून सांगितले व दुर्बीण त्याला डोळ्यांला लावायला दिली आणि लांब अस्पष्ट दिसणाऱ्या हिमशिखरांकडे त्याचे तोंड वळवले. 'हे काय बुवा यंत्र!' अशा कुतुहलाने जरा भीतभीतच त्याने दुर्बीण डोळ्यांना लावली व तो मळसूत्र फिरवू लागला. मी त्याच्या तोंडाकडे पाहात होते. त्याच्या कपाळावर एखादे अवघड काम करताना उमटतात तशा आठ्या होत्या, ओठ दाबलेले होते; पण लौकरच त्याचे तोंड आश्चर्याने उघडले. आठ्या पार नाहीशा झाल्या. त्याने दुर्बीण काढून लांबच्या डोंगराकडे पाहिले. परत यंत्र डोळ्यांना लावले, परत काढले. नंतर परत डोळ्यांना दुर्बीण लावून चौफेर नजर टाकली. रस्त्यापलीकडे व नदीपलीकडे प्रचंड पहाड होते. तिकडे त्याने मान वळवली व एकदम हात लांब करून मान हलवली व दुर्बीण काढून तो हसू लागला. "बाई, मला वाटलं, तो डोंगर माझ्या हाताला लागेल आणि बर्फ मुठीत घेऊन खाता येईल." परत त्याने दुर्बीण डोळ्यांना लावली व खाली नदीच्या पात्राकडे दृष्टी फिरवली. खाली खोल दोन हजार फुटांवर शेतांत माणसे काम करीत होती. ती त्याला दिसली, तशी त्याने दुर्बीण काढली. एक लांब श्वास घेतला व मला म्हणतो, "हे उंच उंच डोंगर भोवती नसते तर मला दुर्बिणीतून माझं नेपाळातलं घर आणि अंगणातली मुलं दिसली असती; नाही?" धनसिंगच्या मनात केव्हाही डोकावले तरी त्याचे घर, मुले, त्याचे धान्याने भरलेले कोठार आणि त्याच्या गावचे उंच उंच पहाड मला दिसत.

आमच्याबरोबर कधी थोडे पुढे, कधी मागे चालणारा एक बंगाली बायांचा गट होता. एकाच धर्मशाळेत उतरलो म्हणजे त्यांचे न् माझे मोडक्यातोडक्या हिंदीत संभाषण चाले. त्या मेळाव्यात दोघी बहिणी होत्या.

एक मध्यम वयाची, अहेवपणाची लेणी अंगावर असलेली, भांगात शेंदूर भरलेली अशी; व दुसरी तरुण पण केस काढलेली, पांढरे वस्त्र नेसलेली, विधवा होती. कधीकधी त्या एकत्र असत. कधी ती तरुण पोर दुसऱ्या बायांत जाऊन बसे. थोरली बहीण खाऊनपिऊन सुखी होती व तिने धाकट्या बहिणीचा खर्च देऊन तिला यात्रेला बरोबर आणले होते; इतकी हकीकत मला थोरलीकडून कळली होती. यात्रा जवळजवळ संपली होती. परतणाऱ्या लोंढ्याबरोबर आम्ही पीपलकोठीला येऊन पोचलो होतो. येथून बसने प्रवास करून रेल्वेचे स्टेशन गाठायचे होते. चालणे संपले होते. एका लांबलचक छपराखाली आम्ही गटागटाने बसलो होतो. बससाठी बाऱ्या लागल्या होत्या. बंगाली बायांतील काही जणी आमच्या शेजारीच एका घोळक्यात बसल्या होत्या. काही जणी मागे राहिल्या होत्या. गरुडगंगेवर स्नान करून त्या मागून येत आहेत असे कळले. ह्या बायांना यात्रा घडवणारा बंगाली माणूस व पंड्या तिकिटाच्या खिडकीजवळ तिकिटे काढीत होते. एवढ्यात ती थोरली बहीण अडखळत धडपडत कशीबशी पाय उचलीत येताना दिसली. तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. ती आत आली तो तिने जमिनीवर लोळणच घेतली व मोठमोठ्याने रडावयास सुरुवात केली. तिच्या मागून तिच्या बरोबरच्या बाया आल्या त्याही डोळे पुशीतपुशीत. थोरली बहीण तोंडाने काही बोलत होती, हातवारे करीत होती, धाकट्या बहिणीकडे वळून परतपरत काही सांगत होती, व मधेच कपाळावर हात मारून रडत होती. एवढ्यात त्यांच्याबरोबरचा गृहस्थ तिकिटे घेऊन आला; त्यासरशी ती धावत गेली व त्याच्या पायांवर डोके ठेवून, त्याचे पाय धरून रडू लागली. छपरात बसलेली सर्वच माणसे अगदी घाबरून गेली. झाले तरी काय? कोणी मेले की काय? थोड्या वेळाने कळले की ह्या बाया कपड्यांच्या घडीत पैसे ठेवून आंघोळीला गेल्या, परत येतात तो त्यांचे सर्व पैसे, सुमारे सहाशे रुपये– नाहीसे झाले होते. कुठे पीपलकोठी नि कुठे कलकत्ता? पैशाशिवाय एवढा प्रवास होणार कसा? आम्ही सर्वांनी वर्गणी करून तिकिटे काढून देण्याचे ठरवले पण तो बंगाली मनुष्य म्हणाला, "तिकिटं काढली आहेत, पैशाची जरुरी नाही. काळजी करू नका तुम्ही." त्या बाईचे सांत्वन करण्याचा त्याने प्रयत्न केला पण त्याला काडीचे यश आले नाही. इतरांचे पण पैसे गेले होते. त्या नव्हत्या का स्वस्थ? ही तर

श्रीमंतीण. पण ती सारखी म्हणत होती, "मी मेले असते तर बरं होतं." मला काही समजेचना की तिचं दुःख एवढं अनावर का?

आमचा चंडीप्रसाद इकडेतिकडे भटकत होता तो एवढ्यात आमच्यात आला. मी म्हटले, "एवढी यात्रा केलीन्, पण बघ बाबा, पैशासाठी कसा जीव टाकते आहे ती." तो माझ्याजवळ सरकला व मला खालच्या सुरात म्हणाला, "बाई, ती काही पैशासाठी नाही एवढी रडत. अहो, त्या काही लुगडी टाकून नव्हत्या स्नानाला गेल्या. ती धाकटी बहीण आहे ना, तिचं स्नान आधीच झालं होतं, सगळे कपडे तिच्याजवळ ठेवून ह्या नदीवर गेल्या. परत येतात तो ही तिथं बसलेली, तिच्या पुढ्यात लुगडी, पातळांच्या घड्या पण जशाच्या तशा, फक्त आंतले पैसे मात्र नाहीसे झाले होते.

चंडीप्रसादची हकीकत ऐकून मी चमकलेच. दोघी बहिणींना मी गेले आठदहा दिवस पाहात होते, त्यांतल्या एकीशी अधूनमधून बोलतही असे. पण काही विशेष असे जाणवले नव्हते. आज त्या दोघींच्या संबंधावर एकदम नवीन प्रकाश पडला. पण त्या प्रकाशाने काही स्पष्ट न दिसता मनाचा गोंधळ मात्र उडाला. मी परत घोळक्याकडे दृष्टी टाकली. थोरली बहीण किंचित् शांत झाली होती, पण तिच्या मनातला हलकल्लोळ तिच्या प्रत्येक हालचालीत दिसत होता. क्षणभर ती अगदी निश्चल बसे, दुसऱ्याच क्षणी मोठा सुस्कारा टाकून मान हालवी. काही वेळा तिच्या डोळ्यांतून सारख्या धारा वाहात, एरवी ती पुतळ्यासारखी बसे. काही वेळा कपाळावर हात मारी. कधी आश्चर्याने डोळे विस्फारून धाकटीकडे पाही, तर कधी पदर पसरल्यासारखे करून पाहून काही याचना करी. काही तासांपूर्वी ती किती सुखी, तिची यशस्वी कर्तबगार बाई होती. तिने धाकटीवर केवढे उपकार नव्हते का केले? ती श्रीमंतीत गरीब बहिणीला विसरली नव्हती काही. तिचे बोलणे कधी आढ्यतेखोर नव्हते; पण तिच्या बोलण्या-चालण्यात आत्मतुष्टी असे. मला ती समजून येई पण मला त्याची चीड येत नसे– मी थोडीच तिची धाकटी बहीण होते! आज विचारांनी उभे केलेले सर्व विश्व धुळीला मिळाले होते. किती आत्मप्रतिष्ठा, स्वतःबद्दलचा विश्वास, स्वतःबद्दलची चांगुलपणाची कल्पना, सगळ्या त्या पोरीने पार फाडून तोडून पायदळी तुडवल्या होत्या. तिचा बिचारीचा आत्मा तडफडत होता. मला तिच्याकडे बघवेना म्हणून मी धाकटीकडे पाहिले. तिचे डोळे कोरडे ठणठणीत होते. पापण्यांनी ते अर्धवट झाकलेले होते. माझी नजर तिला जाणवल्यामुळे

की काय, तिने वर मान करून माझ्याकडे पाहिले. तिचे डोळे टपोरे काळभोर होते. पण त्यात मला कसलीच भावना दिसली नाही. त्यांत दुःख नव्हते, सूडाचे समाधान नव्हते, गोंधळ नव्हता- अगदी काही काही नव्हते. क्षणभरच तिने माझ्याकडे पाहिले व नंतर नजर खाली वळवली. ती नजर मला निरागसही म्हणवेना, अगदी काहीच त्या दृष्टिक्षेपात नव्हते. काही तऱ्हेच्या काचा अशा असतात की बाहेरून आत प्रकाश येतो पण आतले काही बाहेर दिसत नाही. तसे होते तिचे डोळे. तिचा चेहराही अगदी स्तब्ध, निर्विकार होता. आसपास बाया फुसफुसत होत्या, थोरली बहीण मधूनमधून तिला काही म्हणत होती, पण त्याची तिला जाणीवच नव्हतीसे वाटले. चेहरा बोलतो म्हणतात-पण मला तिच्या डोळ्यांची व चेहऱ्याची भाषा कळत नव्हती. काही खिडक्या उघडल्या होत्या. पण अंतरंगातली खोली मला अंधारानेच भरलेली दिसली.

ह्या बाया काही माझ्या ओळखीच्या नव्हत्या. त्यांचे अंतरंग मला कळले नाही, तर नवल कसले? पण अगदी दाट ओळखीचे माणूससुद्धा आपल्या माहितीचे आहे असे म्हणणे धाडसाचे होईल. माणूस निरनिराळे मुखवटे घालून निरनिराळ्या भूमिका वठवीत असतो. नाटक म्हणून नव्हे- अगदी अंतःकरणापासून प्रत्येक जण स्वतःचे म्हणून एक प्रतीक मनाशी बाळगून असते. इतरांनाही त्या प्रतीकाची प्रचीती यावी अशी धडपड असते. बरीचजणे त्या प्रतीकाबरहुकूम तंतोतंत नाही, पण मोठ्या प्रमाणात भूमिका उठवतात. एखाद्या वेळी तळाशी गाडलेले खरे बंड करून उठते-नको त्या खोलीची खिडकी उघडते व स्वतःला व इतरांना माहीत नसलेल्या व्यक्तीचे चमत्कारिक हुरहूर लावणारे दर्शन होते.

मला एक व्यक्ती आठवली. असा मनुष्य शोधून सापडणार नाही. त्यांची वृत्ती इतकी आनंदी व संतोषी होती की, त्या भेटल्या किंवा बोलल्या तर त्याचा आनंद दिवसेन्‌दिवस मनात राही. जन्मभर इतरांसाठी झिजल्या, मेल्या त्याही झिजून झिजून तिळातिळाने. भेटायला गेले की म्हणत, 'नाही ग सोसवत आता, काही तरी द्या आणि सोडवा यातून.' जणू शरीराचे दुखणे कमी नव्हते म्हणून की काय, काही महिने त्यांना मधूनमधून भ्रम होई. भ्रम झाला म्हणजे मात्र त्यांच्या अंतरंगाचे एक कल्पनातीत दर्शन होई. भ्रमात त्यांना मुलगा, नातू, सून किंवा पणतवंडे मेलेली दिसायची, कधी मुलगी मेली म्हणून रडायच्या, कधी सून, तर कधी नातवंड गेले म्हणून उरी फुटत. खूप समजूत घातली, जे मनुष्य

मेले म्हणून त्या रडत, ते मनुष्य पुढे आणून उभे केले की काही वेळ स्वस्थ असत. परत आपल्या थोड्या वेळाने रडायला सुरुवात करायच्या. त्यांच्या आयुष्यात त्यांनी पुष्कळ दुःखे भोगली पण सर्व निःशब्द, मुकाट्याने. पण आजारपणाच्या भ्रमातील ह्या खोट्या दुःखांना वाचा होती. त्या मोठमोठ्याने आक्रोश करायच्या. लहान मूल जसे धाय मोकलून रडते तशा रडायच्या.

सारखे अंथरुणाला खिळलेले, सर्व व्यवहार परस्वाधीन, दिवसाकाठी काही तास मर्मांतिक वेदना सहन करता करता जागरूकपणी मन मृत्यू मागे, पण ते मन निजले म्हणजे जिवाची तडफडत का होईना, जगण्यासाठी सनातन धडपड चालू राही. आपल्याला मागितलेला मृत्यू दुसऱ्याला बहाल करून जीव दुसऱ्यांना दाखवी की मला दुःख होत आहे. पण जीवाचे खरे दुःख स्वतःबद्दलचेच होते. मृत्यूच्या दाट अंधारात भ्यालेला जीव आक्रोश करीत होता. स्वतःच स्वतःला फसवीत होता. "मी नाही मेलो, हा मेला-ती मेली-मी जिवंत आहे. मी त्यांच्यासाठी रडतो आहे."

कवीला द्रष्टा का म्हणतात? तो मुखवट्यांच्या आड पाहू शकतो. अगदी अंधारात दडवलेले त्याला दिसते. आपण वाङ्मय का वाचतो? त्याबद्दल इतकी आवड का वाटते? माणसाच्या रोजच्या मुखवट्याआड दडलेल्या भावना इच्छा, धडपड त्यात व्यक्त होतात म्हणून. पुस्तकातील काल्पनिक व्यक्तीच्या अंतःकरणाचा तो आविष्कार असतो. पदोपदी त्यात आपली स्वतःची ओळख स्वतःला पटत असते. पण आपली स्थिती त्या भ्रम झालेल्या बाईसारखी असते. सतत बंद केलेल्या आत्म्याच्या खिडक्या उघडतात. थोडे वारे, थोडे ऊन आत शिरते, मन मोकळे झाल्यासारखे वाटते, मुखवटे फाटतात, सत्यदर्शन होते. दडपलेले भारावलेले मन हलके होते. पण हे सर्व होत असता माझे स्वतःचे दर्शन मला होते आहे, ही जाणीव नसते. दुसऱ्या कोणाचे तरी अंतरंग आपण पाहतो असे वाटते, त्यावर आपण अगदी आडपडदा न ठेवता वादविवाद करतो, हसतो, रडतो, कीव करतो-पण ती स्वतःची, हे आपल्याला समजत नाही.

पाच पांडव द्रौपदीबरोबर महापंथाने निघाले होते. म्हातारपणाने, वाटेच्या श्रमाने एक एक मधेच थकून पडे; व उरलेले पुढे चालू लागत. मेलेला शेवटपर्यंत न जाता मध्येच का पडला, म्हणून भीम विचारी व धर्मराज युधिष्ठिर त्याला उत्तर देई. उत्तराच्या ह्या एकेका वाक्याने धर्मांच्या

हृदयाची एक एक खिडकी उघडी होत होती. द्रौपदी पडली, भीमाचे रांगडे प्रेमळ मन कळवळले. नकुल, सहदेव, अर्जुन प्रत्येकाबद्दल एक एक बोचक वाक्य बोलून थोरला भाऊ पुढे चालला होता; पण द्रौपदीच्या वेळेला त्या मनातली खरी तळमळ, आयुष्यभर पचवलेले विष बाहेर पडले. "द्रौपदीनं इतरांपेक्षा अर्जुनावर जास्त प्रेम केलं म्हणून ती वाटेतच पडली." उत्तर वरवर दिसायला किती सरळ, पण त्यात धर्माच्या आयुष्यातील अगतिकता आली. हा युधिष्ठिर कोणती युद्धे खेळला होता? कोणतीही नाही. ह्या धर्मराजाने कोणता धर्म पाळला होता? अर्जुनाने पांडवांसाठी द्रौपदी मिळवली; एवढेच नव्हे तर असहाय, राज्यातून वनवासी झालेल्या पांडवांना बलशाली पांचालांचे साहाय्य मिळवले व पर्यायाने हस्तिनापूरच्या राज्याचे वारस केले. सर्व पृथ्वी जिंकली. खांडववन जाळून इंद्रप्रस्थ स्थापले. युधिष्ठिराने-धर्माने-विनासायास मिळालेले राज्य व बायको पणाला लावली. त्या मानी राजकन्येची भरसभेत विटंबना होऊ दिली. तिला वनवास भोगावयास लावला. जयद्रथाच्या वासनेला तिचा बळी जायचा; पण तिला अर्जुनाने वाचवले. तिला विराटाच्या नीचकुलोत्पन्न राणीची बटीक केले. निरनिराळ्या निमित्ताने तिला अर्जुनापासून दूर केले. पहिल्याने एकांतवासाचा भंग झाल्याचे निमित्त करून अर्जुनाला तीर्थयात्रेस पाठवले. मग पाच वर्षे अस्त्रप्राप्तीसाठी पाठवले. जेव्हा तिने हट्टच घेतला तेव्हा स्वारी त्याच्या भेटीस निघाली. धर्म राज्यावर बसला पण ते राज्य व त्याची राणी अर्जुनाच्या शौर्याने त्याला मिळाली होती. स्वयंवरात अर्जुनाने तिला जिंकले होते– तिचे मन जिंकले होते. ती अर्जुनाच्या शौर्याचे प्रतीक होती, तशीच धर्माच्या व्यसनाधीनतेची, परपुष्टतेची, असहायपणाची, अतीव वैफल्याची, मूर्तिमंत सदैव डोळ्यांपुढे नाचणारी, हृदयाला जाळणारी आठवण होती. धर्माने आपल्या वाक्याने द्रौपदीचा दोष म्हणून सांगितला तो त्याच्याच आत्म्याचे उघडेवाघडे प्रदर्शन होते... युधिष्ठिर धर्माच्या भूमिकेत आपण सर्वच वावरत असतो. मला नाही का वाटत की मी आयुष्याच्या युद्धात स्थिर व अविचल राहिले म्हणून? मला नाही का वाटत की मी आयुष्यात धर्माने वागले म्हणून? महाभारताच्या वरील कथेत स्वतःच्या आत्म्याचे दर्शन घडत असते, पण ते आपले नव्हे म्हणून बिचाऱ्या धर्मराज युधिष्ठिराची कीव करीत, कवीची प्रशंसा करीत उघडलेल्या खिडकीतील मंद झुळूक अंगावर घेत रसिकपणाचा आव आणीत ही कथा मी मोठ्या आवडीने वाचते.

*

६

# आजोबा

"मी अगदी मजेत आहे. मी आनंद लुटतो आहे." थोडा वेळ थांबून ते परत म्हणाले, "मी आयुष्यातला आनंद लुटतो आहे."

कोणी तरी आजोबांची मुलाखत घ्यायला आले होते व आजोबा आपल्या नेहमीच्या स्पष्ट, खणखणीत आवाजात बोलत होते. आतल्या खोलीत मला सर्व मुलाखत ऐकू येत होती.

आजोबा म्हणजे मामंजी. त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलण्याचा प्रसंग फारसा येतच नाही. आला तरी हाक मारायचा येत नाही. मी घरात आल्यापासून जाऊबाईंची मुले त्यांना आजोबा म्हणत. मीही तोच शब्द उपयोगिते. आज तीस वर्षांवर मी त्यांच्या घरी आहे; निदान पंधरा वर्षे तरी ते सर्वस्वी माझ्या घरी राहतात; तरी त्यांच्या मनाचा ठाव काही मला घेता आला नाही. त्यांचे बोलणे किंवा त्यांची एखादी कृती अजूनही मला आश्चर्याचा धक्का देतात.

आताच पाहा ना. किती मनापासून ते सांगत होते की मी आनंद लुटतोय म्हणून! आणि मी आश्चर्याने ऐकत होते. माझे वय आहे बावन्न, आजोबा आहेत शंभरीच्या घरात. माझे आयुष्य दुःखात गेले असेही नाही; पण 'आनंद लुटणं' मला ह्यापुढे अशक्य वाटते. आयुष्याच्या वाटेकडे पाहायला लागले तर मध्ये मोठमोठाले पांढरे दगड आहेत, काही आनंदाच्या स्मृती आहेत, तर जवळजवळ तितक्याच दुःखाच्या घटना आहेत. किती तरी प्रेमाची माणसे नाहीशी झाली आहेत. त्यांच्या आठवणीने मी रोज अश्रू गाळीत आहे असे नव्हे; पण त्या अनुभवामुळे आज आनंद लुटणे मला अशक्य झाले आहे. 'वेणीसंहार' नाटकात एके ठिकाणी उद्गार आहेत:

"गांधारी शंभर पुत्रांस नव्हे तर शंभर दुःखांस प्रसवली." मला वाटते, ह्या उद्गारात साऱ्या जीवनाचे व मायेच्या गुंफणीचे तत्त्व गोवले आहे. आजोबांच्या शंभर वर्षांच्या आयुष्यात किती तरी प्रेमाची माणसे व सहकारी गेले. आई, वडील, दोन बायका, मुले, नातवंडे व किती तरी सहकारी. सासूबाई व थोरले भाऊजी गेले त्याला तर अशी काही फार वर्षे लोटली नाहीत, त्यांची आठवण काय होत नसेल?

थोरले भाऊजी गेले त्या दिवशी पुण्यातील लोक सकाळपासून संध्याकाळपर्यंत समाचाराला येऊन गेले. एक गृहस्थ सकाळचेच आले होते. त्यांच्याजवळ आजोबा चार शब्द बोलले; आणि ते काय, तर "आता त्याचं वय झालेलं होतं– प्रकृतीहि बरी नव्हती. एक दिवस माणूस जायचंच." भेटायला आलेला गृहस्थ तर हे उद्गार ऐकून आश्चर्याने थिजलाच; पण मलाही धक्का बसला. कुटुंबियांविषयी त्यांची वृत्ती 'जसी गोरुवे रुखाखाली बैसली' अशा तऱ्हेची आहे. दुपारच्या उन्हात गायी-बैल झाडाखाली बसतात; थोड्या वेळाने निघून जातात, काही नवे येतात. तसे कुटुंबाचे आहे.

ते घरात आहेत, पण घरातल्या माणसांशी संबंध जवळजवळ नाही म्हटला तरी चालेल. माझी लेक– त्यांची एक नात-फलटणला राहते. गेल्या वर्षी त्यांना नव्वाण्णव वर्षे पुरी होऊन शंभरावे वर्ष लागले. तेव्हा काही फलटणकर तिच्याकडे येऊन म्हणाले, "आज तुम्ही आपल्या आजोबांच्या आठवणी सांगा." ती म्हणाली, "काय सांगू? माझ्याजवळ आठवणी अशा नाहीतच. मी अगदी लहान असताना आजोबा घरी येत असत, पण कधी माझ्याशी बोललेले आठवत नाहीत. मी जरा मोठी झाल्यावर मी त्यांच्याशी जे काही बोलले ते 'आजोबा, पाणी तापलं आहे;– आंघोळीला जाता ना?... आजोबा, चहा झाला आहे... आजोबा पानं वाढली आहेत... आजोबा, तुम्हांला कुणी भेटायला आले आहे!... ह्या– पलीकडे काही बोललेली स्मरत नाही." इतर नातवंडांशी ते काही जास्त बोलले असतील असे वाटत नाही. आम्हा सुनांशीही कधी बोललेले मला स्मरत नाही. मुलांशी बोलत असत का, म्हणून खोदखोदून विचारते, पण तेही दिसत नाही. तसे ते फारसे बोलके नाहीत; अगदी अबोल आहेत, असेही दिसत नाही. पण कुटुंबात घरगुती गप्पा झालेल्या आठवत नाहीत. युनिव्हर्सिटीतदेखील सर्व कमिट्यांवर असूनही कधी माझ्या आठवणीत

बोललेले नाहीत. सासूबाई म्हणत, "आधी सर्व दिवसभर बाहेर असायचं. रात्रीचं जेवण झाल्यावर काही घरगुती विषय (आजोबांच्या मते, कटकट) काढावा. तो हे आपले भिंतीकडे तोंड करून निघून जात. मग काय करायचं? किती कटकट केली तरी हे बोलायचे नाहीत व मनचं करायचं सोडायचे नाहीत."

'मनचे करायचे' हे प्रकरणही मोठे गमतीदार. आजोबांच्या आत्मचरित्रावरून दिसते की एखादा विचार मनात आला की ते दिवसेन्‌दिवस, महिनेन् महिने त्यावर विचार करीत. एकदा विचार पक्का झाला की कृती करीत. त्यांनी कृती केली म्हणजे त्यांचे विचार लोकांना समजायचे. हिंगण्याचा आश्रम काढल्यानंतरची गोष्ट. आजोबा फर्ग्युसन कॉलेजात प्रोफेसर होते. त्यांनी कोणाला न कळवता सवरता एक दिवस आपली तीन हजारांची पॉलिसी आश्रमाच्या नावाने करून दिली. सासूबाई सांगत, "अ़ग, पुनर्विवाह केल्यामुळं पहिल्या सासरला मुकले, माह़ेराला मुकले. नव्या सासरच्या मंडळींनी वाळीत टाकलेलं. त्यातून शंकर झालेला. विधवा बाईला पोळपाट-लाटणं असतं; तोही मार्ग मला बंद. काही बरेवाईट झाले तर जीव देण्यावाचून मार्ग नव्हता मला! खूप रडले, खूप आदळ आपट केली, पण ह्यांना काही पाझर फुटला नाही. तेव्हा ठरवलं की ह्या संसारात मलाच माझं व मुलांचं बघितलं पाहिजे आणि त्याप्रमाणं केलं."

'मलाच माझे व मुलांचे बघितले पाहिजे' ह्याप्रमाणे त्यांनी केलेही. आजोबा शंभर रुपये पगारापैकी पंचेचाळीस रुपये घरात खर्चासाठी देत. त्या दिवसांत स्वस्ताई होती तरीदेखील नवराबायको, तीन मुले आणि इतर दोघेतिघे तरी कोणी घरात असत. इतक्यांचे एवढ्या पैशात कसे होत असेल ह्याचा त्यांनी कधी विचारच केला नसावा असे वाटते. सर्व स्वस्तात स्वस्त करून शिवाय दोन पैसे गाठी बांधायचे ह्या विवंचनेत सासूबाईंचा संसार कसा झाला असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. आजोबांचा बराच वेळ बाहेर जायचा, पण मुले घरीच; म्हणून काहींच्या मनात तरी सासूबाईंबद्दल अढी बसली. "आमच्या घरी खेळगडी घेऊन जायची आमची कधी छाती झाली नाही... बी. ए. च्या वर्गात गेल्यावर मला पहिला कोट शिवला... बायाला (सासूबाईंना) भांडी घासायला मी कितीदा मदत केली..." असे मुले सांगतात. सासूबाई- आजोबांच्या लग्नाचा पन्नासावा

वाढदिवस मुलांनी साजरा केला त्या दिवशी सासूबाई सांगत होत्या की, "गेल्या ५० वर्षांत कर्व्यांनी कधी मला लुगडं घेतलं नाही!"

मुलांना बी.ए.पर्यंत शिक्षण द्यावयाचे (डी.ए. सोसायटीचे लाइफमेंबर असल्यामुळे फी कधीच पडली नाही.) पुढचे त्यांचे त्यांनी पहावे, असा आजोबांचा करार. दुसऱ्या मुलाने डॉक्टरीचे शिक्षण घेतले. मुंबईस राहावयाचा व शिकावयाचा जो खर्च झाला तो आफ्रिकेत डॉक्टरी करावयास जाऊन फेडला. तिसरा मुलगा बी. एस्‌सी.त पहिला येऊन स्कॉलरशिप मिळवून बंगलोरला शिकायला गेला. तेथे एम्. एस्‌सी. झाल्यावर विलायतेला जायचे मनात आले. पैसे कुठून आणायचे? आजोबा तर कुणाजवळ मागायचे नाहीत. हिंगण्याच्या संस्थेचा सर्व किराणा माल त्या वेळी आढाव नावाच्या मंडईजवळच्या दुकानदाराकडून घेत असत. सासूबाई त्यांच्याकडे गेल्या व तीन हजारांचे कर्ज मागितले. त्या देवमाणसाने पण सासूबाईंच्या शब्दावर कर्ज दिले! कर्ज मिळाल्यावर सासूबाईंनी आजोबांच्या खनपटीस बसून त्यांना प्रॉमिसरी नोट लिहावयास लावले. विलायतच्या अभ्यासाला आणखीही पैसे लागले. पैकी साडेपाच हजार आजोबांचे कर्ज म्हणून परत केले, व त्या पैशांत शेवटचा मुलगा विलायतेला गेला. तो हिंगण्याला आजन्म सेवक झाला, म्हणून आजोबांनी त्याच्याकडून कर्ज परत घेतले नाही. सासूबाई कधी ह्या सर्व जुन्या गोष्टी काढून डोळ्यात पाणी आणू लागल्या, की आजोबा खूप वेळ एकून घेत. मग म्हणत, "अग, त्याचें सगळे नीट झाले आहे ना? आता का रडतेस?"

पहिल्या मुलावर सासूबाईंचा फार जीव. तो जोशांसारखा गोरा, बाकीची मुले कर्व्यांसारखी काळी! तो हुशार, कर्तबगार, श्रीमंत! पण खरे म्हणजे ह्या सर्वांपेक्षा पुनर्विवाह झाल्यावर झालेले हे पहिले अपत्य, तेव्हा त्यांना साहजिकच त्याच्याबद्दल फार जिव्हाळा! पण तो तर आफ्रिकेत जाऊन बसलेला. "अरे, इथं नसती का तुला डॉक्टरी करता आली?" तर उत्तर येई, "कधी घर असं माहीतच नव्हतं आम्हांला. सदा आपली धर्मशाळा. इथं पुण्यात तसंच होईल, म्हणून मी लांब जात आहे." सासूबाईंचा संसार होता खरा तसाच; पण त्याला काय त्या एकट्याच जबाबदार होत्या? पण त्या कळवळ्याने कधी बोलत, कधी रागावत म्हणून त्यांना उत्तरे मिळत. आजोबांनी कधी शब्दाने विचारपूस केली नाही. कोणी

एका शब्दानेही त्यांना बोलले नाही. शंकरराव कधी पाच वर्षांनी नाही तर दहा वर्षांनी पुण्यास यायचे. ते यायचे कळले म्हणजे "शंकर येणार, शंकर येणार. त्यानं माझ्याकडे राहिलं पाहिजे. तुम्हा कुणाकडे एक दिवस राहू देणार नाही!" म्हणून सासूबाईंची नुसती धांदल उडायची. अर्थात् सासूबाईंकडे कंटाळून दोन दिवसांतच शंकरराव कोणा तरी भावाकडे जात. पण तरीही शंकर असेपर्यंत त्यांचा आनंद उतू जाई. ते जायचा दिवस जवळ आला की त्यांच्या जिवाची घालमेल होई. बोलता बोलता डोळ्यांत पाणी येई. "शंकर आता नाही रे परत दिसणार!" म्हणून त्या वारंवार म्हणत. शंकररावांच्या पोटातही कालवून येई. ते म्हणत, "हिच्या दुःखामुळं भेटीगाठीचा आनंद पार नाहीसा होतो." सासूबाईंच्या दुःखामुळे आम्ही पण कष्टी असायचो. एक अचल तेवढे आजोबा! "शंकर आलास का?.... शंकर जातोस का?" संपले. "जैसी गोरुवे रुखाखाली बैसली."

आजोबा सर्वांशी सारखेच वागत; पण आप्पांच्या (कै. रघुनाथराव, थोरले भावजी) सांगण्यात येई की, आजोबांची त्यांच्याबाबतची वागणूक कठोर व कर्तव्यनिष्ठ होती. अप्पांना कॉलेजात जाईपर्यंत शेंडी– हजामत करून घेरा ठेवून ठेवावयास लावली होती. नाटक पाहण्याची सक्त मनाई होती आणि गंमत म्हणजे सर्व मुलांना, विशेषतः आप्पा व शंकरराव ह्यांना नाटकाचा शौक भारी. अर्थात् चोरून नाटके पहावी लागत. सासूबाई व आजोबा ह्यांच्या कचाट्यातून बाहेर पडण्याची जरूरी ह्या दोघांना विशेष वाटली.– आणि लहानपणाच्या काटकसरीची, कंजूष संसाराची प्रतिक्रिया म्हणून की काय ही दोघेही मुले बरीच खर्चिक बनली. स्वतःचे लहानपण आठवून शंकररावांनी आपल्या मुलाच्या एकाही हौसेला नाही म्हटले नाही. अर्थात् सासूबाई ह्या खर्चावर फार रागावत आणि मुलगा दाद देत नाही तर सुनेवर राग निघे. साधासाधा खर्चही त्यांना वावगा वाटे. बोलण्याने बोलणे वाढे व कटुता उत्पन्न होई. आजोबा अगदी ह्याउलट. त्यांनी कधी एका अक्षरानेही ह्याबद्दल विचारले नाही. अर्थात् आम्हा सुनांनाही आजोबा फार प्रिय. सासूबाई आल्या म्हणजे आता ह्या काय बरे म्हणतील, असे वाटे आजोबांच्या पुढे हापूस आंबे ठेवले म्हणजे आस्वाद घेऊन मोठ्या आनंदाने खात. ते आंबे स्वस्त की महाग विचारीत नसत. चहा-फराळाचे खात. आता चहाची वेळ आहे का नाही? सकाळचा हा कितव्यांदा चहा झाला?

आणि फराळाचे घरी केलेस का बाजारचे आणलेस, ह्याची चौकशी करण्याचे कधी त्यांच्या मनातही आले नाही.

आजोबांनी शंभर वर्षांच्या आयुष्यात कधी पैशाचा तरी जिन्नस बाजारातून आणला असेल असे वाटत नाही. सर्व जगभर प्रवास केला. हिंदुस्थानभर वर्गणी गोळा करीत हिंडले, पण कधी स्वतःचे आगगाडीचे तिकीट काढले नसेलसे वाटते. लोक तिकीट काढीत, हे पैसे देत. स्वतःच्या कपड्यांबाबत ते फार काळजी घेत. विशिष्ट तऱ्हेची धोतरे, डोईला बांधायचा रुमाल, विशिष्ट कापडाचा कोट, असा त्यांचा पोशाख आहे. पण हे सर्व बाजारातून आणणे, शिंप्याकडे शिवायला टाकणे ही कामे इतर मंडळी करीत– माझ्या आठवणीत सासूबाई व मुले करीत. एकदा अप्पांना ब्लँकेट आणावयास सांगितले. मला वाटते, कुठे दूर प्रवास करायचा होता. घरातली सर्व पांघरूणे जीर्ण, परत परत शिवलेली, तेव्हा जरा नवे ब्लँकेट घ्यावे, असा विचार झाला होता. अप्पांनी वडिलांसाठी म्हणून एक मऊ, दुरंगी ब्लँकेट आणले. किंमत रुपये साठ! आजोबांचे पेन्शन रुपये सत्तर. आजोबांनी मुकाट्याने साठ रुपये दिले व परत रघुनाथाला काही जिन्नस विकत घ्यायला सांगायचे नाही म्हणून मनाशी खूणगाठ बांधली. आजीबाईंनी खूप तळतळाट केला. ते ब्लँकेट म्हणजे सबंध घरात मोठा थट्टेचा विषय झाला. पण आजोबा मात्र काही बोलले नाहीत.

ब्लँकेटवरून गोष्ट निघाली म्हणून सांगते. ह्या किंमती मालाचे पैसे अप्पांनी दिले असते. इतरही मुलांनी दिले असते. पण आजोबा स्वतःसाठी इतरांची– म्हणजे मुलांचीसुद्धा– पै घेत नसत. पोस्टाचे तिकीट जरी लागले तरी त्याचे पैसे ताबडतोब हातात ठेवीत. त्यांनी स्वतः व इतरांनी ह्या गोष्टीबद्दल लिहिले आहे. पण मला कित्येक दिवस हे उमजले नव्हते. मी म्हणे (अर्थात मनाशी) की पन्नास वर्षे बायको काय नेसते आहे, कुणाकडून काय मागून आणते आहे, ह्याची दादही नाही– हा अपरिग्रह कोण्या गावाचा? सासूबाई बहुतेक रोज गावात जात. कधी संस्थेसाठी वर्गणी मागत; कधी आत्मचरित्राच्या प्रती खपवीत; कधी बाळगलेल्या मुलांसाठी धान्य, वस्त्र वा पैसा मागत;–कधी स्वतःसाठी मागत. माझे लग्न होऊन नुकताच संसार थाटला होता. गावात जाण्यासाठी आमचे जिमखान्याचे घर जवळ पडे म्हणून सासूबाई आमच्याकडे राहायला होत्या. त्या डब्यातून

कधी काही आणायच्या. "हे जेवताना वाढून घे." म्हणायच्या. यावरून आमचा पहिला खटका उडाला. मी म्हटले, "मी घरचं ओलंकोरडं आनंदाने खाईन, पण तुम्ही वाटेल तिकडून मागून आणता ते खाणार नाही. नवऱ्याला वाढणार नाही." सासूबाईंनी परत कधी आमच्याकडे काही आणले नाही. सुनांना कोणालाच ते खपत नव्हते; पण आजोबा मात्र सासूबाई पुढे ठेवतील ते खात. ते आपण दिलेल्या पंचेचाळीस रुपयांतले, की मागून आणलेले ह्याची कधी वास्तपुस्तच होत नसे. मला पहिल्यापहिल्याने ह्या वागणुकीचा अर्थच लागत नसे; पण आता पंधरा वर्षे आजोबांबरोबर राहून मी मनाशी एक संगती लावली आहे. ती बरोबर आहे असे मला म्हणता येणार नाही. पण ती त्यांच्या स्वभावाला धरून आहेसे वाटते.

मी वर 'अपरिग्रह' असा शब्द वापरला, तो आजोबांचा नव्हे. ते कधीच जाडेजाडे शब्द वापरीत नाहीत. त्यांच्या वागणुकीचे मर्म म्हणजे एक, स्वतः लोकांचे काही घ्यावयाचे नाही; व दुसरे आपल्याला योग्य वाटेल ते आपण करायचे, दुसरा काय करतो ते पाहायचे नाही. पैकी घ्यायचे म्हणजे आजोबांच्या मते फक्त पैसे. कोणी पैसे दिले तर ते ताबडतोब आश्रमाकडे जातात. फलटणच्या राजेसाहेबांनी त्यांना खास स्वतःला म्हणून पन्नास रुपये महिना दिलेले आहेत. ते चालू झाल्यापासून आजोबा फक्त सहीचे धनी आहेत. पैसे जातात संस्थेकडे. कोणी त्यांनी वापरावी म्हणून वस्तू दिली; त्यांना काही खाण्यासाठी दिले; मोटरीत घेऊन गेले, तर ते आजोबा मोठ्या आनंदाने स्वतःसाठी स्वीकारतात, ते आपण घेता कामा नये किंवा परत केले पाहिजे अशी त्यांची भावना नाही. ते कुठचीच गोष्ट अतिरेकाला नेत नाहीत. 'अपरिग्रह' वगैरे मोठ्या गोष्टीत ते पडत नाहीत. कोणाचे पैसे घेत नाहीत-इतर काही कोणी प्रेमाने दिले तर नाही म्हणत नाहीत.

दुसरे म्हणजे, काय त्यांचे नियमबियम असतील ते स्वतःपुरते. आपल्याप्रमाणे इतरांना करण्याच्या फंदात ते पडत नाहीत. चालवले तोवर ते न चुकता आठ मैल रोज चालत असत; पण व्यायामाबद्दल कोणाला व्याख्यान देताना मी कधी ऐकले नाही. त्यामुळे बायको, मुले-प्रत्येक जण आपल्याला योग्य दिसेल ते करीत होती. आजोबांनी त्यांच्यावर कसलेच बंधन घातले नाही. त्यांचे स्वतःचे जीवन ते जगतात; इतर काय करतात,

ह्याची त्यांना पर्वा नाही किंवा पुष्कळदा जाणीवच नाही असे वाटते.

लोकांचे काही घ्यायचे नाही हा कटाक्ष खरा, पण पैशाखेरीज इतर गोष्टींत उपकाराचे ओझे होते ही जाणीव त्यांना नव्हतीसे वाटते. ते कुठे वर्गणी मागावयास गेले म्हणजे लोकांकडे उतरत. लोकांची वहाने वापरीत; पण हे ओझे आपले आहे, असे त्यांना वाटले नाही. मी संस्थेसाठी ह्या गृहस्थाकडे उतरलो आहे– माझ्या स्वत:साठी नव्हे, ही त्यांची भूमिका असे. ते योग्यच होते. कारण त्यांच्या पगारातून काही देणे त्यांना परवडले नसते; द्यावे असे कधी त्यांच्या मनातही आले नाही व संस्थेच्या पैशातून देणे गैर झाले असते. पण लोकांकडून पैशाव्यतिरिक्त सेवा करून घेण्याचा हक्कच मनाला वाटू लागतो.

एकदा आजोबा खूप आजारी होते व पुण्यातील एका प्रख्यात सर्जनच्या दवाखान्यात एका महिन्यावर उपचारासाठी राहिले. त्या दवाखान्यात औषध पाणी, खाणेपिणे, नर्सकडून सेवा अगदी उत्कृष्ट झाली. आजोबांना घरी आणल्यावर सर्जनना बिल विचारले. ते काहीही घेईनात. पण आम्हां सर्वांच्या आग्रहावरून फक्त इंजेक्शने, औषधे, वगैरेचे बिल मोठ्या नाखुषीने त्यांनी घेतले. आजोबा चांगले बरे झाल्यावर ही गोष्ट त्यांना सांगितली. ही हकीकत ऐकून ते म्हणाले. "अरे, आता माझ्या बँकबुकात काही शिल्लक नाही. चार सहा महिन्यांत मी तुम्हा मुलांचे पैसे फेडीन." आम्ही सर्वांनी त्यांच्याशी वाद घातला. की "जर त्या सर्जनच्या उपकाराचे ओझे खरोखर मोठे झाले होते; पण ते तुम्हांला वाटले नाही. आणि ज्या मुलांना तुमच्यामुळे आज चांगले दिवस होते, त्यांनी कधी जन्मकर्मात चार कवड्या खर्च केल्या तर परत देण्याची गोष्ट करता, हे योग्य आहे का?" आजोबांनी आमचे म्हणणे कबूल केले. पण त्या वर्षी दिवाळीच्या दिवशी मला वीस रुपये देऊ केले व म्हटले, "हे तुझ्यासाठी खण नि मुलांसाठी खाऊला." मी घेत नाहीसे पाहून म्हटले. "अग, परतफेड नाही. माझी दिवाळीची भेट आहे ही." मी काय बोलणार? मुकाट्याने पैसे घेतले. त्या दिवाळीला आम्हा पाची सुनांना (आम्ही चौघी व नानासाहेब आठवल्यांची पत्नी सुशीलाबाई) व नातवांना त्यांनी आयुष्यात पहिल्यांदा व शेवटचे खणासाठी व खाऊसाठी पैसे दिले!

आजोबांनी कधी एखाद्या मुलाच्या हातात खाऊ ठेवला किंवा एखाद्या

मुलाला मांडीवर घेतलेले मला स्मरत नाही. ते काही चांगला पदार्थ खात असले, समोर बशी भरलेली असली, तरी आपल्या पुढेच टुकत उभ्या राहिलेल्या लहान मुलाच्या हातावर त्यांनी कधी काही ठेवले नाही. माझे थोरले भाऊजी कै.अप्पासाहेब ह्यांचे पण अगदी असेच होते. अर्थातं आजोबा कोणाही लहान मुलाला हिडीस-फिडीस करीत नाहीत. रागावले तर कधीच नाहीत. आपण होऊन मूल जवळ घेणार नाहीत; पण एखादे जवळ गेलेच तर त्याच्याजवळ गोड बोलतील. मात्र जवळ घेऊन कुरवाळणार नाहीत. अण्णांच्या अगदी उलट त्यांचे मामेभाऊ अप्पासाहेब परांजपे. जाई आपल्या तान्ह्या मुलीला घेऊन माहेरी आली हे कळले मात्र, लगेच तिला पाहायला आले. ते येतात तो मुलगी दूध पिऊन निजली होती. तिच्याकडे टक लावून बघत बसले व मला म्हणतात, "किती गोड आहे नाही जाईची मुलगी!" जाईची मुलगी आहे आपली दहा जणींसारखी. पण अप्पासाहेबांचे वात्सल्य मात्र अति गोड आहे खरे. मुलांच्या बाबतीत आजोबा व त्यांचे थोरले चिरंजीव ह्यांच्यासारखी सर्वस्वी उदासीन माणसे मी पाहिली नाहीत. आजोबांनाही मुले नको होती, असे सासूबाई अधूनमधून सांगत. त्यांत तथ्य किती व तिखटमीठ किती, त्यांनाच माहीत. एवढे मात्र खरे, की आजोबा कधी कोणावर रागावले नाहीत; म्हणून इतर कुटुंबियांप्रमाणे नातवंडेही एकंदरीने आजोबांवर खूष आहेत.

आजोबा अतिशय भित्रे आहेत. ज्यांनी लोकमताला न जुमानता पुनर्विवाह केला, लोकापवाद व स्वजनांचा राग सहन केला, त्यांच्याबद्दल असे म्हणणे चमत्कारिक दिसते. पण ते जात्या भित्रे ह्यात शंका नाही. तोंडास तोंड देणे, वादविवाद करणे, आपली बाजू मांडणे त्यांना जमत नाही. ते गप्प बसतात. फार तर विचार करून लिहीत, पण बोलत नसत. बायकांच्या युनिव्हर्सिटीच्या किती तरी सभा भांडणाने गाजलेल्या आहेत, पण आजोबा मात्र कधी बोलत नसत. कमलाबाई देशपांडे ह्यांच्यावर सव्वीस हजार रुपयांची अफरातफर केल्याचा एक विचित्र आळ आला होता. तो सर्वथैव खोटा होता, हे दहा वर्षांच्या वह्या पाहून सिद्ध झाले. हा आळ आणणारे कोण आणि त्यांनी तो का आणला हेही उघडकीस आले. ह्या सर्व प्रकाराबद्दल खंत वाटून श्री. धनंजयराव गाडगीळ ह्यांनी युनिव्हर्सिटीच्या सेनेटचा राजीनामा दिला. त्या वेळी वह्या तपासणे, हिशेब

लावून देणे, वगैरे कामे रात्रंदिवस कमळाबाई, नानासाहेब आठवले व मधूनमधून दिनकर इतकी जणे करीत होती. आजोबा सिंडिकेटमध्ये होते. आम्ही त्यांना म्हणत होतो, की आळ खरा की खोटा हे आम्ही पाहून घेतो, पण "कमळाबाई असं करतीलसं वाटत नाही." एवढे एक वाक्य तुम्ही म्हणा. तुमच्या गप्प बसण्याने लोक नाना कुतर्क काढतात. पण हरे राम! ह्यांनी काही ते वाक्य तोंडून काढले नाही. कमळाबाई काही इतर अनाथ विधवांप्रमाणे आश्रमात आलेल्या नव्हत्या. त्या हुजूरपागेच्या विद्यार्थिनी. खऱ्या म्हणजे फर्गसन कॉलेजात जायच्या. पण तात्यासाहेबांनी मोठ्या ध्येयवादाने त्यांना स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीत घातले. त्या वेळी युनिव्हर्सिटीने केवढी जाहिरात केली होती! त्यांनी आपले आयुष्य संस्थेच्या सेवेला वाहिलेले, पण आजोबा काही एक साधे वाक्य त्यांच्याबद्दल बोलायला तयार नव्हते, हे पाहून मला फार राग आला होता. हा प्रसंग एकच नव्हे. ज्या सहकाऱ्यांनी सर्वस्व देऊन संस्था नावारूपास आणली, त्यांच्यावर काही अशा तऱ्हेचा प्रसंग आला तर हे आपले अलिप्त राहात.

वर्गणी मागायला जायचे खरे, पण दुसऱ्या कोणाला तरी पुढे करून. अशा एका वेळेचे श्री. मायदेवांनी वर्णन केले आहे. कोण्या श्रीमंताकडून अपमान झाला तर "मला कशाला इथं आणलंस?" म्हणून मायदेवांवरच रागावले. अशा तऱ्हेचे प्रसंग नानासाहेब आठवले, हरिभाऊ दिवेकर ह्या सर्वांवर आले. ज्याने त्याने आपले पाहून घ्यावे; आजोबा कशात मन घालतील, कोणाची कड घेतील ही गोष्टच कधी झाली नाही. घरातही तोच प्रकार. सासूबाई आमच्याकडे राहायला आल्या होत्या. आमची काही कुरबूर चाले. पण ह्यांचे आपले कशातच लक्ष नाही. ह्या सर्व कृतीच्या बुडाशी कठोरपणा किंवा आप्पलपोटेपणा नसून कमालीचा भिडस्त, भित्रा स्वभाव आहे असे मला वाटते. त्यांच्या आत्मचरित्रात एका प्रसंगाचे वर्णन आहे. खोटा आळ येऊन छड्या खाण्याचा प्रसंग आला होता. त्यांनी आपला कपाळाला हात लावला आणि ते पाहून साहेब हेडमास्तरांनी खऱ्याखोट्याची चौकशी केली व ते प्रसंगातून निभावले; पण निक्षून, न डरता आपल्या निरपराधीपणाची ग्वाही काही त्यांना देता आली नाही. जातीच्या भित्र्या व लाजाळू माणसाने इतकी कामे करावीत हा विरोध मला मोठा मजेदार वाटतो त्यांचे सहकारी नरहरपंत ह्यांची बहीण विधवा नसती तर पुढाकार

घेऊन, चार चार मित्रांच्या द्वारे चौकशी करून सर्वस्वी अनोळखी विधवेशी लग्न करण्यास लागणारी धडाडी आजोबांनी दाखवली असतीसे वाटत नाही. म्हणजे असे की, विधवेशी लग्न लावण्याची त्यांची तयारी होती, पण त्यासाठी काही खटाटोप– विशेषतः चार लोकांकडे जाऊन चौकशी वगैरे करण्याचा– त्यांना जमला नसता. जात्या अबोल स्वभाव, घरातसुद्धा फारसे न बोलणारे, आणि जन्मभर काम केले वर्गणी मागण्याचे, हाही विरोध मजेदार नाही का? पण त्यांनी एकट्याने हिंडून फारशी वर्गणी मागितली नाही. कोणी तरी खटपट करणारे असे बरोबर असे. वर्गणी मागतानाही ते फारसे बोलत नसत. व्यासपीठावरून मात्र फार सुंदर, मुद्देसूद व कळकळीने ते बोलत. त्यांचे थोरले चिरंजीव अप्पासाहेब घरात असेच अबोल असत. मग त्यांनी स्वतःचे असे एक मासिक काढून वर्षानुवर्षे त्यांतील मजकूर स्वतः लिहून काढून घरातल्या अबोलपणाचा वचपा काढला.

ही माणसे माणूसघाणी नव्हेत; पण आपण होऊन ओळख काढणे, परक्या माणसाला आपण होऊन एखादा प्रश्न विचारणे, माणसाच्या मनाचा ठाव घेण्यास बघणे, भोवतालच्या माणसांशी समरस होणे, ह्यांना जमत नाही. ती आपले हृदय क्षणभरही गमवावयास तयार नसतात. माणसाने माणसाशी समरस होण्यात आनंद असतो खरा, पण त्याचबरोबर दुःखाचे वाटेकरी होण्याचाही संभव असतो. जीवनाच्या शांत, धीम्या प्रवाहात त्यांना भावनांची खळबळ नको असते. आनंदाचा पूर नको, क्रोधाची आग नको; दुःखाचे चटके नकोत– म्हणून ह्यांचा माणसांशी संपर्क दुरून दुरून असतो. ह्यांच्या सहानुभूतीचा उगम भावनेत नसून बुद्धीवर आधारलेला असतो. प्रत्यक्ष कृतीच्या दृष्टीने कदाचित ही भूमिका फलदायी असेल; पण शेजारी असणाऱ्याला पुष्कळदा असे वाटते की आपल्या घरी माणूस वावरते की माणसाची छाया!

आजोबा मैलन् मैल चालले असतील; पण चालत असताना भोवतालच्या सृष्टीच्या सौन्दर्याकडे त्यांचे लक्ष गेले असले, तरी निदान मला उमगेल अशा तऱ्हेने नव्हे. उकडते आहे की गारवा आहे, जमीन कोरडी आहे की चिखलाने चिकचिकाट झाला आहे, ह्याबद्दल कधी तरी ते बोलताना ऐकले आहे पण आकाश निळेशार आहे की ढगांनी भरले आहे,

सगळीकडे हिरवेगार आहे की रुक्ष आहे, वेताळावरून देखावा सुंदर दिसतो की धुळीमुळे काही दिसेनासे झाले आहे, ह्याबद्दल कधी अक्षर ऐकले नाही. भोवतालची सृष्टी, झाडेझुडपे, आकाश, लहानमोठे प्राणी ह्यांत त्यांना कधी गंमत वाटली नाही. त्यांचे मन मनुष्य व त्याची एक विशिष्ट परिस्थिती ह्यांना सर्वस्वी वाहिलेले होते. पण त्यातही वर सांगितल्याप्रमाणे एक प्रकारचा अलिप्तपणा आहे. ह्याही बाबतीत त्यांच्यात व त्यांच्या थोरल्या चिरंजीवांत विलक्षण साम्य दिसते.

त्यांच्या आयुष्याची वाट थोडी अरुंद वाटते. करमणूक काय, काम काय– सगळे एका अरुंद सीमेत आखलेले आहे. ते पूर्वी सुटीत कधीकधी पत्ते खेळत. पत्त्यांचे त्यांचे डाव म्हणजे 'लॅडिस' व 'झब्बू'. पुढेपुढे नातींबरोबर गुलामसत्ती खेळत आणि कोणी अडवाअडवीचा डाव खेळू लागले की रागवत. सुरुवातीलाच न अडवण्याबद्दल बजावीत. ह्या कंटाळवाण्या डावाला नाती व सुना अर्थातच कंटाळून जात. पण तेही आता कित्येक दिवस सुटले आहे. त्यांच्या करमणुकीचे एकमेव साधन म्हणजे वाचन. मराठी हाती पडेल ते वाचतात– फक्त आधुनिक कविता व रहस्यकथा मात्र वाचीत नाहीत. बाकी वाचून काढतात. मला वाटते, पूर्वी कादंबऱ्या फारशा वाचीत नसत. इंग्रजी वाचनात फक्त गंभीर लिखाण वाचीत. नाटके, कादंबऱ्या, कविता (अर्थातच) प्रवासवर्णने, वगैरे त्यांना वर्ज्य होती. घरात ह्या प्रकारची पुस्तके कधी हाती लागली तर पान उघडून काय आहे हे कळल्याबरोबर खाली ठेवीत. माझ्या विषयावरील पुस्तके कधी हातात घरीत नसत. आता मात्र सारा वेळ वाचतात व वर सांगितलेल्या ललित वाङ्मयाखेरीज सर्व वाचतात. माझ्या टेबलावरील एकही पुस्तक त्यांच्या तडाक्यातून सुटत नाही; आणि वाचताना त्यांना एक पुस्तक पुरत नाही तर चांगली दहा-पंधरा लागतात. ही पुस्तके पुष्कळदा इतकी रुक्ष व तात्त्विक चर्चेने भरलेली असतात की मलासुद्धा वाचायला कठीण जातात. त्यांना कळते म्हणून ते हल्ली वाचतात असे वाटत नाही. अशा एका पुस्तकाचे पानभर वाचतात, मग ते खाली ठेवून दुसरे काढतात. असा क्रम चालतो. एखादे सोपे मराठीतले पुस्तक असले म्हणजे मात्र अगदी आस्वाद घेत वाचतात. पु. ल. देशपांड्यांचा लेख त्यांच्या हातांत आला व त्यात काव्य (!) नसले, तर त्यांच्या खदखदून हसण्याने खोली दणाणते.

कथा, कादंबऱ्या, कविता ह्यांत त्यांना कधी गोडी वाटली नाही ह्याचे कारणही भावनांच्या कल्लोळापासून दूर राहावयाचे हा जो त्यांचा स्वभाव, तेच असावे.

त्यांच्या संस्था काढण्याच्या कृतीतही असेच एक विशिष्ट मर्यादेत आखलेले वर्तन दिसते. मनात आले की संस्था काढायची. ती काही उत्तम कार्यक्षम माणसांच्या हवाली करायची व आपण वर्गणी जमवायची. संस्थेच्या दैनंदिन कारभारात त्यांचे लक्ष नसे. संस्थेमध्ये आपण मुख्य म्हणून अधिकार गाजवावा असेही कधी त्यांच्या मनात आले नाही. खर्च जास्त होते असे वाटले, तर ते कधीकधी एखादे वाक्य बोलत. एरवी कडाक्याचे वादविवाद होऊन आजीव सेवकांचे खून होण्याची पाळी आली तरी ते आपले स्वस्थ बसत. किती विषय शिकवावेत, कसे शिकवावेत, वगैरे विषय युनिव्हर्सिटीत येऊन त्यावर किती जरी काथ्याकूट झाला तरी ते कधी बोलले नाहीत. हिशेब चोख आहेत ना, वर्गणीदारांना कार्डे वेळेवर गेलीत ना, नवे वर्गणीदार किती झाले, जुने किती गळले, ह्याकडे त्यांचे लक्ष असते. आपले सहकारी संस्था नीट चालवतील ना, अशी शंकाही कधी त्यांच्या मनात आली नाही. ज्या तऱ्हेने त्यांनी मुलांच्या संसारात कधी लक्ष घातले नाही, त्याच तऱ्हेने संस्थांच्या संसारातही मन घातले नाही. वर्गणीचे काम करावयाचे. त्यातून निवृत्त झाल्यावर फक्त समारंभास जातात. अमके कसे चालले आहे, तमके कसे चालले आहे, त्याची चौकशीसुद्धा करीत नाहीत. त्यांना फार निःस्वार्थी व कर्तबगार आजीव सेवक मिळाले; व त्यांनी संस्था नावारूपाला आणल्या. हा अलिप्तपणा म्हणा, किंवा वादविवाद व भांडणांला भिणारा स्वभाव म्हणा, तो नसता व त्यांनी युनिव्हर्सिटीच्या भांडणांत पहिल्यापासून लक्ष घातले असते तर युनिव्हर्सिटी गोडीगुलाबीने मुंबईला जाती आणि सर्वांचेच कष्ट व मनाचा निष्कारण त्रास वाचला असता.

आजोबांचा आयुष्यमार्ग असा ठराविक आहे. ते आपले सरळ त्या वाटेने जातात. उगीच उपचार व दंभ त्यांना मुळीच माहीत नाहीत. एकदा आपले ठरले ते खरे. सरळ त्या वाटेने मुकाट्याने जावयाचे. ह्यावरून एक मजेदार प्रसंग आठवला. मी एम्. ए. झाल्यावर जर्मनीत पुढच्या अभ्यासासाठी जावे असे दिनकरने (माझ्या नवऱ्याने) ठरविले. त्याप्रमाणे

त्याने आजोबांना कळवले. आजोबा या बेताच्या विरुद्ध होते. आणखी शिकून काय करायचे? खर्च फार येईल, मी आता तुला युनिव्हर्सिटीत नोकरी देतो, वगैरे त्यांनी सांगितले. दिनकरला ते पटले नाही. तो म्हणाला, "आम्ही पैशाची काही व्यवस्था करू." एवढी बोलणी झाली व आजोबा कुठे गावाला गेले. नंतर पैसे कर्जाऊ मिळून माझे जायचे ठरले. बोट निश्चित झाली. तेव्हा दिनकरने वडिलांना एक कार्ड लिहिले की, "अमक्या बोटीने इरावती जर्मनीला जात आहे, आपला आशीर्वाद असावा." पत्राचे उत्तर ताबडतोब आले की, "माझे म्हणणे मी तुला कळवलेच आहे. हिने जावे असे मला वाटत नाही." संपले. आशीर्वाद वगैरे कुछ काही नाही! ह्या गोष्टीचे शल्य माझ्या मनाला बरेच दिवस वाटत असे. त्यातूनही अभ्यासांत कधी विशेष मन घातले नाही, अशा बायांना जेव्हा त्यांनी मोठ्या उत्साहाने विलायतेला जाताना आशीर्वाद दिले, तेव्हा तर मला फारच राग आला. पण त्यांच्या ह्याही कृत्याची संगती लागली व मला त्याचे काही वाटेनासे झाले. ती संगती अशी : एकदा एखादी गोष्ट आपल्याला आवडत नाही म्हटले, म्हणजे उगीच तोंडदेखला आशीर्वाद देण्याची आजोबांची वृत्ती नाही. रागाने शाप देणे त्यांना शक्य नाही, पण उपचार म्हणून आशीर्वाद देणेही त्यांना जमणार नाही. दुसरे, ज्या बायांच्या विलायतयात्रेबद्दल त्यांनी उत्साह दाखवला त्या सर्व त्यांनी काढलेल्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या पदवीधर होत्या. आजोबांनी जे हृदय सर्व माणसांपासून चोरून ठेवले ते त्यांनी आपल्या संस्थांना, विशेषतः हिंगण्याला दिले आहे.

संस्थेबद्दल त्यांना फार आपुलकी वाटे व अजूनही वाटते आणि ह्या आपुलकीपुढे त्यांची उदासीनता पार कुठच्या कुठे लोपते. सासूबाई मुलांच्या व सुनांच्या जिव्हाळ्यामुळे चारचौघांत वेळीअवेळी त्यांची स्तुती करीत. दुसऱ्यांशी तुलना करून माझी मुले व सुना किती चांगली ह्याचे वर्णन करीत. अगदी तीच तऱ्हा आजोबांची त्यांच्या संस्थांबद्दल होती. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात मुंबई विद्यापीठाच्या बी.ए.बाया व त्यांच्या विद्यापीठाच्या जी.ए.बाया ह्यांची एक अगदी नावनिशीवर यादी देऊन बी.ए.बायका काही समाजकार्य करीत नाहीत व जी.ए.बायका मात्र ते करतात हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी दिलेल्या यादीतील बऱ्याचशा जी.ए.बाया विधवा होत्या. त्यांच्या पदवीला सरकारात मान्यता नव्हती. त्यांच्या

पोटापाण्याची व्यवस्था करणे संस्थेचे एक प्राप्त कर्म होते व ते करताना जिल्ह्याच्या ठिकाणी नवी शाळा काढण्यास त्यांना मदत करून संस्थेने व आजोबांनी दोन समाजकार्ये साधली. पण त्यावरून आजोबांची तुलना योग्य नव्हती हेही कळते. ह्या तुलनेमुळे बऱ्याच बी.ए.बायका चिडल्या असल्यास नवल नाही.

एकदा जिव्हाळा म्हटला म्हणजे संगती-विसंगती ही बुद्धिप्रामाण्ये लुळी पडतात. मी फार उंच म्हणून सासूबाई नाक मुरडीत व "काय दीपमाळ आहे!" म्हणून म्हणत. माझी मुलगी जाई अशीच उंच झाली तेव्हा म्हणत, "दिनूची मुलगी काय सुरेख उंच वाढली आहे!" संस्थेच्या बाबतीत आजोबांची वृत्ती अगदी तशीच होती. इंग्रजीतून शिकण्याने, गणित विषय सक्तीचा असल्यामुळे स्त्रियांच्या मेंदूला शीण होतो; त्यांचे असे विशेष विषय त्यांनी शिकावे, म्हणून स्त्रियांची युनिव्हर्सिटी निघाली. ह्यांतील काही जी. ए. स्कॉलरशिप मिळवून विलायतेला गेल्या तेव्हा आजोबांना फार आनंद झाला. परदेशात विदेशी भाषेतून शिक्षण घेण्याने ह्या स्त्रियांच्या मेंदूला त्रास होईल असा विचारही त्यांच्या मनात आला नाही. उलट आमच्या जी. ए, पदवीधर बी. ए. ची बरोबरी करू शकतात म्हणून भरपूर जाहिरात झाली. प्रेमाच्या राज्यात तर्काला जागा नाही आणि आजोबांचे एकमेव प्रीतिस्थान त्यांच्या संस्था, तेव्हा ते असे वागले तर नवल नाही. संस्थेच्या बाबतीत तरी ते केवळ छाया नसून हाडामासाचे माणूस आहेत हे पटते.

आजोबांच्या संस्थेवरील प्रेमामुळे जसे कुटुंबाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले असे वाटते, तसेच संस्थेत शिकण्यास आलेल्या काही व्यक्तींबद्दल झाले असा माझा समज आहे. संस्थेत आरंभी आरंभी बऱ्याच विधवा शिकल्या. काही थोड्यांनी पुनर्विवाह केला. पण बऱ्याच अशा विधवा होत्या की पुनर्विवाहासारखे वय असूनही आजोबांनी त्यांच्या हाती जबाबदारीची कामे सोपवली व विवाहाचा प्रश्न पुढे आणलाच नाही. कदाचित् असेही झाले असेल की, ह्या विधवांनीच पोटापुरते मिळून प्रतिष्ठेने समाजसेवा करता येत आहे, तर विवाह नको, असा निर्णय घेतला असेल. कदाचित् हिंगण्याची संस्था व पुनर्विवाह हे विषय अगदी वेगवेगळे ठेवण्याच्या आजोबांच्या संकल्पामुळे येथे शिकाऊ बाया त्यापासून दूर राहिल्या

असतील. शिक्षण व पोटाचा प्रश्न आधी आणि मग विवाहाचा प्रश्न असा जो आजोबांनी निर्णय घेतला तो विधवांनाच नव्हे तर सर्वच स्त्रियांना उपकारक ठरला ह्यात शंका नाही.

संस्थासंस्थांतही डावे-उजवे आहेच. जोपर्यंत युनिव्हर्सिटीचे केंद्र पुणे होते, युनिव्हर्सिटीच्या एकमेव कॉलेजचे प्रिन्सिपॉल व युनिव्हर्सिटीचे रजिस्ट्रार हिंगण्याचे आजीव सदस्य होते, तोवर आजोबांच्या मनात हिंगणे व युनिव्हर्सिटी हा भेदभाव नसावा. हिंगण्याची संस्था युनिव्हर्सिटीची जन्मदात्री. मुलगी कायम आईशी संलग्न राहील असे त्यांना वाटत असावे. खरोखर पाहता विद्यापीठ मुंबईस जावयाचे– ते तसे जावे म्हणून ठाकरसीबाईंची धडपड, तर ते पुण्याहून जाऊ नये अशी हिंगण्याच्या मंडळींची इच्छा. येथेही आश्रमाच्या प्रेमाने उचल खाल्ली व आजोबांना सर्व वादविवादात त्रयस्थाची भूमिका घेता आली नाही; आणि सर्वांनाच अतोनात त्रास सोसावा लागला. ह्या सर्व प्रसंगातही त्यांनी पुढाकार घेतला नाही. इतर बरीच जणे होरपळून निघाली. पण हे मात्र सहीसलामत सर्व मानसन्मानासह होते तेथे राहिले. तरीही त्यांचे प्रेमाचे पहिले स्थान हिंगण्याची संस्था हेच राहिले आहे. एखादे पत्र वाचून आजोबा विशेष प्रसन्न दिसले म्हणजे हिंगण्याला काही पैशाचे दान त्या पत्रातून मिळाले असले पाहिजे, असा गौरीचा ठाम सिद्धांत आहे! परगावचे कोणी भेटण्यास आले तर अजून उत्साहाने सांगतात, "अहो, तुम्ही हिंगण्यास जा. तिथला आश्रम ही एक फार उत्तम संस्था आहे." त्यांचे प्रेम आग्रही व अहंकारी नाही. पुष्कळ आजीव सदस्यांना वाटते की आपल्याशिवाय संस्था चालायची नाही. त्यामुळे सर्व सूत्रे ते हाती ठेवतात; सर्व कामे मोठ्या हिरीरीने अंगावर घेऊन पार पाडतात; इतरांना वाव देत नाहीत. आजोबांनी तसे केले नाही. त्यामुळे संस्थेचे सर्वच सभासद संस्थेच्या उत्कर्षासाठी झटले. अण्णांच्या मोठेपणाच्या सावटाखाली त्यांचे कुटुंबीय व सहकारी खुरटले नाहीत.

कित्येक मोठ्या माणसांना आपले असे काही वैशिष्ट ठेवावेसे वाटते. शरीराबद्दल अनास्था हे तर मोठेपणाचे लक्षणच मानले जाते. आजोबांची वृत्ती अशी मुळीच नाही. शरीराचे चोचले करायचे नाहीत, पण शरीर हे वैरी आहे असे म्हणून त्याला दंडही करायचा नाही, अशी त्यांची वर्तणूक

आहे. फक्त लिहिण्यावाचण्याचा आनंद शरीराला मिळाला म्हणजे पुरे; इतर कोणताही आनंद पापमय आहे म्हणून त्यापासून दूर राह्यचे, अशी कल्पना बऱ्याच ऋषितुल्य मोठ्या माणसांची भारतात आहे. पण आजोबा त्याला अपवाद आहेत. ते आपणहून एखाद्या आनंदासाठी धावपळ करीत नाहीत; तो आनंद मिळाला नाही तर त्यांना चुकल्याचुकल्यासारखे वाटत नाही. त्यांची वृत्ती सदैव प्रसन्न, आनंदमय आहे; पण एखादी चांगली गोष्ट मिळाली तर अगदी आस्वाद घेऊन ते तिचा उपभोग घेतात. ते कधीही दारूसाठी हपापलेले नसतात. असा एखादा जिन्नस जगात आहे ह्याची नित्याच्या व्यवहारात त्यांना दखलही नसेल. पण त्यांच्या मुलाने त्यांना रोज रात्री निजायच्या आधी घोटभर पिण्यासाठी म्हणून मद्य (Wine) आणून दिले होते; ते अगदी स्वाद घेत घेत, मान डोलवून, "छान लागते!" असे म्हणत ते घेत. बाटली संपली– मग त्याबद्दल बोलणे नाही. त्यांचे खाणे मांसाहाराचे नव्हे; पण कांदे घातलेले अंड्याचे चुरचुरित ऑमलेट ते आवडीने खातात. कोंबडीच्या किंवा बैलाच्या मांसाच्या अर्काचे गरम गरम सूप ते चमच्याचमच्याने मिटक्या मारीत मारीत पितात. बाटली संपली की ते खाणेही संपले. ते त्याचा विचारही करीत नाहीत. त्यांना पोळी किंवा फार तूप असलेले पदार्थ आवडत नाहीत. पण बाहेर गेले की लोक वाढतील ते खातात. ते आवडले, का नावडले ह्याची चर्चा करीत नाहीत. एकदा एका मानलेल्या मुलीकडे जेवावयास गेले होते. संध्याकाळी मी सहज विचारले, तेव्हाच मला म्हणाले, "अग, तिला माहीत असूनही तुपात भिजलेला शिरा केला होता. खावा लागला!" रेशनच्या दिवसांत आम्ही नेम केला होता की काळ्या बाजारात एक पैचा जिन्नस घ्यावयाचा नाही; जे रेशनमध्ये मिळेल ते खायचे. फक्त अधूनमधून माझ्यातले गहू कोणाला देऊन त्या बदल्यात बाजरी मिळाली तर मी घेत असे. आजोबांनी तांबडा मायलो, मक्याच्या भाकऱ्या, उकड्या तांदुळाचे जिन्नस, सर्व काही खाल्ले, आणि संतोषाने; कुरकूर न करता. जी साखर मिळे त्यातला थोडा जास्त वाटा त्यांना देत असू, पण कधी काळ्या बाजारातली साखर आणावी लागली नाही. गुळाच्या पोळ्या, गुळाचे, बेसनाचे किंवा मुगाचे किंवा कणकीचे लाडू, गुळाची केक– सर्वच गोडधोड गुळाचे होई. त्यांनी कधी नाक न मुरडता ते खाल्ले, रेशन संपले, साखर आली, आता साखरेचे खातात. रेशनच्या दिवसांतल्या

हालांचे रसभरित वर्णन किती लोक करतात; पण रेशन आले व गेले, आमच्या घरात आजोबांनी कसलीच दखल घेतली नाही.

ते सत्तर वर्षांचे असताना त्यांचे बरेच दात पडले होते. शिल्लक होते त्यांत खालचा व वरचा दात एकत्र येऊन चावण्यास मदत होईल अशा जोड्या नव्हत्या. खाण्याचा त्रास होई. मुलांनी सांगितले, नवे दात बसवा आणि त्यांनाही ते पटले. पण सासूबाई त्यांना दात बसवू देईनात. त्यांनी निरनिराळी कारणे पुढे केली. त्या म्हणत, "ज्या वयात दात पडतात त्या वयात आपण दातांनी चावावे लागतील असे जिन्नस खाऊ नयेत अशी देवाची योजना आहे."

पण सासूबाईंच्या कानांत देव आपल्या योजना कुजबुजतो हे मानावयास आजोबा काही तयार नव्हते. ते म्हणत, "देवाने नागडे जन्माला घातले म्हणून आपण काही जन्मभर नागडे राहात नाही. डोळे अधू झाले तर चष्मा लावून वाचतोच की."

मग सासूबाई म्हणत, "अहो, दात काढताना शेरभर रक्त जाईल."

"हरकत नाही."

शेवटी सासूबाईंनी अगदी रामबाण मुद्दा काढला. त्या म्हणाल्या, "अहो, आता सत्तराव्या वर्षी दोन-अडीचशे रुपये खर्च करून दातांची कवळी घेणार? समजा, काही बरेवाईट झाले तर ती कोणाच्या उपयोगी का पडणार आहे? जोडे, कोट वाटले तर नवीन घ्या. पण एका कवळीपायी एवढे पैसे नका घालवू."

हा मुद्दा आजोबांना पटण्यासारखा होता. पण दातांमुळे नुसती स्वतःचीच गैरसोय होत नव्हती, तर इतरांनाही त्रास झाला असता; आणि आपल्यामुळे एवढासुद्धा त्रास कोणाला होऊ नये अशी त्यांची इच्छा. ते सासूबाईंशी बोलले नाहीत. सासूबाईंना वाटले, आपण जिंकली. आजोबा एकदा अप्पांकडे राह्यला म्हणून गेले. आठपंधरा दिवस राहून नवीन कवळी बसवून आले व सासूबाईंनी खूप बडबड केली, ती ऐकून घेतली.

इतर जेवतात ते आजोबा जेवतात. वेडी वेडी बंधने आपल्यावर लादून घ्यायची, त्यांची जाहिरात करायची आणि ती पाळता यावीत म्हणून आपल्याला व जगाला त्रास द्यायचा, अशी त्यांची वृत्तीच नाही. खरेखुरे गरिबीचे जेवण ते आवडीने जेवतात. बाजरीची, जोंधळ्याची भाकरी,

लसणाची तिखट चटणी व त्यावर तेल ह्या गोष्टी आजही ते आवडीने खातात. अंबाडीची किंवा फणसाची भाजी, त्यावर लसणाच्या फोडणीचे तेल ह्या जिनसा ते मिष्टान्न म्हणून खातील. चार माणसांसारख्या आवडीनिवडी आहेत, पण त्या आवडीनिवडींचा त्यांनी कधी बडेजाव केला नाही. अमके सात्त्विक, अमके तामस, अशा निरर्थक चिकित्सा करीत बसले नाहीत. सर्व खाणे सारखेच— सर्व पदार्थांनी त्यांच्या पोटात जाऊन त्यांची प्रकृती धारण केली. अन्नाला त्यांचे गुण आले. त्यांनी कधी अन्नाचे गुण धारण केले नाहीत. मी दिवसातून चारदासुद्धा चहाकॉफी पितो, असे त्यांनी सांगितले की कित्येक आहारचिकित्सक अगदी वाईट तोंड करून निघून जातात.

जी गोष्ट जिभेची तीच इतर इंद्रियांची. गृहस्थाश्रमाचा त्यांनी उपभोग घेतला— आनंदाने घेतला. स्वतःचा मोठेपणा वाटण्यासाठी बायकोच्या कामुक वृत्तीचा उल्लेख काही महात्म्यांनी केला. काहींनी ब्रह्मचर्याचा डांगोरा पिटला, काहींनी आपल्या सहकाऱ्यांवर व अनुयायांवर नसते नियम लादले. आजोबा स्वतःचे जीवन पूर्णतया जगले. अगदी छिद्रान्वेषी मनुष्यालासुद्धा त्यांच्या आयुष्यात स्त्रियांच्या बाबतीत वावगे असे काही सापडणार नाही. स्त्रियांच्या संस्थेत, त्यातून विधवाश्रमात, काम करण्यात जन्म गेला; पण त्यांनी कधी कोणत्याही मुलीला आपली सेवा करू दिली नाही. मर्यादेची लक्ष्मणरेषा त्यांनी कुठल्याच बाबतीत, कधीही ओलांडली नाही. तसा गवगवा त्यांनी केला नाही.

त्यांना सौंदर्यदृष्टी मात्र आहे. पूर्वी ते कोणाशी कधी फारसे बोलले नाहीत. आताही इतरांशी बोलत नाहीत. पण ते स्वतःशीच मोठ्याने व स्वच्छ बोलतात, ते आम्हांला ऐकू येते आणि साहजिकच त्यांचे विचार कळतात. एखाद्या दिवशी माझ्या हृदयात कसेसेच होते. त्यांनी लपवलेले विचार आज उघडे होत आहेत आणि जे पाहण्याचा आपल्याला अधिकार नाही ते आपण पाहात तर नाही ना, अशी अपराधाची जाणीव मनाला होते. पण मी आपण होऊन ऐकत नाही, आणि जे ऐकते ते इतके निर्व्याज असते की, त्यांच्याजवळ लपवायला काही नव्हतेच हे समजून येते. लोकांच्याजवळ लपवायचे म्हणून ते अबोल नव्हते, अबोलपणा हा त्यांचा स्वभाव होता. परवा 'वन्य जाती' ह्या मासिकाचा अंक माझ्या टेबलावर

पडला होता व नेहमीच्या पद्धतीप्रमाणे इतर बुकांबरोबर तोही त्यांनी घेतला. वरतीच तो अंक होता म्हणून हाती धरला. त्यावर एका वन्य कन्येचे चित्र होते. आजोबांनी न्याहाळून पाहिले, मान डोलवली व म्हटले, "सुंदर आहे, सुंदर आहे."

उत्तम संगीत व नाटक ही त्यांना मनापासून आवडतात. कधी पैसे टाकून गाण्याच्या बैठकीचे किंवा नाटकाचे तिकीट त्यांनी घेतलेले स्मरत नाही. कोणी नेले तर संकोच न करता जातात आणि अगदी शेवटची तान व शेवटचा अंक होईपर्यंत बसून ऐकतात व बघतात.

त्यांच्या वागण्यातली निर्व्याजता मुलाची आहे. एक प्रकारचा आत्मकेंद्रितपणा आहे; तोही मुलाचा आहे. फरक एवढाच की, मुले रुसतात, रागावतात. हे मूल बहुधा आत्मतुष्ट असते. यंदा विभागासाठी काम करायला मला जीप गाडी मिळाली आहे. ती जेव्हा मोकळी असेल तेव्हा आठ आणे मैल भाडे देऊन डेक्कन कॉलेजातील लोकांना ती वापरता येते. मी ती एक दिवस घरी आणली व आजोबांना खडकवासल्याच्या धरणापर्यंत फिरायला नेऊन आणायला सांगितले. बरोबर गौरीची एक मैत्रीण व माझे एक मित्र बडोद्याचे प्रो. कालेलकर असे होते. गौरीला सांगितले होते की धरणावरून परत या. पण तिला तिच्या आजोबांप्रमाणेच खर्चाची कधी कल्पना नसते, तिने आजोबांना धरण तर दाखवलेच, पण नॅशनल डिफेन्स ॲकाडेमी, पुणे युनिव्हर्सिटी, वगैरे चांगले ४० मैल फिरवून आणले. आजोबा चढ चढून, धरण पाहून मोटरीत बसले. युनिव्हर्सिटीत बागवानाकडून फुलांचा मोठा गुच्छ विकत घेऊन नातीबाईने आजोबांना दिला, सगळी मंडळी अगदी खुषीत होती व मोटरीत गात होती. मुली म्हणत होत्या, "Que Sera, Sera, Whatever will be will be" आजोबा म्हणत होते "त्रैगुण्यविषया वेदाः निस्त्रैगुण्यो भवार्जुन... " कोणीच अर्थासाठी गाणी म्हणत नव्हते, आनंद व्यक्त करायची ती एक तऱ्हा होती, एवढेच. घरी आल्यावर एवढी हवा खाल्ल्यामुळे भूक लागली होती. आजोबा, नातीबाई व पाहुणी हात मारून जेवली व नंतर आजोबा नेहमीप्रमाणे तीन तास बाळझोपेने झोपले. कधी अननस, हापूसचा आंबा किंवा असाच काही सर्वांच्या आवडीचा जिन्नस आणला व सर्वांना बशा भरून ठेवल्या म्हणजे आजोबा मिटक्या मारून खातात. बशी रिकामी झाली की निरागसपणे विचारतात, "एवढाच का माझा वाटा?" दिनू नाही तर मी

आमच्यातले इवलेसे देतो. आजोबांना वाटते, आपण कधी जास्त मागत नाही; अगदी काटेकोरपणे वाट्याचे तेवढे खातो. गौरीला पण तसेच वाटते!

आजोबांची टापटीप फार असते. सगळे कपडे अगदी नीट घड्या करून जागच्या जागी ठेवलेले असतात. कपडे मळले तर आजकाल त्यांच्या लक्षात येत नाही; म्हणून ते पाहून धोब्याला देण्याचे काम दिनूचे. किती माणसे म्हातारी झाली, पेन्शनात आली, म्हणजे कपड्यालत्त्यांत फार गबाळेपणा करतात. काही कार्यकर्त्यांना गबाळेपणा म्हणजेच कर्तृत्वाची निशाणी वाटते, ह्यांनी कधीही गबाळेपणा केला नाही, पोषाख साधाच. पण तो नेहमी टापटिपीचा असतो. सदऱ्याचे किंवा कोटाचे बटण तुटले तर "अग, हे एवढं बटण शिवून दे बरं." असे सांगतील. शर्ट लांब हाताचा घालतात व कफांना बटणाऐवजी रुंद एक इंच बंद शिवलेला असतो. ह्यामुळे बटणे किंवा कफलिंक घालाय-काढायचा त्रास वाचतो. हा बंद बरेचदा उसवतो; पण उसवलेल्या बंदांचा शर्ट ते कधी घालीत नाहीत. बाहेर जाताना धोतर, लांब कोट व टोपी (पूर्वी रुमाल) असा त्यांचा पोशाख. कुठे जायचे असले म्हणजे ठरलेल्या वेळेआधी पंधरा मिनिटे ते तयार होऊन बसतात. दोन वर्षांपूर्वी रात्री नवाला कुठच्या तरी सभेला जायचे होते; म्हणून ते पाऊणेनऊलाच पोशाख करून तयार राहिले. साडेनऊ झाले; त्यांना घेऊन जाणाऱ्या माणसाचा पत्ता नाही. ते पोशाख बदलून येऊन बैठकीच्या खोलीत वाचीत बसले. एवढ्यात त्यांना घेऊन जायला मोटार घेऊन गृहस्थ आले. मी खूप रागावले. हे फक्त म्हणाले, "थांबा, येतो." मी म्हटले, "असू दे आता पायजमा, धोब्याकडचा आहे. वर फक्त कोट घाला." पण छे! त्यांना नाही ते पटले. ते परत खोलीत जाऊन नीट पोशाख करून आले.

नुकतीच झालेली गोष्ट. मी कुठून गावाहून आले होते. बैठकीच्या खोलीत खुर्चीवर एक फ्लॅनेलची विजार दिसली. चौकशी करता समजले की ती दिनूने आजोबांसाठी शिवायला टाकलेली त्याच शिंप्याकडून आली होती. आजोबांना दुसऱ्या दिवशी सकाळी कुठे सत्कारसमारंभासाठी जायचे होते. फेब्रुवारीचे दिवस. थंडी बरीच होती. मी म्हटले, "आज धोतर नका नेसू. नवी फ्लॅनेलची विजार घालून जा!" त्यांनी विजार पाहून अगदी पसंतीने मान डोलवली. आंघोळ करून कपडे करू लागले. विजार घातली. मी

कपाटातून कोट काढून दिला. विजार होती लोकरीच्या कापडाची, तपकिरी रंगाची. कोट होता लोकरीचाच पण राखी रंगाचा. कोट हाती घेतला व मला म्हणाले, "हे काय, ह्या विजारीवर हा कोट कसा चालेल? बरा दिसेल का?" मी "छान आहे." म्हटले; पण माझे मत मानायला ते तयार नव्हते. भास्करने "छान आहे, शोभतो." असे म्हटल्यावर तो कोट घातला. दिनू गावाला गेला होता. तो परत आल्यावर त्याला ही हकीकत सांगितली, तेव्हा त्याने मुकाट्याने कोटाच्या रंगाची नवी विजार करवून आणली! न्हावी जर पंधरवड्याने आला नाही तर उद्गारतात, "अरे, केस बरेच वाढले आहेत. जा बरं, न्हाव्याला बोलवून आण." हल्ली विस्मरण फार होते. न्हावी एका आठवड्याने आला तरी परत केस कापायला बसतात! आजोबा वहाण घालून सतरंजीवर पाऊल टाकीत नाहीत. सतरंजीच्या बाहेरच्या फरशीवर वाहणेशिवाय चालत नाहीत!

पूर्वी आजोबा कफल्लक असत. सासूबाईंना महिना रुपये पस्तीस (हे त्यांनी भांडून भांडून मिळविले होते), आमच्या घरी राहायला आले म्हणून आम्हांला रुपये पंचवीस (गेली १५ वर्षे देत आहेत. हा अपरिग्रहाचा एक भाग); एवढे गेले म्हणजे सत्तर रुपये पेन्शनीपैकी फक्त दहा रुपये उरत. त्यांत स्वतःचे करावयाचे म्हणजे फार काटकसरीने राहावे लागे. मी मागे म्हटले की त्यांचे कुटुंबाकडे लक्ष नव्हते. पण एक मात्र अपवादात्मक गोष्ट आठवते. त्यांनी २५ वर्षांपूर्वी अप्पांना एक हजार रुपये दिले. इतर मुलांना तेवढे दिले होते म्हणून. अप्पांनी ताबडतोब मोठ्या उत्साहाने ते हजारच्या हजार 'संततिनियमन' ह्या पुस्तकाची नवी आवृत्ती काढण्यात खर्च करून टाकले. नंतर बऱ्याच वर्षांनी परत अप्पांचे नीट चालत नाही, बायकोच्या आजारामुळे अतोनात खर्च झाला, वगैरे गोष्टी यांच्या ध्यानात आल्या. अर्थात् हे गुपित नव्हते. आम्ही सर्व व खुद्द अप्पाही त्याबद्दल बोलत असत. पण ते ऐकून ध्यानात धरले हे नवल! अप्पाच्या हातांत पैसे दिले तर तो लगेच खर्च करून टाकील, म्हणून त्यांनी भास्करजवळ तीन हजार रुपये हिंगण्याच्या संस्थेत ठेवावयास दिले व सांगितले की अप्पाला कधी गरज लागली तर ह्यांतून दे. सासूबाई गेल्यानंतर आजोबांचा खर्चच नाहीसा झाला. त्यांनी स्वतः व दिनकर ह्या जोड-नावाने बँकेत खाते काढले. त्यांत पैसे पडत असतात. ते स्वतः कधी किती पैसे आहेत, ह्याची चौकशी करीत

नाहीत. कुठे पैसे द्यायचे झाले म्हणजे आपण आकडा सुचवला की दे म्हणतात. मला वाटते, पैशाचा मुळीच हिशेब केला नाही अशी हीच वर्षे त्यांच्या आयुष्याची असावीत. आम्ही त्यांच्यासाठी चांगले चांगले कपडे शिवून आणतो व त्यांचेच पैसे खर्च करतो. तरीही खूप पैसे उरतात. दर वर्षी संस्था व व्यक्ती मिळून तीन-चारशे रुपये तरी इकडेतिकडे दे म्हणून दिनकरला सांगतात. फक्त दर महिन्याला न्हाव्याचे पैसे व सुपारीचे पैसे आपल्या पैशातून मागून घेऊन देतात! जुन्या सवयीचे एवढेच वैशिष्ट आता राहिले आहे.

त्यांचे वागणे प्रसन्न, वाणी गोड व त्या सर्वांपेक्षाही हसणे गोड, मनमोकळे व खदखदून आहे. मुद्दाम उपचाराने वागणे त्यांना जमत नाही. पण नैसर्गिक वागणेच इतके आर्जवी की मनुष्य मोहून जातो. माझ्या आईला मी पुष्कळ अर्ज-विनंत्या करून माझ्या घरी राहावयाला बोलावते. सासूबाई होत्या तेव्हा त्यांनी आईला पाहिले की हसून म्हणावे, "का भागीरथीबाई, आलीस वाटतं! आता बरेच दिवस मुक्काम असेल?" ह्या पहिल्या सलामीनंतर माझ्या आईला चारदोन दिवस राहवून घेणेसुद्धा शक्य होत नसे. आता आई आली व आजोबांनी तिला पाहिले म्हणजे तेही हसून म्हणतात, "कोण? भागीरथीबाई का? फार दिवसांनी आला?" एवढ्यावर आई अगदी प्रसन्न होते. "अग, त्यांनी मला ओळखलं! चारच महिने झाले ना जाऊन, पण फार दिवसांनी आलात म्हणाले." असे दिवसातून दहादा मला सांगते.

आजोबांनी मुद्दाम आशीर्वाद दिला नाही. पण आयुष्यातले दोन प्रसंग आजोबांमुळे चिरस्मरणीय झाले आहेत. माझ्या लग्नाच्या दुसऱ्या दिवशी कर्व्यांकडचे जेवण होते. लग्नांत दोन्हीकडच्या निरनिराळ्या नातेवाईकांकडून इतका आचरटपणा व आडमुठेपणा झाला होता, की मी अगदी कावून गेले होते. मन अप्रसन्न, भांबावलेले असे होते. पंक्तीत श्लोक म्हणणे चालले होते. नेहमी शेवटचा श्लोक आजोबांनी म्हणावयाचा अशी इकडे पद्धत आहे. आजोबांचा आवाज नाणे वाजवावे असा खणखणीत व वाणी स्पष्ट आहे. माझ्या मनस्तापात इतर काय म्हणाले, इकडे माझे लक्षही नव्हते. पण आजोबांच्या आवाजाने व उच्चारांच्या स्पष्टपणामुळे माझे मन वेधले. "प्रेयो मित्रं बंधुता वा समग्रा" हा श्लोक आजोबा सावकाशपणे

म्हणत होते. आजोबांचे शब्द किती स्पष्ट! दगडावर कोरून लिहावे त्याप्रमाणे एकएक अमृताची ओळ माझ्या कानांवर पडत होती व माझ्या हृदयावर कोरली जात होती. माझे मन शांत झाले. हा आशीर्वाद घेऊन मी कर्व्यांच्या घरी आले.

दुसरा प्रसंग नुकताच पाच-सहा वर्षांपूर्वी घडला. आजोबांना घेऊन आम्ही सर्वजण हैदराबादला माझ्या भावाकडे दिवाळीला गेलो होतो. दिवाळीच्या अवसेच्या दिवशी बंगला शृंगारण्यात, मुले दारू उडवीत होती ते पाहण्यात श्रम व जाग्रण झाले होते. शिवाय सुटी म्हणून आम्ही उशिराच उठत असू. माझा भाऊ व आजोबा सहाच्या आतच उठून चहा वगैरे घेत आणि आजोबा गरम कपडे घालून बागेत फेऱ्या घालीत. तसेच पाडव्याच्या दिवशी घालीत होते. त्यांचा पायरव येऊन मी जागी झाले. एवढ्यात त्यांनी गाणे म्हणायला सुरुवात गेली. "अंतरिचा ज्ञानदिवा मालवूं नको रे— " पाडव्याच्या पहाटे ऐकलेले हे शब्द असेच हृदयात कोरून राहिले आहेत. आयुष्याच्या ह्या काळात परत आजोबांनी मार्ग दाखवला. पहिल्या आशीर्वादाने पूर्वायुष्य उजळले, आताच्या उपदेशाने उत्तर आयुष्यात माझी सोबत व्हावी.

'नुकतीच एका अमेरिकन मित्राला स्थितप्रज्ञ म्हणजे काय, ज्ञानोत्तर व्यवहार म्हणजे कसा असतो हे समजावून सांगत होते. तासभर आमचे संभाषण झाल्यावर त्याने विचारले, "अहो, तुम्ही सांगता तसे माणूस कधी खरोखरीचे तुमच्या पाहण्यात आले आहे का?"

मी विचार करून उत्तरले, "पाहण्यात काय, माझ्या घरात असं माणूस आहे; पण मी इतकी पापी, की ही स्वभावलक्षणं ज्ञान्याची की आत्मतुष्ट आत्मकेंद्रिताची हेच मला कळत नाही."

केवढे माझे भाग्य, की मी अशा माणसाची सून झाले! त्याहीपेक्षा केवढे महत्तर माझे भाग्य, की मी अशा माणसाची बायको झाले नाही!

*

७

# द्वारका

एक झाड नाही, झुडूप नाही, कसलाही निवारा नाही. सूर्य रणरण तळपत होता. संध्याकाळ होण्याची वेळ असूनसुद्धा हवेत गारवा नाही. भोवतालची तापलेली वाळू थंड होण्यास निदान मध्यरात्र तरी लोटावी लागेल असे असूनही मी देवळाचा निवारा सोडून समुद्रकाठी आले. देवळातील दृश्यास विटून बाहेर यावे व बाहेरचे वैराण जग पाहून आत जावे असे येथे आल्यापासून चालले आहे. डाकोरनाथचे विलास व भोग पाहून मनात काही भक्ती रुजत नाही. देवाने उठावे– देवळाची दारे उघडली जावीत– मूर्तीचे दर्शन व्हावे, अशी हुरहूरही लागत नाही. देवाचा कार्यक्रम मोठ्या पगाराच्या सरकारी अधिकाऱ्यापेक्षाही काटेकोर. सकाळी आरती व नैवेद्य, मग स्नान व पूजा आणि मोठा नैवेद्य, मग दुपारची वामकुक्षी, मग संध्याकाळी सूर्य कलला म्हणजे उठून भक्तांना दर्शन, परत आरती-शेजारती व शयन ह्या चक्रात देवाचा इतरेजनांशी संबंध फारच थोडा येतो. जो जास्त पैसा देईल त्याला जवळून दर्शन मिळण्याची शक्यता– लोकांना पिळून काढणाऱ्यांचा, श्रीमंत, राजविलास भोगणारा हा देव त्या श्रीमंतांनाच लखलाभ होऊ दे!

कोठे ती पूर्वीची द्वारका व कोठे हे वाळवंटातले एकाकी देऊळ कृष्णचरित्र सगळेच अद्‌भुताने भरलेले आहे– आणि आपली पुराणे त्या अद्‌भुतावर मात करून काळ्याचे पांढरे न्‌ पांढऱ्याचे काळे करतात. द्वारका खरोखर कृष्णाच्या अपजयाची निशाणी. कंसाला मारून मथुरेच्या सिंहासनावर उग्रसेनाला कृष्णाने बसविले व सर्व यादवकुले मथुरेच्या आसपासच्या सुपीक यमुनाकाठी निर्भय वास्तव्य करण्याच्या विचारात

होती; पण कंसाची बायको सम्राट जरासंधाची मुलगी होती. तिने बापाला यादवांवर सूड घेण्याची चेतना दिली व जरासंधानेही यादवांचा निःपात करण्याचा चंग बांधला. एकदा, दोनदा, तीनदा, पुनःपुनः यादव वीरांनी जरासंधाचा प्रतिकार करून त्याला मागे रेटले. पण जरासंधाने प्रयत्न सोडला नाही. त्याने पश्चिमेकडील योनांचे साहाय्य मिळविले व कालयवन आणि तो अशी दुहेरी सैन्ये मथुरेवर चालून आली. आता आपल्या चिमुकल्या यादवसेनेचा निभाव लागणे शक्य नाही. हे ओळखून कृष्ण-बलरामांनी सर्व यादवांसह मथुरा सोडली. रजपुताना, उत्तर गुजराथ व काठेवाड हे तीन रूक्ष प्रदेश ओलांडून ते समुद्रकिनाऱ्याला आले. तेथे रैवतक पर्वताशेजारी सपाट, वाहने चालवण्यास योग्य अशी भूमी त्यांना दिसली. कृष्णाच्या मर्जीखातर समुद्राने थोडे मागे सरून हे क्षेत्र नवीन शहर वसवावयास दिले व कृष्णाने विश्वकर्म्याच्या साहाय्याने एक रम्य व अजिंक्य नगरी वसवली– तीच द्वारका ऊर्फ द्वारावती. त्या ठिकाणी आल्यावर यादवांना उसंत मिळाली व ते पुन्हा बलशाली झाले; म्हणजे 'द्वारका' हे कृष्णाच्या पराजयाचे प्रतीक. हरिवंशात जेव्हा वैशंपायन द्वारकेचे वर्णन करू लागतात तेव्हा जनमेजय त्यांना मधेच थांबवून विचारतो की, 'मुनिवर्य, सुपीक, रम्य धनधान्ययुक्त असा यमुनाकाठचा मध्यप्रदेश सोडून यादव द्वारका वसवायला इकडे वाळवंटात कुठं आले?' तेव्हा वैशंपायनाला सर्व कथा सांगावी लागली. तरीदेखील कृष्णाचा पराजय शक्य तो कमी लेखून, द्वारकेचा मोठेपणा वर्णन करून मुनिवर्यांनी वेळ मारून नेली. विशेषतः रुक्मिणीहरणामुळे कृष्णाचा व द्वारकेचा दरारा वाढला व द्वारकेच्या जन्माच्या मागची यादवपराजयाची स्मृती इतकी लोपली की नरेन्द्र आपल्या "रुक्मिणी स्वयंवरात" द्वारकेचे वर्णन "देवाचेया दादुलेपणाचा उबारा, न साहवे सातही सागरा, भेणे वौसरोनी राजभरा, दीधली द्वारावती" असे करतो.

हस्तिनापूर, गिरिव्रज, मथुरा वगैरे महाभारतकालीन शहरे भारतीय युद्धाच्या आधी व मागूनही होती. कैक राजकुले त्यात नांदली, वैभवाला चढली व नष्ट झाली; पण द्वारकेचे तसे नाही. द्वारकेचे नाव फक्त श्रीकृष्णाशी निगडित आहे. श्रीकृष्णांनी तिला निर्मिले व श्रीकृष्णाबरोबर ती नाहीशी झाली. श्रीकृष्ण साकारलेले चैतन्य होते; तर द्वारका श्रीकृष्णाचे साकारलेले

स्वप्न होते. श्रीकृष्णाबरोबर द्वारकेचे जड रूप जाऊन ती एखादी रम्य स्वप्नाची स्मृती म्हणून राहिली आहे. खरी द्वारका कशी होती कोण जाणे, पण प्रत्येक कवी आपापल्या मनाप्रमाणे उद्यानांनी वेढलेली, राजवाड्यांनी नटलेली, एक खांबावर पेललेली सोन्याची द्वारका निर्माण करतो.

भर्तृहरी जेव्हा गतकाळातील 'कोणा एक्या रम्य' नगरीचे वर्णन करतो, त्या वेळी तेथील मोठा सम्राट, इतर मांडलिक राजे, स्तुतिपाठक, सुंदर स्त्रिया, हास्य विनोद ह्याबरोबर उच्छृंखल वागणाऱ्या राजपुत्रांचाही उल्लेख करतो– 'उद्‌वृत्तः स च राजपुत्रनिवहः।' आणि खरोखरच द्वारकेचा नाश अशाच उनाड, दारूबाज, जुगारी, रंगेल आणि रगेल यादव राजपुत्रांच्या वर्तनाने झाला ती कथा सर्वांना माहीतच आहे. जैनांची कथा महाभारत कथेहून निराळी आहे ती अशीः द्वारकेचा नाश मद्यपी यादवांमुळे द्वैपायन करील, असे नेमिनाथांचे भविष्य ऐकून कृष्ण-बलरामांनी यादवांच्या हाती लागू नये म्हणून सर्व मद्य द्वारकेबाहेरच्या एका रानातील गुहेत ठेवले होते. शिकारीवर गेलेल्या राजपुत्रांच्या हाती ते लागले. अनेक वर्षांची ती मुरलेली उत्कृष्ट दारू पिऊन झिंगलेल्या कुमारांनी द्वैपायन ऋषीला लाथाबुक्क्यांनी मारले व त्याने हा अपमान मनात धरून, एक दिवस संधी साधून द्वारकेला आग लावून दिली व सर्व दरवाजे रोखून धरले. कृष्ण-बलरामांना कोणालाही वाचवता येईना. निदान वसुदेव-देवकीला तरी वाचवावे म्हणून त्यांनी त्यांना रथात घातले पण जनावरे पुढे पाऊल टाकीनात, तेव्हा स्वतः दोघांनी रथ ओढीत नेला तो आस निखळला. दाराशी यमाप्रमाणे द्वैपायन होता. त्याने परत निक्षून सांगितले की, तुम्ही दोघे जा, मी इतरांना जाऊ देणार नाही. वसुदेवानेही काकुळतीने सांगितले, तुम्ही जा; निदान तुम्ही तरी जिवंत आहात असे समजून आम्ही सुखाने मरू. शहर धाडधाड जळत होते. धूर आकाशापर्यंत भिडला होता, रस्त्यारस्त्यांतून बायका, मुले व पुरुष 'कृष्णा, आम्हांला सोडीव, रामा, आम्हांला सोडीव', असा आक्रोश करीत होते. कृष्ण तेथेच मरावे असा निश्चय करीत होता, पण वसुदेवाच्या आज्ञेमुळे भ्रातृवत्सल बलरामाने त्याला ओढीत बाहेर नेले. श्रमाने क्लांत होऊन झाडाखाली निजलेल्या कृष्णाला त्याच्याच एका बांधवाने हरिण समजून मारले; व स्वतःची नगरी जळत असलेली पाहात पाहात, दैवाला शिव्याशाप देत कृष्ण परलोकवासी होऊन नरकात गेला अशी ही कथा आहे. ह्या कथेतील कायंबिनी दारूचे वर्णन व

द्वारकेतील यादवांचा हृदयद्रावक अंत इतका अपूर्व सांगितला आहे की एकदा वाचल्यावर विसरणे शक्य नाही. पण या कथेपेक्षा हरिवंशातील कथा जास्त वास्तव वाटते. यादव पुरुष दारू पिऊन आपापसांत झगडून मेले व स्त्रिया, म्हातारे व बालके फक्त नगरात राहिली. स्वतः मरण्याच्या आधी श्रीकृष्णाने अर्जुनाला झाल्या प्रकाराचा निरोप पाठवण्याची सोय केली. तो निरोप पोचल्यावर अर्जुन आला. त्याने वसुदेवाचे सांत्वन केले. सर्व मृत यादवांना अग्नी दिला. कृष्ण-बलरामांची कलेवरे शोधून काढून त्यांनाही अग्नी दिला व उरलेल्या सर्वांना घेऊन हस्तिनापुराकडे निघाला. वाटेत पंचनद्यांच्या प्रदेशात काही यादवस्त्रिया आपणहून अभीरांकडे गेल्या; व काही त्यांनी पळवल्या. उरलेल्या घेऊन अर्जुन हस्तिनापुराला आला. त्याने श्रीकृष्णाचा नातू जो वज्र त्याला इंद्रप्रस्थाचे राज्य दिले व उरलेल्या यादवांना तेथे राहण्यास जागा दिली. ज्या क्षणी अर्जुन शेष यादवांना घेऊन बाहेर निघाला, त्याच क्षणी समुद्राची मोठी लाट येऊन द्वारका नाहीशी झाली.

जैनमताप्रमाणे द्वारकेला प्रचंड आग लागली; महाभारताप्रमाणे द्वारका समुद्रात गेली. खरे काय झाले माहीत नाही. सध्या ज्याला 'द्वारका' क्षेत्र म्हणतात ती खरी द्वारका नसून प्रभासपट्टणशेजारी समुद्रात एक लहानशा टेकडीवजा उंचवटा आहे, ती द्वारका होय, असेही मत आहे. द्वारकेशेजारी रैवतक पर्वत होता असे हरिवंश व जैन ग्रंथकार एकमताने सांगतात. हा रैवतक पर्वत म्हणजेच जुनागढ शेजारचा गिरनार; व तेथेच नेमिनाथ निर्वाणपदाला गेले असे म्हणतात. त्या भागात उत्खनन केले असता ख्रिस्त शकासुमाराचे व त्या आधीचेही जुने अवशेष सापडले आहेत व आणखीही सापडण्याचा चांगलाच संभव आहे. तेथील समुद्रकिनाऱ्यावर कदाचित जुन्या द्वारकेचा पत्ताही लागेल.

पर्शियन आखातापासून तो काठेवाडपर्यंतच्या भागात अजूनही धरणीकंपाचे धक्के बसतात. येथे समुद्रात ज्वालामुखी पर्वत असून अधूनमधून त्याच्या स्फोटाने किनाऱ्याजवळील जमीन हादरते व समुद्रात प्रचंड लाटा उसळून त्या किनाऱ्यावर आदळल्या की कोळ्यांची गावेच्या गावे गिळून टाकतात. नुकताच दोन वर्षांपूर्वी तसा धरणीकंप होऊन कराचीशेजारच्या शंभर मैल किनाऱ्यावरील कोळीवाडे समुद्राच्या पर्वतप्राय लाटांनी नष्ट झाल्याचे वर्तमान सर्वांनी वाचले असेलच.

• द्वारका लाकडाची बांधलेली होती. तिच्याभोवती मोठा कोट असून त्यांत दारे ठेवलेली होती म्हणूनच तिचे नाव द्वारावती असावे किंवा पश्चिमसमुद्राचे दार म्हणून द्वारका. घराघरांतून पेटलेल्या चुलीतील आगीत काही भाग धरणीकंपाने कोसळून पडतो व मोठमोठ्या आगी लागतात. अशी प्रचंड आग टोकिओला १९११ साली लागली होती. आगीपाठोपाठच मोठमोठ्या लाटा येऊन धरणीकंपाने खचलेली द्वारका नाहीशी झाली असण्याचा संभव आहे. अशा परिस्थितीत अती प्राणहानी होते व फारच थोडे लोक वाचतात. असा धरणीकंप होण्याच्या आधी पुष्कळदा लहान लहान धक्के बसतात व त्या सूचनेने लोक पळून जातात. रोमन लोकांचे पाँपी शहर ज्वालामुखीने नष्ट झाले. द्वारका खचून खरोखरच समुद्रात गेली असली तर तिचे अवशेष सापडणे कठीण आहे; पण खणणाऱ्याच्या हाती काय लागेल ते सांगवत नाही. कदाचित् धरणीकंपाने, आगीने अर्धवट जळलेली द्वारका सापडायची देखील. पाँपी शहरात आज जी अद्‌भुत दृश्ये दिसतात, तशीसुद्धा दिसतील. काही यादवस्त्रिया व पुरुष रस्त्यावरून पळताना एक पाय जमिनीवर, एक पाय उचललेला अशा स्थितीत मेलेले व उभेच्या उभे गाडलेले आढळायचे. काही आंघोळ करताना, काही चुलीजवळ, काही रथात– छे: कल्पनाच नको. त्यापेक्षा जुनी द्वारका समुद्राच्या लाटांनी झाकलेली आहे तशीच असू दे.

खरी द्वारका आपल्या निर्मात्याबरोबर गेली तर मग ही सध्याची द्वारका काय आहे? ही द्वारकेची वास्तू नाही, प्रतिकृती नाही; केवळ त्या रम्य नावाने मिरवणारी एक विकृती आहे.

*

## ८

# 'भोकं राहिली'

टांगानिका सरोवराच्या जवळजवळ दक्षिण टोकाला पण पूर्वेकडे असलेल्या उंच पर्वतावर आम्ही बसलो होतो, ही पर्वतांची रांग टांगानिका सरोवराची पूर्वेकडची भिंत होती. मध्ये ४०० मैल लांब व ५० मैल रुंद असे प्रचंड सरोवर पसरले होते. पश्चिमेस अशीच एक पर्वतांची रांग भिंतीसारखी उभी होती. आम्ही बसलो होतो दाट झाडांच्या सावलीत. पण समोरचा देखावा मात्र उन्हात तरंगत होता. समोरची पर्वतांची रांग स्पष्ट दिसत नव्हती. सरोवराचे पाणी कोठे संपते व वातावरणास सुरुवात कोठे होते, तेही स्पष्ट दिसत नव्हते. आम्ही समोर नकाशा पसरला होता. हाताशी दुर्बीण होती. नकाशात पहावयाचे व दुर्बीण डोळ्यांना लावावयाची असे चालले होते. दुर्बिणीतूनही स्पष्ट दिसेना. शेवटी मी कंटाळून समोरचे भव्य पण किंचित अस्पष्ट चित्र पाहात बसले.

मी बघत होते तो देखावा नुसता भव्य व रमणीयच नसून ते एक पृथ्वीवरले मोठे आश्चर्य होते. लहानपणापासून ज्याच्याबद्दल वाचले होते— जे नकाशात परत परत पाहिले होते, ते आज प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहात होते. नकाशात एका मोठ्या कागदावर गोष्टी कशा स्पष्ट समजतात. पण प्रत्यक्ष गोष्ट एवढी मोठी असते की, दिवस न् दिवस प्रवास करूनही तिचे आकलन होत नाही. तसेच आजही झाले. टांगानिका सरोवर हा आफ्रिकेतील आश्चर्यकारक रिफ्ट व्हॅलीचा एक भाग आहे. तेसुद्धा एका दृष्टिक्षेपात दिसत नव्हते; तर संबंध रिफ्ट व्हॅली कशी दिसणार? मागच्या वेळेला म्हणे कॉन्फरन्समधल्या काही लोकांनी एक विमान भाड्याने घेऊन सबंध रिफ्ट व्हॅली बघून घेतली. ह्या वेळी आम्ही २०० माणसांनी ५० मोटरींतून

ऱ्होडेशियातील लिव्हिंग्स्टन गावापासून तो टांगानिका सरोवराजवळील ॲबरकॉर्न शहरापर्यंत प्रवास केला. सकाळी सुरुवात करायची, वाटेत प्राचीन मानवाचे अवशेष जेथे जेथे सापडले ती स्थळे बघावयाची, संध्याकाळी कोठेतरी मुक्काम, परत प्रवास, असे तीन दिवस चालले होते. टांगानिका सरोवरापासून रिफ्ट व्हॅलीचे खरे जवळून पहिले दर्शन झाले खरे दर्शन म्हणायचे कारण म्हणजे वास्तविक लिव्हिंग्स्टनच्या भोवतालचा प्रदेश, झांबेझी नदीवरील प्रचंड व्हिक्टोरिया धबधबा, नदीचे पात्र व वाहण्याची दिशा ही सर्व रिफ्ट व्हॅलीचेच एक अंग आहे. पण रिफ्ट व्हॅली म्हणजे काय हे समजायला प्रथम टांगानिका सरोवरच पाहावे लागते.

रिफ्ट म्हणजे भेग, चीर. व्हॅली म्हणजे दरी किंवा खोरे. साधारणपणे आपल्या नेहमीच्या पाहण्यात ज्या दऱ्या व खोरी येतात ती पाण्याच्या प्रवाहामुळे उत्पन्न झालेली असतात. उंच डोंगरावरून पाणी खाली वाहात असताना ते आजूबाजूंची माती धुपून आणते; एवढेच नव्हे, तर स्वतःचे पात्रही खोल व रुंद रुंद करीत जाते. हिमालयात, आल्प्स पर्वतात वगैरे भागांत पूर्वीच्या काळी लांबवर वाहात असलेल्या हिमनद्यांनी प्रचंड पात्रे खोदली आहेत. ह्या दऱ्या हजारो वर्षे पाणी वाहून वाहून तयार झालेल्या असतात. पर्वतांच्या रांगा जरी असल्या तरी खोऱ्याच्या सपाटीशी उतरत कोन करीत आलेल्या असतात. ह्याउलट रिफ्ट व्हॅली ही भूभंगाने झालेली असते. काही कारणांमुळे जमीन दुभागते, तिला मोठमोठ्या चिरा पडतात आणि ह्या चिरा म्हणजेच रिफ्ट व्हॅली. अशा चिरा का पडाव्यात, याचे कारण अजून सर्वस्वी उमजलेले नाही. तरीपण शास्त्रज्ञांचे असे मत आहे की, पृथ्वीच्या पोटात कोठेतरी लाव्हा रसाचे तळेच्या तळे साठून मोठा भूभाग वर उचलला जातो व जो भाग उचलला जात नाही किंवा दोन्हीकडचा भाग उचल्यामुळे खचतो, त्यालाच रिफ्ट व्हॅली म्हणतात. आफ्रिकेत ॲबिसीनिया, सोमालीलँड, युगांडा, केनिया, टांगानिका व ऱ्होडेशिया हा सबंध भूभाग सुमारे ५००० फूट उंच उचलला गेला आहे. आणि त्यामुळे ठिकठिकाणी भेगा पडून रिफ्ट व्हॅली निर्माण झाल्या आहेत. एवढा प्रचंड भूभाग वरती उचलण्याच्या क्रियेमुळे काही गमतीदार प्रकार घडतात. त्यांतला एक म्हणजे रिफ्ट व्हॅलीचा तळ पुष्कळदा समुद्रसपाटीच्या खाली जातो. पश्चिम आशियातील जॉर्डन नदीचे खोरे समुद्रसपाटीपासून १००० फूट खाली आहे. तसेच टांगानिका सरोवर. बहुतेक ठिकाणी

सरोवराचा तळ समुद्रसपाटीच्या वर आहे. पण काही ठिकाणी सरोवराचा तळ समुद्रसपाटीपेक्षा खोल आहे. अशा तऱ्हेचे जलसंचय समुद्राला मिळणे शक्यच नव्हते. जॉर्डन नदी आतल्या आतच एका सरोवराला मिळते, त्याला मृत समुद्र म्हणतात. टांगानिका सरोवराच्या प्रदेशात बराच पाऊस पडला म्हणजे पाण्याचा एक प्रवाह डोंगराडोंगरांतून वाट काढीत काँगो नदीच्या खोऱ्याला मिळतो. आफ्रिका व अरबस्थान ह्यांना विभागणारा तांबडा समुद्र हीसुद्धा एक रिफ्ट व्हॅलीच आहे. म्हणजे जॉर्डन नदीच्या खोऱ्यापासून ते थेट ऱ्होडेशियापर्यंत अशा कितीतरी रिफ्ट व्हॅली पसरल्या आहेत. काही लोकांची कल्पना अशी आहे की, पूर्वीच्या काळी टांगानिका सरोवर, व्हिक्टोरिया सरोवर, आल्बर्ट सरोवर, रुडोल्फ सरोवर व केनियाच्या रिफ्ट व्हॅलीमध्ये असलेली इतर लहान लहान सरोवरे मिळून पाण्याचा एक प्रचंड प्रवाह उत्तरेकडे वाहात होता. आतासुद्धा माझ्या शेजारी बसलेला इंग्रज शास्त्रज्ञ मला सांगत होता, "कर्वेबाई, तुम्हांला आत्ताचा देखावा भव्य वाटतो आहे. पण कल्पना करा, दोन्ही तीरांनी भरून पूर्वी एक नदी येथून जवळजवळ १००० मैल वाहत होती. काय त्या वेळेला दिसत असेल, नाही? आज जगामध्ये वाहणाऱ्या कोणत्याही नदीपेक्षा ही नदी मोठी होती." कल्पना तर मोठी भव्य होती. पण ती कल्पना की सत्य, ह्याबद्दल मात्र बराच वादविवाद आहे. वरती ज्या सरोवरांची नावे घेतली त्यांतल्या कितींच्या तरी मध्ये डोंगरांच्या रांगा आहेत. तेव्हा एका सरोवराचे पाणी दुसऱ्यांत जात असेल, ह्याविषयी पुष्कळ लोक शंका घेतात. हा प्रश्न न सुटायचे एक कारण म्हणजे वर सांगितलेल्या २००० मैलांच्या टापूत ठिकठिकाणी पृथ्वीला कित्येक मैल लांब व कित्येक मैल रुंद भेगा पडल्या. त्या भेगांतून नद्या वाहू लागल्या आणि मग कधी तरी त्याच टापूत मोठमोठे ज्वालामुखी पर्वत उत्पन्न झाले. ज्या पर्वतांच्या रांगा निरनिराळ्या रिफ्ट व्हॅलींना छेदून गेलेल्या आहेत, त्यांतल्या बऱ्याच ह्या ज्वालामुखींच्या वर येण्यामुळे बनलेल्या आहेत. सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे जमीन दुभंगणे, लांबच लांब पर्वतांच्या रांगा उत्पन्न होणे, ह्या उलाढाली मानवजातींच्या हयातीतल्या आहेत. आपल्याकडे सुद्धा पूर्वी एका काळी समुद्र होता; तिथे हिमालय उत्पन्न झाला, पण हिमालयाची उत्पत्ती पहायला मानव पृथ्वीवर आलेला नव्हता. रिफ्ट व्हॅली उत्पन्न होताना मानव कदाचित उत्पन्न झाला नसेल, पण रिफ्ट व्हॅलीतून वाहणाऱ्या प्रचंड नद्या किंवा आत्ताच्यापेक्षा दसपट

मोठी सरोवरे त्याने खास पाहिली होती. एवढेच नव्हे; तर ह्या सरोवराच्या पाण्यातून ज्वालामुखी उफाळून निघाले, तेही मानवाच्या हयातीतच; आणि पाण्याने भरलेली रिफ्ट व्हॅलीतील सरोवरे पर्जन्ययुग संपल्यानंतर हळूहळू लहानलहान होत गेलेली मानवाने पाहिली आहेत. नायरोबीच्या शेजारी जी रिफ्ट व्हॅली आहे तिच्यामध्ये काही थोडी सरोवरे आहेत. बाकी सबंध दरीचा तळ म्हणजे खाराने भरलेले एक ओसाड, निर्वृक्ष वाळवंट आहे. त्या क्षाराच्या ढिगाखाली अडीच तीन लाख वर्षांपूर्वीची अश्मयुगीन मानवाची हत्यारे शोधावयाची म्हणजे किती उकराउकरी करावी लागते, किती चाल करावी लागते व दिवस दिवस भटकून दोनचार हत्यारे हाती आली तर स्वर्ग हाती लागल्याचा आनंद होतो. भारतात बऱ्याच शोधाअंती अशा काही जागा सापडल्या आहेत की तेथे दिवसभर काम केले तर शंभरपर्यंतदेखील हत्यारे सापडतात. पण ह्या नायरोबी शेजारच्या ग्रेगरी रिफ्ट व्हॅलीमध्ये जे दृश्य दिसले ते काही अवर्णनीयच. दरीच्या तळाशी प्रेक्षकांसाठी जायला म्हणून एक रस्ता केलेला आहे व ठिकठिकाणी ७-८ फूट उंचावर उभे राहून पाहायसाठी चौथरे केलेले आहेत. एकेका चौथऱ्यावर उभे राहून खाली पाहिले म्हणजे साधारण २५ चौरस फुटांच्या जागेमध्ये दगडाच्या उत्तम उत्तम हत्यारांचा खच पडलेला दिसतो. त्याचप्रमाणे त्याच दरीच्या एका भिंतीत एक मोठी गुहा आहे. ही गुहा एके काळी वरपर्यंत पाण्याने भरलेली होती. पाणी जसजसे खाली जायला लागले, तसतशी माणसे गुहेत येऊन राहायला लागली. आणि पाणी ओसरेल तसतशी वस्ती पाण्याच्या जवळजवळ जात अगदी दरीच्या तळाजवळ आली. इतके होईतो पर्जन्ययुग संपून हल्लीचे कोरडे युग सुरू झाले होते. दरीतले पाणी आटले होते. एके काळी तेथे मोठमोठी गोड्या पाण्याची सरोवरे होती. अरण्ये होती, रान पशूंनी भरलेले होते– सरोवरे माशांनी भरलेली होती, शेतीचा मागमूस नाही अशा काळी केवळ दगडाच्या हत्यारांनी शिकार करणाऱ्या मानवाचे जीवन सुसह्यच नव्हे तर बऱ्याच अंशी खाण्यापिण्याची ददात नसलेले असे असणार. खणायच्या उपयोगाचे अणकुचीदार दगड, घाव मारून लाकूड, पशूची तंगडी वगैरे तोडता येईल इतपत धार असलेले कुऱ्हाडीच्या पात्यासारखे दगड, पशूचे कातडे सोलण्यासाठी व खरवडून साफ करण्यासाठी लहान लहान पाती असलेले दगड हजारोंनी डोळ्यांपुढे दिसत होते. मधूनमधून लिंबाएवढे व तशाच आकाराचे दगड तीनतीनाच्या पुंजक्याने आढळत होते. अशा तऱ्हेचे

दगड अमेरिकेतील वन्य जमाती वापरताना आढळलेले आहे. ह्या दगडांना 'बोला' म्हणतात. एका लांब दोरीच्या शेवटी तीन लहान दोऱ्या लावतात. प्रत्येक दोरीच्या शेवटी एक एक दगड घट्ट गुंफतात ती लांब दोरी गरगर फिरवून जनावराच्या पायाच्या रोखाने फेकली की ती पायाभोवती गुंडाळून गेल्यामुळे जनावर कोलमडून पडते-पुष्कळदा त्याचा पाय मोडतो व ते शिकाऱ्याच्या हातांत सापडते. ह्या दोऱ्या वापरात नसतील तेव्हा गुंडाळून ठेवलेल्या असतात. आफ्रिकेतही मानवाने त्या तशा गुंडाळून ठेवलेल्या असणार. दोऱ्या कुजून नाहीशा झाल्या– दगड मात्र तीनतीनच्या पुंजक्याने राहिले! सरोवरे आटली, अरण्ये नाहीशी झाली, पशू गेले, माणसे गेली, फक्त त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा मात्र राहिल्या. आज तेथे आफ्रिकेतील एक सुप्रसिद्ध सोडा कंपनी कुदळीफावड्याने जमिनीवरील क्षार उकरून जगभर नेऊन विकीत आहे.

ह्याप्रमाणे रिफ्ट व्हॅली, त्यांतली सरोवरे, त्यांच्यामध्ये उत्पन्न झालेले ज्वालामुखी पर्वत हे मिळून आजही एक आश्चर्यकारक दृश्य आहे; पण त्यापेक्षाही आश्चर्य म्हणजे ही सर्व प्रचंड घडामोड मानवेतिहासाशी गुंफली आहे. ही गुंफण इतकी गुंतागुंतीची आहे की, आत्ता कुठे तिचा थोडा थोडा उलगडा पडू लागला आहे. आफ्रिकेत काम करणारे शास्त्रज्ञ दर वर्षी ह्या ज्ञानात भर घालीत आहेत. रिफ्ट व्हॅली व तिच्याशी निगडित असलेला मानवेतिहास ह्यासारखी सुरस व चमत्कारिक कथा दुसरी नाही.

आमचा मोटरचा प्रवास कधीच संपला होता. टांगानिका सरोवरापासून नायरोबीला आम्ही विमानानेच आलो. मोटरच्या प्रवासात ज्याप्रमाणे ठिकठिकाणी थांबून प्रदेश पाहता आला तसे विमानात करता येईना. शिवाय विमान अतिशय उंचावरून जाते व खाली धुके असते त्यामुळे काही विशेष दिसले नाही. नायरोबीजवळच्या रिफ्ट व्हॅलीत परत गेलो. तेथल्या पाहण्यासारख्या जागा पाहून झाल्यावर मी हिंदुस्थानचे विमान पकडले. ज्या प्रदेशावरून विमान जात होते तो प्रदेश बराच रूक्ष होता. कुठे शेतीही फारशी दिसत नव्हती; कुठे अरण्यही फारसे दिसत नव्हते. तिथली लोकवस्ती अतिशय विरळ आहे व आफ्रिकेतील बऱ्याचशा भटक्या व गुरांवर उपजिविका करणाऱ्या टोळ्या तेथे राहतात. विमान संध्याकाळी निघाल्यामुळे खालचा देखावाही लवकरच दिसेनासा झाला. येताना हा प्रवास दिवसाउजेडी झाल्या असल्यामुळे मला त्याचे काही विशेष वाटले नाही. ह्या

वेळेला अरबस्तानचा प्रवास सकाळी होणार होता तेव्हा ताजेतवाने राहावे म्हणून तारे किंवा आकाश ह्यांकडे न बघता विमानात झोप काढली. सकाळी एडनचा रूक्ष विमानतळ आला. त्या वैराण प्रदेशावरून निघालो. सुदैवाने खिडकीशेजारी जागा मिळाली. विमान फार उंचावरून जात नव्हते, हवाही अगदी स्वच्छ होती; त्यामुळे खालचा प्रदेश लख्ख दिसत होता. पर्वतांच्या रांगा दिसत होत्या. कोठेही झाडझुडूप काही दृष्टीआड असे नव्हतेच. पर्वतांतून नद्या निघालेल्या उगमापासून दिसत होत्या. नद्यांचे संगम दिसत होते. नद्या दऱ्याखोऱ्यांतून वळणावळणाने कशा जात होत्या, ते दिसत होते. आम्ही समुद्रकिनाऱ्याला येऊन पोचलो, तेव्हा नद्यांची मुखे दिसू लागली. दहा दहा पंधरा-पंधरा मुखांनी, पंख्यासारखी पसरून एक एक नदी समुद्राला मिळाली होती. तेथे, भूशिरे दिसत होती. ह्या सर्व देखाव्यात वाण होती ती पाण्याचीच! पूर्वी एके काळी ह्या प्रदेशात नद्या वाहिल्या होत्या, त्यातले पाणी गेले आटून अन् आता फक्त ते पाणी कसे वाहिले, कुठून वाहिले हे दाखविणारे वाळवंटातून दिसणारे पात्र तेवढे राहिले.

आफ्रिकेत ज्या परिषदेसाठी गेले होते, तिथे एकदोघा शास्त्रज्ञांनी अरबस्थानातील प्राचीन वस्तीबद्दल निबंध वाचले होते. ह्या कोरड्या पडलेल्या नद्यांकाठी मानववस्तीचे अवशेष सापडतात. एके काळी येथे माणसे होती, जनावरे होती, पाणी होते, झाडे होती, गवत होते, पाणी नाहीसे झाले तेव्हा इतरही सर्व नाहीसे झाले, एका काळच्या सुबत्तेच्या ह्या विलक्षण खुणा मात्र शिल्लक राहिल्या. कापाचा शृंगार गेला, भोकांची जखम मात्र राहिली. पाणी नाहीसे होण्याचे कारण बऱ्याच अंशी नैसर्गिक व काही अंशी मानवी कृतीत सापडते. नैसर्गिक कारण असे सांगतात की, युरोप खंडाला पाऊस आणणारे वारे पूर्वी भूमध्यसमुद्रावरून वाहात असत, व थोडासा पाऊस थेट अरबस्तानापर्यंत पोहोचे. का कोण जाणे, ह्या वाऱ्यांनी आपली दिशा किंचित बदलली हे एक, व दुसरे जॉर्डनची रिफ्ट व्हॅली उत्पन्न होताना भूमध्यसमुद्राचा पूर्व किनारा सबंधच्या सबंध उचलला गेला, त्यामुळे जे काय चार ढग येतात ते तिथेच अडकतात आणि अरबस्तानात पाऊस पडत नाही. मनुष्याची करणी म्हटले ती अशी, की माणसांनी आपल्या उपयोगासाठी अरण्येच्या अरण्ये कापली. जे काय थोडे गवत होते त्या जमिनीत नांगरट केली; आणि पाळीव गुरे व विशेषतः शेळ्या ह्यांच्या चरण्यामुळे गवत व रान ह्या दोहोंचाही फडशा पडला. खालचा प्रदेश पाहता पाहता मला नुकत्याच ऐकलेल्या एका गोष्टीची

आठवण झाली. इस्त्राएलच्यां सरकारने शेती, बागाईत व लहानलहान राखीव जंगले करायचा निश्चय केला आहे; आणि त्या प्रयत्नांना मदत म्हणून इस्त्रायलच्या राज्यामध्ये शेळी हे जनावर पाळण्याची बंदी आहे; शास्त्रज्ञांचे असे मत आहे की, पोर्तुगाल, स्पेन, सिसिली, माल्टा, भूमध्य समुद्रातली इतर बेटे व ग्रीसचा बराच भाग हे वैराण होण्याचे मुख्य कारण म्हणजे शेळी होय; अर्थात् शेळीच्या मदतीला अरबस्थानात वर सांगितलेल्या इतरही गोष्टी होत्या.

समुद्राच्या किनाऱ्याकिनाऱ्याने विमान चालले होते. सबंध किनारा अतोनात वैराण व एकाकी आहे. खोटया खोटया नद्यांची खोटी खोटी मुखं बघता बघता डोळे दुखू लागले व थोडी डुलकी लागली. थोड्या वेळाने जागी झाले ते एक धक्का मिळाल्यामुळे. खिडकीतून बाहेर पाहिले तो विमान ढगातून चालले होते. थोड्याच वेळात भारताचा किनारा दिसू लागला सह्याद्रीच्या रांगेवर लठ्ठ पोटाचे काळे ढग विसावत बसले होते. विमान ढगांच्या वर होते पण ढगांना फटी पडल्या होत्या व त्या रिफ्ट व्हॅलीमधून पश्चिम किनारा पाण्याने तुडुंब भरलेला दिसत होता. अरबस्थानचा निळा समुद्र जाऊन तिथे नदीच्या मुखातून आलेल्या गाळाने गढूळ झालेला समुद्र खाली दिसत होता. जिकडून तिकडून पाणी वाहात होते व जिथे थोडीशी म्हणून माती असेल तिथे वनस्पती उगवलेल्या दिसत होत्या. विमान वेगाने खाली उतरत होते व माझी सुजला, सुफला अशी आई सर्वांगाने ठिपकत आपल्या गार कुशीत घ्यायला तितक्याच वेगाने धावून वर येत होती.

आफ्रिकेतला प्रवास झाल्यानंतर काही महिन्यांनी विमानाने मुंबईहून दिल्लीला जात होते. विमान सह्याद्री ओलांडून तापीच्या खोऱ्यावरून गेले आणि तापीच्या खोऱ्याची उत्तरेकडील भिंत– सातपुडा पर्वताची रांग– ओलांडताना एकदम ध्यानात आले की खरोखर तापी-पूर्णा खोरे ही पण एक रिफ्ट व्हॅलीच आहे. ह्या रिफ्ट व्हॅलीमध्ये तापी मागून आली. सातपुड्याची भिंत रिफ्ट व्हॅलीच्या भिंतीप्रमाणेच सरळसोट असून त्या बाजूने तापीला काही नद्या मिळत नाहीत. ही रिफ्ट व्हॅली आफ्रिकेतील रिफ्ट व्हॅलीच्या समकालीन असेल तर पूर्णा, तापी व नर्मदा ह्या तीन नद्यांच्या खोऱ्यांचा अभ्यास मनोरंजक होईल.

१९५९

*

९

# सुटका

"ह्या वेळी बराच त्रास झालेला दिसतो आहे तुला. फारच दमलेली दिसतेस."

"तसा त्रास नाही झाला; पण बैलगाडीचा प्रवास आणि चालणं बरंच झालं आणि मापं घ्यायला माणसं इतकी मिळाली, की आम्ही रात्रंदिवस काम करीत होतो; त्यामुळं शीण आला आहे. जाईल दोनतीन दिवसांत."

लांबचा प्रवास करून मी घरी आले होते. घरातील सर्व गोष्टींचा आस्वाद परत नव्याने घेत होते. रॉकेलचा कंदील किंवा मेणबत्ती यांच्या उजेडात दोन आठवडे वावरल्यावर घरचे विजेचे दिवे विलक्षण तेजस्वी वाटत होते. बऱ्याच दिवसांत उघड्यावर नदीत किंवा आडाच्या पाण्याने अंग धुतल्यावर स्वतंत्र न्हाणी खोलीत साबण लावून ऊनऊन पाण्याने आंघोळ केल्याने मन व शरीर कसे सुखावले होते! बऱ्याच दिवसांनी खरोखर स्वच्छ कपडे अंगावर आले होते. भात, भाजी, पोळी, आमटी, चटणी, लोणचे वगैरे रोजचेच जेवण पंचपक्वान्नांसारखे वाटत होते. गाडीतून उतरल्याबरोबर फाटक उघडून आंत येते, तो दोघा कुत्र्यांनी अंगावर उड्या मारमारून स्वागत केले होते. त्यांच्या धाकट्या मालकीणीने येऊन अंगणांतच मला मिठी मारली होती व इतर माणसे बाहेर यायच्या आत तिघेजण माझ्या भोवतीभोवती घुटमळून मला पुढे पाऊलच घालू देत नव्हती. पण इतरांनी येऊन ह्या प्रेमाच्या वर्षावातून माझी सुटका केली व मी आत आले. त्या क्षणापासून आतापर्यंत मी बाहेरचे जग विसरले होते- - विसरले म्हणण्यापेक्षा ते जग किती निराळे आहे; किती लांब आहे; आता त्याचा आपला संबंध नाही, असे मला सारखे वाटत होते. पण ह्या मोहांतून

मला जागे व्हावेच लागेल. "तो पत्रांचा ढीग पाहिलास का? आज नाही चाळलास तरी उद्या मात्र पाहवा लागले." ह्या बोलण्याने मी दचकले. ह्या गावाहून त्या गावाला अशी मी भटकत होते, म्हणून सर्व डाक इथेच अडकून राहिली होती. पत्रांचा ढीग पडला होता. काही थोडी नातेवाईकांची व मित्र मंडळींची होती. ती घरी सर्वांची वाचून झाली होती. मी ती वाचतावाचता आतील मजकूर व पाठवणारी व्यक्ती ह्यांबद्दल घरगुती गप्पा झाल्या. नंतर दुसरा ढीग समारंभाच्या निंत्रणांचा होता. सुदैवाने सर्व समारंभ मी पुण्यास पोचायच्या आंत उरकलेले होते. मी एक श्वास टाकून तो ढीग सबंधच्या सबंध उचलून टोपलीत टाकला व उरलेल्या पत्रांकडे वळले.

"उद्या तरी वेळ कसा मिळणार? सकाळी दोन तास गणेशखिंडीवर शिकवणे, परत येऊन घाईघाईने जेवून कॉलेजात जायचे, तिथे अकरा ते पाचची हजेरी. पंधरा दिवसांच्या गैरहजेरीमुळे कितीतरी विद्यार्थी वाट पाहात असणार. शिवाय तिकडे काही पत्रव्यवहार पाहावा लागणारच. संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास एकदा आईकडे जाऊन भेटून यायचे आहे. एकदा रोजचे चक्र सुरू झाले म्हणजे वेळ कुठचा? आठवड्यातून दोन तास शिकवायचे, तर सातआठ तास वाचन व अभ्यास करावा लागतो मला अजून!"

मी पत्रे पाहू लागले. "आमच्या गावी आम्ही अमकी व्याख्यानमाला योजिली आहे. आपण एक पुष्प गुंफावे." हाच मजकूर निरनिराळ्या प्रकाराने आलेला होता. कोणी मुलांना गोष्टी सांगण्याचा उपक्रम सुरू केला होता. "तुम्ही येऊन आमच्या मुलांना गोष्टी सांगा." कोणी लिहिले होते, "अमक्या गावात अमके भगिनीमंडळ आहे, त्याच्या हळदीकुंकूप्रसंगी व्याख्यान द्यावे." "अमक्या पेठेत शाळेच्या पाचवी-सहावी-सातवीचा वार्षिक उत्सव आहे, तुम्ही मुख्य पाहुण्या म्हणून यावे व चार शब्द सांगावेत." एका विशेष तडफदार सेक्रेटरीने नुसते आमंत्रण दिले नव्हते, तर त्याबरोबर आतापर्यंत कोणकोणते लोक येऊन कशाकशावर बोलून गेले त्याची ठळक अक्षरात यादी दिली होती.

मी पत्रे पाहात होते तो धाकटी आली. "आपण येत्या शनिवारी सर्कसला जाऊ. बघ, किती छान सर्कस आहे ती!" सर्कशीची एक

जाहिरात तिने माझ्यापुढे टाकली. तिची जाहिरात व त्या सेक्रेटरीचे छापील पत्रक ही दोन्ही इतकी सारखी होती, की वाचून तिच्या हातात जाहिरात देण्याऐवजी मी ते पत्रकच दिले!

"हे काय भलतंच दिलंस? माझी जाहिरात दे परत, व तुझं पत्र घे तुला!" मी जरा आश्चर्याने ते पत्रक हातात घेतले व परत त्यावर नजर टाकली. नुसते आकार-साम्यच नव्हे तर सर्वच दृष्टींनी ते पत्रक म्हणजे सर्कसची जाहिरात होती. तो सेक्रेटरी निरनिराळ्या जनावरांना प्रेक्षकांपुढे नाचवीत होता. बंगालचा पट्ट्या वाघ, गीरच्या रानातले सिंह व सह्याद्रीच्या जंगलातली हरणे एका रिंगणात उभी होती– छे! वाचायला चुकले. पुण्याचे महामहोपाध्याय द. वा. पोतदार, मुंबईचे अनंत काणेकर व नागपूरच्या कुसुमावतीबाई देशपांडे एका व्यासपीठावरून, पण एकामागून एक त्या व्याख्यानमालेत व्याख्याने देऊन गेले होते. आता माझा खेळ व्हावा, अशी प्रेक्षकांची मनीषा होती व रिंगमास्तर मला पिंजऱ्यातून बाहेर येण्यास फर्मावीत होते. फडाड्! चाबकाचा आवाज ऐकू येऊन माझे अंग शहारले. मी डोळे चोळून भोवताली पाहिले. अजून तरी मी घरीच होते. मी ह्या सर्कशीत जाणार नाही. ही लिहिणारी सगळी माणसे साक्षर होती, "माझे विचार तुम्हांला ऐकायचे आहेत ना? मग मी मोठ्या परिश्रमाने लिहिते ते लेख व पुस्तके का नाही तुम्ही वाचीत? मला काय येत आहे ते सर्व त्यांत आहे. त्याबाहेरचं मजजवळ काही नाही. मुलांना गोष्टी सांगा की. घरातली मुले पुरेशी वाटत नसली तर आळीतली गोळा करा. कितीतरी आपोआप तुम्हांला दुवा देतील. घरगुती गोष्टींना जागतिक रूप देऊन त्याची जाहिरात कशाला? शाळेतल्या वर्गावर्गांची संमेलने करायची असल्यास खुशाल करा. शिक्षक व विद्यार्थी एकत्र जमा. खा, प्या, हसण्याखेळण्यात एक दिवस घालवा; पण त्याचा समारंभ करून त्याचा साक्षी म्हणून परक्याला का बोलावता? संक्रांतीच्या हळदी-कुंकवालासुद्धा अर्घ्य लागू लागले. नशीब माझे की लग्नसम..रंभ अजून अमक्या तमक्याच्या अध्यक्षतेखाली नाही होऊ लागले!"

"अग तू व्याख्यान कसलं देते आहेस आणि चिडली का आहेस? लिहून टाक सगळ्यांना, वेळ नाही म्हणून."

मी मोठमोठ्याने बोलत होते हे माझ्या ध्यानातच नव्हते. मी गप्प

बसले. "सारखा दोन दिवस प्रवास चालला होता. दमली आहेस, आता नीज. उद्या लिहिता येतील उत्तरं."

"नाहीतर मी कार्ड लिहून ठेवतो. तू नुसत्या सह्या कर," मोठ्या सहानुभूतीने मुलग्याने पुस्ती जोडली. झाली एवढी शोभा पुरे, म्हणून मी पण मुकाट्याने निजावयास गेले.

दोनतीन दिवस सुखाचे गेले. कामात होते, पण त्यात त्रास व शीण वाटत नव्हता. आठवड्यात एकच लेक्चर होते; ते घेऊन झाले होते. कॉलेजातील सहकारी मंडळींशी बोलणे-चालणे झाले. कितीतरी विद्यार्थी शंका विचारून गेले. इतर काही पीएच्. डी. च्या निबंधाची टाचणे घेऊन आले होते, त्यांच्याशी चर्चा झाली. घरी एक पोलके शिवायला घातले. कसल्याशा वड्या मुलांना आवडतात, त्या केल्या. धाकटीने साड्या फाडून ठेवल्या होत्या त्या शिवल्या. तरी काही कामे राहिली होती. मुख्य म्हणजे प्रवासातील खर्च केलेल्या पैशाचा हिशेब व रोज झालेल्या कामाचा तपशील लिहून तयार करावयाचा होता. हिशेबाची कटकट नेहमी असते. खर्चाचे टाचण तयार असते; पण ते जसेच्या तसे देता येत नाही. काही खर्च ऑडिटर मान्य करीत नाही. उदाहरणार्थ, जंगली मुलुखात पुरुषांना दिलेल्या विड्या व लहान मुलांना दिलेला खाऊ ह्यासाठी पाच सहा रुपये खर्च झाले होते; ते कशात घालायचे? एका गावाला जाताना गाडीत जागा नव्हती, म्हणून दुसऱ्या वर्गाने प्रवास केला. ते पैसे कसे दाखवायचे? पण आता मला ह्या हिशेबांची सवय झाली होती. मुख्य म्हणजे माझी मदतनीस, ऑफिसच्या मदतीने ह्या सर्व गोष्टी ठाकठीक करीत होती, म्हणून मला त्यांचे ओझे वाटत नव्हते. काढलेले फोटो छापायचे, त्यात एखादा दिवस जाणार; पण तेही काम मदतनीस करील सावकाश, म्हणून मी एकंदरीने स्वस्थ होते. रोजच्या ठराविक आयुष्याच्या चाकोरीतून गाडी चालली होती. अभ्यास, आणलेल्या माहितीचे वर्गीकरण व टाचण, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व घरातले काम आणि वाचन व अधूनमधून लेखन. शनिवार रविवार जवळच आले होते. तेव्हा घरी विश्रांती घेतली, म्हणजे उरलासुरला शीण पण जाईल, अशी माझी खात्री होती.

तिसरा दिवस उजाडला. सकाळचे सर्व आटोपून जरा पुस्तक हाती धरले तो एक बाई भेटावयास आल्या. "मी अमकी अमकी. म्हटलं,

तुम्हांला पाठवलेल्या पत्राचं उत्तर आलं नाही; समक्षच भेटावं म्हणून काल संध्याकाळच्या गाडीनं आले."

मी जरा आश्चर्याने म्हटले, "अहो; तुम्हांला पत्र पाठवल्याला तीन दिवस झाले. तुमच्या गावी पुण्याहून तर दुसऱ्याच दिवशी पत्र जातं."

"छे बाई, मिळालं नाही. मी अगदी रोज वाट पहात होते. मग काय उत्तर दिलं?"

"मला येता येणार नाही. इथंच माझी ढीगभर कामं साचलीत." मी तुटकपणे म्हटले.

"मला नव्हतीच आशा! सगळ्यांनी विनवून सांगितलं की तुम्हांला आण. मी म्हटलं, त्या कशाला आपल्या लहानशा गावात येतात! शहर म्हणायचं, पण खरं म्हणजे पुण्याच्या मानानं खेडंच. तर मी येते. त्या अमक्याचं घरी किती दूर आहे हो? कसं जायचं ते सांगा. पुण्याची इकडली वस्ती मला माहीत नाही. जरा कुठल्या रस्त्यानं जायचं ते सांगा, म्हणजे मी जाईन."

माझे पत्र पोचले नाही, म्हणून त्या बाईला इतक्या लांब यावे लागले. इकडे वाहन मिळायची पण पंचाईत. बाई दमल्यासारखी दिसत होती. मला माझ्या तुटकपणाची लाज वाटली. मी मवाळ आवाजात म्हणाले, "वीस-पंचवीस मिनिटं थांबलात तर बस येईल. तुम्हांला जिकडं जायचं त्याच रस्त्यानं जाईल. जरा बसा, चहा करते."

"छे! चहा नको. तेवढं तुम्ही हो म्हटल असतंत म्हणजे माझे सारे श्रम हरले असते. पण तुम्हांला आग्रह करायचा तरी जिवावर येतं. तुम्ही कामाची माणसं, सगळी शिकलेली. आमचा समाज आपला खेडवळ. दुसऱ्या कुणाचं नाव सांगा; नाहीतर चिठ्ठी द्या, म्हणजे तिकडं जाईन."

सांगायचे तात्पर्य काय, बस यायच्या आत मी व्याख्याने द्यायचे कबूल केले; शनिवारी सकाळच्या गाडीने जायचे, रविवारी रात्रीच्या गाडीने परत आले, की सोमवारी कॉलेजला हजर राहता येईल वगैरे. ती बाई गेली, आणि मी कशी हा हा म्हणता बळी पडले, त्याची जाणीव होऊन मी कपाळावर हात मारून घेतला! तेवढ्यात मुलगा बसण्याच्या खोलीत आला. "शेवटी पाघळलीस ना?" त्याने कुचेष्टेने विचारले. माझा दुःख व राग शब्दांपलीकडे होते. मी फक्त मान हालवली. मला माझा स्वतःचा राग आला

होता. मी खुशामतीला बळी पडले होते. नुकतेच कुठल्याशा पुस्तकात एका सर्कसवाल्याची मुलाखत वाचली होती; त्यात त्याने सांगितले होते– प्राण्यांना माणसाळवयाला व शिक्षण देण्यासाठी हल्ली चाबकाचा वा काठीचा उपयोग करीत नाहीत. युक्तीने व गोडीगुलाबीने त्यांच्याकडून कामे करून घेतात. अगदी हेच तंत्र त्या बाईने वापरले होते, व मी माकडा-कुत्र्याप्रमाणे त्याला बळी पडले होते. माझी शनिवार रविवारची सुटी बुडाली होती. माझे व पोरीचे न्हाणे एका आठवड्याने पुढे गेले होते. व्याख्यान लिहण्यापायी पुढचे दोनतीन दिवस तरी खर्ची पडणार होते.

मी कॉलेजात गेले, पण माझा कामातला उत्साह गेला होता. मन वाचण्यात, लिहिण्यात कशातच केंद्रित करता येईना. संध्याकाळी घरी आले, तो काही काम हातून न होताही थकलेली अशी आले; व कोचावर लवंडले. "मी सरबत करते आहे, घेशील ना?" जेवणघरातून आवाज आला. मी 'हो' म्हटले. एवढ्यात टेलिफोनची घंटा वाजली. "कोण आहे?"

"मी अमकी, तुमच्याशीच काम आहे. येत्या मंगळवारी आम्ही आमच्या बालवाचन मंदिराचा उद्घाटन-समारंभ तुमच्या हस्ते करण्याचं ठरवलं आहे. तुम्ही हो म्हटलं पाहिजे."

"छे हो! माझ्यावर कृपा करा, मला शक्य नाही. माझं.... "

"नाही. मी नाही ऐकून घेणार! अर्ध्या तासापेक्षा वेळ घेणार नाही. माझी गाडी पाठवीन तुमच्या घरी... ."

माझा रागाचा पारा चढत होता, पण त्यांना नाही म्हणणे शक्य नव्हते... त्याशिवाय सुटका नव्हती. मी 'हो' म्हणून टेलिफोन खाली ठेवला.

पैसे पुरत नाहीत म्हणून बाराबारा तास किंवा चोवीस तास तिसऱ्या वर्गाने मी जात होते. दगडधोंड्यांतून मैलमैल पायी किंवा खटारगाडीने हिंडत होते; त्या वेळी होती का ह्यांची गाडी? माझ्या रागात माझा विवेक नाहीसा झाला होता. त्या बाईने माझे श्रम वाचवायसाठी गाडी देऊ केली; पण त्याने माझे मन जास्तच भडकले.

गौरी जोरजोराने लिंबे पिळीत होती. "अग जरा हळू, सालीचासुद्धा रस काढणार आहेस का?" मी म्हटले. मनात आले, ही माणसेसुद्धा अशीच करताहेत. मला पिळून झाले, की अशीच चोथ्या-सालासारखी टाकून देतील व म्हणतील "बाईंच्या पहिल्या लिखाणातील व बोलण्यातील नवलाई उरली

नाही. तेच तेच मुद्दे परत सांगतात." एका माणसाची आयुष्याची कमाई किती असणार? ती कमाई करताना अनुभूतीचा प्रवाह तुडुंब भरून चालला की मनुष्य आपण होऊन दुसऱ्याला बोलावते व आपली कमाई वाटीत सुटते. पण त्याला ओहोटी लागणारच. परत नव्याने भरायला थोडी उसंत नको का? मी एक क्षुद्र माणूस. इतरांसारखी मीसुद्धा माझ्या क्षुद्र संसारात, वेड्याबागड्या मुलांत रमलेली आहे; माझ्या कामातं गढलेली आहे. अशी वेळ येते की माझी अनुभूती मला सांगावीशी वाटते; अशी वेळ येते की माझ्या कामात काही नवे सापडल्यासारखे वाटते व मग मी कोणी न बोलावता सांगते व लिहिते. ते करून झाले की मजजवळ काही राहात नाही. मग मी बोलले तर ते रिकाम्या गाडग्यात दगडाच्या खुळखुळण्यापेक्षा जास्त किंमतीचे नसते. सभांतून बोलावयाचे तरी काय? पुढे बसलेला समाज एकजिनसी नसतो. काही अशिक्षित, काही अर्धशिक्षित, काही सुशिक्षित. वये चौदा-पंधरापासून तो पंचाहत्तरापर्यंत. कोठच्याही विषयावर परिश्रमपूर्वक बोलणे कसे शक्य होणार? मी उठले आणि असला समाज पुढे पाहिला की माझे हातपाय गळतात. असल्या बोलण्याने कोणाला काही बोध व आनंद होत असेल का?"

बाहेरचे दार वाजले म्हणून मी पाहिले तो तीन-चार माणसे फाटक उघडून अंगणात येत होती. 'अरे देवा!' मी म्हटले. मुलगा तिथेच वाचीत बसला होता. "तू नको पुढं होऊस. सकाळसारखा प्रकार होईल. मी लावतो त्यांना वाटेला." त्याने होकाराची वाट न पाहता दार उघडले व तो सोप्यात गेला. खोलीत पडल्यापडल्या मला बाहेरचे संभाषण ऐकू येत होते.

"कोण पाहिजे आपल्याला? कोण आपण?"

"आम्ही अमक्या गावचे. मी आमच्या गावच्या व्याख्यानमालेचा चिटणीस. हे दुय्यम चिटणीस, हे खजिनदार, हे उपाध्यक्ष– चौघे आलोत. म्हटलं, तिघांनी जाऊन कार्यभाग होणार नाही." गृहस्थ आपल्यावर खूष होऊन हसले. "बाईंना पुष्प गुंफण्याची विनंती करण्यास आलो आहो. सेकंड क्लासचं भाडं देऊ. सकाळच्या गाडीनं निघायचं. मुंबईला किंवा दादरला गाडी बदलायची, की एका तासात स्टेशन येईल. आम्ही स्टेशनवर न्यावयास येऊ. मग एका तासाचा मोटारीचा प्रवास की–"

"अहो, पण..."

"...पण वगैरे चालणार नाही. बाई घरात आहेत असं आम्हांला नक्की माहीत आहे. तुमच्या माळ्यानंच कुंपणावरून सांगितलं, की त्या घरी येऊन तास झाला. कुठं बाहेर गेल्या नाहीत."– आपल्या हुशारीचे परत एकदा कौतुक वाटून तो दुष्ट हसला; व इतरांनी त्याला साथ दिली. "आम्ही ठरवलं आहे की नकार म्हणून घ्यावयाचा नाही! अहो, इतकी नावं सुचवली पण सभासदांनी एकमुखानं सांगितलं, की दुसरं कोणी नको."– साखर पेरावयास सुरुवात झाली. "बाईंचेच विचार ऐकावयाचे आहेत. बाईंनाच भेटलेलं बरं. त्यांना निरोप सांगा... "

गृहस्थ दमदार होता. बोलताना लौकर थांबण्याचे चिन्ह दिसत नव्हते. नंदू दात आवळून ओरडला–

"अहो, तुम्ही म्हणता त्या बाई, माझी आई, आताच थोड्या वेळापूर्वी मेली!"

१९५५

*

१०

# किती घेशिल दो कराने

दिल्लीला पोचल्यापासून उन्हाच्या जोडीला धुळीच्या वादळालाही सुरुवात झाली होती. भर दुपारीसुद्धा सूर्य दिसत नव्हता. चमत्कारिक पांढुरका उजेड होता; पण फार लांबवरचे काही दिसत नव्हते. राजपूरला प्रत्यक्ष वादळ नव्हते, पण अंतराळातली धूळ काही कमी झाली नव्हती; व उष्णता तर वाढलीच होती. डोळे उघडे ठेवले तरी दुखत होते. बंद केले तरी दुखत होते. दोन दिवस त्या तशा उन्हात हिंडून हिंडून अगदी दमून गेले होते, पण कुलूला जायला तर पाहिजेच होते. पुण्यापासून पत्रे व तारा गेल्या होत्या. लोक उगीच वाट पाहात बसायचे. अगदी अनिच्छेने रात्रीची गाडी पकडली व धगधगत्या डब्यात बसून पहाटेची पठाणकोटला पोचले.

स्टेशनवर कुणीच आले नव्हते. काय करावे बरे? तोंड धुऊन थोडे खाऊन घ्यावे; तोवर कुणीतरी येईल– निदान एखादी जीप व ड्रायव्हर तरी येईल, असा विचार केला. पण अर्ध्या-पाऊण तासाने पाहिले तरी कोणी नव्हते. आता काय करावे बरे? इतक्या लांब आले, तशी बसने कुलूला जावे व काम आटपून टाकावे, म्हणून बसचे तिकीट काढायला गेले. "छे, कुलूला जाणारी बस कधीच गेली. आता बस मंडीपर्यंत जाईल. कदाचित तेथून कुलूची बस मिळेल"... तरीच बरं का, प्रवासी गाडीतून उतरून धावत सुटले होते मघाशी! काश्मीर व कुलू लांब पल्ल्यावर म्हणून पहिली बस पकडण्याची धडपड असणार त्यांची. मी मात्र जीपवर विसंबून राहिले. "विचार कसला करता? दुसरी गाडी पण भरत आली आहे." मी भानावर आले. तिकीट काढले. सामान चढवले व आत बसले तो गाडी सुरू झाली. मनातल्या मनात मी रागावले होते– गोंधळलेही होते. महिन्यापूर्वीपासून

तारा व पत्रे जाऊनही कोणी कसे न्यायला आले नाही, हे काही समजेना. आता आज कुलूला पोचते का नाही कोण जाणे? सुदैवाने जागा खिडकीजवळची मिळाली होती. हवा दिल्लीच्या व राजपूरच्या मानाने जरा गार होती, पण वातावरण मात्र धुळीने भरलेलेच होते.

रस्त्याच्या बाजूने शेते व फळबागा होत्या. सगळीकडे हिरवेचार होते पण विशेष थंड नव्हते. सबंध वाटभर म्हशींचे कळपच्या कळप व त्यांमागून कुटुंबेच्या कुटुंबे जाताना भेटत होती. फाटकेतुटके कपडे पण बळकट सुरेख माणसे. कोण बरे ही? चौकशी करताना कळले की ही सर्व माणसे गुजर जमातीची होती. भाकड म्हशी, गाभण म्हशी, लहान रेडके हिमालयातील रानांत हाकून न्यावयाची व हिवाळ्याच्या सुमाराला परत येऊन काही विकायची, काही घरी ठेवून दुधाचा धंदा करावयाचा, असा या लोकांचा उद्योग असतो. आपल्या महाराष्ट्रात अशा तऱ्हेचा उद्योग करणारे लोक आहेत. ते बहुधा 'गोसावी' जातीचे असतात– कोकणात त्यांना 'हेडे' म्हणतात– आपल्याकडचे हिंदू असतात. गुजर बहुतेक मुसलमान असतात. त्यांच्या कळपात गायी काही दिसल्या नाहीत. सर्व वाटभर हे लोक दिसत होते. सर्व संसार बरोबर घेऊन चालले होते. काळ्या लठ्ठ म्हशींना काठ्यांनी रस्त्याच्या मधून बाजूला हाकून नेणारी, भुऱ्या केसांची, गुलाबी गालांची, मोठ्या डोळ्यांची, मळकट कपडे घातलेली, धुळीने भरलेली लहान लहान मुले मोठी लोभस दिसत होती. या मुलुखात आंघोळ क्वचित् करतात. त्यातूनही गुजरासारख्या भटक्या जमातींच्या अंगाला पाणी लागत नसणारच. त्यांच्या मुलींचे सौंदर्य मळकट शरीरांतून व लक्तरांतूनही दिसून येत होते. सौंदर्यवती, गोरीपान दमयंती हीनदीन अशी भटकत भटकत आपल्या मावशीच्या गावी आली; त्या वेळचे महाभारतातील सुंदर वर्णन आठवले.

बसच्या वाटेने जाताना मधेच पाट्या लागत होत्या. 'डलहौसी', 'चंबा', 'कांग्रा'... सारखे मनात येई- आपल्याला काम नसावं, एखादी मोटर असावी व मन मानेल त्याप्रमाणे या रम्य प्रदेशातून भटकावं. शतद्रू (शतलुज) पाहिली. आता विपाशा (बियासच्या) खोऱ्यातून चालले होते. डलहौसी व चंबाला इरावती (रावी) दिसली असती. जाऊ द्या झालं! जे नाही त्याच्यासाठी पुढे असलेल्याचा उपभोग टाकायचा की काय?

हळूहळू सपाटी संपून गाडी चढणीला लागली. एका बाजूला बियासचे विस्तृत खोरे व दुसऱ्या बाजूला बियास व रावी यांमधील पाणलोट असलेली पर्वतश्रेणी होती. पण खोरे काय, वा डोंगर काय, फार दूरपर्यंतचे दिसतच नव्हते. डोंगरातून सगळीकडून पाणी वाहात होते. हवेत गारठा आला होता. देवदाराची झाडी पण लागली. एका डोंगराच्या कडेला एक सुंदर देऊळ दिसले. ते बैजनाथचे होते. आमची गाडी वैजनाथला थांबली. येथे खूप गाड्या थांबल्या होत्या. उतरून परत चौकशी केली. कुलूहून कोणी आले नव्हते. थेट कुलूला जाणारी बस पण नव्हती. स्टँडवरून देऊळ दिसत नव्हते, पण जवळच आहे असे समजले म्हणून तिकडे गेले. देऊळ बंद होते. बाहेरच्या आवारातून काही देखावा दिसतो का पाहिले. धुळीमुळे काहीसुद्धा दिसले नाही. हिरमुसली होऊन परत गाडीत येऊन बसले. येथून पुढे, हिमालयात लागतो तसा, प्रचंड घाट लागला. मैलन् मैल वाकणावाकणाने गाडी सारखी चढत होती. डाव्या बाजूला, पाणी झिरपणारी पर्वतांची भिंत व उजव्या बाजूला सर्वत्र खोल; घळी असलेले बियासचे खोल खोरे. खरे म्हणजे बियास दिसतच नव्हती. ती खूप लांब गेली होती. तिला मिळणाऱ्या लहानलहान प्रवाहांनीच या असंख्य दरडी खणल्या होत्या. हिमालयातल्या नद्यांतून खोरी, फावडी वाहत येतात की काय कोण जाणे? मनुष्याला व इतर प्राण्यांना व वनस्पतींना पाणी पुरवणे हे त्यांच्या दुय्यम कामांपैकी वाटते. मुख्य काम म्हणजे माती उकरण्याची लहान लहान यंत्रेच. पाण्याच्या प्रवाहाच्या जोराने व दगडाच्या घासण्याने तीरावरचे प्रचंड विभाग खालून कापून काढलेले असतात. शेकडो फूट उंचीची खालून कापून काढलेली भिंत पाण्यावर अधांतरी लोंबती दिसते. असे वाटते की, थोडा वेळ पाहात उभे राहिले, तर डोळ्यांदेखत कित्येक फूट पर्वत खाली कोसळेल. खरोखरच दरवर्षी ठिकठिकाणी हिमालय असा कोसळत असतो. असा ढिगारा कोसळला, की नदीला तात्पुरता बांध उत्पन्न होतो. बांधामागे नदीचे पाणी वाढत राहते, बांधामागची खेडेगावे-शेते वाहून बुडूनसुद्धा जातात. एक दिवस पाण्याचा दाब इतका वाढतो, की फुगलेला प्रवाह ढिगाऱ्याचा बंधारा फोडून धो धो बाहेर पडतो. मग बंधाऱ्याखालच्या तीरावरील दरडी कोसळतात, गावे बुडतात, शेते वाहून जातात. हिमालयातील सर्वच नद्यांच्या खोऱ्यांतून हे दृश्य दिसते. नद्या वाहून वाहून पर्वत ठेंगणे होतील.

नदीचा वाहण्याचा जोर कमी होईल. आपल्या महाराष्ट्रांतल्या नद्यांप्रमाणे त्या वाहतील अशी कल्पनाही करता येत नाही. कारण वाहून नेलेल्या गाळाने गंगेचे खोरे जसजसे भरून वरती येत आहे, तसतसा हिमालय पर्वतही म्हणे उंच उंच वाढत आहे! या नद्या म्हणजे शंकराच्या संहारक शक्तीचे दृश्य रूपच आहेत. त्यांचे सौंदर्य जसे अनुपम, तसेच त्यांचे रौद्र स्वरूपही मन व डोळे ओढून घेणारे.

गाडी अगदी रूक्ष चढ चढत होती. रणरणत होते. चढ काही केल्या संपत नव्हता. तेरा हजार फूट याप्रमाणे चढलो. एका बाजूला वैजनाथचे डोंगर व दुसऱ्या बाजूला बियास नदीचे अरुंद पात्र व तिच्या काठी वसलेले 'मंडी' गाव दिसले. दुसऱ्या क्षणी हे दृश्य नाहीसे होऊन गाडी वळणावळणाने उतरू लागली. थेट मंडीपर्यंत गाडी उतरत होती. मंडीत एक सुंदर भव्य राजवाडा आहे. एकंदर गाव सुंदर पण गलिच्छ आहे. कुलूच्या गाड्या निघून गेल्या होत्या व रात्र काढणे मला भाग होते. एका डोंगराच्या टोकावर सुंदर डाकबंगला आहे; पण तेथे चढून जायचे व पहाटे सामान घेऊन उतरायचे म्हणजे दिव्यच. सांगितलेला हमाल वेळेवर आला नाही तर वळकटी व पेटी घेऊन मैलभर पहाटेच्या अंधुक उजेडात आपल्याच्याने काही चालवायचे नाही असा विचार करून बस स्टँडजवळच्याच हॉटेलात एक खोली घेतली. असेच कुठेतरी जेवण उरकले व खोलीत येऊन पडले. इतका वेळ मनस्वी उकडत होते. आता भरभर ढग जमून गडगडाट, विजा व पावसाला सुरुवात झाली. भल्या पहाटे गाडी निघायची होती. एक चुकली की तीनचार तास दुसरी मिळत नाही. कारण हिमालयात सर्वत्र 'गेट' ची पद्धत आहे. या पद्धतीने गाड्यांची वाहतूक एकेरी असते. रस्ते अरुंद, खाली खोल नदीचे पात्र व दरडी कोसळण्याचे भय यामुळे फक्त एकेरी वाहतूक ठेवतात. पहिल्या गेटात सकाळी सहा ते सात मंडीहून कुलूला जाणाऱ्या व कुलूहून मंडीला येणाऱ्या गाड्या दोन्ही बाजूंनी सुटतात. साधारण अर्धी वाट गेले की एक मोठे गाव लागते. तेथे दोन्हीकडच्या गाड्या आल्या की पोलिस मंडीच्या गाड्या कुलूकडे व कुलूच्या मंडीकडे सोडतो. या गावी बराच वेळ मुक्काम असतो. म्हणून पहाटे निघालेल्या लोकांची चहा पिण्यासाठी एकच गर्दी उसळते. गाड्या मुक्कामी पोचल्या की दुसऱ्या गेटच्या गाड्या सुरू होतात.

पहिला प्रवास अंधारातच झाला. गाडी कुलूच्या अरुंद रस्त्याला लागली व आम्ही अगदी बियासच्या काठाकाठाने जाऊ लागलो. येथे विपाशाला बियास म्हणतात किंवा ब्यासा-प्यासा असेही कानांना ऐकू येते. तिचा संबंध व्यासांशी जोडतात! विपाशा, नांवाप्रमाणेच विपाशा खरीच! तिने वशिष्ठांचे पाश तोडले की नाही कोण जाणे; पण स्वतः मात्र खळाळत मुक्त वाहते आहे. दरी जसजशी अरुंद होते, तसतसा दोन्ही बाजूंच्या पर्वतांच्या भिंतीतून निनादल्यामुळे तिचा आवाज इतका वाढत जातो की बोलणेही अशक्य होते. विपाशा मोकाट धावणारी. शतद्रू (शंभर) अफाट धावणारी. इरावती व सरस्वती पाण्याने भरलेल्या, दशद्वती– दगडाळ. काय नावे आहेत! मध्य आशियाच्या निर्वृक्ष कोरड्या गवताळ माळावरून दक्षिणेकडे आलेल्या आर्यांना या नद्या पाहिल्यावर काय वाटले असेल ते नावांवरून प्रतीत होते. वाहत्या प्रवाहाला 'नदी' म्हणायचे हेसुद्धा गमतीदार नाही का? आर्यांच्या भाईबंदात अशा प्रवाहांची नावे मी आठवायला लागले. जर्मन म्हणतात Fluss (वाहणारी), फ्रेंच म्हणतात Fleuve (वाहणारी), इंग्रज म्हणतात River (तीर असलेली, तटिनी) आपण म्हणतो नदी– आवाज करणारी! खरंच, मी जर्मन नद्या अगदी उगमापासून पाहिल्या. त्या कशा गवतातून, झाडांतून लपून छपून वाहतात. हिमालयातील नद्यांप्रमाणे अव्याहत आवाज करीत त्या धावत जात नाहीत. हिमालयात प्रवास करताना या नद्यांच्या आवाजाची इतकी सवय होते की त्या टापूबाहेर गेले की पहिल्याने चुकल्याचुकल्यासारखेच होते. विलायतेतील मंदगामी मुक्या नद्या पहिल्या म्हणजे हिमालयातील प्रवाहांना नदी हे नाव सार्थ वाटते.

दहा वाजता कुलूचे मैदान लागले. स्टँडवर उतरले. तेथेही कोणी नव्हते. आता काय करावे? तेथेच उभी राहून परतणारी गाडी पकडण्याखेरीज गत्यंतर नव्हते. कुलूला हॉटेल वगैरे काही नाही. अर्धा तास उभी होते, एवढ्यात एक माणूस धावत आला. "बाईसाहेब, अशाच जाऊ नका. सरकारी विश्रांतिगृहात या." मी त्याच्यामागून चालू लागले. त्याने मला खोली दाखविली व सकाळच्या न्याहारीची व्यवस्था केली. मी म्हटले, "बाबा, आमची पत्रे, तारा तुम्हांला मिळाल्या नाहीत का?"

तो म्हणाला, "जिल्ह्याच्या मुख्यांकडे पाठवून दिल्या, त्या आहेत लाहूलला, आणखी पंधरा दिवस येणार नाहीत."

"येथे दुसरे कोणी अधिकारी नाहीत का?"

"नाही, मुख्य ग्रामसेविका रजेवर गेली आहे."

मी म्हटले, "मग मला शक्य तितक्या लौकर परत जाऊ दे. निदान आज रात्रीपर्यंत पठाणकोटला गेले तर परतीची गाडी तरी मिळेल."

तो कारकून नको नको म्हणत होता तरी मी निघालेच. सुदैवाने परतीची गाडी मिळाली. हा सर्वच प्रवास अगदी त्रासाचा झाला होता. पंजाबच्या खेड्यांतून रणरण उन्हात हिंडले होते. कुलू संपले की राजस्थानात जायचे असे ठरवून अतिशय थकले असूनही तशीच निघाले होते. महिनाभर आधी, 'मी येणार, व्यवस्था व्हावी' म्हणून पत्र जाऊनही त्या कारकुनाच्या गबाळेपणामुळे मला व्यर्थ वळसा पडला होता. असो. गाडी लौकर मिळाली, आता पठाणकोटला पोचता येईल, याबद्दल आनंद मानीत मी निघाले. हवा सुंदर थंड होती. अर्ध्या वाटेवर भरून येऊन, खूप गडगडाट होऊन पाऊस पडायला सुरुवात झाली. हिमालयातला गडगडाटही ऐकण्यासारखा असतो. आपल्याकडे ढगांचा गडगडाट एका दिशेने येऊन दुसरीकडे जाताना ऐकू येतो. हळूहळू आवाज कमी कमी होतो. येथे आवाज दरीत अडकून घुमत राहतो. एकदा या बाजूने, एकदा त्या बाजूने असा आदळताना ऐकू येतो. वातावरण एकदम रौद्र रूप धारण करते. दरीच्या मुशीतून वारा जोराने वाहू लागतो. उंच डोंगरांच्या भिंतीमुळे आधीच प्रकाश मंद असतो, तो आणखीनच कमी होतो. मोटर हळूहळू चालली होती, ती एकदम थांबली. रस्त्यावर आडवा अडसर टाकला होता. एक पोरगे तांबडे निशाण घेऊन उभे होते. अर्ध्या फर्लांगावर रस्त्याच्या मधोमध एक प्रचंड शिळा वरून कोसळली होती. कामकरी सुरुंग लावून तिला फोडीत होते. तास दोन तास तरी खोटी होणार होती. झालं– आता कसलं पठाणकोट! परत एक रात्र मंडीला काढावी लागणार! मनातल्या मनात त्या कारकुनाला परत शिव्या दिल्या. पण काही झाले तरी पठाणकोटला आज पोचणे शक्य नाही हे समजल्याबरोबर मनावरचा ताण कमी झाला. बियासचे सौंदर्य अनुभवीत असताही, वेळेवर पोहोचू ना, आगगाडीत जागा मिळेल ना, वगैरे काळजी मनात होती तीही नाहीशी झाली. त्या थंडीवाऱ्यात व गडगडाटात मला सीटवरच अगदी गाढ झोप लागली. मी जागी झाले ती बस चालू झाल्यामुळे.

चांगली दोन तास झोप झाली होती. पाऊस चालूच होता. बस निघाली. एका वळणावर वारा इतक्या जोराने आला की बसवरची ताडपत्री उडाली व एक वळकटी लांब फेकली गेली. सुदैवाने नदीत पडली नाही. आणखी अर्धा पाऊण तास खोटी झाली पण मी अगदी स्वस्थ होते. मंडीला संध्याकाळी पाच वाजता पोचले. दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या बसचे तिकीट घेऊन ठेवले, संध्याकाळी जेवले व निजले. रात्रभर पाऊस पडत होता, तो कधीतरी पहाटे थांबला.

सकाळी परत हमाल, परत बसची गर्दी व रेटारेटी. एकदाची जागा मिळाली. हवेत गारठा होता. आकाश निरभ्र होते. मनाला व शरीराला विश्रांती मिळाली होती. गाडी मंडी सोडून चढ चढू लागली. सकाळचे आठ वाजले असतील. परत तेरा हजार फुटांवर आम्ही येऊन पोचलो. कालचा निर्वृक्ष वैराण चढ आज उतरून जायचे होते. खालच्या दरीत धुके होते. मी समोर दृष्टी टाकली. क्षणभर, मी काय पाहते आहे ते लक्षातच येईना. काल न दिसलेली पर्वतांची शिखरे आज स्वच्छ दिसत होती, कोवळ्या उन्हात ती चमकत होती. सर्वांच्या शिखरांवर बर्फ दिसत होते. कालच्या वादळाने व पावसाने वातावरणातील धूळ खाली बसली होती. खाली पाऊस म्हणून लागतो तो उंचावरती बर्फ म्हणून पडला असला पाहिजे. दर वळणाला शिखरे नाहीशी होत व परत दिसत. हां हां म्हणता वैजनाथला पोचलो. मी घाईघाईने उतरून मंदिरात गेले. मंदिर उघडे होते. सगळीकडे स्वच्छ झाडले होते. नुकतीच पूजा झाली होती. देवावरील ताज्या फुलांचा मंद वास सभामंडपात भरून राहिला होता. मी पाया पडून गाभाऱ्याला उजवी घालून देवळाच्या मागच्या बाजूला आले. मागे उंच उंच पर्वतांची एक लांबच लांब रांग पसरली होती व सबंध रांगच्या रांग बर्फाने चमकत होती. पर्वतांच्या कापलेल्या काळ्या भिंतींमधून ठिकठिकाणी हिमनद्या वाहात होत्या. प्रवाही पाणी पर्वत कापून काढते पण ते कापणे व बर्फरूपाने वाहणाऱ्या हिमनद्यांचे कापणे अगदी वेगळे असते. बर्फ घासत जाते– रोज काही फूटच जाते पण दोन्ही बाजू अगदी उभ्या कापीत जाते. त्या बाजू इतक्या सरळ असतात की त्यांवर बर्फ ठरत नाही. त्या काळ्याशार भिंती व मध्ये पांढरे शुभ्र चमकणारे बर्फ असे दिसते. एका विशिष्ट उंचीच्या खाली बर्फाचे पाणी होऊन सबंध रांग झिरपत होती. डोंगर कित्येक मैल दूर होते, पण

वातावरण इतके स्वच्छ होते की हिमनद्यांवरील बर्फ हाताने उचलावे इतके जवळ वाटत होते. माझे मन आनंदात वाहात होते. वातावरणातील धूळ नाहीशी झाली होती– माझे मनही प्रसन्न होते. मोठ्या कष्टाने मी परत फिरले. परत देवाच्या पाया पडले व बसमध्ये येऊन बसले. सबंध वाटभर ती पर्वतांची रांग दिसत होती. हिमनद्यांमागून हिमनद्या दिसत होत्या. काल ह्या होत्या कोठे? आज मी पाहते ते खरेच आहे ना? असे सारखे मनात येई. गावात आल्यावर हे दृश्य लोपले. मी स्टेशनवर विश्रांती घेतली. डोळे मिटून खोलीत पडल्या पडल्या वैजनाथच्या मागच्या डोंगराचा देखावा आठवून मन भरून येत होते. पाच वाजता गाडीत बसले. गाडी सुरू होऊन स्टेशनच्या बाहेर आली व मी सहज खिडकीतून बघितले. तो काय आश्चर्य, तीच पर्वताची रांग सबंधच्या सबंध दिसत होती. सकाळी रस्त्याने येताना पर्वतश्रेणीचा एक एक तुकडा डोळ्यांसमोर येत होता. आता मात्र पंचवीस-तीस मैलांची रांग एकसंध दृष्टीसमोर होती. सूर्य खाली गेला तसतशी सोनेरी, गुलाबी छटा पांढऱ्या बर्फावर पसरली. एक शिखर नाही– सबंध शिखरांची रांग दिसत होती. सूर्य खाली गेला तरीही अंधुक उजेडात पांढरे बर्फ चमकत होते. दर मिनिटाला पालटणारे ते रम्य, भव्य चित्र प्रकाशमय होते. सौंदर्य विश्वरूपाने माझ्यापुढे उभे होते आणि मी वेड्यासारखी ते अनंतरूप माझ्या द्रोणाएवढ्या ओंजळीत, मुठीएवढ्या हृदयात व चिंचोक्याएवढ्या डोळ्यांत साठवण्याचा प्रयत्न करीत होते.

१९५९

*

## ११
# भ्रमंती

आंब्याच्या दाट पालवीतल्या गडद छायेत प्रकाशाचा लांबलचक किरण चमकला. परत पाहिले तर तो किरण सजीव होऊन इकडून तिकडे नाचत होता! आता ओळख पटली. एकटाच आहे वाटते. मादी पण आसपास असली पाहिजे. हा उत्तरेकडचा माशा खाणारा पक्षी. इंग्रजांनी त्याला नाव दिले आहे 'नंदनवनातील मक्षिका-भक्षक'; आणि त्याला कारण काय, तर त्याची 'मिया मूठभर, दाढी हातभर' असे प्रमाण असलेली फूट दीड फूट लांबीची पांढरी शुभ्र, अरुंद शेपटी, हा लहानसा पक्षी दाट पानांच्या झाडांत डहाळीडहाळीवरून उड्या मारीत कीड व किडे शोधून खात असतो. तो इकडून तिकडे आतल्या आत उडत असला म्हणजे त्याचे चिमुकले शरीर दिसायच्या आधी त्याची शुभ्र रेशमी शेपटी सुरकांड्या मारताना दिसते. हिमालयाच्या खालच्या रांगांपासून तो मध्यओरिसापर्यंत हा रमणीय पक्षी हिवाळ्याखेरीज दिसतो. पुण्यात फक्त अश्विन मार्गशीर्षाच्या दिवसांत दिसतो. इकडे थंडी पडू लागली की आणखी दक्षिणेकडे जातो की काय कोण जाणे! पुण्यात दरवर्षी आमच्या बागेत एखादा आठवडाभर दिसतो न् वर्षभर कुठे गडप होतो कोण जाणे!

हळूहळू पाय न वाजवता मी जवळ गेले, तो लाल विटकरीच्या रंगाची त्याची मादी पण दिसली. दोघेही अगदी आपल्या कामात दंग होती. नर पांढऱ्या शेपटीमुळे लांबूनसुद्धा दिसतो. मादीला मात्र जरा शोधावे लागते. हिवाळ्यातल्या या पहिल्या पाहुण्यांचे मी स्वागत केले.

हळूहळू इतरही लांबलांबचे पाहुणे येऊ लागले. संध्याकाळी कालव्यावरून जाताना खुपसे चतुर दिसले. त्यांच्या अभ्रकी पंखांचे कौतुक

वाटून मी क्षणभर थांबले व एक पंखाची जोडी दूर जाते तो दुसरी आली, तिसरी आली, पांढरे पोट व काळसर निळे लकलकणारे पंख असलेले हे पाकोळीच्या जातीचे 'स्विफ्ट' नावाचे पक्षी हिमप्रदेशातून आलेले पाहुणेच होते. ते म्हणे, युरोपातील आल्प्स पर्वतावरून इकडे येतात! ते चांगले फेब्रुवारी, मार्च– अगदी माघ संपेपर्यंत इकडे दिसतात. आपल्याकडल्या पाकोळ्यांचे हे जातभाई आकाराने मोठे असतात व पंखांचा रंगही जास्त सुंदर असतो. त्यांचे इंग्रजी नाव त्यांच्या वेगाने उडण्यावरून पडलेले आहे. आपल्याकडचे पाकोळी नाव कसे पडले ह्याची उपपत्ती डॉ. मल्हारराव आपटे ह्यांनी ह्या पक्षांच्या दुसऱ्या एका गुणधर्मावरून दिली आहे. पाकोळ्या कधी जमिनीवर किंवा झाडाच्या डहाळीवर बसत नाहीत. त्यांची मातीची घरटी नदीकाठच्या उभ्या दरडीमध्ये किंवा उभ्या खडकावर किंवा घराच्या भिंती किंवा छपरांमध्ये असतात. त्यांचे पाय 'पांगुळलेले' म्हणून त्या पाकोळ्या असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. पण मला ते तितकेसे पटत नाही. त्या पक्ष्यांची कोठची एक क्रिया लक्षात राहात असेल तर ती त्यांच्या उडण्याची. जेव्हा पाहावे तेव्हा ते आकाशांत उडत असतात. हवेतल्या हवेत सारखे आपल्या उडत्या भक्ष्यावर झेपा घालीत असतात व उडताउडता हवेतच ते त्या भक्ष्याचा फन्ना उडवतात. संध्याकाळी पन्नासपन्नास शंभरशंभर पाकोळ्या उंच आकाशात मजेत घिरट्या घालतात व एक विशिष्ट आवाज करतात. हे पक्षी पांगळे आहेत, अपंग आहेत असे कधी मनातसुद्धा येत नाही. बागेतल्या फुलपाखरालासुद्धा आपण पाकोळी म्हणतो ते काही त्याच्या पांगळेपणामुळे नाही. पाखरू हा शब्द पख म्हणजेच संस्कृत 'पक्ष' ह्यापासून आलेला. तसाच पाकोळी हा शब्दही पक्ष शब्दापासूनच आलेला वाटतो. सदैव पंखावर असते ती पाकोळी.

युरोपात थंडी पडू लागली म्हणजे कीटक नाहीसे होतात व हे पक्षी दक्षिणेकडे येऊ लागतात. हस्ताचा पाऊस पडून गेला म्हणजे वाळव्यांना पंख फुटतात व अशा लक्षावधी वाळव्या आठ दिवस सर्व वातावरण भरतात आणि शेकडो पक्षी काही हवेत, काही जमिनीवर त्यांना खात असतात. त्यांच्यातच हे पाहुणे पण अधूनमधून दिसतात.

दिवाळीनंतरच्या एखाद्या दिवशी मजेत थंडी पडलेली असावी, सकाळी उठून पाहावे तो टेलिफोनच्या तारा लहानलहान पक्ष्यांनी भरून गेलेल्या

असतात. काही पक्षी लालसर, काही तांबूस असे असतात. त्यातच काही थोड्यांच्या शेपटाची दोन पिसे लांब तारेसारखी मागे आलेली असतात. हे पक्षीसुद्धा स्विफ्ट प्रमाणेच कधी झाडांवर न बसणारे असतात. मात्र ते तारांवरून, घराच्या भिंतीवरून व गच्चीवर बसतात व अगदी क्वचित् जमिनीवर पण बसतात. ही सर्व मंडळी पण उत्तरेकडून दक्षिणेकडे चाललेली. ही मात्र बरेच दिवस दिसतात व मग जी नाहीशी होतात, ती हिवाळा सरताना परतीच्या वाटेवर असली म्हणजे पुन्हा भेटतात. आपल्याकडे ह्यांनाही पाकोळीच म्हणतात असे वाटते. इंग्रजीत त्यांना 'स्वालो' म्हणतात.

हिवाळ्यातली ही भ्रमंती पाहिली म्हणजे कालिदासाच्या रघुदिग्विजयातील श्लोकांची आठवण होते. सूर्य परत तळपू लागला; इंद्रधनुष्ये नाहीशी झाली; निरभ्र आकाशात चंद्र प्रकाशू लागला; अगस्तीच्या उदयाबरोबर गढूळ पाणी निवळू लागले; नद्यांचे पूर ओसरू लागले; रस्त्यातला चिखल वाळू लागला, शरद ऋतू हिवाळा आल्याचे सांगत आला आणि त्याने काय केले तर रघूला चालू लागण्यास प्रोत्साहन दिले (यात्रायै चौदयामास).

पावसाळा संपला म्हणजे जणू सर्व चरसृष्टीला चालू लागायची प्रेरणा मिळते. चरैवेति चरैवेति-"चालू लाग बाबा, जगायचे असेल तर चालत राहा, नाही तर मरशील."

मार्गशीर्ष-पौषाच्या सुमारास मी एका पाहुण्याची वाट पाहात असते; पण तो नेहमी दिसतोच असे नाही. एक दिवस कॉलेजात बसल्याबसल्या खिडकीबाहेर पाहिले तर समोरच्याच झाडावर सोन्यासारखे काहीतरी लखलखत होते खिडकीशी जाते तो एक सोन्याचा पक्षी त्या झाडावरून उडाला व दुसऱ्या झाडावर बसला. ह्या पक्ष्याचे पंख नवीन उजाळा दिलेल्या सोन्यासारखे, लाल डोळ्यांच्या कडा काजळ घालावे तशा काळ्या व पंखांची टोके काळ्या साटिनची. ह्या अद्‌भुत सौंदर्यदर्शनाने माझे हृदय फुलून आले. तो पक्षी दोनतीन दिवस दिसून नाहीसा झाला. पुढल्या वर्षी घरच्या व कॉलेजातल्या बागेत पण दिसला. त्याचे 'गोल्डन-ओरिओल' हे इंग्रजी नाव पुस्तकात वाचून समजले, व कळले की हा पक्षी तुर्कस्थान, गिलगिट, अफगाणिस्तानांतून इकडे येतो, नंतर एका वर्षी वसंतऋतूत मी ओरिसात गेले असताना भल्या पहाटे पिऊऽऽ पिऊऽऽ असा पक्ष्याचा गोड आवाज ऐकून

जागी झाले. आम्ही उतरलो होतो तेथे ह्या झाडावरून त्या झाडावर पक्षी पिऊऽऽ अशी एकमेकांना साद देत होते. शेवटी उजाडल्यावर बाहेर जाऊन पाहिले तो काय आश्चर्य! पुण्यात पाहिले तसे सोन्याचे पक्षी झाडावर बोलत होते. सोन्याला नुसता जीवच आला नव्हता, तर कंठही फुटला होता! हे पक्षी वसंतात ओरिसात येतात व तिकडे त्यांना 'हलदी बसंत' म्हणतात. कुठे सोन्याची प्रभा न् कुठे हळदीचा पिवळेपणा! मी जेव्हा ह्या पक्ष्यांना पहिल्यांदा पाहिले तेव्हा आश्चर्याचा भर ओसरल्यावर मला अगदी खात्री वाटली की नळराजा नेसते धोतर घेऊन ज्या पक्ष्यांना धरायला धावला ते हेच पक्षी असले पाहिजेत. पण महाभारतातही त्यांना काहीच नाव दिलेले नाही.

ह्या शरत्कालीन भ्रमंतीत फक्त पक्षीच असतात असे नाही. तर इतरही प्राणी वाटचाल करू लागतात. एक दिवस सकाळी पुणे-मुंबई रस्त्यावर तट्टावर बसून चाललेल्या बायका पाहिल्या. भांडीकुंडी, पोरेसोरे सर्व चालली होती. ही आघाडीची मंडळी होती. दहा-अकरा वाजता कुठेतरी पाणी व सावली बघून ती थांबतील व सैंपाक करून ठेवतील तो मागूनची मंडळी येणार. ही मागूनची मंडळी कॉलेजात जाताना भेटली आणि कुठे; तर मालधक्क्याच्या रस्त्यावर अगदी ऐन ऑफिसच्या वेळेला. दोनचारशे शेळ्यामेंढ्या पन्नासपन्नासाच्या गटाने शिस्तीत हाकीत धनगर चालले होते. काळेकभिन्न, अंगात मळकट सदरे, ते इतके खाली, की लंगोटीच्या त्रिकोणाचे फक्त टोक तेवढे पुढे दिसत होते. धोतर अंगावर घेतलेले, बरोबर त्यांच्यासारखीच काळीसावळी, हसतमुख, गुटगुटीत पोरे, चौक ओलांडायला त्यांना चांगली दहा मिनिटे लागली. तोवर शेकडो सायकली, दहाबारा मोटरी, दहाबारा मोटरसायकली अडून बसलेल्या. एका बाजूने मालधक्क्यावरून माल भरून मोठाले माल ट्रक व बैलगाड्या ह्यांचा तांडा येऊन उभा राहिलेला; आणि दुसऱ्या बाजूने पोलिसाने रस्ता खुला दिल्यामुळे धनगर व शेळ्यामेंढ्या जात होत्या. पुण्याच्या पूर्वेकडच्या सर्व रस्त्यांतून ह्या काही दिवसांत कळपच्या कळप पश्चिमेकडे जात असतात. हिंगण्याच्या रस्त्यावर, सिंहगडच्या रस्त्यावर, लोणावळ्याच्या रस्त्यावर त्यांच्या बायका मारे सैंपाकपाणी करीत असतात व नगर रस्ता, सोलापूर रस्ता ह्या मार्गे येऊन टिळक रस्ता, डेक्कन जिमखाना, स्टेशन रस्ता अशा सर्व रस्त्यांवर शेकडो शेळ्यामेंढ्या पूर्व महाराष्ट्रातील कोरडी, वृक्षहीन मैदाने सोडून

पाण्यासाठी, चाऱ्यासाठी पश्चिम महाराष्ट्राच्या डोंगराकडे चाललेल्या असतात. सगळ्यांचा मंत्र एकच– चरैवेति चरैवेति।

आणि ह्याच सुमाराला शेते पिकली म्हणजे त्या उघड्या दौलतीवर डल्ला मारायला, दिवाळीच्या आनंदात असलेल्या शहरवासियांकडून काही मिळाले तर पाहावे म्हणून बहुरूपे, जोशी, फासेपारधी, कोल्हाटी, माकडवाले हे पण रस्त्यावर दिसू लागतात, गुडुम्-गुडुम्-गुडुम्. बापूराव भागूबाई ही गेल्या वर्षी नाहीशी झालेली जोडी आपल्या साखळीला हिसके देत, पोरांना वाकुल्या दाखवीत परत पुण्याच्या रस्त्यावर आपल्या संसाराच्या परवडीचे प्रदर्शन मांडीत हिंडू लागली. गुडुम्-गुडुम्-गुडुम् नंदीबैल पैसा मागत येतो.

...आणि ही सगळी हालचाल पाहिली म्हणजे चौऱ्याऐंशी लक्ष योनीतील पशुपक्ष्यादी सगळ्या भटक्या पूर्वजांचे रक्त माझ्या शरीरात उसळून उठते. मी पण बांधाबांध करते व प्रवासास निघते... लोकांना वाटते, बाई संशोधनकार्याला निघाल्या म्हणून!

१९५४

*

## १२
# युगांतर

बोटीत इतकी गर्दी झाली होती, की उभे राहायला जागा नव्हती. "रोज असते का हो एवढी गर्दी? जास्त बोटी तरी सोडाव्यात." असे मी म्हटल्यावर माझ्या बरोबरच्या गृहस्थाने सांगितले, की काही पर्वणीनिमित्त ही सर्व मंडळी पलीकडे गंगास्नानाला चालली आहेत. मला जास्तच अचंबा वाटला. पाटणा शहर गंगेच्या किनाऱ्यावर वसले आहे. इतकेच नाही, तर त्या शहराला रुंदी जवळजवळ नाहीच. लांबी मात्र चांगली दहा मैल आहे! मला वाटते, शहराचा कुठचाही भाग नदीपासून अर्ध्या मैलापेक्षा लांब नसेल. दहा मैल लांबीचा नदीकिनारा घराच्या अंगणात असताना बोटीत बसून पलीकडच्या तीरावर आंघोळीला जायचे प्रयोजन काय, ह्याचा मला उलगडा होईना.

जुगलबाबूंनी सांगितले, "अहो, इकडच्या किनाऱ्यावर आंघोळ केली तर माणूस गाढवाच्या जन्माला येतो." तरी माझ्या डोक्यात प्रकाश पडेना; तेव्हा त्यांनी पुढे सांगितले 'पाटण्याचा किनारा 'मगध' देशात येतो. पलीकडे 'विदेह' आहे."

आता मला उमगले; पण माझे आश्चर्य मात्र दसपटींनी वाढले. विदेह पुण्यभूमी होती. विदेही जनकाने त्या भूमीत अग्नीची स्थापना केली होती. आर्यांच्या जुन्या वसाहती गंगेच्या उत्तर तीरावर होत्या. मगध तर पहिल्यापासून पाखंडांचा देश. पाटलीपुत्रात नाटपुत्त वर्धमानाने जिनधर्माला परत एकदा भरभराटीला आणले. पाटलीपुत्रातच बुद्धधर्माची विजयी पताका फडकली. मगध वैदिकांचा देश नव्हता; मगधात राहणे पुण्यप्रद नव्हते. परम मंगल गंगासुद्धा मगधाच्या किनाऱ्यावर आपले मंगलत्व

गमावून बसली होती! ज्यांना वेदांचे एक अक्षर माहीत नव्हते; ज्यांना संस्कृताचा गंध नव्हता; ज्यांना इतिहास माहीत नव्हता, असे पाटण्याचे हजारो लोक मगध सोडून एक दिवसाचे तरी पुण्य गाठी बांधण्यासाठी विदेहाला चालले होते! जुन्या समजुती उराशी बाळगणाऱ्या ह्या लोकांना म्हणावे तरी काय? सोनपूरच्या जत्रेतून येणारी एक आगबोट माणसांच्या गर्दीमुळे व उतरण्याच्या धांदलीमुळे नुकतीच बुडाली होती. पण एकीकडे तोंडाने त्या घटनेबद्दल चर्चा करीत लोक आपापली गाठोडी घेऊन पलीकडच्या तीरावर त्याच धांदलीने निघाले होते.

एक क्षणभर माझे मन विषादाने व धिक्काराने भरून गेले. दुसऱ्या क्षणी वाटले, मी माझ्याकडे नुसता मोठेपणा घेत आहे. मला विदेही जनकाची माहिती होती. पाटलीपुत्राचा इतिहास मी वाचला होता– पण माझी निव्वळ पुस्तकी माहिती होती. हे हजारो लोक तो इतिहास जगत होते. ज्यांना मी जुन्या समजुती समजले, त्या जुन्या नव्हत्याच मुळी. त्या आजच्या जिवंत भावना होत्या. दुसऱ्या देशांतून जुन्या कल्पना नष्ट होतात व नव्या येतात; पण भारताच्या भूमीत जुने अमर व अजर असते.

उतरायचा घाट जवळ आला तसतसे बसलेले लोक उठून उभे राहिले. "यंदा उतरायचा घाट दोन फर्लांग पुढे गेला आहे." लोक म्हणत होते. जुगलबाबूंनी परत एकदा समजावून सांगितले, "गंगेने गेल्या वर्षी प्रवाह बदलला म्हणून आगगाडीचे स्टेशन जरा लांब न्यावे लागले. स्टेशनजवळच उताराचा घाट आहे." परत एकदा पुस्तकी ज्ञान व अनुभव ह्यांतील फरक लक्षात आला. वाळूने भरलेल्या जवळजवळ सपाट मैदानातून वाहणारी गंगा व तिला मिळणाऱ्या इतर नद्या ह्या शाप की आशीर्वाद अशी भ्रांत का पडते हे समजायला गंगा-किनाऱ्यावरच आले पाहिजे. ते चैत्राचे दिवस होते. गंगेचे पाणी कमी झालेले होते. गंगा धीरे धीरे वाहत होती. पात्राला रुंदी खूप होती; पण त्या मानाने खोली नव्हती. ठिकठिकाणी पात्रात वाळू साचून लहानलहान बेटे झाली होती. पाण्याच्या पलीकडे अर्धा मैल रेती होती व काठ तर इतके सखल होते, की पात्र व किनारा ह्यांतील फरक चटदिशी लक्षात येत नव्हता. त्या वाळूवरच गाडीचे स्टेशन होते. स्टेशन कसले? गाडी उभी होती तिथपर्यंत रूळ घालून बांबूच्या मांडवाखाली तिकिटघर होते. तिकिटे काढून गाडीत बसलो. पंधरा मिनिटांनी गाडी सुटायची होती. मी भोवताली पाहिले तो

गंगेच्या विस्तीर्ण वाळवंटात हजारो माणसे स्नानासाठी गोळा झाली होती. ग्रहण लागावयास अजून चौदा पंधरा तास तरी अवकाश होता. पण मालगाड्या, बोटी, पडाव, खटारे भरभरून माणसे येत होती व कित्येक चालतच आलेली होती. आगगाडीच्या डब्यातच नाही तर बाहेरूनही खिडक्या, दरवाजे– सर्व काही माणसांनी लिंपलेली दिसत होती. जणू पर्वणीच्या दिवसापुरता गुरुत्वाकर्षणाचा सृष्टिनियम ईश्वराने सैल केला होता. इतर सामाजिक बंधनेही त्या दिवसापुरती ढिली झालेली दिसत होती. एरवी घराबाहेर न दिसणाऱ्या बायका पर्वणीच्या निमित्ताने मिश्र समाजात दिसत होत्या; पण तरीही दक्षिणेकडील बायकांचा मोकळेपणा त्यांच्यात नव्हता. त्या पर्वणीच्या दृश्यात काही तरी उणे आहे असे मला वाटत होते. ते म्हणजे सर्व देखावा रंगांनी भरलेला नव्हता. वर चैत्र-वैशाखाचे धूसर वातावरण, खाली गंगेची पिवळसर पांढुरकी रेती आणि वर मळकट पांढरी वस्त्रे नेसलेले स्त्रीपुरुष-असे ते दृश्य होते. प्रदेशही सपाट-पाहावे तिकडे सपाट जमीन क्षितिजाला टेकलेली. मला गंगेचे खोरे कंटाळवाणे वाटू लागले.

आगगाडी हळूहळू चालली होती. अमक्या ठिकाणी अमक्या वेळी पोचायची काही व्यवस्था होती की नाही कोण जाणे. शेवटी एकदाचे स्टेशनला पोचलो. तेथून पुढचा प्रवास मोटरचा होता व आम्हांला शक्य तर कलेक्टरकडून काही तरी वाहन मिळेल अशी आशा होती, पण आम्हांला उतरून घेण्यासाठी स्टेशनवर तर कोणीच नव्हते. कलेक्टर कचेरीकडे जाऊन चौकशी केली; पण कोठेच दाद लागेना! शेवटी बसस्टँडवर जाऊन तिकिटे काढली. बस शेवटपर्यंत जाणारी नव्हती; पण इथे वेळ घालवण्यापेक्षा निदान अर्ध्या वाटेवर तरी जाऊन पडावे असा विचार केला. बस निघावयास बराच अवकाश होता, म्हणून आसपासची माणसे बघत बसमध्ये बसून राहिलो. इतक्यात बसस्टँडवर काही गडबड झालीसे वाटले म्हणून तिकडे पाहिले, तर कोणी सरकारी पट्टेवाला कसली तरी चौकशी करीत होता. तो थेट आमच्याकडे आला व पाटण्याहून सीतामढीकडे जाणाऱ्या बाया आम्हीच का, म्हणून विचारले. आम्ही 'हो' म्हटल्यावर तो लवून नमस्कार करून म्हणाला, "तुम्हांला कलेक्टरसाहेबांनी बोलावलं आहे." आता आली का पंचाईत! गाडी सुटायला पंधरावीस मिनिटेच होती. मी कलेक्टरकडे गेले तर नमस्कार होईतो गाडी निघून जायची व मी धड नाही पाटणा न् नाही सीतामढी, अशा भानगडीत मध्येच राहायची! मी म्हटले,

"कलेक्टरसाहेबांना माझे प्रणाम सांगा. मी परत येताना वेळ झाल्यास त्यांना भेटेन; पण आता येण्यास मला वेळ नाही." तो परत जाऊन पाच मिनिटे होतात, तो खुद्द कलेक्टरच आले. पाटण्याहून पाठविलेले पत्र त्यांच्या हाती कारकुनाने दिलेच नव्हते. ते आता हाती पडले. त्यांनी आग्रह केला, की मी उतरलेच पाहिजे, त्यांच्या घरी चहा घेतलाच पाहिजे वगैरे. अर्ध्या तासापूर्वी, कचेरीत साहेब नाहीत म्हणून त्यांच्या घरी गेलो होतो व पाचच मिनिटे गाठ पडेल का, म्हणून चौकशी केली होती, तर त्यांच्या बायकोने नोकराकरवी 'गाठ पडणे शक्य नाही', म्हणून निरोप पाठवला होता; म्हणून आमची आम्ही व्यवस्था केली, तर आता हे साहेब उतरून घ्यावयास आले; मला राहण्याचा आग्रह करू लागले. दुसऱ्या दिवशी कोणी मिनिस्टर येणार, म्हणून गुढ्या-तोरणे उभारणे चालले होते. ह्या धांदलीत माझे काम होण्याची शक्यता नव्हती, म्हणून मी गाव सोडून जात होते. शेवटी त्याच दिवशी मोटरने मला सीतामढीस पोचविणार असाल तर उतरते, असा वायदा करून उतरले. एक पट्टेवाला पुढे, एक मागे अशा थाटात आम्ही कलेक्टरच्या बंगल्यात पोचलो. कलेक्टरीणबाई बंगल्याच्या फाटकापाशी सामोऱ्या आल्या; मोठ्या अगत्याने दिवाणखान्यात घेऊन गेल्या. तेथे चहा-फराळाची व्यवस्था मोठी सुंदर युरोपीय पद्धतीवर केली होती.

मी आपली बोलत होते. जाई काही बोलेना न खाईना. स्वारी जरा घुश्शात होती. मी सांगितले, "बाई, अन्न पुढं आलं आहे, थोडं खाऊनपिऊन घे. आज संध्याकाळी मुक्काम कोठे होणार, काय खायला मिळणार काही पत्ता नाही. सकाळी सात वाजता खाल्लं. आता दोन वाजून गेले आहेत, वेडेपणा करू नकोस." तसे तिने पण खाल्ले.

कलेक्टरीणबाई म्हणत होत्या, "ह्यांना उद्याची तयारी करायची आहे; आमची मोटर काही देता यायची नाही; दुसऱ्या कुणाची मिळते का पाहतो आहोत."

मी म्हटले, "अहो, आम्हांला खराब रस्त्यानं जायचं, उगाच तुमची काय किंवा दुसऱ्या कुणाची काय, चांगली गाडी नकोच मुळी. एखादी जुनी गाडी, जीप, माल-ट्रक काही चालेल." त्याबरोबर बाई खूष झाली.

तिने बाहेर कलेक्टरसाहेब होते त्यांना तसे कळवले व थोडक्याच वेळात जीपचा एक लहानसा ट्रक दाराशी येऊन उभा राहिला. आम्ही पण निघालो. जाताना बाईंचे व साहेबांचे आभार मानले व गाडीत बसलो.

“आता स्वतंत्र गाडी मिळाली आहे; आपल्याला ‘रीघा’ ला पोचायला हरकत नाही.” मी उद्गारले.

“ते शक्य नाही. आपण पोचल्यावर एका तासात ही व्यवस्था झाली असती तर पोचलो असतो. आत दुपार उलटली आहे आणि मैलांच्या हिशेबानं अंतर जरी थोडं असलं तरी रस्ता इतका खराब आहे, की सीतामढीला पोचायलाच संध्याकाळ होईल.” जुगलबाबू म्हणाले.

“आणि ह्या सगळ्या घोटाळ्याला कारण ते कलेक्टर!” जाई म्हणाली, “पहिल्याप्रथम आपल्या दाराशी उभं करावयास तयार नव्हते आणि मग क्षमा मागतामागता व पाहुणचार करताकरता पुरेवाट! मला शुक्रवारच्या कहाणीचीच आठवण झाली. फराळाचं खाऊ नये, एकएक घास उचलून दागिन्यांवर ठेवावा असं वाटत होतंस.”

“अग, दागिन्यांवर नाही, गव्हर्नरसाहेबांच्या पत्रावर!” मी हसून उद्गारले. पण जाईचे बोलणे संपले नव्हते, “इतका घोटाळा करून ठेवला आणि तरी तू आपले त्यांचे आभार मानीत होती.”

“हे बघ, जायले! तू त्या बिचाऱ्या कलेक्टरच्या दृष्टीनं विचार कर पाहू जरा, कलेक्टरला आधीच काम पुष्कळ असतं; पण हल्ली रेशनच्या दिवसांत तर ते किती तरी वाढलं आहे. पूर्वी कलेक्टर जिल्ह्याचा सर्वाधिकारी असे. आपल्या समजुतीप्रमाणं तो काम उरकीत असे व वरिष्ठांपुढे कामाचा जाब देत असे. हल्ली जिल्ह्यातील प्रत्येक काँग्रेस पुढारी त्याचा वरिष्ठ बनला आहे; त्यांच्या हस्तक्षेपामुळे कारभार करणं जड जातं, एवढंच नव्हे, तर चटचट कामाचा उरकच होत नाही. त्याशिवाय तू पाहिलंसच, की हा मिनिस्टर आला, तो मिनिस्टर आला म्हणजे स्वागताची केवढी जंगी तयारी करावी लागते ती! आणि त्या सर्वांवर कळस म्हणून की काय, आपल्यासारखी आगंतुक माणसं गव्हर्नराकरवी पत्र पाठवून येतात आणि त्यांच्या दृष्टीनं अँथ्रोपॉलॉजीसारख्या निरर्थक कामात त्यांचा वेळ घेतात. वेळात वेळ काढून अनिच्छेनं का होईना त्यांनी आपला पाहुणचार केला; एक गाडी देऊन आपल्याला पुढच्या मुक्कामावर रवाना केलं; हा त्यांचा व त्यांच्या बायकोचा उपकारच नाही का?”

‘बरं बाई, तुझ्या म्हणण्याप्रमाणं का होईना!’ अशा अर्थाचा चेहरा करून जाई स्वस्थ बसली. रस्ता वाईट हे आधी समजले होते; पण तो किती

वाईट ह्याची कल्पना नव्हती. रस्त्यावरून चाललो होतो म्हणण्यापेक्षा गाडी एका खड्ड्यातून दुसऱ्या खड्ड्यात जात होती, म्हणणे जास्त बरे झाले असते! गाडीच्या वेगाने धूळ एवढी उडत होती, की दहा पावले मागे काही दिसत नव्हते! आम्ही नेपाळच्या सरहद्दीजवळ चाललो होतो. येथून म्हणे सबंध हिमालयाची रांग दिसते. जाई मोठ्या आशेने डोळे फाडफाडून बघत होती. सबंध हिमालय काय पण क्षुद्र टेकडीसुद्धा कुठे दिसत नव्हती. पाहावे तिकडे सपाट प्रदेश व धूळ. “रात्री धूळ खाली बसली की पहाटे कदाचित् पर्वताच्या रांगा दिसतील,” असे मी म्हटले.

जुगलबाबू उत्तरले, “छे! आता पाऊस पडून गेल्याशिवाय धूळ खाली बसायची नाही! आता तर आपण वसंतऋतूत आहोत. अजून उन्हाळ्याबरोबर धूळ वाढतच जाणार. जसे दिवस जातील तसं वातावरण धुळीनं धुंद होईल.”

ते पुढे म्हणाले, “आपण जे शहर सोडलं ते पूर्वीचं वैशाली. आता जात आहोत तिथे सीता सापडली व तिथून तीन मैलांवर नेपाळहद्दीत जनकपूर म्हणजे पूर्वीची मिथिला आहे असं म्हणतात.”

गंगेच्या खोऱ्यात पावलापावलावर प्राचीन इतिहासाच्या खुणा आहेत. कोठेही खणा, वैदिक देवतांच्या किंवा बुद्धाच्या मूर्ती सापडतात. ह्याच वाटेने विश्वामित्र रामलक्ष्मणांना घेऊन जंगलातून मिथिलेला गेला असणार; नंतर हजार वर्षांनी वैशंपायनांशी भांडण झाल्यावर याज्ञवल्क्य ह्याच वाटेने त्या वेळच्या जनकराजाकडे गेले असणार; परत तीनशे वर्षांनी त्याच वाटेने माहेरी जाताजाता मायादेवी बाळंत होऊन बुद्धाचा जन्म झाला असणार; ह्याच वाटेने जाऊन कोसलराजा पसेनदीच्या मुलाने शाक्य कुलाची कत्तल केली. बुद्ध, अशोक, चाणक्य, चंद्रगुप्त, गुप्तसम्राट् व कालिदास–विदेह व मगधाच्या परिसरात प्राचीन भारताच्या इतिहासाची किती तरी उज्ज्वल पाने लिहिली गेली. जुगलबाबूंच्या उद्गाराने माझ्या विचारांची साखळी तुटली. “ही नदी आपण ओलांडतो आहोत ना, तिचं नाव मनुस्मारा.” गतेतिहासात गुंतलेल्या माझ्या मनाला एक आश्चर्याचा व आनंदाचा धक्का बसला. विदेहाचा इतिहास मी प्रभू रामचंद्रांपर्यंतच नेत होते; पण येथे तर थेट मनूपर्यंत ह्या लोकांनी पोहचवला की! मनूचेसुद्धा स्मरण यांनी ठेवले आहे!

नदी ओलांडून आम्ही गावात शिरलो व एका मोठ्या आवारातून

आत जाऊन लहानशा घरासमोर उभे राहिलो, "इथल्या सीतादेवीच्या देवळाच्या महंताचं हे घर. आज रात्र येथे काढून उद्या पुढे जाऊ. आपल्याला आणायला आलेली मोटर आपण वेळेवर आलो नाही, म्हणून परत गेली, ती उद्या सकाळी येईल."

आम्ही पुढे झालो. खुर्च्या टाकून काही मंडळी बसली होती. त्यांतला एक पोरसवदा माणूस उभा राहिला. अंगात रेशमी शर्ट, त्याला सोन्याच्या गुंड्या, केसांचा भांग काढलेला, अशी मूर्ती होती. अत्तराचा घमघमाट सुटला होता. "हे इथले महंत श्री साधु अमुक अमुक" म्हणून ओळख करून दिली. मी चकितच झाले; पण मुकाट्याने नमस्कार करून बसले. मला नंतर कळले, की महंत म्हणजे पुजारी.

माझ्या कामाची माहिती जुगलबाबूंनी त्यांना करून दिली. त्यांनी जिज्ञासेने विचारले, "माझं रक्त तपासता का?" "एका माणसासाठी नळी फोडता यायची नाही," मी उत्तर दिले. तशी ते म्हणले, "मी माणसं जमवतो." म्हणून सर्व सामान काढले. सुमारे २०-२५ नमुने मिळाले व अंधार पडला म्हणून आत जाऊन किटसनच्या उजेडात रक्त तपासणे सुरू झाले. काम चालू असताना प्रश्नोत्तरे होतच होती. "तुमच्या तपासणीनं कोठचा रोग झाला ते कळतं का हो?" असा नेहमीचा प्रश्न झाला. मी "नाही" म्हणून उत्तर देऊन परत प्रश्न केला, "तुमच्या प्रदेशात रोगराई किती आहे?"

महंतजी उद्गारले, "किती व कुठचे रोग म्हणून काय विचारता? सर्वांना रोग आहेत; व सर्व प्रकारचे आहेत. काळा आजार आहे; मलेरिया आहे; हत्ती रोग आहे; त्याशिवाय दोषी ताप, नवज्वर, पटकी आहे. एवढंच काय, पण नदीचं पाणीसुद्धा विषारी आहे" "कुठल्या नदीचं?" मी विचारले. "ह्या लक्ष्मणा नदीचं. म्हणून तर आम्ही तिला मनूस्-मारा म्हणतो."

कल्पनेत रचलेल्या गतेतिहासाच्या वैभवशिखरावरून वास्तवाच्या दरीत कोसळत गडगडत येणाऱ्या मनाला सावरून मी विचारले, "पण नदीचं पाणी विषारी का?"

"ह्या नदीचा उगम नेपाळच्या तराईत बचनाग असलेल्या जंगलात होतो व तसल्याच जंगलातून वाहात ती ह्या गावाला येते. म्हणून हिचं पाणी विषारी आहे. पुढे दोनतीन नद्या तिला मिळाल्यावर तिच्या पाण्यातील विषार जातो."

ही माहिती त्या वेळी मला नवीनच होती. पुढे काही वर्षांनी जंगलांतून वाहणाऱ्या इतर नद्यांबद्दल व जंगलातील गावांबद्दल हेच प्रवाद ऐकायला मिळाले. ओरिसात दक्षिणेकडील जंगलात कोरापुट म्हणून गाव आहे. तेथील पाणी वर्षाचे सहा महिने जानेवारी ते जूनपर्यंत विषारी असते, असा प्रवाद होता. आपल्याकडे पाटण गावावरून कोयना नदी वाहते, तिच्या पाण्याबद्दलही अशीच समजूत आहे. 'पाटणला बदली म्हणजे अंदमानावर पाठवणी!' असे एक सरकारी नोकर म्हणताना मी ऐकले. पावसाळ्यात पाणी ठीक असते; पण पावसाळा संपून पाणी कमी होऊ लागले म्हणजे ते विषारी होते, असे कळले. लक्ष्मणा ऊर्फ मनुस्-मारा नदीच्या थोड्याशा पाण्यात इतर दोन नद्यांचे ओघ मिसळले म्हणजे विषाची तीव्रता कमी होत असली पहिजे.

काम संपतासंपता डासांचा इतका त्रास झाला, की रक्ताचा थेंब तपासणीसाठी काढून घेतला की त्यावर डास यावयास लागले. म्हणून एकजणीने डास वारून दुसरीने तपासणी संपवली. पसारा आवरला आणि शेजारीच असलेल्या एका अंधाऱ्या खोलीत श्रमपरिहारार्थ गेलो. आठ वाजून गेले होते. दिवभराच्या प्रवासाने शीण आला होता, म्हणून बिछाने पसरले. मच्छरदाणी लावावयास खुंट्या सापडेनात. लक्षावधी डास गुणगुणत होते, म्हणून जाईला म्हटले, "बाई, डोक्यावरून पांघरूण घेऊन नीज." ती म्हणाली, "थांब जरा. काला आजारानं मरणं बरं, का जीव घुसमटून मरणं बरं, ह्याचा आधी विचार करू दे." दारावरून माणसांची ये-जा सुरू होती; दोघींनाही भूक लागली होती, पण आमचे काम सुरू झाल्यावर जुगलबाबूंनी जी दडी दिली होती त्यांचा अजून पत्ताच नव्हता! सांगायचं कोणाला, म्हणून मी खोलीचे दार लावले व जाईशेजारीच पायापासून डोक्यापर्यंत पांघरूण घेऊन पडले.

दाराच्या खडखडाटाने मी दचकून जागी झाले. घड्याळात पाहिले तो साडेदहा वाजले होते. जुगलबाबूंचा आवाज ऐकू आला, "जेवण तयार आहे. येता ना?" मी "हा" म्हणून जाईला उठवले व ती नको म्हणत असताही "तुला एकटीला इथं कुठं सोडून जाऊ? माझ्याबरोबर चल." म्हणून तिच्याबरोबर बाहेर आले. खोलीच्या शेजारी आतला चौक होता व पडवीत आमची दोघींची पाने मांडली होती.

"इतर मंडळींची जेवणं झाली वाटत?"

"इतक्यात कुठची? अजून तास दोन तास अवकाश आहे. जुगलबाबूंच्या सांगण्यावरून तुम्हांला आधी वाढलं." वाढणाऱ्या इसमाने सांगितले.

"महंतजींच्या घरी कुणी बायकामाणसे नाहीत का?"

"आहेत की, शेजारच्या वाड्यात ती असतात. अधूनमधून महंतजी तिकडे जातात."

"त्यांची जेवणं झाली का?"

"इतक्यात कशी होतील? पुरुष मंडळींची जेवणं झाली की त्या जेवतील."

जास्त विचारपूस न करता पुढे आलेले जेवण आम्ही जेवलो. जेवणाच्या बाबतीत प्रवासात असताना आम्ही उंटाला गुरू केले होते. अन्न भेटले की पोटभर जेवायचे. अन्नासाठी कामाचा वेळ गमवायचा नाही; जेवण नाही मिळाले तर तसेच पुढे ढकलायचे, असा आमचा क्रम होता. ह्या प्रवासात तरी कधी चोवीस तास अन्नशिवाय गेले नाहीत व जेवणावर जेवण मिळून कधी अजीर्णही झाले नाही.

जेवण झाल्यावर परत खोलीत गेलो, पोट भरल्यावर जाईची झोप उडाली होती. ती म्हणाली, "नको रे बाबा हे गंगेचं सुपीक खोरं व इथल्या बायकांचा जन्म! त्या शेजारच्या चार भिंतींत हातावर हात व पायावर पाय ठेवून जेवणासाठी ताटकळत बसायचं म्हणजे कोण कर्मकठीण! त्या बहुतेक आतल्याआत कुजत असतील नाही?"

"नाही; तसं व्हायच्या आत काळा आजार, मलेरिया वगैरे रोग त्यांना मारून टाकतात!" मी सुस्कारा टाकून म्हटले.

तिला कसली तरी आठवण झाली. "आपण बंगाली कादंबऱ्यांची भाषांतरं वाचली, त्यात पण पांढरपेशा लोकांची राहणी अशीच रंगवली आहे, नाही? ते पुरुष पण असेच मध्यरात्री जेवायला येतात व तोवर त्यांच्या बायका ताटकळत बसतातसं दिसतं."

पुढे मी ओरिसात गेले तेथेही असाच काहीसा प्रकार दिसला. दिवसा भयंकर उकाडा म्हणून रात्रीचा दिवस करतात; की आम्हांला विलक्षण नमुने भेटले कोण जाणे! संध्याकाळपासून रात्रीच्या जेवणापर्यंतचा बहुतेक वेळ पत्ते खेळण्यात जातोसे दिसते. आम्ही थोड्याच वेळात झोपी गेलो. रात्री बऱ्याच

मोठमोठ्याने चाललेल्या हसण्याखिदळण्याने, संभाषणाने मला परत जाग आली. आम्ही जेवलो त्याच चौकात महंतजी व त्यांचा मित्रपरिवार ह्यांचे मोठ्या मजेत, सावकाश, हसतखेळत जेवण चालले होते. पत्त्यांच्या खेळातील हारजितीबद्दल वादविवाद चालला होता. ऐकता ऐकता मला परत झोप लागली.

रोजच्याप्रमाणे आम्ही सहा वाजता उठलो. दार उघडले तो बाहेर अगदी सामसूम. खोलीतल्या खुजातल्या पाण्याने तोंड वगैरे धुऊन, बिछाना आवरून, सामान बांधून, नीट एकावर एक रचून ठेवले व जरा उघड्यावर जावे म्हणून बाहेरच्या बागेत आलो. गावात सर्वत्र दहा वर्षांपूर्वीच्या भूकंपाची पडझड दिसत होती. देवीचे देऊळ शेजारीच होते; तेथे गेलो. आत एक घागरा नेसवलेली ओबडधोबड मूर्ती होती. देऊळही अगदी जुजबी बांधणीचे होते. त्यांतूनही भूकंपात पडलेला भाग अजूनही दुरुस्त न केलेला होता. ज्या भूमीत अशोकाच्या वेळची व गुप्तांच्या वेळची अप्रतिम शिल्पे सापडतात, तेथेच अशा भिकार मूर्ती घडाव्या हे काय दुर्दैव!

हा सर्व प्रदेश म्हणजे चंपारन्‌पासून थेट पूर्व बंगालच्या सीमेपर्यंत, निरनिराळ्या रोगांनी पछाडलेला आहे. महंतजी सांगत होते त्यात अतिशयोक्ती नव्हती. तेच रोग पुढे पूर्व किनाऱ्याने सबंध ओरिसा व आंध्राच्या पूर्वपट्टीला व्यापून आहेत. ओरिसात व आंध्रात तर जोडीला आणखी महारोग पण आहे! ह्याच प्रदेशातील जंगल विभागात, विशेषतः समुद्रसपाटीपासून साधारण ८०० ते १००० फूट उंच असलेली ठिकाणे रोगमुक्त आहेत. आज रोग व महापूर ह्यांच्या तडाख्यात सापडलेल्या प्रदेशातच प्राचीन व मध्ययुगीन संस्कृती फोफावली होती. जंगल विभागात तेव्हाही वन्य जमातींचा काही प्रदेश जमिनीसाठी सदैव हपापलेल्या शेतकऱ्यांनी ताब्यात घेतला; पण एकंदरीने त्या सृष्टीत मोठ्या घडामोडी झाल्या नाहीत. सपाट, सुपीक प्रदेशात मात्र एका काळी समृद्ध राज्ये, मोठा व्यापार, सुंदर शहरे, भरभराटलेली बंदरे होती. वैदिक धर्माचा अभिमानी कालिदास, बौद्ध अश्वघोष व जैन विमलसूरी ह्यांनी आपली काव्ये इथेच लिहिली. ह्याच भूमीवर नालंदाचे विश्वविद्यालय सतत पाचशे वर्षे त्या वेळच्या सुसंस्कृत जगाला विद्यादान करीत होते. त्या वेळीही नद्यांना पूर येत असणारच. भूकंपाचे धक्के बसत असणारच, आताचे आजार त्या वेळीही होते, ह्याची साक्ष वैद्यकावरील ग्रंथ देतात. मग आताच बहुजन

समाज इतका हीन व दीन आणि सुखवस्तू माणसे इतकी नादान व संस्कृतिहीन का झाली? ह्या कोड्याचे उत्तर काय?

त्या वेळी मला झट्‌दिशी दोनच कारणे दिसली. मुसलमानी व इंग्रजी आमदानीत जहागीरदारी व जमीनदारी वाढली. दिल्लीच्या राजाने सनद दिली की केवढा तरी मुलूख एका माणसाच्या ताब्यात जाई; व तिथले सर्व शेतकरी त्या एकाचे ताबेदार बनत. कलकत्त्यात कॉर्नवॉलिसने केलेल्या लिलावात बंगाली जमीनदारांनी कधीही न पाहिलेल्या ओरिसाच्या हजारो एकर जमिनी विकत घेतलेल्या आहेत. अरबांनी व मागाहून युरोपीय लोकांनी आशियात चाललेला दर्यावर्दी व्यापार आपल्या ताब्यात घेतला. आतील व्यापार परकीयांच्या ताब्यात गेला. मंदिरे वगैरे बांधकामे थांबली व अव्याहत वाढत्या लोकसंख्येला जमीन कसण्याखेरीज निर्वाहाचे काही साधनच उरले नाही. शेतकरी दिवसेदिवस जास्त निर्धन बनत चालला. अर्धपोटी माणसांमुळे तऱ्हेतऱ्हेची रोगराई. पण सुखवस्तू लोक नादान का झाले, याची कारणपरंपरा मात्र इतक्या सोप्या तऱ्हेने सापडण्यासारखी नव्हती.

आम्ही दर्शन करून परत आलो, तो जुगलबाबू काही माणसांबरोबर बोलत होते. ही सर्व माणसे सोशलिस्ट पार्टीची होती व ह्या विभागातील कार्य कसे चालले आहे व कसे व्हावे ह्याबद्दल वादविवाद सुरू होता. भारत स्वतंत्र होऊन नवे युग उगवले होते; पण नव्या युगाच्या जागृतीचे चिन्ह मला ह्या प्रवासात अजून तरी दिसले नव्हते. महंतजी व त्यांचा परिवार गाढ झोपेत होता. पण सकाळच्या प्रहरी शेतकरी व कामकरी ह्यांनी पुढील सहा महिन्यांत काय योजना कराव्यात, बिहारमधील साखर कारखान्यात मजूर-संघटनांतून काय फेरबदल करावेत ह्याबद्दल निदान वादविवाद करणारी ही तरुण पोरे नव्या युगाच्या सुरुवातीची चिन्हेच होती. त्यांच्याशेजारी महंतजींचा धाकटा पाच वर्षांचा मुलगा सदरा चघळत उभा होता. अर्धवट इंग्रजी, अर्धवट बिहारी भाषेत चाललेले संभाषण त्याला कळत नव्हते; पण तो मोठ्या उत्सुकतेने व एकाग्रतेने बोलणाऱ्या प्रत्येक माणसाकडे टक लावून ऐकत उभा होता. तो ह्या नव्या युगाचा वारसदार होता, की त्याचा पहिला बळी होता कोण जाणे!

१९५४

*

१३

# डार्विनचा सिद्धांत

"पृथ्वीवर सगळीकडे जीवनाचा तीव्र झगडा चालला आहे. स्वपोषण आणि प्रजनन हे सर्व जीवनसृष्टीचे अंतिम ध्येय आहे. आपण जिवंत राहावयाचे व आपल्या जीवजातीची संतती-सातत्य-कायम ठेवायचे ह्या प्रयत्नात जग गुंतलेले आहे. जे जीव ही दोन्ही कार्ये करतात, ते जीवनाच्या लढाईत यशस्वी झाले असे म्हणावे. शक्ती, युक्ती व परिस्थिती ह्या तिन्हींच्या जोरावर व्यक्ती– एक एक जीव– हे कार्य करते. ज्यांना साधत नाही, त्या व्यक्ती मरतात. सर्वतया वरील गुणांनी युक्त तेच जीव जगतात..." वर्गामध्ये डार्विनच्या विकासवादाचे विवरण करताना मी सांगितले व माझा तास संपवून घरी परतले.

वाटेत किती तरी दिवसांनी तिची गाठ पडली. एका हातात औषधाची बाटली, एका हातात भाजीची पिशवी, अशी घाईघाईने ती कुठे तरी निघालेली दिसली. "आजारी होतीस का?"

"छे ग! माझी ती सिंधी निर्वासित मैत्रीण आहे ना, तिची मुलगी आजारी आहे. तिचं औषध आणायला चालले आहे."

"आणि ही भाजी कुणासाठी चालवली आहेस बाई?"

"तुझं आपलं काही तरीच. ही काही दुसऱ्या कुणासाठी नाही. अगदी घरच्यासाठी भाजी आहे बरं!" तिने हसून उत्तर दिले. आणि "मला लवकर गेलं पाहिजे, जाते मी– " असे म्हणून ती पुढे सटकली व मी माझ्या वाटेने चालू लागले.

भाजी अगदी घरच्यासाठी होती; तरी इतर नव्हते का कुणी ती आणायला? एवढी मुले घरी आहेत, कुणालाच का नसते जाता आले? माझ्या

मनात आले. ती जवळ नव्हती, तरी तिचे उत्तर माझ्या कानांनी ऐकले, "अग, त्यांचा अभ्यास होता. मी औषधासाठी जाणारच होते. म्हटलं, मीच आणीन."

ही काही आजची गोष्ट नव्हती. नेहमी असेच चाले. दवाखान्यातून औषध आणून त्या बाईला देईल; घरी जाऊन भाजी काढून, निवडून चिरील. घाई घाईने अंग धुवील व शाळेला उशीर होईल ह्या भीतीने कसेबसे दोन घास खाऊन बाहेर पडेल. संध्याकाळी घरी आली की परत घरचे काम, नाही तर गावात कुणी नातलग असतील त्यांची कामे. मग शाळेतल्या वह्यांची तपासणी मग सुदैवाने रात्र झाल्यामुळे झोप... हा तिचा रोजचा कार्यक्रम असे.

आम्ही लहानपणी एका घरात राहिलेल्या, बरोबर शाळेत गेलेल्या. ती माझ्यापरीस मोठी म्हणून नेहमी मला संभाळून घ्यायची. माझीही दोन कामे करायची. मला आठवते तेव्हापासून पाहते आहे, प्रत्येकजण आपले हक्काने तिच्याकडून कामे करून घेई. मीही काही त्याला अपवाद नव्हते. आता दोघींच्या दोन वाटा झाल्यावर कधीकधी आमची भेट होते. कधीकधी एकमेकींकडे जातो, एकमेकींचे कसे काय चालले आहे ह्याची आम्हांला बातमी असते; आणि भेटलो म्हणजे दोघींनाही आनंद होतो– म्हणजे मला ती दिसल्याचा आनंद होतो, पण लगेच तिच्या परिस्थितीचे चित्र डोळ्यांपुढे आल्याने दिवसभर हुरहूर व विषाद वाटतो. मी तिच्यासाठी काही करीत नाही; नुसती हळहळते. सुखाच्या आयुष्यात लोकांबद्दल निष्क्रिय सहानुभूती व त्यामुळे वाटणारी हळहळ हीसुद्धा एक प्रकारची चैन आहे.

...आज ती मला आणखी वाळल्यासारखी वाटली. लहानपणी ती माझ्या एवढीच दिसायची. आता पहाते तो ती दिवसानुदिवस लहानलहानच दिसते. ती लहान होत होती, का मी सारखी फुगत असल्यामुळे ती तशी दिसायची, कोण जाणे! मी जगाची एक घेणेकरी होते. दोघी रिकाम्या हाती व उघड्या अंगाने जगात आलो, पण पहिला श्वास घेतल्यापासून आतापर्यंत माझ्यावर देणग्यांचा वर्षाव होत होता. लाडकी मुलगी, प्रेमाची बहीण, मायेची शाल पांघरलेली पत्नी, पिलांची किलबिल चाललेल्या घराची धनीण... एक ना दोन, देव देत होता व मी घेत होते; आणि घेता घेता शरीराने पण वाढत होते आणि ती?... एक देणेकरीण होती. आई, बाप, भाऊ, बहिणी, मित्रपरिवार... सगळ्यांनी तिच्याकडून घेण्याचा जणू विडा

उचलला होता. आई बिचारी महासाध्वी होती. नवऱ्याच्या क्षुल्लक पगारावर आठदहा माणसांचा संसार कसा करी, तिचे तिलाच माहीत.

मुले हळूहळू मोठी झाली. थोरल्या मुलीचे लग्न झाले, थोरला मुलगा मिळवू लागला, खालची लवकरच आपल्या मार्गाला लागणार असे दिसत होते. तरुण वयात केलेल्या कष्टाचे फळ मिळणार, आत सुखाचे दिवस येणार ह्या आशेत सर्व होती पण ते बिचारीच्या नशिबात नव्हते. थोरला मुलगा कर्ज काढून परदेशात गेला तो परत आलाच नाही. त्याचे कर्ज मात्र कुटुंबाच्या डोक्यावर बसले. आई व वडील दुःखातच गेली. मधल्या मुलाला मध्येच कॉलेज सोडून लहानशी नोकरी पत्करावी लागली. हिने, भावाच्या मदतीने काही शिष्यवृत्त्या मिळवून शिक्षण संपवले व शिक्षण संपल्या दिवसापासून ती व तिचा भाऊ ह्यांनी संकल्प सोडावा त्याप्रमाणे आपल्या आयुष्याचे कुटुंबाला दान केले. कर्जाची फेड करता करता भावाबहिणींचे वय झाले... कोणी तरी वंशाला राहावा म्हणून धाकट्याचे लग्न करून दिले व दोघांनी त्याच्या संसाराला मदत केली. तिच्या त्यागाची सीमा तरी काय, हे दैवाला पाह्यचे होते की काय कोण जाणे... बहिणीची मुले, विधवा भाच्या आणि नातवंडे पण तिच्याच पदरी पडली... आणि जणू काय हे सर्व कमीच म्हणून, ती आता एका निर्वासित मैत्रिणीसाठी दवाखान्यात खेटे घालीत आहे. तिचा विचार करायला लागले की माझ्या विचारांचे पर्यवसान रागात होई. पहिल्याने काही कारण नसता तिच्या दीन अगतिक नातलगांचा राग येई- नंतर परदेशात सुखात असलेल्या भावावर मी चरफडे. शेवटी मला तिचाच राग येई, 'तिला तरी जरा अंगाबाहेर नसते का टाकता आले?' असे मी घरी हजारदा मनाला विचारी. माझ्या सुखासीन जिवाला तिचा त्याग अगदी असह्य होई.

विचाराच्या चक्रात मी घरी कधी आले ते समजलेसुद्धा नाही. घरची मंडळी जरा खिन्नच दिसली व लवकरच त्याचे कारणही कळले. "तुला कळलं का ताई गेल्या ते?"

"म्हणजे? दोन दिवसांपूर्वीच मला दिसल्या होत्या. भावाच्या आजाराची चौकशीसुद्धा केली मी त्यांच्याजवळ. जरा दमल्या भागलेल्या व ओढल्यासारख्या दिसत होत्या, पण आजारी काही नव्हत्या. काही अपघात वगैरे झाला की काय?" मी आश्चर्याने विचारले.

"त्यांचे संध्याकाळी पोट दुखू लागलं. दोन दिवस घरी होत्या.

शेजारच्या डॉक्टरीणबाईंना बोलावलं, त्यांनी सांगितलं की घरगुती उपचारांचं हे दुखणं नाही, म्हणून इस्पितळात नेलं. तिथ शस्त्रक्रिया करण्याच्या आतच मेल्या!" मला माहिती देण्यात आली. "ताईच्या आई काय आक्रोश करताहेत!" कोणीसे कळवळून म्हणाले.

'करतील तर काय झालं. एक गुलाम नाहीसा झाला. कोणालाही वाईट वाटेल!" मी मनातल्या मनात म्हटले, पण मोठ्याने मात्र "सुटली बिचारी!" एढेच शब्द उच्चारले.

ही दुसरी देणेकरीण. ताई कॉलेजची परीक्षा पास झाली तेव्हा कोणी तिला एका संस्थेत काम करण्याची गळ घातली होती. ती नाकारून ताईने जरा जास्ती पैशांची सरकारी नोकरी पत्करली. तर त्या वेळी कोण गहजब झाला! एका सभेत तिचे नाव न घेता लोकांना समजेल अशा बेताने एक वक्ते म्हणाले होते, 'मुली बी. ए. झाल्या म्हणजे आपले आयुष्य एखाद्या गरीब संस्थेत न वेचता पैशाकडे पाहतात व मोठ्या नोकऱ्या धरतात." बिचारी ताई वक्त्यांच्या समोर पुढच्या रांगेत बसली होती. संताप, आश्चर्य, अगतिकता व शरम ह्यांनी तिच्या अंतःकरणात काय झाले ते ती कोणाजवळ बोलली नाही. बऱ्याच वर्षांनी मला ते कळले. तिच्या अंगावर आई व सात भावंडे ह्यांचा संसार होता. त्यांचे शिक्षण करता येईल अशी नोकरी तिला हवी होती. आई व भावंडे शिकण्यासाठी एकीकडे व स्वतः नोकरीच्या गावी, असे दोन संसार तिला चालवायचे होते. सर्व भावंडांचे शिक्षण व लग्ने करूनही तिची जबाबदारी व देणे संपले नव्हते. भावाच्या आजारात रात्रंदिवस तिची सेवा चालली होती. दिवसभर नोकरी, रात्रभर जागरण, मधल्या वेळात स्वयंपाक– कोण गुलाम पैसा देऊनही इतके करणारा मिळेल? मिळवता मुलगा घरी आला की दमला म्हणून त्याचे कौतुक होई, पण ताईला "बस हो, दमलीस-" एवढे दोन शब्दही कधी कोणी म्हटले नाहीत. ज्या बायांनी संस्थांतून कामे केली, त्यांचा बोलबाला झाला, वर्तमानपत्रातून फोटो आले, समाजसेविका म्हणून सत्कार झाले, शारीरिक स्वास्थ लाभले, प्रतिष्ठा मिळाली, ताईचा त्याग कोणाला दिसला नाही. सगळ्या बहिणींची लग्ने झाली. कोणाच्या मनात येईना, की ताईलाही संसार करावासा वाटत असेल म्हणून. शेवटी शरीराने संप पुकारला आणि ताईच्या कचाट्यातून आपली सोडवणूक करून घेतली.

ताईची ही तऱ्हा, तिची ती तऱ्हा. तिने लग्न करावे म्हणून भावाने तिला पुष्कळ सांगितले, पण तिनेच भावावर एकट्यावर भार नको म्हणून लग्न केले नाही. तिला पाहिले की मला वाटते, ती ताईसारखीच एक दिवस जाईल. दोघी चांगल्या मिळवत्या, पण कधी झुळझुळीत वस्त्र नेसल्या नाहीत. दोघींचे केस सुन्दर पण कधी त्यावर फूल घातले नाही. जबाबदाऱ्या अंगाबाहेर टाकायच्या ही युक्ती त्यांना साधली नाही. आयुष्याच्या धकाधकीत इतरांना मागे रेटून आपण पुढे सरायचे ही शक्ती त्यांना नाही. परिस्थिती म्हणजे शक्तियुक्तीनेच आपलीशी करून घ्यायची. अशी शक्तियुक्ती ज्यांच्यात असेल त्यांचेच संसार होतात... त्यांची संतती पृथ्वीची मालक होते. जीवनाच्या झगड्यात यशस्वी होण्यास लागणारा स्वार्थ, बेदरकारपणा दोघांच्यातही नव्हता. डार्विनच्या सिद्धान्ताप्रमाणे त्या जगण्यास नालायक; त्यांनी कामकरी मुंग्यांप्रमाणे इतरांचे संसार उभारायचे, लोकांची कर्जे फेडायची, लोकांसाठी कष्ट करायचे व निर्वंश मरायचे !

*

१४

# मल्हार

हवा गार होती पण सुखदायकही होती. चालता चालता मी घराच्या गल्लीला आले तो पलीकडून माझी शेजारीण त्याच गल्लीला वळताना दिसली. मला पाहिल्याबरोबर ती उद्गारली, "हे काय, तुम्ही छत्री विसरला होतात वाटते? भिजला आहात की!" मी हातमोजे काढून कोटावरून हात फिरवला तर खरेच. डोक्यावर रुमाल बांधला होता तोही भिजला होता. मी वर आकाशाकडे पाहिले तो ते नेहमीसारखेच घुंघट घातलेले होते. खालचा रस्ता भिजला होता पण वाहात नव्हता. रस्त्यावरच्या दिव्यांकडे पाहिले तर चंद्राभोवती खळे असावे तसा त्यांचा प्रकाश दिसत होता. पाऊस पडत होता म्हणण्यापेक्षा हवेत पाण्याचे कण भरून राहिले होते म्हणणे जास्त बरोबर झाले असते. ह्या पावसाचे थेंब कधी दिसायचे नाहीत; आवाज काही ऐकू यायचा नाही- अगदी चोरपावलाने येतो. शेजारणीबरोबर वाट चालता चालता मला एकदम शेक्स्पिअरच्या ओळीची आठवण झाली. "करुणा मारून मुटकून उत्पन्न होणारी नव्हे (Quality of mercy is not strained); आकाशातून अलगद पडणाऱ्या पावसाप्रमाणे ती येते." बी.ए.च्या वर्गांत ह्या ओळींवर अध्यापकांनी केलेले भाष्य अगदी मान डोलवून डोलवून ऐकले होते. त्या ओळींचा रसास्वाद घेतला होता. पण आज मला खरा अर्थ कळला. अगदी हळू म्हणजे पाऊस पडतो तरी कसा हे कळायला इंग्लंडमध्ये जावे लागले. आपल्या इकडचा पाऊस ज्यांना माहीत, त्यांना इंग्लंडमधला हलका पाऊस म्हणजे काय, हे कळणार कसे? करुणेचा पाझर नकळत अंतःकरणातून झरतो तसा हा पाऊस वातावरण ओले करतो, जमिनीला

नकळत भिजवतो. तो इतका सौम्य की पावसातून चालणाऱ्याला समजत सुद्धा नाही. फक्त हवेत आर्द्रता असते. वाऱ्याची झुळूक ओल्या हातांनी गालाला हळूच शिवून जाते. तितक्याच नकळत खालची जमीन हळूहळू पाणी पिते. 'Quality of mercy is not strained' शेक्सपिअरची ही ओळ जणू नव्याने मी अनुभवीत होते.

इंग्लंडची सगळीच सृष्टी मला नवी होती. मी गेले तो पानांचा रंग पालटून पानं झडायला सुरुवात झाली. केनसिंग्टन् व हाइड पार्क या दोन बागांतून मी चालत जाई व मग पुढचा मार्ग बसने जात असे. वाळलेल्या पानांचे ढीगच ढीग बागेच्या कडेला जमविलेले होते. पानझड थांबल्यावर रोज त्या ढिगांना सकाळी आगी लावीत आणि सर्व वातावरण कडवट तिखट धुराने भरून जाई. सकाळच्या थंडीत तो वास व पेटणाऱ्या पाचोळ्याच्या आगट्या मोठ्या सुखदायक वाटायच्या. सगळ्यांत चमत्कार वाटे तो हा की, मोठमोठे वृक्ष पानाशिवाय उभे-कुठे हिरव्या रंगाची छटासुद्धा त्यांवर दिसायची नाही; आणि खाली मात्र थंडी असो वा बर्फ असो, गवताचा गालिचा नेहमी टवटवीत व हिरवाचार असायचा. गवत कोळपून जाईल अशी थंडी इंग्लंडमध्ये पडत नाही आणि गवत पाण्याशिवाय वाळेल असे क्वचितच होते; कारण पाऊस नाही असे काही आठ दिवस जात नाहीत.

सप्टेंबर-ऑक्टोबर नंतर जवळजवळ रोज पाऊस पडायचा, आणि माझ्या ओळखीचे सर्व लंडनवासी पावसाला शिव्या देत असायचे. मला त्या पावसाची मोठी मौज वाटे. वाटेत चिखल नाही, मजेदार गारवा आणि ४-५ मैल चालूनही थकवा नाही. घरनं वर्तमानपत्रं यायची; त्यांत महाराष्ट्रांतल्या दुष्काळाची वर्णने व नगरच्या लोकांची कधीही न संपणारी पाण्याची कटकट-कोणी म्हणाले की तुम्ही कशा पावसाला कंटाळत नाही, तर मी उत्तर देई की, जगात कोठे तरी असा पाऊस पडतो व कायम हिरवेगार राहते, त्याचे मला फार कौतुक वाटते.

नुसता पाऊसच नाही, लंडनची सर्वच सृष्टी इकडच्या उलटी. आपल्याकडे धुके म्हटले की काही तरी मजेदार संवेदना मनाला होते. पावसाने धुऊन काढलेले प्रसन्न आकाश, सकाळची व संध्याकाळची पडू लागलेली थंडी व दहा मैल लांबचे दिसावे असे स्वच्छ वातावरण आणि

त्यात काही थोडा वेळ मात्र राहणारा, दृष्टीला चकविणारा धुक्याचा पडदा-असे आपल्याकडचे धुके. सकाळी उठून पहावे तर महाबळेश्वरी किंवा सिंहगडावर खाली दरी धुक्याने भरलेली असते– तेवढ्यात सूर्य उगवला, की त्या धुक्यावर इंद्रधनुष्ये उमटतात आणि थोडा वेळ इतस्ततः पळून, सूर्य वर आला की धुके पार नाहीसे होऊन गवताच्या पातीपातीवर अनंत दंवबिंदू कोटिसूर्य प्रतिबिंबित करतात. संध्याकाळी धुके पसरले तर तेही रात्र निवळली की नाहीसे होते व रात्रीचे आकाश सर्व ताऱ्यांनिशी चमकत असते. पण लंडनचे धुके म्हणजे औरच असते. आधी वर्षाचे दहा दिवस सुद्धा आकाश निरभ्र नसते. तिकडचे आकाश आपल्या आकाशाइतके उंच कधी वाटतच नाही. कधीही वरती पाहा, काळसर पांढुरके छत जसे सर्व शहरावर घातलेले असते. कोळशावर चालणारे लंडनमधले हजारो लहानमोठे कारखाने व कोळशावर चालणाऱ्या लंडनच्या घरातील लक्षावधी चुली रात्रंदिवस वातावरणात धूर ओकीत असतात. घरातही जरी अनवाणी चालले तरी पाय काळे होतात. कोठल्याही झाडाला हात लावला तर हात काळे होतात. या धुरकट वातावरणात धुके पसरले म्हणजे एरवी डोळ्यांना न दिसणारे कोळशाचे कण जणू दृश्य होतात. काळोख डोळ्यांना दिसतो व हातात धरता येतो. असे धुके वर्षातून एकदोनदा तरी लंडनवर पसरते. पृथ्वीच्या भोवती हवेचे आवरण आहे व आपण त्या हवेच्या तळाशी आहोत या गोष्टी भूगोलाच्या पुस्तकात वाचल्या होत्या, पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव लंडनच्या धुक्यात आला. समुद्राच्या तळाशी असलेल्या जीवांना काय वाटत असेल त्याची कल्पना येते. ह्या धुक्याने हाहाकार होतो. ब्रिटिश खाडीत बोटीवर बोटी आपटतात. रस्त्यावर गाड्यांचे अपघात होतात. मुले रस्ता चुकतात. म्हातारी-कोतारी, विशेषतः छातीचा विकार असलेली माणसे-बरीच मरतात; पण या विचित्र हवेमुळेच हिटलरला लंडनवर स्वारी करायला संधी मिळाली नाही, असे म्हणतात.

लंडनमधला धूर शहरातल्या शहरात कोंडतो व झाडे आणि घरे यांवर धुराची पुटेच्या पुटे बसून सर्व इमारती काळ्याकुट्ट होतात. सर्व जगात इतक्या काळ्या पडलेल्या इमारती कोठे पाहिल्या नव्हत्या. राणीच्या राज्यारोहणानिमित्त लंडनची साफसफाई होत होती व लोक मोठाल्या इमारती

कसल्याश्या रसायनाने धुऊन साफ करीत होते. धुतलेली इमारत शुभ्र पांढरी तर शेजारीची काळीकुट्ट असा विरोध मोठा मौजेचा दिसे. ह्या काळ्याकुट्ट इमारती नेहमी धुतल्या नाहीत तरी सुंदर दिसाव्या म्हणून खटपट चाललेलीच असते. माझा रस्ता पार्लमेंट स्ट्रीटवरून असे. तेथे निरनिराळ्या सरकारी खात्यांच्या कचेऱ्या आहेत. त्यांच्या समोरून जाताना हिवाळ्याच्या उदास वातावरणात त्या अधिकच काळ्या व उदास वाटावयाच्या; पण एक दिवस पाहते तो रस्त्यावरच्या सर्व खिडक्यांतून निळसर जांभळी आयरिस फुले कुंड्यांतून भरून राहिली होती. वसंत ऋतूतली ही पहिली फुले; आणि मग दर पंधरा दिवसांनी ऋतुमानाप्रमाणे कुंड्या व फुले बदलत. आयरिसनंतर पिवळे धमक डॅफोडिल, त्यानंतर निरनिराळ्या रंगांचे हंड्रेड्स अँड थावजंड्स्, ह्याप्रमाणे वसंतातील निरनिराळ्या फुलांची हजेरी तेथे लागायची. काळ्या खिडक्या, आतील सदैव अंधाऱ्या खोल्या, त्यात भर दुपारी दिवे लावून काम करणारी माणसे व बहुधा अभ्राच्छादित असलेले आकाश, या अंधाऱ्या सृष्टीत सूर्यप्रकाशाला बांधून आणून खिडक्यांतून डांबून ठेवण्याची खटपट अजब खरीच! त्या फुलांनी खिडक्यांना शोभा येते की नाही, ह्या प्रश्नाचा निर्णय मात्र मला शेवटपर्यंत झाला नाही.

हिवाळ्यातले कित्येक आठवडे येथला दिवस संधिप्रकाशाइतपत उजेडात असतो. ह्या अर्धवट उजेडात प्रकाशाचा जसा अभाव तसाच छायेचाही. निरनिराळ्या उद्यानातून केवढाले पर्णहीन वृक्ष उभे असायचे; पण एकाचीही सावली खालच्या हिरवळीवर पडायची नाही. आमच्याकडे रखरखीत ऊन असते व त्याबरोबरच अगदी त्याला चिकटून सावली असते. डांबरी रस्ता उन्हाने इतका चकाकतो की दृष्टी ठरत नाही. पण प्रत्येक चालणारे माणूस व धावणारे वाहन आपल्या सावलीनिशी चालत वा धावत असते. दिव्याच्या प्रत्येक खांबाची सावली त्याच्या शेजारी लांब पसरलेली असते. प्रत्येक वस्तूची एक बाजू पोळलेली आणि प्रकाशमय तर दुसरी बाजू छायेची व निवाऱ्याची, असा विरोध सतत दिसतो. आगगाडीतून प्रवास करताना बघावे, उन्हाच्या वेळी, टेलिग्राफच्या तारांवर बसताना पक्षी नेमके खांबाची सावली पडलेली असेल तेथेच खांबाला चिकटून बसलेले आढळतात. पायी चालणारी माणसे घरांची सावली ज्या बाजूला पडली असेल त्या रस्त्याच्या बाजूने चालतात.

झाडाखाली दाट छायेच्या काळ्या चंद्रकळेवर लख्ख प्रकाशाचे गोल गोल कवडसे खडीसारखे चमकतात; पण येथे सावली पडेल इतका लख्ख प्रकाश महिनेच्या महिने पडत नाही.

एक दिवस मी ह्या उद्यानातून त्या उद्यानात भटकत भटकत सेंट जेम्स बगीच्यात पोचले व तळ्यातील पोहणाऱ्या पक्ष्यांकडे पाहात उभी राहिले. सगळीकडे मंद रुपेरी प्रकाश पडला होता. एकाएकी मला चमत्कारिक वाटले. आपल्याकडे सर्व प्रकाशाचा उगम आकाशात होतो. येथे मला वाटले की प्रकाश खालून वर फाकला आहे. मी परत नीट भोवताली व वर पाहिले. खरेच आकाश अभ्राच्छादित होते. अगदी काळे जरी नसले तरी सूर्याचा मागमूसही नव्हता. खाली तळच्या पाण्यावर व मधल्या दगडावर बर्फाचा पातळ थर साचला होता व त्यातून परावर्तन पावून प्रकाश सर्वत्र फाकला होता. यामुळे प्रकाश खालून वर गेल्यासारखा वाटला. या विशिष्ट प्रकाशात सर्वच रंग आंधळे वाटतात. कधी एखादद़िवशी सूर्यप्रकाश पडला, व तोही वसंत ऋतूत फुलांनी बहरलेल्या ताटव्यावरून व हिरव्या कुरणावरून पडला, म्हणजे रंगाने नटलेली सृष्टी डोळ्यांपुढे नाचते. पण तरीही येथल्या सृष्टीतले रंग व आपल्याकडच्या सृष्टीतील रंग ह्यात फार फरक आहे. सर्वच रंग जरा मंद व सौम्य वाटतात. जसा दाट छाया व झगझगीत प्रकाश हा विरोध इंग्लंडात दिसत नाही, तशा निरनिराळ्या रंगांतील छटा पण आपापल्या भडकपणाने उठून न दिसता एकमेकांना पूरक व मंद अशा भासतात. इकडच्या चित्रकारांची चित्रे मला ही सृष्टी पाहिल्यावर जास्त आवडू लागली. काळसर पांढुरके पाणावलेले आकाश, तशाच प्रकाशात दिसणारे डोंगर, नद्या व तळी, हिरवी, फुलांनी भरलेली नाजूक रंगाची कुरणे व त्यात लठ्ठ, गोऱ्या गुलाबी गालांची, निळ्या डोळ्यांची व सोनेरी केसांची माणसे. ह्याही सृष्टीची मला मौज वाटे. कारण सर्वच कसे निराळे होते. पण चित्र-मंदिरातील नामांकित चित्रकारांची चित्रे पाहून पाहून किंवा लंडनमधील उद्यानातून हिंडता हिंडत दमले व मी स्वस्थ डोळे मिळून बाकावर बसले की अनाहूतपणे घरची सृष्टी माझ्यापुढे येई.

उन्हात भाजून निघणारी रेताड जमीन, युगानुयुगे उन्हापावसात उभे राहिलेले, वेडेवाकडे झिजलेले अरवलीचे डोंगर व शेतात काम करणाऱ्या दोन अहिर बाया—लांबून त्यांची तोंडे दिसत नव्हती, पण भडक तांबडी व

जर्द पिवळी अशा दोन रंगांच्या ओढण्या दिसत होत्या. किती तरी लांबून ते लाल व पिवळे ठिपके शेतात दिसत होते.

ओरिसाच्या दाट अरण्यात जर्द काळसर हिरव्या पालवीच्या खाली सूर्याचे नाचणारे कवडसे. रानातील वळणावळणांनी जाणारी पाऊलवाट, शेजारच्या लहानशा झोपडीपुढे उभ्या असलेल्या जवळजवळ नागड्या बोंडो बायका व त्यांच्या गळ्यांतील बटबटीत मण्यांच्या माळा, त्यांचे सुरकुतलेले चेहरे, साफ गुळगुळीत हजामत केलेली डोकी, त्यांचे थोडे भेदरलेले, थोडे प्रश्नार्थक मुद्रेने माझ्याकडे लागलेले डोळे व त्यांच्या शेजारीच दारू पिऊन झिंगलेला, झुकांड्या जात असलेला, मला परत परत सलाम करणारा त्यांच्या घराचा मालक हे चित्र डोळ्यांपुढे येऊन उभे राहिले.

नगर जिल्ह्यातल्या एका डोंगरावर आम्ही चढत होतो. सकाळचे दहा-साडेदहाच झाले होते; पण ऊन मी म्हणत होते. डोंगरावरचे काळे कातळ चटकत होते. आमच्याबरोबर वाटाडे म्हणून वारकरी पंथाचे एक बुवा होते. डोंगरावरच्या गावाहून एक बाई व दोन-तीन पुरुष खाली उतरत होते. बुवांना पाहून ही मंडळी थांबली. ती बाई फाटक्या अंगाची, तरुण, पोरसवदा, हिरवे लुगडे नेसलेली होती. रंग काळा, चेहरा व अंग इतके रेखीव, की आम्ही आश्चर्याने स्तब्ध झालो. तिचे नाक रेखीव, जिवणी कातीव, हनुवटी नाजूक, डोळे पाणीदार पिंगट, दाट काळ्या सरळ भुवया व बांधा हिरव्या कळकाच्या काठीसारखा होता. जणू शेजारच्या काळ्या कातळातून कोरून काढलेली मूर्ती सजीव होऊन आम्हांपुढे उभी राहिली होती. वरचे निळे आकाश, खालचा खडकाळ प्रदेश, कडक उन्हात पसरलेल्या वेड्यावाकड्या लांब लांब सावल्या व ती रमणीय सावळी मूर्ती आठवताच लंडनच्या गारठ्यातसुद्धा माझ्या अंगात ऊब आल्यासारखे वाटले.

इंग्लंडचे चित्रकार आपली सजीव-निर्जीव सृष्टी जिव्हाळ्याने चित्रात जिवंत करतात; पण माझ्या घरच्या सृष्टीला अजून कोणी चित्रकारच भेटत नाही. पाहावे त्या चित्रात गोऱ्या, लुसलुशित, गुलाबी चोळयांच्या व फिक्या रंगांच्या साड्या नेसलेल्या बायका विलायती फुलांचे गुच्छ घेऊन हसत असतात किंवा विलायती वाद्ये वाजवितात किंवा स्वित्झर्लंडमधील सरोवराच्या काठी बसून स्वेटर विणीत असतात. त्यांच्या तोंडाला कधी त्यांच्या आकाशातला सूर्यप्रकाश भेटलेलाच नसतो. रणरण ऊन व गार

सावली, दाट हिरवे, पिवळे, तांबडे असे भडक रंग असलेली झाडे व फुले, कातीव दगडांचे सौंदर्य असलेले काळे स्त्री-पुरुष, काळ्या म्हशी व तांबड्या गायी, निळे-काळे डोंगर यांना कागदावर जिवंत करणारा चित्रकार जन्मायचा तरी आहे, किंवा मी पाहिला तरी नाही. मी मोठ्या उद्वेगाने उठून चालू लागे. आमचे काव्य, आमचे वाङ्मय, आमची कला, काहीच का आमच्या जीवनाशी व सृष्टीशी संबंध नसलेली अशी आहे, असा मला विचार पडे. पण एक दिवस मला साक्षात्कार झाला की भारतीय कलाकार भारतीय सृष्टीचे खरे पुत्र आहेत.

लंडनमध्ये मी एका प्रोफेसरांची हिंदी संगीतावरील व्याख्याने अधून-मधून ऐकत असे. व्याख्याने मला कळत असत असे नाही, पण अर्धा तास व्याख्यान झाले म्हणजे उरलेला अर्धा तास उत्तमोत्तम गायक-वादकांचे संगीत फोनोग्राफवर ऐकावयास मिळे व तो मला अपूर्व लाभ वाटत असे. असेच एक दिवस व्याख्यान ऐकत होते. बाहेर लंडनला पडतो तसा चोरून चोरून पाऊस पडत होता. प्रोफेसरमहाशय सांगत होते की, "अमका राग अमक्या वेळी किंवा ऋतूत गावा, असा संकेत आहे. या संकेताचा त्या रागाच्या आविष्कारांशी संबंध असतोच असे नाही. उदाहरणार्थ, मल्हार राग व पाऊस यांचा संबंध काय आहे, हे कळत नाही."

मी अर्धवट कान देऊनच व्याख्यान ऐकत होते, पण त्या वाक्याबरोबर मी खडबडून जागी झाले. बाहेरच्या पावसाकडे मी पाहिले. खरेच, तो दिसेपर्यंत शेक्सपिअरच्या ओळीतील करुणेचा पाझर व पाऊस ह्यांचा संबंध तरी मला कुठे कळला होता! पाऊस, नेहमीच वरदानासारखा, पण शेक्सपिअरने दिलेली विशेषणे पावसाला कशी लागतात हे कुठे मला समजले होते? त्याचप्रमाणे ज्याने माझ्या मायभूमीचा वळवाचा पाऊस पाहिला नाही, त्याला पावसाचा व मल्हाराचा संबंध काय कळणार? वादळावर स्वार होऊन, ढगांचा नगारा वाजवीत, विजेचा लखलखाट करीत दरवर्षी जमिनीला झोडपीत येणारा पाऊस, थेंब अंगावर पडायच्या आधीच लांबून लक्षावधी माणसे चवड्यांवर धावत यावी, असा येणाऱ्या सरींचा आवाज; व छपरे उडवीत, झाडे पाडीत, गारांनी फोडीत आठ महिने तापलेल्या, उत्कंठेने होरपळलेल्या जमिनीला झोडीत, राक्षसी प्रणयाने की प्रलयाने तांडव करीत येणारा पाऊस ह्या महाशयांना काय माहीत?

सावकाश सुरुवात होऊन वक्र गतीने गिरकत गिरकत वर जाणारी मल्हाराची तान आहे, की क्षणाक्षणाला कडकडाट करणारी मेघगर्जना आहे; की ऐकणाऱ्या हृदयाची धडधड आहे, हेच मल्हार ऐकताना कळेनासे होते. प्रियकरासाठी एखाद्या माणसाचा तो टाहो नसून बैठकीच्या बाहेर सर्व सजीव निर्जीव सृष्टी प्रत्येक मेघगर्जनेबरोबर उत्कंठेने कापत असते. ती उत्कंठा, ती धडपड, ते तांडव, मल्हाराच्या तानेतानेने वाढत जाते व राग संपायच्या वेळी खरोखरच गडगडाट होऊन पाऊस पडायला लागला तर मल्हारानेच पावसाला आवाहन केले, याबद्दल मनाला शंका वाटत नाही.

*

१५

# सत्याचा शोध

"आजच्या विज्ञानयुगात शुद्ध स्वरूपात ज्ञानसाधना होत आहे. सत्य काय आहे हे हुडकून काढताना शास्त्रज्ञ प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या कसावर घासून बघतात व मगच ती ग्राह्य धरतात. सर्व व्यवहार बुद्धिप्रमाण्यावर आधारलेला आहे 'बाबावाक्यं प्रमाणम्' ही वृत्ती आता राहिलेली नाही.

विज्ञानयुगाचे ढोलके बडवण्याच्या दोन तऱ्हा आहेत. एक प्रत्यक्ष स्तुती करून जाता जाता इतर युगांतील लोकांचा कमीपणा दर्शवायचा ही, व दुसरी प्राचीन संस्कृतीचा इतिहास लिहिता लिहिता त्या वेळचे कायदे, नीतिकल्पना, धर्म, ही सर्वच हल्लीच्या मानाने हीन दर्जाची होती म्हणून प्रतिपादन करावयाचे "मिसर (ईजिप्त), बावेरू (बाबिलॉन) वगैरे देशांचे लोक कायम भीतीच्या वातावरणात राहात असत. रोग पसरवणारी निरनिराळी दैवते, माणसाला झपाटणारी भुते, ह्यांनी सर्व सृष्टी भरलेली आहे, असे त्यांना वाटे व मानवी जीवनाचा आनंद त्यामुळे हरपून जाई" असे एक इतिहासकार लिहितो. जणू हल्लीच्या युगात कोणाला कसलीही भीती व रोग नाही! पूर्वीचे जीवन आनंदी होते किंवा नाही, हे त्यांना काय माहीत? ज्या लोकांत पूर्वीच्या समजुती आहेत त्यांचे जीवन या समजुतींमुळे जसे निरानंद दिसत नाही, तसेच पूर्वीच्या लोकांचे असणार. वैदिक काली मलेरिया घालविण्यासाठी मंत्र म्हणत असत व त्यामुळे मलेरियाचा राक्षस निघून जाई अशी कल्पना असे. मलेरियाचा राक्षस आहे, का जंतू पसरविणारे डांस आहेत, ह्या ज्ञानावर आयुष्यातील आनंद अवलंबून असण्याचे कारण नाही. ज्ञानामुळे काही अवस्थांत रोगांवर नीट उपाययोजना करणे शक्य आहे; पण त्यामुळे जीवनातल्या आनंदात भर

पडलीच पाहिजे व ते निर्भय झालेच पाहिजे ही अपेक्षा मात्र चूक आहे. जगांत सर्वत्र जंतू पसरले आहेत व ते आपल्या अंगात शिरून रोगराई होईल, ह्या ज्ञानामुळे जीवनांतील गंमत नाहीशी झाल्याची अनेक उदाहरणे मी पाहिली.

मला आठवते, एकदा एक विलायती माणूस आपल्या लहान मुलाला घेऊन आमच्याकडे चहाला आला होता. फराळाला नाना तऱ्हेचे गोडाचे व तिखटाचे पदार्थ केले होते. बापाने एक कपभर बिनदुधाचा चहा घेतला व मुलाला दूध हवे असूनही घेऊ दिले नाही. दुधात टायफॉइडचे जंतू असतील ही भीती! माझी मुले खात होती व तो बिचारा मुलगा आशाळभूतपणे बघत होता. पण बापाने स्वतः खाल्ले नाही व मुलालाही खाऊ दिले नाही. शेवटी टेबलावरचे एक केळे मुलाला दिले व आपण एक खाल्ले. खाण्याच्या पदार्थांत जंतू असतील ही भीती! केळ्याचे साल स्वतः काढले म्हणजे आतमध्ये निर्जंतुक शुभ्र पांढरे फळ असते ते खाल्ले तर अपाय होणार नाही ही कल्पना. शेवटी हा कोल्हा-करकोच्याचा पाहुणचार संपला व पाहुणे निघून गेले.

जी गोष्ट आनंदाची तीच सत्याची. पूर्वीच्या लोकांचे सत्यशोधन व हल्लीच्या लोकांचे सत्यशोधन ह्यांत जो फरक आहे तो उपकरणांचा आहे, मनोवृत्तीचा नाही. गेल्या सहा हजार वर्षांत मानवाने जो ज्ञानाचा व द्रव्याचा संचय केला आहे, त्यामुळे सत्यशोधनाची निरनिराळी साधने उपलब्ध झाली व आता त्याचा खटाटोप व आटापिटा जास्त वाढला. पूर्वी ज्ञानाची साधने सोपी, सर्वांच्या जवळ असलेली अशी असत व म्हणून अमका म्हणाला ते खरे का खोटे, हे स्वतः पडताळून पाहण्याची शक्यता तरी होती. आता मात्र बहुसंख्य लोकांना अमका असं म्हणतो म्हणून विश्वास ठेवण्याखेरीज गत्यंतर नाही.

अमक्या दिवशी मृगनक्षत्रातील व्याधाचा तारा सूर्याबरोबर उगवला, असे जेव्हा जगभर देशांतील ज्योतिर्विद सांगत, तेव्हा ते कितपत बरोबर आहे, ह्याचा अंदाज करणे त्या अक्षांश-रेखांशावर राहणाऱ्या इतर लोकांना स्वतः लौकर उठून बघणे शक्य असे. पण आता मृग नक्षत्रातील अमक्या ताऱ्याजवळ मोठे तेजोमेघ आहेत व त्यात आपल्या सूर्यमालेसारख्या कित्येक सूर्यमाला आहेत असे सांगतात, त्याचा प्रत्यय काय आपल्याला

येणे शक्य आहे? जे सांगतात त्यांचा शब्द हेच ना सत्याचे प्रमाण? कोठच्या तरी बाबाचेच वाक्य शेवटी प्रमाण मानावे लागते.

हल्लीच्या युगात शब्दप्रामाण्याला महत्त्व नाही हे म्हणण्यात अर्थ नाही. साध्या व्यवहाराचं काय पण शास्त्रीय बाबतींतसुद्धा शब्दप्रामाण्यावर विसंबून राहावे लागते व अशा वेळी माणूस विश्वास ठेवतो ते अमकी गोष्ट बुद्धीला पटते म्हणून नव्हे; तर अमक्याने सांगितली म्हणून.

गौरी आम्हांला गोष्ट सांगत होती : "त्या लहानग्या कुत्र्याने छोट्या जॉनच्या हाताला बांधलेली दोरी कुरतडून टाकली व त्याची सुटका केली मग जॉन कुत्र्याच्या पाठीवर बसून भरधाव पळत सुटला व चोराच्या गुहेपासून दूर गेला..." ही घटना ऐकल्याबरोबर आम्ही सर्वांनी एकच गिल्ला केला. "गौरे, काहीतरी सांगू नकोस. सहा महिन्यांचं लहानसं कुत्रं आठ वर्षांचं मूल पाठीवर घेऊन कधी पळू शकणार नाही." गौरी आमचे ऐकेना, तेव्हा तिला वेड्यांत काढून आम्ही मोकळे झालो. सर्वांनी गौरीपुढे बुद्धीची फुशारकी मारली तरी या हकीकतीवरून एवढेच दिसते की, आम्ही गौरीच्या शब्दावर विश्वास ठेवण्यास तयार नव्हतो. एखाद्या लठ्ठ इंग्रजी पुस्तकात जर कोणी लिहिले असते की अमक्या देशातली कुत्री इतकी मोठी व बावळट असतात की तेथे ती घोड्याप्रमाणे माणसाच्या बसण्यासाठी उपयोगी पडतात, तर आम्ही खचित त्यावर विश्वास ठेवला असता!

गौरी बागेतून पळत पळत येऊन सांगू लागली असती की, "अरे दादा, मी आत्ता एक बेडूक पाहिला, तो सापाला खात होता." तर कॉलेजात जाणाऱ्या तिच्या दादाने तिच्यावर कदापि विश्वास ठेवला नसता. पण तोच दादा प्राण्यांविषयी नवीनच प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकातील सापाला खाणाऱ्या बेडकांविषयीचे वर्णन घरातील प्रत्येकाला वाचून दाखवीत आहे. बेडूक हा प्राणी सापाला खाणे शक्य आहे का, असा मूलगामी प्रश्न तो स्वतःला विचारतच नाही. तसा प्रश्न विचारण्याची पात्रता अजून त्याला आली नाही. त्याचे सृष्टीविषयक ज्ञान आज तरी बव्हंशी त्याचे शिक्षक, आईवडील व पुस्तके ह्या आप्तांच्या शिकवण्यावर आधारलेले आहे. कसल्या गोष्टींवर विश्वास ठेवायचा ह्याबद्दल तो विचार करीत नाही, तर कोणावर विश्वास ठेवायचा, ह्याबद्दलच त्याने विचार केला आहे.

फक्त लहान मुले व साधारण माणसे ह्यांचाच व्यवहार शब्द-

प्रामाण्यावर बालतो असे नव्हे; तर मी मी म्हणणारे शास्त्रज्ञही आप्त-वाक्याच्या आहारी कसे जातात, हे पाहण्यासारखे आहे.

इंग्लंडमध्ये १९०८ साली डॉसन नावाचा एक प्रतिष्ठित गृहस्थ फिरावयास जात असता रस्त्याची खोदाई चालली होती, तेथे गेला. तेथे काही हाडे व माणसाची एक कवटी सापडली असे कळल्यावर तो खाली उतरला. माणसाची कवटी अति पुराणकालीन आहे, हे ओळखून त्याने कवटी व इतर हाडे उचलून आणली व त्यांचे वर्णन प्रसिद्ध केले. प्राण्यांची हाडे, सुमारे दोन अडीच लाख वर्षांपूर्वी इंग्लंडमध्ये असले प्राणी राहत असत, त्यांची होती. माणसाची कवटी त्यांच्या समकालीन म्हणून तितकीच जुनी, म्हणून ह्या हाडांचे महत्त्व. अतिशय विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या कवटीबरोबरच एक खालच्या जबड्याचे हाडही सापडले होते व ते त्या कवटीबरोबरचेच असे डॉसनचे म्हणणे होते. जबड्याचे हाड माणसाच्या जबड्यासारखे नसून आधुनिक वानराच्या जबड्यासारखे आहे असे कित्येक प्राणीशास्त्रज्ञांचे मत पडले. पण इतर प्राण्यांच्या हाडांचे जे अवशेष होते, त्यांत वानराची हाडे मुळीच नव्हती व ते हाड त्या कवटीचेच असले पाहिजे, असे दुसरे शास्त्रज्ञ म्हणत. त्या कवटीवर व जबड्यांवर कित्येक ग्रंथ झाले. त्यावरून प्राचीन मानव कसा दिसत असेल, ह्याची कितीतरी चित्रे प्रसिद्ध झाली. त्या कवटीची व जबड्याची मोजमापे झाली व अडीच लाख वर्षांपूर्वी मानवाचे डोके संध्याच्या मानवाच्या डोक्याएवढे मोठे व आकृतीनेही सध्याच्या मानवाच्या डोक्यासारखेच होते व जबडा मात्र वानराच्या जबड्यासारखा होता, असा सिद्धांत प्रस्थापित झाला. ह्या सिद्धान्ताविरुद्ध लिहिणारे एक दोन शास्त्रज्ञ होते, पण त्यांच्याकडे कोणी लक्ष दिले नाही. ह्या पुराणमानवाचे "एओ ॲन्थोपस डॉसोनी" (डॉसनने शोधलेला मानवाच्या प्रभावळीचा मनुष्य) असे अगडबंब लॅटिन नामकरण झाले व जगात जेथे जेथे मानवशास्त्र शिकवीत, त्या त्या सर्व संस्थांतून विद्यार्थ्यांना ह्या मानवाची वर्णने पाठ करावी लागली.

१९५१-५२ साली पुराणकालीन हाडांचा जुनेपणा ठरवण्याची एक नवीन रासायनिक रीत एका शास्त्रज्ञाने शोधून काढली व ती रीत सर्व तऱ्हेच्या हाडांबाबत लागू पडते का, हे पाहण्यासाठी ब्रिटनमधल्या म्युझिअममध्ये असलेल्या प्राण्यांच्या व माणसांच्या हाडांवर प्रयोग करण्याचे

ठरले. अर्थातच डॉसनला सापडलेल्या हाडांचेही परीक्षण झाले व त्यावरून असे ठरले की, इतर प्राण्यांची हाडे २-२॥ लाख वर्षांपूर्वीची, कवटी सुमारे एक लाख वर्षांपूर्वीची आणि जबड्याचे हाड जेमतेम १००० वर्षांपूर्वीचे आहे! ह्या विलक्षण कालनिर्णयामुळे जबड्याच्या हाडाचे पुन्हा एकदा सूक्ष्म निरीक्षण सुरू झाले. ह्या निरीक्षणात असे आढळून आले की, जबड्याचे हाड खरोखरीच एका आधुनिक वानराचे आहे. त्याचा काही भाग मोठ्या खुबीने कापून व काही दात युक्तीने तोडून तो माणसाच्या जबड्यासारखा थोडा दिसावा म्हणून प्रयत्न केला होता. तसेच एका रसायनात बुडवून ठेवून त्याला जुन्या हाडांचा असतो तसा रंग दिला होता. म्हणजे डॉसन व त्याचा सहकारी ह्यांनी बुद्धिपुरस्सर सर्व जगाची फसवणूक केली होती!

ह्या सर्व प्रकारात आंधळेपणाने डॉसनवर विश्वास ठेवला म्हणून शास्त्रज्ञांना दोष देता येत नाही. मानवाच्याच काय पण इतर प्राण्यांच्या उत्क्रांतीचेही शास्त्र नवे आहे. जसजशी निरनिराळी हाडे सापडत आहेत. तसतसे ज्ञान वाढत आहे. धड माणूस नाही, धड वानर नाही अशा कोणत्या तरी प्राणिजातीपासून एक वानरांची व एक माणसांची अशा शाखा निघाल्या, असा सिद्धान्त आहे. ह्या उत्क्रांतीत कोठच्या तरी एका काळी माणसाचा जबडा सर्वस्वी हल्लीच्या वानरासारखा व कवटी मात्र बरीचशी आधुनिक माणसासारखी नसणारच, असे काही खात्रीने सांगता येईना. बरे, डॉसनसारखा प्रतिष्ठित माणूस फसवीत असेल, अशी शंकाही कोणाला नव्हती. तेव्हा शास्त्रज्ञ पाहता पाहता फसले गेले तर नवल नाही.

काही शास्त्रांत प्रयोग करणे शक्य असते; व प्रत्यक्ष पडताळून दुसरा सांगतो ते खरे का खोटे, हे ठरवता येते. पण अशा शास्त्रांतही पारंगत होण्यास अर्धे आयुष्य गुरुजनांचे वाक्य प्रमाण मानून ते सांगतील त्या मार्गाने जावे लागते व अशी उपासना केल्यावर स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त होतो. काही वेळा लोकांच्या सांगण्यावरच विश्वास ठेवावा लागतो. मूळ गोष्ट इतरांना पहावयास मिळत नाही. रूक पक्ष्याची गोष्ट अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टीत सगळ्यांनी वाचलेली आहे. रूक पक्ष्यासारखा प्रचंड पक्षी असेल असे कोणास खरेही वाटत नसे. पण अशा पक्ष्यांची अंडी व सांगाडे आफ्रिका खंडात सापडले. व माणसाला पेलून नेण्याइतके मोठे पक्षी पृथ्वीवर होते- ते गेल्या काही शतकांतच नाहीसे

झाले असे सिद्ध झाले. आता त्या पक्ष्याचा उपयोग कोणी रत्ने वेचण्यासाठी करीत असे, ही गोष्ट कल्पनेतील का खरी हे समजण्यास मात्र सध्या काही साधन नाही.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी चीनमधे पेकिंगजवळ फार मोठे उत्खनन झाले; व त्यात पुराणकालीन मानवाच्या काही कवट्या व सांगडे सापडले. या कवट्यांचे फोटो व मापे पण घेतलेली आहेत. ते दिवस फार धामधुमीचे होते. जपानची चीनवर स्वारी झालेली होती व हळूहळू जपानी फौजा पेकिंगजवळ पोचत होत्या. शेवटी पेकिंग जपान्यांच्या ताब्यात जाण्याच्या आत घाई करून सर्व हाडे काळजीपूर्वक खोक्यात भरली व खोके बंद करून, काही अमेरिकन ऑफिसर परत चालले होते, त्यांच्याबरोबर दिले. ही गाडी वाटेत जपानी सैन्याने अडवली व सर्व अमेरिकनांना कैदेत घातले. हाडांनी भरलेले खोके मात्र ह्या धावपळीत नाहीसे झाले. जपान्यांनी नेले म्हणावे तर ते कानांवर हात ठेवतात. अमेरिकनांनी शोध केला. युद्धानंतर टोकियोतही शोध घेतला. पण ते सापडत नाही व इकडे चीन व रशिया म्हणत आहेत की हा अमोल ठेवा अमेरिकेनेच चोरून दडवून ठेवला म्हणून! ह्या सगळ्या भानगडीत मानवेतिहासाचे एक साधन मात्र कायमचे नाहीसे झाले; व हाडांचे फोटो व मापे ह्यांवरच आता अवलंबून राहावे लागले. पेकिंगजवळ जेथे जुने उत्खनन झाले, तेथे आणखी खणल्यास तसेच सांगाडे सापडण्याचा संभव मात्र आहे.

पुरावाच नाहीसा झाल्यामुळे आप्तवाक्यावर कसे विसंबावे लागते ह्याचे आपल्याकडील उत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वरीची राजवाडे संशोधित प्रत हे होय. राजवाड्यांना ज्ञानेश्वरीचे एक जुने हस्तलिखित मिळाले व त्यावरून त्यांनी एक ज्ञानेश्वरीची प्रत छापली. ह्या छापील प्रतीत त्यांनी आपल्या मते काही सुधारणाही केल्या. राजवाड्यांनी केलेले फेरफार काय व मूळ प्रत कशी आहे, हे पाहण्याची इच्छा अर्थातच पुष्कळांना होती. काही टीकाकारांनी राजवाड्यांना सापडलेली प्रत तितकी जुनी नसावी, असाही अभिप्राय व्यक्त केला. त्या प्रतीनंतर इतरही हस्तलिखिते मिळाली; व त्या सर्वांचा तुलनात्मक अभ्यास करणे अवश्य झाले. पण राजवाड्यांनी संशोधिलेले हस्तलिखित आज नाहीसे झालेले आहे. कोणी म्हणतात, राजवाड्यांनी टीकाकारांवर रागावून ते जाळून टाकले! मूळ पुरावाच

नाहीसा झाल्यावर आता त्या प्रतीबद्दल काही बोलणे म्हणजे राजवाड्यांच्या शब्दावर कितपत विश्वास ठेवायचा, हाच वादाचा मुद्दा होऊन बसला आहे.

तसे पाहिले तर प्रत्यक्ष प्रमाण व आप्तवाक्य ही काही एकमेकांविरुद्ध नाहीत; तर पूरक आहेत. प्रत्येक सत्यशोधकाची बुद्धी शुद्ध असेल तर तो सत्यशोधन करण्यास लायक ठरतो व शुद्ध बुद्धीचाच मनुष्य आप्त होऊ शकतो. काही संशोधन तर बरेचसे आप्तवाक्यावरच अवलंबून असते. एखाद्या प्रदेशातील पावसाची सरासरी काढावयाची असेल तर काही विशिष्ट ठिकाणी पाऊस मोजण्याची यंत्रे ठेवलेली असतात. रोज एका विशिष्ट वेळेला बाटलीत किती पाऊस पडला हे पाहून त्याची रोजच्या रोज नोंद करावयाची असते. दर आठवड्याला किंवा पंधरा दिवसांनी ही टिपणे मुख्य कचेरीत पाठवावयाची असतात; व तेथे ठिकठिकाणी पडलेल्या रोजच्या पावसाची सरासरी काढून दर महिन्याची किंवा वर्षाची सरासरी काढायची, असा प्रघात आहे. एकच माणूस एका मोठ्या प्रदेशातील सर्व ठिकाणे रोजच्या रोज ठराविक वेळा तपासणे शक्य नाही; म्हणून दर ठिकाणी हे काम निरनिराळ्या माणसांवर सोपवलेले आहे. ह्यांपैकी एखाद्या माणसाने जरी खोटे कागद भरून दिले, तरी सबंध काम फुकट जाणे शक्य आहे. एका गावात असाच एक पाऊस टिपणारा मनुष्य होता. एका वरच्या कचेरीतून अनपेक्षितपणे एक तपासनीस त्या गावी आला. पाहतो तो नेमलेला मनुष्य जाग्यावर नाही. पण तक्ता मात्र सबंध पुढील आठवड्याचा भरून ठेवून पाकिटात घालून ठराविक तारखेला पोस्टात टाकण्यासाठी पोस्टमास्तरजवळ दिलेला!

सध्याच्या शास्त्रीय युगात किती तरी संशोधन मुळी आप्तवाक्याच्या पायावरच उभे आहे. म्हणून प्रत्यक्ष आणि आप्तवाक्य ही निरनिराळी स्वतंत्र प्रमाणे न मानता पूरक प्रमाणे मानावी लागतात. प्रत्यक्ष दिसते तेही आभासमय असते व कोणते प्रत्यक्ष खरे व कोणते खोटे हे ठरविण्याला परत निरनिराळी प्रमाणे लागतात, त्याचप्रमाणे आप्तवाक्याचे आहे.

समाजातील प्रतिष्ठित अधिकारी व्यक्तीचे म्हणणे विचार न करता खरे मानण्याची प्रवृत्ती असते. लहान मुले आणि लहान माणसे ह्यांना मात्र अगदी साध्या साध्या गोष्टीसुद्धा खऱ्या म्हणून लोकांना पटवायच्या म्हणजे पंचाईत पडते.

लहानगा धनू मला म्हणत होता, "आत्याबाई, माझ्या वहीत एक वाक्य लिहून तुमची सही द्या." "कशाला रे बाबा?" "त्याचं असं आहे," धनू सांगू लागला, "मी माझ्या मित्रांना सांगितलं की तुम्ही माझ्या आत्याबाई आहात तर ते म्हणत, 'छट्. तू बाता मारतो आहेस.' आता तुम्ही ह्या वहीत सही दिलीत तर त्यांना पटेल की तुम्ही माझ्या आत्याबाई म्हणून." "पण धनू, काल मी जवळजवळ पन्नास मुलांना माझी सही दिली; म्हणून काय मी त्यांची सगळ्यांची आत्याबाई होईन होय? हवं असलं तर मी असे लिहिते, की हा वेडा धनू माझा भाचा आहे व खाली सही करते; म्हणजे तुझ्या मित्रांची खात्री होईल, की मी तुझी आत्याबाई म्हणून!" पण सत्य शाबीत करण्याचा हा मार्ग धनूला पसंत पडेना व दुसरे तर काही सुचेना. बिचारा गप्प बसला.

आम्ही जेवायला बसलो होतो. मुलांच्या आवडीची ताज्या वाटाण्याची उसळ होती. गौरी तोंड वाईट करून उसळ 'चिवडीत' म्हणाली, "उसळीला तार आली आहे." मी गरजले, "हा फाजीलपणा मला खपायचा नाही. नको असली तर मला दे. म्हणे, ताज्या उसळीला तार आली आहे." तिने मुकाट्याने उसळ माझ्या पानात घातली. "काय शिळी आहे का आंबली आहे, का आहे तरी काय?" माझं आपलं पुटपुटणं चालूच होतं. मी उसळ खाण्यासाठी घास उचलला, तर काय! खरोखरीच उसळीला तार येत होती! गौरी खुदकन् हसली. "उसळीला तार आली आहे ग. कशानं बुळबुळीत झाली बघ बरं." असं मामंजी म्हणाले असते, म्हणजे मी ताबडतोब काही न बोलता कशी झाली आहे ते पाहिलं असतं व चौकशीअंती उसळीत भेंडी गेल्याचे निष्पन्न झाले असते. पण गौरीवर विश्वास ठेवायलाच मी तयार नव्हते. मनुष्य सांगते आहे ते खरे असण्याचा संभव आहे का, असा विचारच मी केला नाही. कोण सांगते आहे इकडेच माझे लक्ष होते.

जर्मनीचा फ्रेडरिक द् ग्रेट म्हणून एक राजा होता. त्याच्या पदरी पुष्कळ शास्त्रज्ञ होते. एकदा फ्रेडरिक निरनिराळ्या शास्त्रज्ञांबरोबर आपल्या बागेत हिंडत होता. बागेत शोभेसाठी वेगवेगळ्या रंगांचे काचेचे गोळे रंगीत काठ्यांवरून लावले होते. एका गोळ्याजवळ फ्रेडरिक उभा होता. त्याने शास्त्रज्ञांना हाक मारली व एक चमत्कार दाखवला. त्या गोळ्यांची जी बाजू सूर्याच्या उन्हाकडे होती ती थंड होती, व सावलीतली बाजू तापली होती. असे का व्हावे? एक आठवडाभर ह्या विषयाची चर्चा

झाली. निरनिराळ्या शास्त्रज्ञांनी ह्या प्रकारची उपपत्ति लावण्याचा प्रयत्न केला. शेवटी फ्रेडरिकने सांगितले की, "अहो, तुम्हांला हाक मारायच्या आधी मीच तो गोळा फिरवला होता, व उष्ण बाजू सावलीकडे व थंड बाजू उन्हाकडे केली होती."

हा आप्तवाक्याचा महिमा पूर्वी होता; आणि आता नाही, असे मुळीच नाही.

सत्यशोधनाची उपकरणे जशी वाढली तशी सत्य लपवण्याची साधनेही वाढली. सत्याचा पडताळा प्रत्येकाला पाहता येत नसल्यामुळे कोणाच्या ना कोणाच्या तरी शब्दावर भरवसा ठेवणे सध्या भाग पडते. पूर्वीचा व्यवहार बहुतांशी आपल्या भोवतालच्या, आटोक्यातल्या जगाशीच होता. आताचा व्यवहार जगड्व्याळ, सर्व जगाचा कानाकोपरा व्यापून राहिला आहे व त्या व्यवहाराचे आपले ज्ञान लिहिलेल्या किंवा बोललेल्या शब्दाच्या द्वाराच होते. सकाळी उठल्यापासून निजेपर्यंत निरनिराळ्या लोकांचे शब्द कानांत घुमत असतात; किंवा डोळ्यांपुढे नाचत असतात. निरनिराळे विक्रेते आपला माल आणि आपली मते आकर्षक रीतीने मांडून खपवण्याचा प्रयत्न करीत असतात. नेसायला पंचवीस तऱ्हेची लुगडी, खायला निरनिराळ्या तऱ्हेची मिष्टान्ने, प्रकृती बिघडल्यास निरनिराळी औषधे, आपण स्वतः मेल्यास मुलांबाळांची सोय करणाऱ्या निरनिराळ्या विमा कंपन्या, निरनिराळी धार्मिक मते, एका बाजूने अमेरिकेचा आवाज तर दुसरीकडे रशियाचा प्रचार, ह्या शब्दब्रह्माच्या अफाट घोटाळ्यात खरे काय व खोटे काय; कोणावर विश्वास ठेवावा, कोणावर नाही, हे कळणे साधारण मनुष्याला शक्य आहे का? शेवटी कोणाला तरी आप्त मानून त्याचे म्हणणे खरे, असेच बहुतेक लोक मानतात. व्यवहारात संशयात्म वृत्ती ठेवून भागत नाही. त्यामुळे कुठल्या तरी एका बाजूने निर्णय घ्यावा लागतो. हा निर्णय सत्यासत्याची छाननी करून घेतलेला नाही, आप्तवाक्यावर विश्वासून घेतलेला आहे, इतकी कबुली देण्याइतपत सत्याची चाड बहुतेकांना नसते. एका बाजूने बुद्धिवादाचा डंका वाजवून दुसऱ्या बाजूने न पारखलेल्या मतांचा स्वीकार करताना त्या मतांबद्दल नसता अहंकार उत्पन्न होतो व परमताबद्दल असूया व द्वेष पण बळावतो. म्हणून हल्लीचे लेखन व भाषण केवळ आपल्या मालाची जाहिरात करून राहात नाही; तर इतरांबद्दल द्वेषही भडकवण्यास कमी करीत नाही.

शास्त्रीय शोध लागले, सृष्टीच्या काही अंगांचे ज्ञान झाले म्हणून त्याच्या जोरावर पूर्वीच्या लोकांना हसणे म्हणजे लक्तरे गुंडाळणाऱ्याने नागड्याला हसण्यासारखे आहे. काही सत्ये हाती आली म्हणून सत्य-शोधकाला लागणारी बुद्धी आपण आत्मसात् केली, असे मुळीच नाही. सत्तेच्या लोभाने, द्वेषाने, अहंभावाने मानवी मने इतकी गढूळ झाली आहेत की सर्व सत्य एखाद्याला उमजणे शक्यच नाही ही साधी गोष्टही त्यांना समजत नाही. मला समजले नाही, माझे चुकत असेल असे वाटण्याची ज्ञानाची पहिली पायरीही ज्यांनी ओलांडली नाही, ते माझे तेच सत्य असे कंठरवाने म्हणणारच. एवढेच म्हणून ते थांबते तरी पुष्कळ होते, पण त्याचबरोबर इतरांचे खोटे, हा सिद्धान्त आपोआपच येतो व इतरांचे म्हणणे सर्वथैव दडपून टाकण्याचे सर्व उपाय योजण्यात येतात. ह्या खटाटोपात सत्याचा शोध तर होत नाहीच, पण आत्मनाश व समाजाचा नाश मात्र होतो.

आप्तवाक्यावर विसंबून राहिल्यानेच सत्य समजण्यास अडचण पडते असे नाही. प्रत्यक्ष प्रत्येकाचे डोळे, कान, जीभ व त्वचा एकच गोष्ट निरनिराळ्या तऱ्हेने बघत असतात, ऐकत असतात; चवीने अनुभवीत असतात व स्पर्शाने जाणत असतात. एकच सामाजिक घटना निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळ्या तऱ्हेने प्रतीत होत असते. सिंहगडावरून मेण्यात बसून एकजण उतरत होता व एकजण गड चढत होता. अर्ध्यावर दोन्ही मेण्यांची गाठ पडली तेव्हा उतरणारा माणूस "काय उकडतं आहे", म्हणून अंगावरील पांघरूण दूर करीत होता; तर चढणारा माणूस "काय थंडी लागते आहे", म्हणून शाल गुंडाळून घेत होता. ही गोष्ट सर्वांनी लहानपणी वाचलेलीच आहे. लहान मुले आवळे, कैऱ्या, चिंचा खात असतात. त्यांना विचारले की 'आंबट आहे का?' तर ती म्हणतात 'छे! छे! गाभुळलेल्या आहेत, खा ना.' पण मोठ्यांना त्या तोंडात घालवत नाहीत. मुलाला घर सुखाचे वाटत असेल; पण त्याच्या बायकोला खाष्ट सासूच्या हाती वागावे लागत असेल, तर तेच घर दुःसह होईल. सत्य शोधताना निरनिराळ्या माणसांना तीच गोष्ट निराळी भासते, ही गोष्ट झाली मानवी जगातील सत्याबद्दलची. मग अंतिम सत्य शोधताना फक्त माणसाच्याच दृष्टीने जग पाह्यचं, का इतरांच्याही?

बागेत हिंडताना हिरवी पाने, तांबडी, पांढरी, पिवळी फुले, निळे

आकाश, अशा रंगमय सृष्टीत मी रमते. माझ्याबरोबर त्याच बागेत मधमाश्या मध गोळा करीत हिंडतात. त्यांची सृष्टी पण रंगमयच आहे, पण मला जे तांबडे दिसते ते त्यांना बिनरंगी दिसते, मला जे पांढरे दिसते ते त्यांना हिरवट पिवळे व निळसर दिसते. मला निळे दिसते ते त्यांना पांढुरके दिसते व मला न दिसणारे काही रंग त्यांना दृष्टिगोचर होतात. प्रकाश-लहरींतील काही भाग माझ्या डोळ्यांना दिसतो, काही मधमाशीला दिसतो व त्याचा परिणाम म्हणजे माझी व तिची सृष्टी अगदी निराळी असते. ह्यातली सत्य कोणती?

जी गोष्ट प्रकाशलहरींची तीच ध्वनिलहरींची. माझ्या कानांना ऐकू न येणाऱ्या ध्वनिलहरी इतर प्राण्यांना ऐकू येतात. कुत्रा ज्या गंधमय विश्वात वावरत असतो, त्यातील एक-शतांश गंध आपल्या नाकाला ओळखू येत नाही.

शिवाय मला जी ज्ञानेंद्रिये आहेत, त्यांशिवाय इतरही ज्ञानेंद्रिये जीवसृष्टीत आहेत व ती त्या त्या प्राण्यांना सृष्टीचे मला अज्ञात व अज्ञेय असे एक निराळेच अद्‌भुत दर्शन घडवीत असतील. अशा अनंत रूपांतील अमकेच रूप सत्य असे म्हणता येईल का? अगदी हाच विचार जुन्या कवींच्याही मनात आला आला असला पाहिजे. मनुष्याला सर्व सत्य सापडणे व कळणे शक्यच नाही; मग ते कोणाला कळेल? सत्य स्वरूप ब्रह्माचे वर्णन म्हणजे ह्या प्रश्नाचे उत्तर आहे. "विश्वतः चक्षुः उत विश्वतो मुखो विश्वतो बाहुः उत विश्वतस्मात्।" असे हे भव्य वर्णन आहे. जो सर्वांच्या डोळ्यांनी पाहतो, सर्वांच्या अवयवांनी क्रिया करतो, तोच सर्व सत्यमय आहे. तो मुंगीच्या चिमुकल्या पायाने व राक्षसाच्या मोठ्या पायाने चालतो. माणसाच्या व मधमाशीच्याही डोळ्यांनी पाहतो. पायदळी चिरडल्या जाणाऱ्या मुंगीचे दुःख व हिरोशिमामध्ये मेलेल्या हजारो मानवांचे दुःख ही दोन्ही त्याला होतात. अशाच कोणाला सत्य– अंतिम सत्य प्रतीत होणार. इतर सर्वांचे– शास्त्रज्ञांचे असो, राजकारणी पुरुषांचे असो वा लहान मुलांचे असो-सत्य नेहमी अपुरे, एकांगी व सापेक्षच राहणार.

१९५४

*

# १६

# विनाशाची सुरुवात

आसामला विमानाने जाणारे लोक आणि इतर ठिकाणी विमानाने जणारे लोक ह्यांच्यात फार अंतर असते. एरवी दिल्लीला किंवा मद्रासला विमानाने जायचे म्हणजे लोकांच्या हातांत एक, फार तर दोन, अगदी हलक्या पेट्या असायच्या. वजन करताना एखादा पौंड वजन जास्त नाही ना भरत इकडे प्रत्येकाचे लक्ष. कधीतरी एखादे अमेरिकन कुटुंब असे दिसते की सामानाचे वजन जास्त भरले तरी चिंता नाही-नोटांच्या लठ्ठ पुडक्यांतून भराभर नोटा काढून देत. एकदा दोनतीन हिंदी लोकसुद्धा जड सामान घेऊन जाताना पाहिले. पण एकंदरीने विमानातून जाताना प्रवास सुटसुटित करण्याकडे सर्वांचा कल. पण आसामला जाणाऱ्या उतारूंजवळ- माझ्याखेरीज सर्वांजवळच-खूपखूप सामान दिसले. कित्येकांजवळ तर पेट्यांबरोबर वळकट्यासुद्धा होत्या. जाणारे उतारूसुद्धा निरनिराळ्या पेशातले दिसले. थोडे लोक श्रीमंत किंवा माझ्यासारखे सरकारी खर्चाने जाणारे, पण बरेचसे मध्यम स्थितीतले तर काही अगदी अतिशय गरीब होते. कलकत्त्याहून गौहाटीला आगगाडीने जायचे म्हणजे इतका वेडावाकडा प्रवास आहे की बरेच लोक विमानाने जातात. कलकत्त्याहून सरळ उत्तरेकडे हिमालयाच्या पायथ्याशी जावयाचे, मग पूर्व पाकिस्तानला वळसा घालून आसामात पोचावयाचे. आगगाडीचा एक मार्ग तर पाकिस्तानातून जातो. मध्येच कस्टमची पाहणी. किती वेळ पाकिस्तानी लहरीवर अवलंबून राहावे लागेल त्याची निश्चिती नव्हती. सामान चोरीला जाण्याचा किंवा जप्त होण्याचाही संभव फार. उत्तरेकडचा लोहमार्ग बराच कच्चा होता. कुठे मार्ग खचलेला असायचा तर पूल धोक्याचा असायचा. कलकत्त्याहून गौहाटीला

जायला रेल्वे टाइमटेबलाप्रमाणे ४८ तासांच्या वर लागतात, पण गाडीला कित्येक तास ते एक-एक दोन-दोन दिवससुद्धा उशीर लागतो. विमानाने तीन ते साडेतीन तासांत गौहाटीला पोचता येते. सरकारी अधिकारी, बऱ्याच ऑफिसातले कारकून व शंभराशंभराच्या टोळ्यांनी मळ्यातील मजूर विमानाने आसामात जात होते. एवढे मजूर अगदी तातडीने विमानाने पाठवणे कसे परवडते, ते काही लक्षात येईना. आसामातले मळे गौहाटीच्या उत्तरेकडे सीमेपर्यंत पसरले आहेत. तेथपर्यंत मजुरांचे कुटुंब पोचावयाचे म्हणजे ४-५ दिवसांचा प्रवासखर्च व खाण्यापिण्याचा खर्चही करावा लागतो. तेव्हा कदाचित ३ ते ५ तासांत पोचणारी विमाने परवडत असतील. का कोण जाणे, पण आगगाडीच्या प्रवासात ज्याप्रमाणे निरनिराळ्या परिस्थितीतली माणसे व सामानाचे ढीग दिसतात तसे मला आसामच्या विमानाच्या फेरीत दिसले.

विमानाचा पहिला प्रवास अगदी सपाट पाणथळ मैदानातून होता. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे पॉद्दा (पद्मा) ऊर्फ मेघना नदीचा विस्तीर्ण पट्टा व त्या काठाची भातशेती. कलकत्ता सोडलं म्हणजे पूर्व पाकिस्तानावरून विमान जाते ते आगरताळ्याला अर्धा-पाऊण तास थांबते. विमानतळ उदास, निर्मनुष्य असा वाटला. हा भारताचा भाग असा आहे की त्याच्या जवळजवळ सर्व बाजूंनी पाकिस्तान आहे. भारताशी व्यवहार विमानाने. फारच थोड्या लोकांना ते साध्य होते. येथली एक बाई मला ग्वाल्हेरला भेटली होती. अननस आवडीने खाताना मला पाहून ती म्हणाली होती, "आमच्याकडे या, रुपयाला २५ अननस मिळतात." मी म्हटले, "कलकत्त्याला का पाठवीत नाही?" ती म्हणाली होती, "इतक्या स्वस्त फळांसाठी लागणारे विमानभाडे परवडत नाही. आगगाडीने माल वेळेवर न कुजता पोचण्याची शाश्वती नाही." विमानातून डोकावताना कुठे अननसाची लागवड दृष्टीस पडली नव्हती. भात-शेते, नारळ आणि सुपारी. पूर्व पाकिस्तानातून जाताना तागाची लागवड दिसेलसे वाटले होते. पण तीही विमानातून ओळखता आली नाही.

आसामात आलो तो पोटपट्टे आवळण्याची सूचना आली. डोंगराळ भाग लागला होता, खालचा देखावा भव्य पण जरा भयानकच होता. कडे तुटलेल्या डोंगरांच्या माथ्यांवर उभ्या भिंती दिसत होत्या. त्यांच्या

अर्धवर्तुळातून एक प्रवाह वाहात होता. हा प्रदेश ओलांडल्यावर लगेच दुसऱ्या बाजूला डोंगरांचे उतार सौम्य होते व त्यांवर व माथ्यांवर भाजावळ चाललेली दिसली. लक्षात आले की हा विभाग गारो डोंगरांचा असणार. ह्या डोंगरांच्या माथ्यावर व उत्तरेकडच्या उतरणीवर गारो लोकांची वस्ती आहे दक्षिणेकडे कडे तुटलेले असल्यामुळे घरे करून शेती करणे अशक्य म्हणून जवळजवळ वस्ती नाहीच. ह्या डोंगरावरून जाताना विमानाला म्हणे हटकून गचके बसतात. तेवढी पाच मिनिटे गेली म्हणजे विमान परत स्थिरावते. कलकत्त्याला व आसामला बऱ्याच लोकांना विचारले...' पण ह्या प्रकाराचे कारण कोणाला सांगता आले नाही. आणि आसामची आठवण झाली की माझे मन परत परत गारो टेकड्यांशी गचके घेत राहते.

हा हा म्हणता गौहाटी आले. मला न्यायला कोणी बाई आल्या होत्या त्यांनी मला ब्रह्मपुत्रेच्या तीरावर बांधलेल्या सुंदर आरामघरात नेऊन पोचवले. फराळाचे मागवले व मग दोघींनी मिळून माझ्या पुढच्या दोन दिवसांचा कार्यक्रम आखला. मला शब्द व त्यांचे अर्थ ह्यांचे जवळजवळ वेड आहे. आसामपासून बंगाल, ओरिसा वगैरे भागांत 'हाट' किंवा 'हाटी' प्रत्यय असलेली गावांची नावे बरीच आहेत. हाट शब्द 'बाजार' ह्या अर्थी असेल किंवा 'घाट' शब्दाचेही रूपांतर असेल. मी विचारले, "गौहाटी म्हणजे गुरांचा बाजार भरण्याचे ठिकाण का हो?" त्या बाईही सुदैवाने शब्दांच्या अर्थावर विचार करणाऱ्या निघाल्या. त्यांचे म्हणणे पडले की, गौहाटी हा शब्द गुवां किंवा गुआं-हाटी यांचे रूप आहे. गुआं म्हणजे आसामी भाषेत सुपारी. पूर्वी येथे सुपारीचा मोठा बाजार भरत असे." मला ही कल्पना फारच आवडली. कारण काही दिवसांपूर्वीच ओरिसामधील शेतकऱ्यांच्या लग्नविधीवर वाचीत असताना 'गुआंफोड' शब्द आला होता व त्याचा अर्थ समजत नाही म्हणून लेखकाने टीप दिली होती. माझ्या मनात जाचणारे शल्य एकदम नाहीसे झाले. लग्नाची सुपारी फोडण्याचा समारंभ असतो त्याचे नाव 'गुवां फोड' असणार. त्या वेळी माझे अगदी समाधान झाले. आता वाटेत जास्त चौकशी करायला हवी होती. गोघाटी कशावरून नसेल? ब्रह्मपुत्रा पार होण्याचे ठिकाण तेथून जवळ असेल तर गुरे हाकून नदीपार करण्याचे ठिकाणही हे असू शकेल.

मार्चचे शेवटचे दिवस किंवा एप्रिलचे सुरुवातीचे दिवस असावेत.

सबंध वातावरण धुळीने इतके भरलेले होते की नदीचा पलीकडचा काठ काही स्पष्ट दिसत नव्हता. उन्याळ्यातसुद्धा बोटी नदीतून जात होत्या. त्यांच्या शिट्ट्या ऐकू येत होत्या. त्यांच्या बंबातून निघणारा धूर अगदी स्पष्ट दिसत होता. उन्हाळ्यात जवळजवळ कोरड्या होणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातल्या नद्या पाहिलेल्या मला ब्रह्मपुत्रेचे ते दर्शन मोठे कौतुकाचे वाटले. विश्रामधामाच्या जवळच ब्रह्मपुत्रेमध्ये एक टेकाड होते. त्यावर एक लहानसे देऊळ व त्यात रात्रभर दिवा असे. त्या स्थानाचे नाव 'उमानन्द'. लग्नानंतर शिव पार्वतीला घेऊन येथे काही काळ राहिला होता म्हणे. त्या टेकडीवर जायची माझी इच्छा, पण दोन-तीन दिवस पहाटेपासून रात्रीपर्यंत इतके काम होते, की ते काही जमले नाही 'उमानन्दा'ची यात्रा वर्षातून एकदा का दोनदा असते तेव्हा लोक तिथे जातात. एरवी देऊळ पुजाऱ्याखेरीज निर्मनुष्य असते. स्थान रमणीय तर खरेच पण त्या रमणीयतेत एक प्रकारचा भयानकपणा पण वाटतो. गंगा-यमुना वगैरे मोठ-मोठ्या नद्या, दोन्ही काठांवर मोठी मनुष्यवस्ती, पण तिथे ब्रह्मपुत्रेच्या काठी शहरे किंवा गांवे कमीच. डोंगर आणि झाडीच जास्ती. तेथे राज्य करणारी पार्वती, एक उमानन्दाचे देऊळ सोडले तर, देवीच्या रूपाने निरनिराळ्या देवळांतून दिसते. पार्वतीचे सबंध चरित्रच अनाकलनीय आहे. आईबापांची लाडकी, रानावनातून भटकणारी, हरणांसारख्या चंचल डोळ्यांची, भुरभुरत्या केसांची अवखळ उमा, लाकडी गौरी हे एक पार्वतीचे रूप; मनाने वरलेल्या पुरुषाला वश करण्यासाठी प्रणयापासून खडतर तपापर्यंत सर्व उपाय योजणारी आणि शेवटी त्या रागीट, रानटी भोळ्या शंकराला वश करून कह्यात ठेवणारी प्रणयिनी हे दुसरे. शंकराबरोबर बैलावरून आकाशमार्गे जाताना कुणी दुःखी, अपंग असे मनुष्य दिसले तर त्याची चौकशी करून त्याचे दुःख दूर करणारी, लोकगीतांत व लोककथांतून जिची गाणी गायली आहेत, अशी वत्सल आई हे तिचे तिसरे रूप; बापाच्या यज्ञात स्वतःला जाळून घेणारी मानिनी हे चौथे रूप. ती अनन्तरूपा आहे. पण ती देवी किंवा माता म्हणून सर्व भारतभर ज्या रूपाने पूजिली जाते त्या रूपाचे मला फार कुतूहल वाटते. सर्वसंपत्तिमान, सर्व शक्तिशाली, सर्वकारुणिक आणि सर्वसंहारक असे ते रूप आहे. तिची देवस्थानेसुद्धा भीती उत्पन्न करणारी आहेत. सौंदत्तीची यल्लमा,

माहुरगडची रेणुका, गुजरातची बेचराजी, मध्यभारतातील विंध्यवासिनी उत्तरेकडील काली व आसामची कामाख्या अशी तिची अनेक स्थाने व नावे आहेत. इथे गौहत्तीतसुद्धा ब्रह्मपुत्रेच्या पात्रातील प्रणयिनी-उमेच्या देवळापासून सुमारे मैलभर अंतरावर उंच टेकडीवर बसलेले कामाख्या ऊर्फ कामाक्षीचे देऊळ आहे. ही देवी आसामची अधिष्ठात्री देवता असून जादुगारीण म्हणून प्रसिद्ध आहे.

दुसऱ्या दिवसापासून आसामात प्रवास सुरू झाला. ब्रह्मपुत्रेच्या व कपिली नावाच्या एका उपनदीच्या खोऱ्यांत दोन दिवस हिंडत होतो. गंगा, यमुना वगैरे नद्या एकदा हिमालय सोडला म्हणजे अगदी सपाट प्रदेशातून वाहतात; पण आसामात मात्र सर्वत्र लहानलहान डोंगर पसरलेले आहेत. त्यांपैकी मुख्य म्हणजे गौहत्तीपासून उत्तरेकडे खासी व जयंति या टेकड्या. येथे खासी नावाच्या लोकांची वस्ती आहे. गौहत्तीच्या नैर्ऋत्येस गारो टेकड्या आहेत, येथे गारो लोकांची वस्ती आहे. गौहत्तीच्या दक्षिणेस लुशाई टेकड्या आहेत, तेथे लुशाई लोकांची वस्ती आहे. याशिवाय निरनिराळ्या लहानलहान टेकड्यांतून निरनिराळ्या वन्य जमातींची वस्ती आहे. आसामच्या पूर्व उत्तर विभागांत प्रसिद्ध नाग टेकड्या आहेत. तेथे सध्या लष्करी अंमल असल्याने साधारण नागरिकाला जायला मज्ञाव आहे. मला पाह्यची स्थळे नाग टेकड्यांत नव्हतीच, म्हणून तिकडे जायचा प्रसंगच आला नाही. मी हिंडले त्या प्रदेशात लहान लहान खेडेगावेच बरीचशी होती. एकमजली गवती छपरांची किंवा कौलाची घरे आणि प्रत्येक खेड्यातून एक एक 'नामघर' असायचे. 'नामघर' म्हणजे एक मोठीशी एकच खोली असलेली झोपडी. यात माणसे नामसंकीर्तन करण्यास जमतात. बंगालमधून वैष्णवसंप्रदाय आसामात पोचला तेव्हा या 'नामघरां'ची स्थापना झाली. आसामध्ये ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात राहणाऱ्या आसामी लोकांखेरीज' 'आहोम्' म्हणून लोक राहतात. हे लोक मोंगोलवंशीय असून त्यांनी पुष्कळ वर्षे आसामात राज्य केले. बऱ्याच लोकांची अशी कल्पना आहे की, 'आसाम' हे प्रादेशिक नाव 'आहोम' या नावावरूनच आले आहे. पुष्कळ आसामी लोक 'आसाम' या शब्दाचा उच्चार 'आहाम' असा करतात.

मी फिरलेल्या खेडेगावांमध्ये मला एक विशेष गोष्ट जाणवली म्हणजे प्रत्येक घरातून माग असत व घरातली लहानथोर सर्व मंडळी मागावर

कापड विणीत. मी गेले त्याच सुमाराला 'बिहू' (विषुव-संक्रमण) म्हणून मोठा सण यायचा होता. त्या सणानिमित्त आपल्याकडे जसे खण वगैरे देतात त्याप्रमाणे एकमेकांना घरी विणलेले लहान-लहान पंचे देण्याची इथे चाल आहे. त्यामुळे जेथे जावे तेथे पंचे विणायचे काम चालले होते. आसामात बंगाली आडनावे असलेली माणसे खूपच आहेत. बारुआ व बेझ बारुआ या नावांचे लोक खूपच आढळले, बारुआ हे नाव भट किंवा ब्राह्मण या अर्थी असावे असे मला वाटले. बेझ म्हणजे वैद्य असे तेथील लोकांनी सांगितले. बंगालमध्ये ब्राह्मण व कायस्थ यांच्या खालोखाल वैद्य ही जात आहे. ती स्वतःला ब्राह्मण समजते. ते लोक इथे येऊन स्थायिक झालेले दिसतात. बारुआ, ओरिसामधले बारिआ, वन्य प्रदेशातील बढिया व पंढरपूरचे बडवे हे सगळे एकाच शब्दापासून झाले की काय कोण जाणे!

खोऱ्यात दोन दिवस हिंडून गोहत्तीला परत आले व लगेच दुसऱ्या दिवशी गारो डोंगरांकडे निघाले. गोहत्तीला परतताना खासी डोंगरांच्या पायथ्याने यावे लागते. खासी डोंगरांमध्ये सध्या एक मोठे समाजशास्त्रज्ञ राहतात. खासी लोक व त्यांची संस्कृती यांना आसाम खोऱ्यांतील लोकांपासून अलिप्त ठेवण्याची हे महाशय कोशीश करून आहेत. ह्या टेकड्यांची रम्यपणाबद्दल फार ख्याती आहे. पण माझ्या कामाच्या क्षेत्रात त्या येत नव्हत्या; म्हणून त्यांना डावलून मला पुढे जावे लागले.

संध्याकाळी काही असामी लोकांकडे जेवायला गेले होते. तेथे नाग टेकड्यांचा प्रश्न निघाला. ब्रिटिश राजवटीत सर्व नाग खेड्यांतून एक एक दुभाषी असे. ह्या दुभाषी लोकांना आपल्या स्वतःच्या टोळीची भाषा व आसामी भाषा अशा दोन्ही येत असत. आसामी भाषा बोलता येणे व त्या भाषेतून ब्रिटिश अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करणे म्हणजे एक मोठेपणा समजला जाई. आता मात्र परिस्थिती पार उलटली आहे. नाग टेकड्यांमध्ये आसामी लोकांना– त्यातल्या त्यात बिनलष्करी आसामी लोकांना– प्रवेश मिळणे दुरापास्त झाले आहे. सगळा मुलूख लष्कराच्या ताब्यात आहे; व लष्करातले अधिकारी हिंदी बोलतात. पूर्वीचे आसामी दुभाषी जाऊन त्या जागी हिंदी जाणणारे लोक आले आहेत. आसामचे लोक म्हणजे जणू नागांचे शत्रू. त्यांना नाग प्रदेशात येऊ देता कामा नये अशा थाटात सर्व व्यवहार चालतो. या परिस्थितीबद्दल आसामी लोकांना साहजिकच अतिशय

राग येतो; वाईटही वाटते. पण त्यांचे काही चालत नाही. जी गोष्ट नाग लोकांची तीच इतर वन्य जमातींची. सर्व वन्य टोळयांमध्ये वन्य संस्कृतीच्या रक्षणाच्या नावाखाली आसामी लोकांच्याबद्दल द्वेष पसरवला जात आहे. आसामी विधिमंडळावरती तर सगळ्यांना जागा हव्यात, सरकारी नोकऱ्या हव्यात. पण आम्ही आसामी नाही, हा प्रत्येकाचा घोष चालू असतो. मी गेले त्याच सुमाराला आसामचा फुटबॉल संघ बंगालच्या फुटबॉल संघाशी खेळायला जावयाचा होता. ह्या संघात एक लुशाई खेळाडू होता. ह्या खेळाडूने जायच्या आदल्या दिवशी "मी आसामी नव्हे, लुशाई आहे." असे सांगून संघातर्फे खेळण्यास साफ नकार दिला. हा प्रकार घडण्याच्याआधी एक दोन दिवसच दिल्लीतील एक बडे प्रस्थ आसाम व मणिपूरच्या दौऱ्यावर होते व त्यांनी आपल्या भाषणातून खोऱ्यातील लोकांना उद्देशून त्यांना "टेकड्यांवरील जमातीची पिळवणूक करणारे" असे संबोधन वापरले होते. या सर्व गोष्टींचा ऊहापोह त्यादिवशी झाला. चालले आहे हे बरे नाही हे साऱ्यांनाच दिसत होते. पण सर्वच त्या बाबतीत अगतिक दिसले. मीही या विचित्र समस्येबद्दल अचंबा करीत माझ्या प्रवासी बंगल्यात परतले.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे प्रवासाला सुरुवात झाली. गारो टेकड्या बऱ्याच दूर आहेत. माझ्या मनात शक्य तो दिवसा-उजेडी गारो प्रदेशाचे मुख्य शहर तुडा म्हणून आहे तेथे पोचायचे होते. गारो टेकड्यांच्या प्रदेशात पोचले की तुडाच्या मार्गावर एकेरी वाहतूक सुरू होते. दुपारी १२ ते १ वरती जाणाऱ्या मोटारींसाठी रस्ता खुला होतो. ती वेळ चुकली की संध्याकाळचे सहा वाजेपर्यंत प्रवेश मिळत नाही. दुर्दैवाने त्या गावाच्या अलीकडे २५-३० मैल आमच्या मोटरची टायर फुटली. ती काढून नवी टायर बसवीपर्यंत खूपच वेळ गेला व घाटाच्या पायथ्याशी येईतो एक-दीड वाजून गेला होता. काही इलाज नव्हता, जवळच्या एका प्रवासी बंगल्यात ३-४ तास घालवले व संध्याकाळी सहाला घाट चढायला सुरुवात केली. थोड्याच वेळात अंधार पडला व घाटातून जाताना मला जे सृष्टिसौन्दर्य पाहायचे होते ते पाहता येईना. वाटेने जंगल भेटेल अशी कल्पना होती पण जंगल असे कोठे दिसेना. लहान लहान बांबू असलेल्या टेकड्या, तर काही वर नुसते गवत उगवलेल्या अशा टेकड्या दिसत होत्या. काही वेळाने लांबवर भलामोठा उजेड दिसला. मला वाटले चंद्र उगवला की काय, पण

थोडी वाट गेल्यावर पाहते तो लांब डोंगरावर आगीचा डोंब उसळला होता. अवतीभवती पाहिले तर कित्येक टेकड्यांना आगी लागलेल्या दिसल्या. रान जळताना पाहिले की माझा जीव घाबराघुबरा होतो. कूर्गमध्ये अरण्यात कुठे इतकासा धूर निघाला की सारे जंगलखाते धावत सुटायचे आणि तेथे पाहते तो जिकडे तिकडे आगी लागल्या असून काहीच हालचाल दिसत नव्हती. माझा मोटरहाक्यासुद्धा जणू काही झालेच नाही, इतक्या शांतपणे मोटर हाकीत होता.

मी त्याला म्हटले, "अरे रानाला आग लागली आहे!" तशी तो मला म्हणतो, "बाई, ही आग लागलेली नाही. भातशेती करण्यासाठी दरवर्षी गारो लोक असेच जंगल जाळीत असतात.

आम्ही जसजसे तुडाच्या जवळ यायला लागलो तसतसा आगीचा भयानकपणा वाढूच लागला. माझ्या नजरेसमोर मोठमोठे वृक्ष धाडधाड पेटून कडाकड पडत होते. आणि माझा मोटरवाला म्हणतो, "बाई, गेल्या वर्षी एक झाड मोटरीवर पडलं होत."

संध्याकाळच्या रम्य वेळी कुजबुजणाऱ्या झाडांच्या थंड हवेतून प्रवास करीत, आज काय बरे जनावर दिसेल, अशा विचारात मी जी होते ते हे विचित्र अनपेक्षित, रौद्र-भयानक दृश्य मात्र मला दिसले. त्या पेटत्या जंगलातून प्रवास करीत आम्ही कसेबसे तुडाला येऊन पोहोचलो. तेथे मात्र जवळपास कुठे आग दिसली नाही. प्रवासी बंगला एका टेकडीच्या माथ्यावर उंच बांधलेला होता. हवाही थंड व आल्हाददायक होती. आमची वाट पाहून लोक निघून गेल्याने खायचीही अडचण झाली. झोपेतसुद्धा मला त्या पेटत्या रानाचे चित्र दिसत होते.

दुसऱ्या दिवशी कलेक्टर येऊन मला समाजकल्याण केंद्रावर घेऊन गेला. त्या दिवशी तुडाचा बाजार होता. आसपासच्या २०-२५ गावचे लोक जमले होते. स्त्रीपुरुषांचे बसके, मोंगल घाटाचे चेहरे, रंगीबेरंगी वस्त्रे व डोक्याला बांधलेल्या नाना तऱ्हेच्या रिबिनी यामुळे बाजार मोठा मनोहर दिसत होता. बाजाराचा दिवस असल्याने कोठच्याही केंद्रावरती ग्रामसेविका सापडणे कठीणच होते. म्हणून एका नवीन निघालेल्या केंद्राची पाहणी करून बाजारात परत आलो. आमच्या सुदैवाने २-३ गावच्या ग्रामसेविका बाजारातच भेटल्या. त्यांना मोटरीत घातले व त्यांचे गाव

पाहण्यास निघालो. त्याही मोठ्या खुशीने आमच्याबरोबर आल्या. कारण ७-८ मैल तंगड्या तोडीत गावाला जायच्या ऐवजी त्यांना जीपमधून प्रवास करायला मिळाला. मुख्य ग्रामसेविका सोनाली सेंगमा म्हणून होती. तिच्या आधी एक आसामी मुलगी मुख्य ग्रामसेविका होती. गारो लोकांनी "आम्ही आसामी नाही, आम्हांला आसामी ग्रामसेविका नको", असे सांगून त्या पोरीचे घर एका रात्रीत जाळून टाकले होते. मोठ्या प्रयासाने थोडीबहुत शिकलेली सोनाली सेंगमा त्यांना सापडली व आता तिची नेमणूक झाली होती. आम्ही खेड्याला पोचेपर्यंत सर्व ग्रामसेविका मजेत गाणी म्हणत होत्या. मीही गारो गाणी ऐकायला मिळतील म्हणून त्यांना गाणी म्हणण्याचा आग्रह करीत होते. गाणी ऐकता ऐकता माझ्या ध्यानात आले की गाण्यांच्या सर्व चाली इंग्रजी. मी त्यांना विचारले, "हे कसे? तुमच्या आया-आज्या गाणी म्हणत होत्या त्यांतली तुम्हांला काही माहीत नाहीत का?"

सोनालीने सांगितले, "पूर्वी कधी तशी गाणी असली तर कोण जाणे, सध्या तरी आम्हांला ती बिलकुल माहीत नाहीत. सध्या आम्ही जी ही गाणी म्हणतोय ती सर्व आम्ही मिशनमध्ये शिकलो."

अर्थातच सर्व गाण्यांच्या चाली इंग्रजी होत्या. लहानपणी मी हुजूरपागेत शिकणाऱ्या ख्रिश्चन मुलीची गाणी ऐकली होती. त्यातले एक मला आठवले.

*"पाखरा प्रीय तू खाली उतर।*
*मला गडे आवडतोस तू फार॥*
*घालीन तुला मी दूधभाकऽऽर।*
*अन् फिरवीन साऱ्या घरऽऽर भऽऽर!॥"*

अशीच भयंकर हीही सारी गाणी होती की काय कोण जाणे! सोनालीच्या शब्दाने माझ्या विचारांतून मी जागी झाले. ती मला म्हणत होती, "आमच्या या गारो टेकड्यांबद्दलचे गाणे फार सुंदर आहे. ऐकता का?" मी माझी उत्सुकता दर्शवली. गाणे सुरू झाले. त्याचे ध्रुपद खालीलप्रमाणे :

"गॅरो हिल्स, गॅरो हिल्स, गॅ... रो हि... ल्स. जी ए आर आर ओ एच आय एल् एल् अस् गॅ... रो हिल्स."

हे अफाट गाणे ऐकून व त्यांतून प्रतीत होणारी गारो लोकांची संस्कृती पाहून माझे मन थक्क झाले. ह्या संस्कृतीच्या संरक्षणाच्या नावाने गारो लोकांत आसामी लोकांबद्दल द्वेष पसरविला जात आहे. वन्य प्रदेशांतील अंमलदारही होता होईतो आसामी नसलेले असे असतात. ते या हुच्चपणाला प्रोत्साहन देतात. हिंदी शिकणे व दिल्लीहून आलेल्या बड्या लोकांपुढे 'जनमनगण' म्हणून दाखवणे आणि आपल्या लोकनृत्यांचे प्रदर्शन करणे हा सर्व टेकड्यांवरील प्रदेशांतून ठराविक कार्यक्रम होऊन बसला आहे. आसाममध्ये ब्रह्मपुत्रेचे खोरे, खासी टेकड्या, गारो टेकड्या, लुशाई टेकड्या आणि इतर काही विभाग असे निरनिराळे विभाग पडलेले आहेत. प्रत्येक जण आपल्याला दुसऱ्यापासून वेगळा समजतो आणि ह्या वेगवेगळेपणाच्या जाणिवेची जोपासना मिशनरी, परकीय समाजशास्त्रज्ञ व अधिकारी वर्ग मोठ्या कसोशीने करीत आहे. महाराष्ट्र गुजरातपासून वेगळा होऊ पाहू लागला तर तो देशद्रोह होतो; पण ज्यांना भाषेत काडीचेही लिखित वाङ्मय नाही; ज्यांचे हल्लीचे जीवन परकीय मिशनऱ्यांनी घडवलेले आहे, अशा या चिमुकल्या वन्य जमातीच्या संस्कृतीचे मात्र दिल्लीकडून मोठ्या कटाक्षाने संरक्षण केले जाते. तीन कोटींचा महाराष्ट्र वेगळा झाला तर जणू हिंदुस्थान रसातळाला जाईल अशी भाषा बोलणारे लोक पूर्व सरहद्दीवर असलेल्या या चिमुकल्या आसामचे तुकडे तुकडे करीत आहेत हे पाहून विलक्षण आश्चर्य व उद्वेग वाटला.

तुडा सोडण्याच्या आधी कलेक्टरकडे गेले होते. तो म्हणत होता, गेल्या काही वर्षांत तुडा गावाला पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. आसपासच्या गावातूनही पाण्याची हाकाटी आहे. डोंगरमाथ्यावरचे जंगल जाळले की पाण्याचे दुर्भिक्ष्य होणारच ही गोष्ट सगळ्यांना माहीत आहे. वन्य लोकांनी डोंगरमाथा निर्वृक्ष करू नये, म्हणून म्हैसूर, गोदावरीचा प्रदेश, ओरिसा, वगैरे ठिकाणी जंगल खात्याचे भगीरथ प्रयत्न चालू असतात. येथे पाहते तो दरवर्षी राजरोसपणे सुंदर सुंदर जंगले नष्ट होत आहेत. दुसऱ्या दिवशी दिवसा-उजेडी तुडाहून निघाल्यावर सर्वत्र जळलेल्या, उघड्या बोडक्या डोंगरांचे जे दृश्य दिसले ते रात्री दिसलेल्या आगीपेक्षाही भयानक वाटले.

धो...धो... पडत्या पावसात गोहत्तीला पोचलो. दुसऱ्या दिवशी कलकत्त्याला जायचे विमान गाठायचे होते. विमानतळावर जाताना

कामाख्येचे देऊळ ज्या टेकडीवर आहे ती लागली. मोटर हाकणारा म्हणाला, "बाई, जायला रस्ता सध्या मोकळा आहे. आपल्याला दर्शन घेऊन येण्यापुरता वेळ आहे. वर जाऊन दर्शन घ्या."

आम्ही निघालो. देवीचे देऊळ बंगाली थाटावर बांधलेले आहे. रोज रेडा बळी देतात. त्याचे मास प्रसाद म्हणून खायला मिळते. मला तो प्रसाद नको होता, म्हणून मी एकदम देवळातच गेले. देवळात खोल खोल अर्धवट अंधारातून देवीच्या दर्शनास जावे लागते. शिरस्त्याप्रमाणे पूजामंत्र म्हणायच्या आधी पुजाऱ्याने म्हटले, "बाई, काय इच्छा असेल ती सांगा." मनात हजारो गोष्टी गर्दी करून आल्या. स्वतःसाठी देवीजवळ काही मागायचे का आसामच्या एकतेसाठी प्रार्थना करायची? सगळ्याच गोष्टी क्षुद्र वाटल्या. जे काय चालले आहे ते काय त्या जगन्मातेला माहीत नाही, असे थोडेच आहे? मी म्हटले, "बाबा, माझी काऽही इच्छा नाही." तो म्हणाला, "खरंच नाही?" मी पुन्हा निक्षून सांगितले, "खरंच नाही." त्याने मला देवीच्या पायांवर डोके टेकायला सांगितले व मंत्र म्हटला... "हे जगन्माते, या तुझ्या मुलीला जन्म, जरा व मृत्यू यांपासून सोडव. तिला मुक्ती दे." सकाळी प्रवासी बंगल्यात बसल्या-बसल्या रिकामपणाचा चाळा म्हणून मी देवीसाठी एक प्रार्थना रचली होती. देवीच्या पायावर डोके टेकून मनातल्या मनात मी ती म्हटली :

राजराजेश्वरी, कामरूपधारिणी । करुणामयी, विश्वजननी
पादकमलपतितायाम् । दुहितरी कृपां कुरु। दया कुरु ॥

१९५९

*

१७

# भटके

घर अगदी निःशब्द होते. जिन्यावर कुणाची पावले धाड धाड वाजत नव्हती, माडीवर कुणाची हालचाल ऐकू येत नव्हती, वर्तमानपत्राची खसखस नव्हती की टाइपरायटरचे टक् टक् नव्हते. मी माझ्या आवडत्या हिरव्या खोलीत पडले होते... भिंतीवरच्या फोटोकडे पाहात. पोरगा हजार मैलांवर गेलेला.. तो कसला इतक्यात दिसणार? केवढे अंतर आहे! पण ह्या अंतरापेक्षाही आता मोठे अंतर पडले आहे– एका पिढीचे, एका जन्माचे. इतके दिवस हे त्याचे घर होते- आता तो दुसरे घर करणार. पोरीसारखाच. ती नाही का जवळ असून दूरच? मीच नाही का तिला दूर केले? अगदी मोठा समारंभ करून? आता का कुरकूर? ती दोघे काही कारणाने गेली, पण बाकीच्यांना काही तसे कारण नव्हते. एकाला कंटाळा आला म्हणून– एक प्रवासाला म्हणून– पण बाहेर जायला कारण कशाला?

“कित्येक जिप्सी ह्या घरात अगदी उघडपणे वावरतात.
काही मला आई म्हणतात, एकजण मला बायको म्हणतो.
जमतात, हसतात. हसवतात. निघून जातात, नि रडवतात.
परत जमतील, परत हसवतील, परत जातील, परत रडवतील.
माझ्या घराच्या थडग्यात मला गाडून जातील.
सोबतीला आठवणींचा पाचोळा नि प्रतीक्षेची हुरहूर.
ह्या भटक्यांना जखडून कसं टाकू?
कोणत्या दाव्यानं बांधून ठेवू?
गायी म्हशी, उंटघोडे, शेळ्यामेंढ्या, अगदी हत्तीसुद्धा बांधून घातले.
पण ह्यांना नाही बांधता येत.

जगाच्या सुरुवातीपासून प्रत्येकीनं शिकस्त केली.
घरं सजवली, ऊब केली, न्हाऊ घातलं, खाऊ घातलं;
उंबरठे केले, कवाडं मिटली, कुलपं लावली;
तरी एक दिवस सारे दरवाजे उघडून,
सारे उंबरठे ओलांडून,
ते निघून जातात.
आणि सगळ्याजणी, अगदी एकट्या
आपल्या सजवलेल्या घराच्या पिरामिडमधे
नाईलच्या हिरव्या पाण्याशेजारी
जिवंतपणी मरून पडतात."

मी रागारागाने उठले. पाडगावकरांच्या दरोबस्त सगळ्या जिप्सी, मनात खोल दडलेल्या होत्या त्यांना ओढून बाहेर काढले, त्यांच्या मुंड्या मुरगळल्या, एक खड्डा खणला आणि खरोखर त्यांना अगदी खोल खोल गाडून टाकले.

घर भरलेले होते. खायच्या वेळी जेवणघरात गर्दी होत होती. किती खायचे केले तरी कधीच संपून जात होतं. नातींच्या रडण्याओरड्याने घर दणाणून जाई; तर त्याच्या आईवडिलांच्या न संपणाऱ्या वादविवादाने डोके दुखू लागे. गेला आठवडा ज्या घरात एक शब्दसुद्धा ऐकू येत नव्हता; तिथे आज निवांतपणे बसायला खोली नाहीशी झाली होती. माझी चिलीपिली माझ्या भोवती भोवती होती.

दुसरा दिवस धांदलीचा उजाडला. सर्वजण परत गावी जाणार होती. धाकटी पण ताईबरोबर जाणार म्हणाली. बांधबांध चालली होती. मी मदत करीत होते– त्यांच्या धांदलीत, गडबडीत जाण्याचा क्षण जवळ आला आहे हे विसरण्याचा प्रयत्न करीत होते- पण शेवटी तो आलाच.

"आम्ही जातो हं." जातो हं." जाते हं." सगळीजणे गेली... परत आपले माझे घर अन् मी.

संध्याकाळी स्वारी आली; आणि मग माझ्या सुजलेल्या डोळ्यांकडे पाहून चौकशी सुरू झाली. चौकशी बारीक आणि त्यावरचा निकाल सरळ न्यायाच्या तराजूने तोललेला.

"का रडलीस? पोरी मनाला लागेल असं काही बोलल्या का?"

"नाही रे. त्या गेल्या म्हणून एकटं वाटलं. निदान धाकटीनं तरी जायला नको होतं."

"ते का? सुटीत एकटी घरी राहून तिला कंटाळा आला. तिच्या बरोबरच कोणी नाही. गेली ताईबरोबर."

धड उत्तर सुचेना. म्हणणे बिनतोड होते. पण मग आठवण झाली. "सुटी झाल्यापासून काडीचं वाचन नाही की अभ्यास नाही. नुसती उनाडते आहे. घरी राहून थोड वाचन झालं असतं." पण हा साळसूदपणा उपयोगी पडला नाही. लगेच उत्तर मिळाले.

"बी.ए.ची परीक्षा झाली तेव्हा तू नाही का सबंध सुटी पोहण्यात न् टेनिस खेळण्यात घालविलीस? तेव्हा किती वाचलं होतंस सुटीत? जा, जाऊन नीज. उगीच काही तरी वेड घेऊन बसतेस."

"ही-ही-ही-ही-खी-खी-खी-खी! कशी जिरली! कशी जिरली!" मी दचकून पाहिले, मघाशी मुंड्या मुरगळून मारून टाकलेले सगळे जिप्सी परत आले होते. माझ्याभोवती नाचत होते. दात विचकून हसत होते.

भिंतीवर आईचा नि सासूबाईंचा फोटो समोरासमोर लावलेले होते. भावजी हजारो मैलांवर नोकरीला होते. ते आले म्हणजे सासूबाईंचा आनंद-ते जाऊ लागले की सासूबाईंची होणारी तडफड आठवली. आता जाऊबाईंचे मन मुले लांब गेली म्हणून तसेच तडफडते.

मी कपाळाला हात लावला. पंढरपूरला विठोबाच्या पायांवर डोके ठेवले, तेव्हा त्याचे पाषाणाचे गार गार पाय कपाळाला लागले. तो स्पर्श आठवला. बायका पंढरपूरला का जातात? घरातले सगळे भटके लांब जातात पण विठोबा मात्र न हालता, न चालता शतकानुशतके तेथेच उभा आहे. जन्मभर भटकणाऱ्या, कोणाच्या हाती न सापडणाऱ्या कृष्णाला येथे दोन विटांवर डांबून ठेवले आहे. सगळ्यांचे सैरावैरा धावणारे जीव, प्रिय जनांचा निरंतर, न संपणारा पाठलाग या दोन पायांशी स्थिरावतो. एकेक दैवत एकेका इच्छेच्या पूर्तीसाठी निर्माण झालेले असते ना? मग विठोबाचे अठ्ठावीस युगे खडे राहिलेले ध्यान खात्रीने त्या पिरामिडमधल्या बायांनी निर्माण केलेले असणार...

बायांनीच काय म्हणून? पुरुषच फक्त भटके असतात? तू त्यांतलीच. आईच्या डोळ्यांकडे पाहिले. ती काही रागाने पाहात नव्हती; पण चित्रात

ती थोडी गंभीरच दिसत होती. मला एक प्रसंग आठवला-एक संभाषण आठवले. पुण्याच्या शाळेतून मी मोठ्या आनंदाने घरी जायला निघाले होते. प्रवासाचा प्रत्येक क्षण नवं नवं पाहण्यात गेला होता. दिवसा खिडकीजवळ बसून पळणाऱ्या सृष्टीचा चित्रपट पाहायचा, रात्री जुन्या काळच्या दुसऱ्या वर्गाच्या प्रशस्त बाकावर, आगगाडीच्या चाकांचा मधुर खडखडाट ऐकत, डब्याच्या मजेदार हालण्याबरोबर हालत अधूनमधून जागं होत झोपी जायचं. हा प्रवास झाल्यावर तीन दिवस बोट, मग रंगूनमधले दोन स्वप्नमय दिवस. मग परत आगगाडी.

आगगाडी सागाच्या जंगलातून जात होती. मोठ्या मोठ्या पानांच्या सरळसोट झाडांची भिंत होती. कुजलेल्या पाचोळ्याचा वास येत होता. खिडकीबाहेर पाहावेसे वाटेना, इतकी कंटाळवाणी वाटली ती झाडी. पण मग गाडी रानाबाहेर आली व आम्ही एकदाचे मिंजानला पोचलो. घरी आई व अजूनपर्यंत न पाहिलेला एक गोड गोड भाऊ! केवढा मोठा दुमजली प्रशस्त बंगला. पूर आला म्हणजे वरच्या मजल्यावरून इरावतीचे पाणी दिसत असे. पण मला नवल वाटे ते निराळेच. ह्या बंगल्याला कुठे दगडविटांचा स्पर्श नव्हता. सारे काम लाकडाचे व बांबूचे, लाकडाचे उंच खांब, लाकडी आडव्या तुळया, वर लाकडी कैच्या व त्यांवर लाकडी कौले होती. जमीन लाकडाची तर भिंती होत्या दुहेरी चटयांच्या. जोराचे वादळ आले की भिंती आतबाहेर व्हायच्या व अधूनमधून होणाऱ्या धरणीकंपात संबंध घर हाले पण मोडत नसे. लहानपणी पाहिलेल्या पण मध्ये पुण्याच्या शाळेत विसर पडलेल्या ह्या जगाची परत नव्याने ओळख करून घेताना मी अगदी आनंदात बुडून गेले होते. पण हळूहळू मला कंटाळा येऊ लागला. माझ्या बरोबरीचे, माझे खेळगडी असलेले दोघे भाऊ हिंदुस्थानात होते. नवा भाऊ छान खरा पण भारीच लहान. मला परत हुजूरपागेची आठवण होऊ लागली. वर्गातील मुली परत भेटाव्या म्हणून उत्सुकता लागली. मी बाबांना विचारले,

"परत शाळेत कधी जायचं?" तर ते म्हणाले, "अशी काय लौकर लौकर रजा मिळते वाटतं? जाऊ दोन तीन वर्षांनी."

उत्तर ऐकून मी सुन्न झाले. दिवसेंदिवस असा कंटाळा वाढत चालला! तो सुंदर बंगला, ती मोठी बाग, मला तुरुंगासारखे वाटू लागले. यातून सुटका कशी होणार या चिंतेत मी पडले. पण बाबांचे अचानक काम निघाले

व वर्षभरातच मी खूप हट्ट करून त्यांच्याबरोबर परत हिंदुस्थानात यायला निघाले. आईचे डोळे भरून आले होते, पण ती काहीच बोलली नाही.

याही गोष्टीला कित्येक वर्षे लोटली होती. आई माझ्या घरात काही दिवस राह्यला आली होती. मुली घरात कशा कंटाळतात, याची कुरकूर मी आईजवळ करीत होते. आई म्हणाली,

"तू तर घराला कंटाळली होतीस एवढंच नव्हे तर घरातून जायला मिळावं म्हणून देवाला नवस केला होतास."

मी आश्चर्याने विचारले,

"काय सांगतेस आई? कधी?"

तिने जुनी आठवण दिली व मला सांगितले, "तू हिंदुस्थानला परत गेल्याच्या दुसऱ्या दिवशी कृष्णा स्वयंपाक्याने एका वाटीत देवापुढे गूळ घालून ठेवला. त्याला विचारले, तर तो म्हणाला-माईने सांगितले होते की, "कृष्णा, मी जर घर सोडून परत शाळेत जायला निघाले, तर देवाला गूळ ठेव बरं का. माझा नवस आहे." आई किंचित् थांबली. जुन्या जखमा परत वाहावल्या. घोगऱ्या आवाजात ती म्हणाली, "माई, त्या वेळी तुला आमचा इतका कंटाळा आला होता, की आमची संगत सुटावी म्हणून तू नवस बोलली होतीस. आता का बरं मुली जरा सुटीच्या बाहेर गेल्या तर कुरकुरतेस?"

जुन्या स्मृती जाग्या झाल्या, अभावितपणे केवढा क्रूरपणा केला त्याची जाणीव झाली. आयुष्यात काही गोष्टींची भरपायी करताच यायची नाही हे उमजले. आईने मला सांगितले ते खरेच होते. न्यायाचे होते. मुलींच्या बापाने सांगितले तसेच. पण मला न्याय कुठे हवा होता? आई पुढे म्हणाली होती, "हे असंच चालायच-पिढ्यान् पिढ्या असंच चालायचं."

मला तत्त्वज्ञानही नको होते... न्यायही नको. आता मला माझा एकटेपणा सहन करवत नव्हता. मी वैतागाने पुटपुटले, "असं असेल तर मुलं दहा वर्षांची झाली की आयांनी मरूनच जावं आपलं."

"ही-ही-खी-खी.... अगदी बरोबर!" माझ्या भोवतालची भुतावळ किंचाळली. मी कानात बोटे घातली.

१९५९

*

## १८

# दोन टोके

दोन टोके म्हणता येतील असे प्रदेश भारतात कितीतरी आहेत. काही वेळा निराळेपणाची जाणीव भौगोलिक परिस्थितीमुळे होते; काही वेळा माणसांच्या निव्वळ बाह्य स्वरूपाने आकारमानाने, रंगाने, कपड्याने होते तर काही वेळा आचारामुळे किंवा विचारामुळे प्रत्ययास येते. बऱ्याच वेळा ह्या सर्व गोष्टी थोड्या थोड्या प्रमाणात मिळून जाणवतात. प्रवास करताना मन काही सारा वेळ तोलीत, जोखत बसत नसते. पुढे दिसते, भासते अनुभवास येते ते पाहायचे; त्याचा आस्वाद घ्यायचा आणि तेही हातांतील काम करता करता. पण एखाद्या वेळी कशाने तरी जुन्या आठवणी जाग्या होतात; व सारखेपणाची नाहीतर निराळेपणाची जाणीव होते.

आसाम आणि कूर्ग-मलबार भारताची दोन टोके. काही दृष्टींनी त्यांच्यात साम्य आहे. दोन्ही जंगली प्रदेश, दोन्ही डोंगराळ, दोन्ही भातखाऊ. जास्तच मौज म्हणजे दोन्ही प्रदेशात काही जमातींची कुटुंबपद्धती मातृप्रधान आहे! मी आसामात गेले तेव्हा भूगोलात वाचलेल्या वर्णनावरून साम्याच्या अपेक्षेनेच; पण प्रत्यक्षात मात्र दर वेळेला फरकच जाणवत गेला. दोन्ही प्रदेशांत रान पण पर्वताची घडण, रानातील वृक्ष, नद्या सर्वच निराळे आहे. मातृप्रधान कुटुंबाची रचनासुद्धा निराळी आहे.

पण मुख्य फरक जाणवला एका रात्रीच्या प्रवासात–

आसामात रात्री जंगलातल्या खेड्यात मुक्काम करावा लागेल की काय असे वाटले होते. तसा प्रसंग आला नाही. पण मी त्याबद्दल बोलत असताना एक आसामी माणूस म्हणाला होत, "काय म्हणता? खेड्यात? अहो तिथं हत्ती धुमाकूळ घालताहेत."

मी म्हटले, "अहो, मी काही बाहेर निघणार नव्हते– सरकारी अतिथिगृहात..."

"छे, छे, म्हणून काय झालं? एकदा हत्ती बाहेर निघाले म्हणजे काय करतील त्याचा नेम नाही."

"इतके का या इथले हत्ती द्वाड असतात?" मी विचारले.

"तुम्हांला माहिती नाही का? अहो तुमची मोटर भर दिवसा वाटेत बिघडली नि ती तासाभरात दुरुस्त होऊन तुम्ही निघालात म्हणून बरं. जरा का रात्रीची वेळ असती तर धडगत नव्हती. इथले मोटरवाले मोटर रस्त्यात टाकून खेड्यात जातात, हत्ती आले तर मोटरचा चक्काचूर करतात. जे मोडता येत नाही ते आपटून आपटून चिपटी करतात. माणसाला तर जिवे सोडीत नाहीत."

मला वाटले, हा माणूस मला उगीच भेवडावीत असेल. पण मागून चौकशी केली तर त्याच्या सांगण्यात बरेच तथ्य आहे, असे कळले व मला एकदम कोडगूंच्या प्रदेशाची (कूर्गची) आठवण झाली. तेथे हत्ती कधीच धुमाकूळ घालीत नाहीत. रानात बांबू व पानांनी केलेल्या तीनचार फूट उंचीच्या झोपड्यांतून वन्य लोक राहातात. त्याच रानातून माणसाळलेले व जंगली हत्ती फिरत असतात. पण माणूस दगावल्याची वा झोपडी उद्ध्वस्त झाल्याची हकीकत ऐकली नाही. पंधरा-वीस वर्षांनी एखादा द्वाड हत्ती निघतो व त्याला मारावे लागते. पण एरवी कधी कोणी हत्तीला भीत नाही. आम्ही दिवसभर रानातून भटकत होतो; पण कोणी 'हत्तीला जपा' असे सांगितले नाही. आम्ही तेथे असताना एका माणसाला एका हत्तीने इजा केली. हा हत्ती 'द्वाड' आहे का काय, म्हणून आम्ही काळजीत होतो. पण सगळ्या जंगल ऑफिसरांनी व जंगली लोकांनी निक्षून सांगितले, 'हा हत्ती नेहमी फिरत असतो, मुळीच दुष्ट नाही. तो माणूसच द्वाड, दुष्ट असला पाहिजे, चोरून हत्तीची शिकार करीत असला पाहिजे. त्याच्यावर खटला करून लेकाला तुरुंग दाखवला पाहिजे.'

आसामला जाण्याच्या पूर्वीची माझी हत्तीची आठवण तर जन्मात विसरण्यासारखी नव्हती. आम्ही सकाळी उठून गुरुवायूरच्या देवळात गेलो होतो. प्रवेशद्वाराच्या आत मोठे भव्य पटांगण होते. समोरच दोनतीनशे फुटांपलीकडील गाभाऱ्यातील नुकतीच पूजलेली मूर्ती स्पष्ट दिसत होती.

पटांगणात मधले दहा फूट सोडून डाव्या बाजूला पन्नासएक लोकांचे उभ्याने गायन व वादन चालले होते; व उजव्या बाजूला तीन हत्ती मधल्या मार्गाकडे तोंड करून उभे होते. मधला हत्ती प्रचंड उंच व रुंद होता. सोंडेच्या टोकापासून शेपटीपर्यंत लखलखणाऱ्या सोन्याचा साज त्याच्यावर चढविला होता. वर सोन्याचे सिंहासन होते व पाच ब्राह्मण मागेपुढे उभे राहून चवऱ्या ढाळणे, पंखा फिरवणे, अबदागीर धरणे वगैरे कृत्यात मग्न होते. दोन बाजूचे हत्ती बरेच लहान लहान होते. आम्ही देवळात सुमारे पाऊण तास होतो. शेकडो लोक सारखे जात येत होते. शेकडो भजन म्हणत होते. गवयाचे, माझ्या कानांना कर्कश वाटणारे गायन चालले होते व हत्ती संथपणे मधून मधून सोंड हलवीत उभे होते, माझी खात्री आहे की त्या शृंगारलेल्या हत्तीला सर्व सोहळा आपल्या प्रीत्यर्थ चालला आहे असे वाटत असणार !

आमच्या महिन्या-दीडमहिन्याच्या प्रवासात हत्ती पाहिला नाही असा आमचा दिवस गेला नाही; आणि तो भेटायचा किंवा त्याच्याबद्दलच्या गोष्टी ऐकू यायच्या, त्यासुद्धा इतक्या छान असायच्या की आम्ही अगदी हत्तीच्या प्रेमात सापडलो असे म्हणायला हरकत नाही. हत्ती अक्कल आणि चांगुलपण यांचे प्रचंड प्रतीक अशी आमची ठाम समजूत झाली होती. पण इथे पहावे, तो सगळाच प्रकार निराळा. आसामातले हत्ती असे पिसाळल्यासारखे का वागतात, हे काही मला समजेना. परत चौकशीला सुरुवात केली आणि मग मात्र हे कोडे उलगडले. इथे गावाच्या आसपास जे हत्ती भटकत असतात त्याला प्रत्येकाला निदान एकदा तरी बंदुकीची गोळी लागलेली असते. गारो टेकड्यांत पुष्कळ लोकांना बंदुकीचा परवाना आहे. त्यातले बरेच जण हत्तीवर बंदूक उडवून बघतात. एखाद्या बंदुकीची गोळी पायात किंवा पाठीत घुसली तरी हत्ती काही मरत नाही; पण मनुष्य म्हणजे आपल्याला दुःख देणारा एक प्राणी हे काही हत्ती विसरत नाही व एकटी-दुकटी वाटेत अडकलेली गाडी किंवा एकटादुकटा मनुष्य सापडला की त्याच्यावर सूड उगवल्याखेरीज तो राहात नाही. पिकाची नासाडी करतो, या सबबीवर लोक हत्तीला मारायला टपलेले असतात. सरकारने संरक्षण दिले नसते, तर हत्तींचा फन्ना उडाला असता. पण हत्ती जिवंत असले तरी त्यांच्याबद्दल प्रेम मात्र कुणाला असत नाही. कोठे म्हैसूर, कूर्ग आणि

त्रावणकोर येथे हत्तीला मिळणारी वागणूक व कोठे हा द्वेष, हे मनात आल्याखेरीज राहिले नाही. आसाम, त्रावणकोर भौगोलिकदृष्ट्या हिंदुस्तानची दोन टोके खरी, पण दोन्हीकडच्या लोकांच्या मनातले अंतर दोन हजार मैलांपेक्षाही कितीतरी जास्त वाटते.

असाच फरक मी ओरिसाहून राजपुतान्यात आले तेव्हा जाणवला. परत तेच शब्द मनात उमटले– दोन टोकं!

पश्चिम ओरिसाची घनदाट अरण्ये, पूर्व ओरिसाची हिरवीगार भातशेती, सगळीकडे भरून राहिलेले पाणी आणि त्यात उमललेली असंख्य कमळे हे पाहताना दृष्टी निवत होती. चिल्का सरोवराइतके रमणीय स्थान क्वचितच दृष्टीस पडते; पण त्याच चिल्का सरोवराकाठी एका खेडेगावात २५ टक्के प्रजा महारोगाने पछाडलेली दिसली. जगन्नाथ मंदिराच्या भव्य पटांगणात हत्तीरोग झालेले भिकारी इतके बसले होते, की नको ते देवदर्शन, नको ती प्रदक्षिणा, असे आम्हांला झाले. ओरिसामध्ये, विशेषतः किनाऱ्याच्या भागात, शेतकरी दारिद्र्याने गांजलेला, अंगावर धड वस्त्र नसलेला; स्त्रिया अंगाभोवती काही तरी, एका काळी पांढरे असलेले पण आता काळे मिच्च झालेले वस्त्र अगदी कलाहीनपणे गुंडाळतात. अशोकाची झाडे उंचच्या उंच वाढलेली सर्वत्र दिसायची. त्यांचे बुंधे दोन माणसांच्या वावेत मावणार नाहीत इतकाले जाड होते. पुन्नागाची (उंडीची) हिरवी तकतकीत झाडे सुंदर पांढऱ्या शुभ्र फुलांनी डवरली होती. निसर्ग समृद्ध होता. पण माणसं रोग, दारिद्य, अज्ञान ह्यांनी पिडलेली होती.

पश्चिम राजपुतान्यात आल्याबरोबर तिथल्या रणरणत्या उन्हाने डोळे उघडू नयेत असे वाटले. पाहावे तिकडे उन्हात चमकणारी वाळू. कुठे काही वृक्ष नि शेती दिसलीच, तर त्याने डोळ्यांना बरं वाटायच्याऐवजी त्या बिचाऱ्या झाडांचीच कीव वाटे. राजपुतान्यांतून उत्तर गुजरातमध्ये गेले तेथेही तोच प्रकार. आम्ही जेवून उठल्यावर गड्याने भांडी घासून आणली. तो प्रकार पाहून तर मी अगदी थक्कच झाले. ताटे, वाट्या, जळकी भांडी... सगळी वाळू घासून लखलखीत करून आणली होती. त्यांना पाण्याचा स्पर्शसुद्धा झाला नव्हता. गावातल्या एकुलत्या एका विहिरीला जेमतेम पिण्यापुरते पाणी होते. तो भांडी घासायला कसले पाणी वापरणार? पण ह्या मुलुखात डास नाही, माशी नाही, रोगराई अतिशय

कमी, लोक धिप्पाड, तेजस्वी व अगदी गरिबांतला गरीब शेतकरी हिंवा मेंढपाळ मोठ्या रुबाबात दिसायचा. पायांत तंग विजार, वर चुणीदार अंगरखा आणि डोक्यावर पागोटे किंवा रंगीबेरंगी रुमाल असा पुरुषाचा पोषाख. बायका रंगीबेरंगी घागरे घातलेल्या, त्याच्यावर तशीच रंगीबेरंगी काचोळी आणि तीनचार हातांची ओढणी अशा पोषाखात असायच्या. बांध्याने उंच, रुंद, ताठ मानेच्या; डोक्यावरून पाण्याचा घडा घेऊन ह्या बायका चालू लागल्या म्हणजे त्यांच्या प्रत्येक अवयवांतून सौंदर्यांची व निरोगीपणाची प्रचीती येई. प्रदेश दिसायला ओसाड दिसला तरी अतिशय सुपीक होता. जिथे जिथे म्हणून पाणी मिळे तिथे पीक भरपूर येई. मुख्य खाणे गहू, बाजरी आणि घट्ट उडदाच्या वरणाचा गोळा. ओरिसा व राजस्थान आणि उत्तर गुजरात इथली सृष्टी निराळी; माणसे निराळी, माणसांची राहणी निराळी; खाणेपिणे निराळे. इतका फरक दुसऱ्या दोन विभागांत क्वचितच आढळेल.

आज 'दुसरे टोक' हे शब्द माझ्या मनात यायला सृष्टीपेक्षा माणसेच जास्त कारणीभूत झाली. बंगालमधल्या काही खेड्यांची पाहणी करून मी विमानाने दिल्लीला आले होते; नि तिथून आगगाडीने राजपूरला गेले. आणि काही तासांतच, बंगालपासून सर्वस्वी भिन्न अशा ठिकाणी मी वावरत आहे, हे तीव्रतेने मला जाणवले. पंजाबच्या मानाने बंगालचा निर्वासितांचा प्रश्न कितीतरी पटींनी जास्त गुंतागुंतीचा व कितीतरी जास्त व्यापक हे जरी खरे असले, तरी अशा आणीबाणीच्या वेळी वागण्याची तऱ्हा मात्र दोन्ही लोकांची अगदी भिन्न यात शंकाच नाही. पश्चिम पंजाबमध्ये ब्रिटिश सरकारने कालवे काढले आणि त्या कालव्यावर पंजाबी शेतकऱ्यांनी संपन्न शेती उभारली. ती सर्व टाकून त्यांना पूर्व पंजाबात यावे लागले. पण ती शेती त्यांनी सुखासुखी टाकली नाही. तिच्यासाठी त्यांनी रक्त सांडले. हिंदुस्थान सरकार मध्ये पडले नसते; तर पंजाबी कित्येक वर्षे आपल्या भूमीसाठी लढत राहिले असते. त्यांच्या खेड्यांतून हिंडले, तेव्हा प्रत्येकाने आपले किती लोक गमावले ह्याबरोबरच त्यांचे किती मारले, हेही मोठ्या अभिमानाने सांगितले. सर्वस्वाला मुकून अर्धी अधिक कुटुंबे गायब होऊन जे आले ते कपाळाला हात लावून बसले नाहीत. ते झपाट्याने भारतभर पसरले. कलकत्ता, मुंबई, दिल्ली वगैरे शहरांतून ते हजारोंनी स्थायिक झाले.

मोटर व मोठाले मालट्रक हाकणे व मोटरदुरुस्तीची लहान लहान दुकाने काढणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. लहान लहान यंत्रे चालवून त्यांवर छोटा छोटा माल तयार करणे व यंत्रांची दुरुस्ती करणे ह्या दोन्ही प्रकारची लहान लहान दुकाने ह्या लोकांनी दिल्लीभोवती शेकडोंनी काढली आहेत. राजपूरला ओस पडलेल्या कित्येक बराकीवजा इमारती मला दिसल्या. राजपूर हे निर्वासितांचे एक मोठे केन्द्र होते. त्यांच्यासाठी या तात्पुरत्या इमारती उभारल्या होत्या. सर्व निर्वासितांची सोय लावल्यामुळे त्या आता मोकळ्या पडल्या आहेत. अगदी मोठमोठ्या कुटुंबांतील बायांनीसुद्धा पडेल ते काम करून कुटुंबे सावरली आणि आज ती मंडळी मार्गाला लागली आहेत.

याच्या उलट बंगालचा निर्वासितांचा प्रश्न अजून तसाच भिजत पडला आहे. लहानमोठ्या जमीनदारांच्या कुटुंबांची सोय लावली आहे, पण ज्यांना जमिनी वगैरे काही नव्हत्या, असे गरीब निर्वासित हजारोंनी कलकत्त्यात इतर गावागावांतून तळ देऊन आहेत. नुसते बंगालातच नव्हे, तर आसामातही ठिकठिकाणी हे लोक भेटतात. त्यांची याचना व रडगाणे कधीही संपत नाही. आसामी लोक तर या निर्वासितांबद्दल नुसते उदासीनच नव्हे, तर अगदी विटलेले दिसले. कलकत्त्याचे सिआल्डा स्टेशन तर हजारो निर्वासितांची राहण्याची एक कायम वस्तीच झाली आहे. पहिल्या प्रथम सिआल्डा स्टेशनवर पाऊल ठेवले की एक भयानक दृश्य डोळ्यांपुढे दिसते. भांडीकुंडी, लक्तरे, डबडी असा संसार भोवती मांडून एकेक कुटुंब वसलेले आहे. कुठे मोलमजुरी करून, भिक्षा मागून जे मिळेल ते पोटात ढकलायचे नि परत स्टेशनवर आपापल्या घरकुलात येऊन बसायचे. हाता-पायाच्या काड्या, खोल गेलेले डोळे, अंगावरची लक्तरे, कधी फणी न फिरवलेले केस अशा बायका, मुले, पुरुष स्टेशनभर पसरलेली आहेत. सर्व स्टेशनभर एक कुबट दुर्गंधी पसरलेली आहे. या लोकांच्या अंगी काही माणूसपणा असला, तरी तो आता नाहीसा झाल्यासारखा दिसतो. राजकीय पक्षांच्या सत्तास्पर्धेतील, माणसांचा भास निव्वळ ज्यांच्यावर राहिला आहे. अशी ही प्यादी. कम्युनिस्टांनी मनावर घेतले व सत्ता बळकावण्यापेक्षा माणसांच्या दुःख निवारणाकडे लक्ष दिले तर निर्वासितांची कोठेही पुनर्वस्ती करता येईल; पण ती तशी करणे अशक्य झाले आहे. अर्थात बंगाली मनुष्याची मनःप्रवृत्तीसुद्धा या दैन्याला जबाबदार आहे. मधूनमधून काही थोडा पैसा

मिळतो म्हणून अशा दैन्यात कोणीही पंजाबी राहिला नसता. पंजाबचा माणूसच काही वेगळा हे खरे; काय वाटेल ते करायचे पण या जंगलातल्या चांगल्या गोष्टी हस्तगत करायच्या हा त्याचा बाणा. सरकारचे शेतीतज्ज्ञ सांगतात की, पंजाबी शेतकरी कुठलाही नवीन प्रयोग करून पाहायला तयार असतो. नवीन खत द्या; नवीन बियाणे द्या; शेतीची नवीन अवजारे द्या, सर्व काही वापरून पाहायला त्याची तयारी असते. हल्लीच्या स्पर्धेच्या युगात पुढे कसा जाऊ असा विचार चुकूनसुद्धा त्याच्या मनात येत नाही, तो सगळ्यांना कोपरखळ्या मारीत धडाक्याने पुढे सरकतो. पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीने घालून दिलेल्या मर्यादा त्याला अडवू शकत नाहीत. मध्यम स्थितीतील बंगाली मनुष्य पुष्कळच बहुश्रुत असतो. त्यांचे स्वतःचे काव्य, नाट्य व इतर वाङ्मय यांच्या परंपरेचा त्यांना मोठा अभिमान असतो. कुटुंबाची खानदानी परंपरा त्यांच्या हाडीमासी खिळलेली असते. कित्येकदा हा खानदानीपणा इतक्या पराकोटीला जातो की दारिद्र्य, मानहानी इतकेच काय, पण मरणसुद्धा ही माणसे पत्करतात पण आपले उच्च समजले जाणारे आचार-विचार सोडायला तयार नसतात. काही दृष्टींनी बंगाली हिंदुस्थानातील सर्वांत सुसंस्कृत लोक, पण त्यांची संस्कृतीच त्यांच्या विकृतीलाही कारण आहे. बंगाली कथा व बंगाली पटकथा यांमध्ये सहृदय, सुशील पण सर्वथैव निष्क्रिय बंगाली पुरुषांचे चित्रण फारच सुंदर केलेले आहे. परिणीता, विराज बहू, पथेर पांचाली ह्या विख्यात चित्रपटांतून पुन्हा पुन्हा तेच ते दृश्य दृष्टीस पडते. लाचार, निष्क्रिय, वेळी अवेळी जेवाय पुरता घरी येणारा पुरुष व त्याची वाट पाहात बसणारी, त्याच्या पानावर भरपूर अन्न वाढून स्वतः न जेवणारी, तो जेवताना त्याला पंख्याने वारा घालणारी बंगाली पत्नी हे दृश्य पाहून माझ्या मनात भयंकर घृणा उत्पन्न होते. जवळजवळ तोच प्रकार बंगाली निर्वासितांना पाहून होतो. त्यांची भयंकर स्थिती पाहून अतीव करुणा तर वाटतेच पण 'मरू; पण कलकत्ता किंवा बंगाल सोडणार नाही', ही वृत्ती किंवा स्वतःच्या व कुटुंबाच्या प्राणाचे मोल व्यर्थ देणारी माणसे, किंवा अशांचे दैन्य व लाचारी ह्यांचे राजकीय भांडवल करणारे सुसंस्कृत बंगाली पाहिले म्हणजे तितकाच त्वेष वाटतो.

इकडे पंजाबात अगदी ह्याउलट वृत्ती. पृथ्वी काबीज करायची त्यांची

तयारी आहे. हिंदुस्थानभर ते जातातच, पण परदेशी जाण्यासाठी जिवाचा भयंकर आटापिटा करतात. दिल्लीला खोटे पासपोर्ट तयार करणारी एक टोळी नुकतीच पकडली. मला इकडच्या लोकांनी सांगितले, "एक टोळी पकडली म्हणून काय झाले? हा उद्योग काही थांबायचा नाही." मी सहा वर्षांपूर्वी सॅन्‌फ्रान्सिस्कोला होते, तेथे कस्टम कचेरीत तीसचाळीस पंजाब्यांचा जथ्था बसला होता—बायका-पोरे पुरुष-कोणाला म्हणून इंग्रजीचे एक अक्षर येत नव्हते. मी दिसल्याबरोबर सर्वांनी मला गराडा घातला व कस्टम अधिकाऱ्यांशी त्यांचे काय काम होते, तिथून पुढे जायला त्यांना कधी मिळणार, वगैरेची चौकशी करावयास सांगितले. त्यांचे काम करून दिल्यावर मी पण त्यांना विचारले, तुम्ही इकडे कुणीकडे? मला कळले की कॅनडात काही शेकडा पंजाबी शेतकऱ्यांना गव्हाची लागवड करण्यासाठी जमिनी मिळाल्या आहेत व पंजाबी कुटुंबे कॅनडात जाऊन स्थायिक झाली आहेत. उद्या सैबेरियात वसाहत करण्यासाठी बोलावले तरी हजारोंनी पंजाबी लोक जातील, ह्याबद्दल माझी खात्री आहे.

ह्या दोन प्रदेशांतील लोकांच्या प्रत्येक आचारात फरक दिून येतो. आधीच लंबा-चवडा असलेला पंजाबी, मोठी थोरली दाढी राखून, मोठा थोरला उंच फेटा बांधून, जाडजूड अंगरखा व तुमान घालून आपल्या उंचीत व रुंदीत भर घालतो व आपल्या दांडग्या पौरुषाची जाहिरात लावतो, तर आधीच ठेंगणा व नाजूक बंगाली पुरुष तलम, झिरझिरित अंगरखा घालून, पोकळ धोतर नेसून व लांब केसांचा भांग काढून आपला नाजुकपणा आणखीनच वाढवितो; पंजाबीसुद्धा आपल्या पोषाखाच्या ऐटीत असतो पण त्याची ऐट एखाद्या पोराची असते, एकदा छानछोक पोषाख झाला म्हणजे लोक आपल्याकडे पाहतात ना याबद्दल त्याला जिज्ञासा व कुतूहल असते. तो नेहमी लोकाभिमुख असतो. ह्याउलट बंगाली मनुष्य आपली बुद्धी, आपली कला, आपली संस्कृती यात बुडालेला, अंतर्मुख तर खासच नव्हे; पण आत्मसंतुष्ट असतो. मला आठवते, मी कलकत्त्याला काही कामानिमित्त गेले होते, तेथल्या एका बागेत आम्हा निमंत्रितांना चहा होता. आमच्या यजमानांपैकी एका बंगाली तरुण पुरुषाबद्दल मला जिज्ञासा वाटली. होता पोरगेलासाच, बंगाल्यांच्या मानाने उजळ, नाक-डोळे रेखीव, भव्य उंच कपाळ, मध्यम उंचीचा असा होता त्याच्या रूपापेक्षाही त्याच्या

वागणुकीने माझे त्याच्याकडे लक्ष वेधले. अत्यंत तलम लांब बाह्यांचा अंगरखा त्याने घातला होता. धोतर तितकेच तलम होते व त्याचा पुढचा लांब ओचा लीलया अंगरख्याच्या खिशात खोचलेला होता. केसांना तेल लावून सुंदर भाग काढला होता. चेहरा तरुणीलाही लाजवील इतका नाजूक व गुळगुळीत होता. हा मनुष्य मंद पावलांनी, वस्त्राची घडी न चुरगळता चालत आला. त्याची दृष्टी लोकांकडे नव्हतीच. मी विचारले तर मला कळले की हा मनुष्य आपल्या स्वतःच्या शाखेत फार विद्वान् म्हणून नाव कमावलेला होता. तो आला. एका टेबलापाशी बसला. काय हवे ते घेऊन खाल्ले. थोडा वेळ बसला. अधून मधून स्वतःशीच मंद मधुर हसत होता; जणू आम्हांला न दिसणारा एक आरसा त्याच्यासमोर होता, व त्यात दिसणाऱ्या स्वतःच्या रमणीय रूपावर तो भुलला होता. नार्सिसस असाच स्वतःच्या रूपावर भुलून, बाहेरच्या मनोहर जगाला विन्मुख होऊन मेला नव्हे का?

*

१९

# कोडगूंच्या प्रदेशात

एखादा लेख लिहिताना त्या लेखातील वस्तूबद्दलच लिहिले पाहिजे. लेखकाच्या सर्व वृत्ती कथावस्तूत बुडून गेल्या पाहिजेत असा एक जुना दंडक आहे. पण एखाद्या वेळी मन बंड करून उठते. मन म्हणजे एक नव्हे– अनेक– ती एकाच वेळी वावरत असतात– बहुधा त्यांतला एक 'मी' इतका जोरदार असतो की इतर मींचे अस्तित्व जाणिवेत नसते. पण काही वेळा अशा येतात, की कोणताच एक मी जोरदारपणे मनाचे अंगण व्यापू शकत नाही. अशा वेळी निरनिराळे 'मी' गर्दी करतात. ह्यांच्या भांडणाने मन त्रस्त होते. तशातच अमके एक काम अमक्या वेळात झालेच पाहिजे, असे असले म्हणजे वृत्ती अगतिक होते. अशाच एका परिस्थितीत हा लेख लिहिला. एका मनाला मी तो लेख लिहावा हे मुळीच पटत नव्हते. थोड्या रागाने, काहीशा चिडीने घालून पाडून बोलून ते मन सारखे मधेमधे तोंड घालीत होते. इतक्या आग्रही मनाची ही लुडबूड लेखातून काढून टाकली असती पण एका मनाने दुसऱ्या मनाची अशी मुस्कटदाबी करणे जमेना. परत मनाच्या अंधाऱ्या खोलीत भांडणाला सुरुवात झाली आणि त्या कटकटीला कंटाळून दोन मनांनी मिळून लिहिलेला हा लेख तिसऱ्याच एका मीने प्रकाशकाकडे पाठविला.

० ० ०

"तू लिहिणार नव्हतीस ना?"

"नव्हते."

"मग इतकी कामं टाकून का बसलीस लिहिण्याच्या थाटात? अर्धा तास झाला नुसती बसली आहेस."

"खरंच मला ल्याहावसं वाटतच नाही."

"मग का लिहिते आहेस? संपादकांना 'नाही' म्हणून स्पष्ट सांग. एवढी भीड कशाला? बाकीची कामं तरी होतील."

"संपादकांच्या भिडेने नाही लिहीत; आणि हे लिहिले नाही म्हणून दुसरी कामे होतील असे थोडेच आहे? एकदा वाटतं, काही लिहावं पण त्याचाही कंटाळा येतो. लिहिलं नाही तर झोप येणार नाही– मनातलं कागदावर उतरलंच पाहिजे अशी परिस्थिती झाल्याशिवाय लिहूच नये; असं मला वाटतं म्हणून उगीच बसले आहे."

"अशी कापूस पिंजत बसू नकोस. काही तरी कर."

"बरं."

० ० ०

निघायचं निघायचं म्हणून सकाळपासून सामान बांधून बसलो होतो. पण ट्रक आली रात्री नऊ वाजता. ट्रकबरोबर जंगलातला एक छोटासा अधिकारी पण होता. तो म्हणाला, "काय करावं, सकाळपासून वाट पाहात होतो. संध्याकाळी ट्रक लाकडं भरून आला. तो खाली केला, ड्रायव्हरचं जेवण झालं, तो ही वेळ आली." मी म्हटले, "चिंता नाही, आमची तयारी आहे." पाच मिनिटांत सामान आत भरलं, गाद्या अर्धवट पसरल्या व चांगले हातपाय पसरून बसलो... बसलो कसले, रेललो. आमचे बहुतेक काम जंगलात चालणार होते व जंगलाच्या मुख्य अधिकाऱ्याने जंगलखात्याच्या ट्रक रिकाम्या असतील तेव्हा वापरण्याची आम्हांला परवानगी दिली होती. महिनाभर होणाऱ्या प्रवासातील हा पहिलाच प्रवास. जंगलातून रात्रीच्या प्रवासाची मोठी मौज असते, आणि त्यातूनही वरून उघड्या असलेल्या ट्रकमध्ये रेलून, अर्धवट निजून प्रवास तर फारच रम्य हे आम्हांला सर्वांना पटले. झाडांच्या भिंतींतून प्रवास चालला होता. झाडे वाऱ्याने हालली की काळ्या भिंतीला भोके पडत व त्यांतून आकाश दिसे. वरती निरभ्र आकाशाच्या धांदोटीत तारे चमकत होते. झाडे उंच असली की वरच्या प्रकाशाचा पट्टा नाहीसा होई व बोगद्यात प्रवास केल्यासारखा वाटे. प्रवासाच्या वाटेवर कळकांची बेटे होती. त्यांच्या पानांची हालती झालर आकाशाच्या पट्टीला अधूनमधून लागे व काळ्या पण प्रकाशमय अवकाशावर पानांची गडद वेलपत्ती उठून दिसे. थोडा वेळ डोळा लागे. जागे होऊन वरती पाहावे तो पहिल्यांदा पाहिलेले नक्षत्र कललेले दिसे व नवे

सरळ दृष्टीच्या टप्प्यात येई. आकाशातल्या मोठ्या घड्याळाचे काटे हालत होते. सबंध रानात झाडे हालत होती. आमची ट्रक पण निर्मनुष्य रस्त्यातून वेगाने चालली होती. पण ह्या सर्व हालचालीत गडबड नव्हती-सर्व प्रकारची अगाध शांतता भरून राहिली होती.

o o o

मी जागी झाले ती एका बंगल्यात, माझी मदतनीस मुले अजून गाढ निजली होती. त्यांना हलवून हलवून जागे केले. तोंड धुऊन चहा घेतो तो जंगलातील अधिकारी दोन रखवालदारांना (फॉरेस्ट गार्ड) घेऊन आला. "ही माणसे तुम्हांला वाट दाखवतील." तो जरा थांबला व किंचित चाचरत म्हणाला "आज इथे ट्रक नाही, पण तुम्हांला ट्रॅक्टर चालत असला तर त्याच्यामागे एक दोन चाकांवरची गाडी लावून तुम्हांला काही मैल जंगलात जाता येईल. पुढे काही मैल चालावे लागेल."

मी म्हटले, "उत्तम. येऊ द्या तुमचा ट्रॅक्टर."

"कुशालपणा, कुशालपणा!" त्याने मोठ्याने हाका मारलेल्या व एक उंच सडसडीत हसतमुख माणूस आम्हांपुढे आला. त्याच्याबरोबर आम्ही दोन-चार दिवस होतो. तो अगदी मूर्तिमंत खुशालपणा होता. त्याचं नाव खुशा+अप्पा+अण्णा असं मिळून कोडगू भाषेत 'कुशालपणा' झाले होते. कुशालपणा ट्रॅक्टरच्या मुख्य बैठकीवर बसला. मागे लावलेल्या गाड्यात एक बाक ठेवलं होत त्यावर आम्ही बसलो. ट्रॅक्टरला स्प्रिंग नसते त्यामुळे रानातील खाचखळग्यांतून जाताना आमची काय अवस्था झाली, हे सांगून कळणार नाही– अनुभव घेतला पाहिजे. मागून कित्येक दिवस आम्हांला ढुंगण टेकून बसता आले नाही.

ट्रॅक्टर थांबल्यावर चार मैल चालायचे होते. बरोबर कोडगू गार्ड. हे लोक उंचच उंच होते. सर्व पाच फूट आठ इंचांच्या वर. अंगाने अगदी सडसडीत. चालताना काही विशेष चालतात असे दिसत नसे. पण त्यांच्याबरोबर चालताना आम्हांला चांगले पळावे लागे, नंदू गार्डच्या बरोबरीने चाले. चंदू व मी गार्डच्या मागे दहा पावले व आमच्या मागे चांगली पंधरा पावले कमल बिचारी धावत येत होती. त्या रात्री ठरवले की, कामकरी मंडळीचे दोन विभाग करायचे. चंदू व कमल घरी राहणारे व नंदू आणि मी चालणारे. एखाद्या दिवशी मीसुद्धा फार दमून जाई. मग चंदू व कमल जात असे. चालणाऱ्यांनी लांबून रक्त आणायचे,

घरच्यांनी ते तपासायचे, नावनिशी टिपून ठेवायची, नळ्या धुवायच्या, दुसऱ्या दिवसाची चालणाऱ्यांची तयारी ठेवायची.

एका मुक्कामावर आम्हांला एक अगदी तरुण पोरगेलासा अधिकारी आमच्या दिमतीला मिळाला. कुठल्याही झाडाचे, वेलीचे नाव विचारले की तो चटदिशी सबंध लॅटिन नाव सांगे. आम्ही पण मोठ्या हौसेने आमची जिज्ञासा पुरी करून घेत होतो. चालता चालता एक झाड आतापर्यंत न पाहिलेले दिसले. मी विचारले "ह्याचे नाव काय".

"त्याने झाडाची पाने पाहिली, खोड पाहिले व मान हलवून म्हणाला, "नाही बुवा माहीत, पण एस् नाहीतर टी ने सुरुवात असणार नावाची."

मी आश्चर्याने विचारले, "अहो, ज्या झाडाचे नाव माहीत नाही त्याच्या नावाची सुरुवात तुम्हांला कशी माहीत?"

तो मोठ्याने हसला, "अहो, मी डेहराडूनच्या कॉलेजात जाण्यासाठी अभ्यास करीत आहे." त्याने एक भला लठ्ठ इंग्रजी ग्रंथ पोतडीतून काढून माझ्यापुढे केला. "त्या बुकात भारतातील झाडांची वर्णनं अकारानुक्रमाने केली आहेत. इंग्रजी आर् पर्यंत माझी सर्व झाडे पाठ झाली आहेत म्हणून म्हटले एस नाही तर टीने सुरुवात असेल म्हणून. "

तो आम्हांला शेवटला दिसला तो एका ट्रकमध्ये. इंग्लंडमधून कोणी बडा लॉर्ड शिकारीला आला होता. त्याच्या दिमतीला त्याला दिले होते. तो लॉर्ड पुढच्या मऊ जागेवर बसला होता व हा मुलगा मागे जोडलेल्या गाड्यात. आम्हांला जंगलाच्या रस्त्यावर पाहिल्याबरोबर तो उभा राहिला. त्याच्या हातात तो लठ्ठ ग्रंथ होता. तो ग्रंथ त्याने हातात वर धरून हालवला व हसत हसत ओरडला, "मी आता एस संपवला आहे, पण ते झाड त्यात नाही."

○ ○ ○

एक दिवस आम्ही हत्तींच्या कँपात पोहोचलो. तेथे बरीच माणसे, विशेषतः आदिवासी कामावर असतात व एकदम बऱ्याच जणांच्या रक्तांचे नमुने आम्हांला मिळतील ही माझी अपेक्षा होती. हत्तींच्या कँपात गेल्यावर माझे सर्व मदतनीस पसार झाले. तेथे पाहायला इतक्या गोष्टी होत्या की मला मदत करायला कोणीच तयार नव्हते. मग मी एक दिवसाची सुटी जाहीर केली व कँपात फिरायला गेले. माणसाळलेले हत्ती कामे करीत होते. एक पिल्लू-असेल माझ्या कमरेइतके उंच-तर मुलांच्यात मिसळून गेले होते. बा, बा (ये,

ये) म्हटले की ते मुलांच्या मागे जाई. मुलांनी त्याला गूळ दिला. मग तर ते इतके चिकटले, की दुपारच्या फराळासाठी आम्ही बसलो तर सरळ आत येऊन आमच्या पंक्तीला बसले! एक हत्ती नवा धरून आणलेला होता. तो सारखा आपल्या लाकडी पिंजऱ्याला धडका देत होता. कित्येक मोठे ओंडके त्याने पार मोडून टाकले होते. पण त्याच्या रागाचा सपाटा व अचाट शक्ती पाहून जिवाचा थरकाप होई. पण तितकीच त्या रागाची विफलता पाहून मनाला फार वाईट वाटले. केवढाले प्रचंड हत्ती आम्ही काम करताना पाहिले. त्यांच्या डोक्यावर एखादा बेट्टा कुरुबा बसलेला असायचा. ही माणसे इतकी लहान असत की त्यांचा उघडा हस्तिवर्णी चिमुकला देह पहिल्याप्रथम दिसतसुद्धा नसे. तो बिचारा पिंजऱ्याला धडका देणारा हत्ती काही दिवसांतच एका लहानशा प्राण्याच्या हुकमतीखाली काम करायला लागणार होता. हत्तीखान्याच्या एका कोपऱ्यात काही आजारी हत्ती होते व एक डॉक्टर मदतनिसाच्या साहाय्याने औषधे देत होता. एका हत्तीची दाढ दुखत होती. त्याच्या किडलेल्या दातांत डॉक्टरांनी एका पिचकारीने हायड्रोजन पेरॉक्साइड घातले व त्यातून पिपेच्या पिपे फेस निघत होता. तो हत्तीच्या डोक्यात व नाकात गेला की हत्ती बेचैन होई. मुले तर आजारी हत्ती व डॉक्टर ह्यांपासून दूर व्हायला तयार नव्हती. एका हत्तीला इंजेक्शन द्यावयाचे होते. हत्तीच्या कातडीतून आत पोचायला म्हणून सुई चांगलीच दणकट व जाड होती. तिसऱ्या हत्तीला एरंडेल पाजीत होते. एका मनुष्याने उंच उभे राहून हत्तीच्या तोंडात एक बांबूचे नळकांडे धरले होते. दुसरा त्यांत एरंडेल ओतीत होता. जितके ओती, त्यातील निम्मे घशात जाई व निम्मे बाहेर पडे. हत्तीला पुरेसा डोस जाईपर्यंत डॉक्टर व आसपासचे मदतनीस एरंडेलाने न्हाऊन निघाले! मुलांना आश्चर्य वाटले की, हत्ती सर्व उपचार होईपर्यंत स्वस्थ राहतो कसा! डॉक्टर म्हणाले, "माणसापेक्षा हत्ती किती तरी शांत व समजूतदार. मी आज पंधरा वर्षे काम करीत आहे, पण कोणत्याही हत्तीने कधी त्रास दिला नाही."

आम्ही रात्रीचे जेवत होतो. साडेआठ वाजले असतील. आमच्याबरोबर त्या दिवशी जंगलचे एक अधिकारी होते. एक गार्ड आत आला व त्याने खिशातून काहीतरी काढून कोपऱ्यातल्या टेबलावर ठेवले. आम्ही पाहिले तो एक वीत लांब व पाउण वीत उंच असे सोनेरी पट्टे असलेले हरणाचे पिल्लू! गार्ड म्हणाला, जंगलातल्या पायवाटेवर त्याला एकटे पिल्लू सापडले. जनावर

पाठी लागले म्हणून आई त्याच्यादेखतच पळून गेली होती. आई परत आली नाही म्हणून त्याने खिशात घालून पिल्लू आणले. हरीण होते बारीक हरिणाच्या जातीचे. मोठे झाले तरी ते फार तर १० इंच उंच होते. जंगल अधिकारी म्हणाला, पिल्लू दोन दिवसांत मरेल. पण आम्ही ते मागून घेतले. लहान काचेच्या नळीला रबर लावून त्यातून त्याला दूध पाजले. पुण्याला आल्यावर ते फारच माणसाळले. आम्ही त्याचे नाव होन्ने (सोनी) ठेवले. पण सर्वांना चटका लावून ते तीन महिन्यांचे होऊन गेले. त्याचे पेन्सिलीएवढ्या पायाचे खूर फरशीवर वाजायचे, त्यांचा आवाज अजून ऐकू येतो. ते नंदूच्या कुशीत शिरायचे ते आठवते. त्याच्या चिमुकल्या चेहऱ्यातले मोठमोठे भावपूर्ण डोळे प्राण ओतून माझ्याकडे बघतातसे वाटते.

तित्तिमट्टीचा मुक्काम आटपला. मला वाटते तित्तिमट्टीच होते ते. होन्नीला पुण्याला पाठवून मुक्काम हालवला. नीटसे आठवत नाही. किती दिवस झाले. गावाची न् माणसांची नावे स्मरत नाहीत.

"आठवत नसेल तर लिहावंच कशाला?"

"विचार केला की आठवेल की आणि लिहिलं की पक्कं होईल."

"पक्कं म्हणजे काय?"

"परत विसरलं तर लिहिलेलं असलं म्हणजे आठवण जागी होईल."

"पण जे विसरलं असेल ते जाणून-बुजून जागं करावंच कशाला? ते मेलं. मेलेला अवयव जिवंत शरीराला चिकटवला तर त्याचं ओझं होतं. तसंच स्मृतीचं नाही का? माणसांचे फोटो काढायचे, त्यांना विसरायचं आणि मग कधी तरी ते पाहिले म्हणजे एकमेकांना विचारायचं, 'हे कोण बरं?' तसंच तुझं चाललं आहे."

"ज्यांची स्मृती असेल, त्यांच्या फोटोची गरज नाही."

"आणि ज्यांची नाही, त्यांच्याही नाही. अनुभव जिवंत रसरशीत असला तर लिहावे; उगाच मेलेल्या मढ्यावरचे निखारे फुंकायचे कारण नाही."

"काय ठरलं होतं?"

"काय?"

"उगीच भरकटायच नाही. पुढे लिही."

"बरं..."

नंदू नि मी उठून भल्या पहाटे कामाला गेलो. कमल सर्व सामान घेऊन

पोन्नम्पेटच्या बंगल्यात जाणार होती. आम्ही काम झाले की तेथे भेटायचे ठरले होते. सकाळी दहाच्या सुमारास चांगले सहा मैल चालून पोन्नम्पेटला पोचलो, तो कमल आपली एका झाडाखाली लांब तोंड करून बसलेली. बंगला म्हणे आम्हांला मिळणार नाही. मी तावातावाने बंगल्याकडे गेले. तेथील माणसाचे आपले एक म्हणणे, "जंगलच्या अधिकाऱ्याला मी जाणत नाही. मिनिस्टरची चिठी असल्यास बंगला उघडतो." आता काय करावे? मिनिस्टरला आम्ही भेटलो होतो. त्याने परवानगी पण दिली होती. पण आम्ही पत्र घेतले नव्हते. शेवटी बऱ्याच अधिकाऱ्यांना भेटून रस्त्यावरच्या एका सरकारी चाळीत एक खोली मिळाली. खोली झाडली, मुलांनी पाणी आणले. बसायला सतरंजी पसरायला घेतली तो कमल म्हणाली, "काकू, लुगडे कसे फाटले?" मी पाहते तो पुढेच सबंध वरपासून खालपर्यंत फाटून खाली लोंबत होते. मी बंगल्यात तशीच गेले होते, अधिकाऱ्यांना तशीच भेटले होते. पोन्नम्पेटच्या रस्त्यांतून तशीच भटकले होते, फार काय, सहा मैल तशीच चालत आले होते. मी मटकन् खाली बसले. लहान लहान गोष्टींचा मला छडा लागला. तो बंगल्यातला नोकर असा चमत्कारिक का बघत होता? त्या अधिकाऱ्याच्या चपराशाने आत येण्यास बंदी का केली? मी इंग्लिश बोलू लागून कोण हे सांगितल्यावर तो अधिकारी चकित कसा झाला? एक ना दोन, गेल्या दोन तासांची चित्रे माझ्या डोळ्यांपुढून गेली. मी परत माझ्या लक्तराकडे पाहिले. सकाळच्या खेड्यातून बाहेर पडून रस्त्याला लागून काही तरी चिरल्याचा आवाज झाला तेव्हाच बहुतेक लुगडे फाटले असले पाहिजे. आम्ही अंतर काटायचे म्हणून भराभर चालत होतो हातात रक्ताच्या नमुन्यांची पेटी– लक्ष गेले नाही. मी लुगडे बदलले. पण पुढचे दोन दिवस पोन्नम्पेटच्या रस्त्यातून जाताना वर मान करून मला चालवले नाही.

हत्तींचे डॉक्टर आम्हांला मधूनमधून भेटत असत. बऱ्याचदा त्यांनी आमच्याकडे मुक्काम केला. आमच्या सर्वांच्या लक्षात एक गोष्ट आली. ती म्हणजे त्या रमणीय सदानंदी प्रदेशात हा डॉक्टर तेवढा एक कायम कष्टी दिसायचा. आम्ही चौकशी केली, तर कळले की त्याला बायकामुले आहेत. संसारही छान चालला होता. मग त्या माणसाचे दुःख तरी काय? शेवटी एकदा न राहवून नंदू त्यांना म्हणाला, "क्षमा करा, डॉक्टर, तुम्ही नेहमी काळजीत दिसता ते का बरं?"

डॉक्टरांनी एक भला मोठा उसासा टाकला व म्हणाले, "अहो, त्या हत्तींची काळजी आहे ना! एखादा हत्ती तरुणपणी आजारी पडून मेला की कौन्सिलमध्ये किती प्रश्नोत्तरे होतात; व शेवटी डॉक्टरच्या हयगयीमुळे हत्ती मेला की नाही, हे ठरविण्यास कमिशने नेमतात. हत्तीची किंमत असते दहा हजार रुपये– माझ्या सारख्या जनावरांच्या डॉक्टरला काय किंमत? ह्या एवढ्या प्रदेशात हत्ती आजारी नाही, असे सहसा होत नाही व मी कधी काळजीतून मुक्त होत नाही."

० ० ०

कूर्गमध्ये हरिजनांची एक विशिष्ट जात आहे. तिकडे गेले होते. गावापासून पाऊण मैलभर मैदानात एक स्वतंत्र वस्ती आहे. तिचे नाव नेहरूनगर. लहान लहान सुबक घरे होती. काम छान झाले. पाहुणचार पण चांगला झाला. पूर्वी हे हरिजन गावाजवळ होते. आता ते गावापासून दूर व बरेचसे स्वतंत्र झाले होते. दुसऱ्या गावी असेच गांधीनगर आहे. निवडणुका जवळ आल्या की निरनिराळे पुढारी येथे येतात. एरवी त्या वस्तीचा गावाशी संबंध नाही. शाळा स्वतंत्र, पाणोठा स्वतंत्र, देऊळ स्वतंत्र, सभागृह पण स्वतंत्र. ह्यामुळे जातिनिर्मूलन कसे होते कोण जाणे!

० ० ०

तडियंडमोळो! संध्याकाळच्या गुलाबी प्रकाशात कूर्गचे सर्वांत उंच शिखर स्पष्ट दिसत होते. विराजपेटचा डाकबंगल्याचा जिना चढून धावतच मी वर गेले. मागच्या पडवीत बसले की शिखर सहज दिसायचे, ते मागच्या वेळेला मी आले होते, तेव्हा मला माहीत झाले होते. तडियंडमोळोवर चढले म्हणजे मंगलोरच्या बंदरातील गलबते दिसतात. त्याच्या भोवती रान इकडच्यापेक्षा दाट आहे. तेथल्या मळ्यांतून वेलदोडा पिकवितात. त्याच्या पायथ्याशी कूर्गच्या शेवटच्या राजाचा-वीरराजाचा-एक राजवाडा आहे. त्या राजवाड्यात वीरराजाची आई व बायका होत्या; आणि त्या एकाकी वाड्यात, दागिन्यांच्या लोभाने कुणी नोकराने त्यांचा प्राण घेतला. वीरराजाचा शेवटही फार वाईट झाला. तडियंडमोळोचे लांबून दर्शन झाले की त्या न पाहिलेल्या वाड्याभोवती, पाय न ठेवलेल्या शिखराभोवती माझे मन रेंगाळते. कूर्गचा राजा टिपूशी झगडून शेवटी इंग्रजांच्या साम्राज्यतृष्णेला बळी पडला. पण कोडगू लोकांना त्यांची आठवणही नाही. त्यांचे सर्व व्यवहार व भाषण

कॉफीच्या मळ्यांसंबंधी व संत्र्यांच्या बागांसंबंधी असते. हे सुंदर घरातून राहतात. दर जेवणाला कोंबडी व डुकराचे मांस खातात. यथेच्छ दारू पितात व मोठमोठ्या मोटरींमधून हिंडतात. ते व त्यांच्या बायका सुस्वरूप असतात. बरेचसे लष्करात जातात व सर्वच एकंदर युरोपियनांसारखे राहतात. राजकारण, समाजकारण असल्या कटकटी त्यांना माहीत नाहीत. त्याच देशात, जंगलात लहान झोपड्यांतून बेट्टा-कुरुबा व जेनु-कुरुबा राहतात. त्यांना पण वीरराजाचे नाव माहीत नाही. ते जंगलात काम करतात. मिळेल तेव्हा मध खातात, दारू पितात, सण आला म्हणजे रात्रभर नाचतात, गातात, रामायणाचे नाट्य करतात. त्यात राम काळा चष्मा घालतो व सीता ओठ रंगवते, गोरे होण्यासाठी तोंडाला हळद फासते. ते पण कोंबड्या बाळगतात. राजकारण अजून त्यांच्यापर्यंत फारसे पोचले नाही. पण एक जेनु-कुरुबा व एक बेट्टा-कुरुबा कोडगू कौन्सिलचे मेंबर असलेले मला भेटले होते. एकजण आपले घर शाकारीत होता. दुसरा घराभोवती कळकाची वई घालीत होता.

○ ○ ○

त्या दिवशी प्रवासातच जाई व जाईचे वडील बरोबर होते. असे प्रसंग क्वचितच येत. आता तर ते कधीच येणार नाहीत. जाई परघरी गेली आहे. तिचा जीव तिच्या माणसांभोवती घोटाळत आहे– आणि माझा पण.

"मग सर्व सोडून जायच्या गोष्टी बोलतेस ते खोटंच ना?"

"जे खरं नाही ते खोटं आणि खोटं नाही ते खरं, अशा दोनच टोकांत का सर्व गोष्टींची विभागणी करायची?"

"असा दुटप्पीपणा करू नकोस. माणसानं आपल्या मनाशी तरी खरं बोलावं."

"मी खरं तेच सांगते. पण पटवून घ्यायचं नाही त्याला काय म्हणावं? माझ्या मनाच्या अडचणीचीच मला भीती वाटते म्हणून मी तोडायची भाषा बोलते."

"उगीच काही तरी उगाळायच नाही असं ठरलं होतं ना?"

"हो!"

"मग पुढे चालू कर."

सबंध सकाळ रानात घालविली होती. कळकांच्या बेटांत, हत्तींच्या कळपात कुरुबांच्या झोपड्यांत, कावेरीच्या काठावर. काम आटोपून

मोटरच्या सडकेला मिळायला आम्ही चाललो होतो. मला गचाळ काव्य सुचत होते व जाई मला मदत करीत होती. शेवटी एकदाच्या चार ओळी झाल्या व दिनूने लगेच डायरी काढून टिपून ठेवल्या

सा रम्या तटिनी मरुन्मुखरितास्ते कीचका उन्नताः
वर्षामेघनिभा गजा मदयुतातस्ते शृंखलाकर्षिणः।
जल्पनत्या विविधाः कथा वनगृहे (अर्थात् फॉरेस्ट रेस्ट हाऊस)
सार्ध दुहित्रा मया
नीतो वो दिवसस्त्वया सह सखे विस्मर्यते सः कथम्॥

○ ○ ○

"कशा काय झाल्या आहेत!" तो म्हणाला, "उत्तम." जाई म्हणाली, "दुसरं ग काय म्हणणार!" आम्ही सर्व हसलो. रस्त्यावर पोचलो. कडेला एक झोपडी होती. तिच्या उघड्या पडवीत मुक्काम केला. सबंध रान सुवासाने भरून राहिले होते. कूर्गभर ठिकठिकाणी हा वास येतो. फुलाला 'कुरुंजी' म्हणतातसे वाटते. काहीतरी चमत्कारिक आवाज डोक्यावर घुमू लागला. म्हणून पाहिले तो मधमाश्यांचा मला मोठा थवाच्या थवा वरून चालला होता. पाहता पाहता तो काळा ढग गुणगुणत लांब गेला. आम्हांला सपाटून भूक लागली होती, म्हणून पोळ्यांचा डबा व मधाची बाटली काढली. कूर्गच्या मधाला तो वास येतो. अजूनही कूर्गच्या रानात दरवळणारा सुगंध, मधमाश्यांची दिवसभर चाललेली गुणगूण, मधाची कडवट गोडी व माझ्या माणसांच्या मायेची संगत ह्यांनी त्या एका दिवसाची स्मृती रसरशीत नाही, धगधगीत नाही, पण शांत आणि स्निग्ध अशी मनात भरून राहिली आहे.

"झालं का तुझं?"

"हो. झालं लिहून."

"मग दे एकदाचा तो लेख संपादकांकडे पाठवून."

"बरं."

१९५८

*

२०

# प्रवास संपला

सहा महिने झाले, मन आणि शरीर इतके थकले आहे की, निजताना मी म्हणायची, "आत उठणे नको." सकाळी आपले डोळे उघडत. तीच खिडकी, तेच झाड, तीच टेकडी. "अरे, मी उठले वाटतं!" परत एक दिवस, परत रात्र आणि मग न चुकता आणखी एक दिवस. कितीदा असे चालणार आहे?

एक एक गाव म्हणजे नव्या नव्या वेदनांची स्मृती, झूरिच, म्युनशेन. ट्युबिगेन, बॉन, आमस्टरडॅम, न्यूयॉर्क. मला वाटले होते युरोपच्या थंड हवेत बरे वाटेल. पण बरे कसले? घरी नुसता थकवा वाटत होता. आता त्याच्या जोडीला वेदना पण आल्या. सगळ्यांचा विरस. आज सॅनफ्रान्सिस्कोला पोचलो व बसत उठत कशीबशी मोटरपाशी पोचले. परत वीस मैलांचा प्रवास. एकदाचे बिऱ्हाडी आलो. एक नर्स तयारच होती. तिने काही परीक्षा केली. दुसरी नर्स आली, तिने रक्त काढले, डॉक्टर आले, त्यांनी तपासणी केली. घरमालकीण व मालक येऊन स्वागत करून गेले. दोघे प्रोफेसर आले होते. ते थोडा वेळ बसून गेले. आमचे बिऱ्हाड चालू करून देण्यासाठी एक बाई आल्या होत्या. त्यांच्याबरोबर सामान आणायला घरची मंडळी गेली. मी बसायच्या खोलीतच निजले होते. अंगावर पांघरूण होते. मंडळी जाताना काहीतरी सांगून गेलीसे वाटले, पण मला वाटते मी अर्धवट झोपेत होते.

डोळे उघडले तो मी कुठे आहे ते कळेना. मग लक्षात आले. हळूहळू प्रवास आठवला. मोठ्या समाधानाने मी म्हटले, "संपला एकदाचा प्रवास."

"प्रवास संपतो का कधी?"

मी रागानेच म्हटले, "मेल्यावर!"

"खरंच?" हेटाळणीचा सूर आला.

"नाही बाबा, कधीच संपत नाही. युगानुयुगे संपत नाही बरं. पण आता आयुष्यात माझा तात्पुरता प्रवास संपला आहे... प्रवास संपला आहे."

पडल्या पडल्या स्वस्थपणे मी खोली न्याहाळाली. सकाळी एकदा घर पाहिले होते, पण घाईत. माणसांच्या गर्दीत.. माझ्या शेजारीच मोठ्ठे काचेचे दार होते, त्यातून बाहेरची बाग दिसत होती. आमच्या लहानशा बंगलीभोवती आवार बरेच मोठे होते व त्यात खूप झाडे होती. झाडे आणि वेलींनी घर वेढले होते. वेलींचे तणावे व झाडांच्या फांद्या दरवाजापर्यंत आल्या होत्या. पडल्या पडल्या मधल्या खोलीचा कोपरा दिसत होता. त्याच्या पलीकडे जेवणघर-स्वैपाकघर व अमेरिकन घराला लागणारी सर्व यंत्रे. पाणी तापत होते, चुलीचा गॅस मंद ज्योतीने जळत होता. पदार्थ थंड होण्याच्या फड़ताळात पदार्थ थंड होत होते. पण ह्या यंत्राचा आवाज मात्र सुदैवाने मला ऐकू येत नव्हता, इतकी ती खोली दूर होती. जर्मनीतली एक रात्र आठवली. घर इतके लहान होते की ह्या सगळ्या यंत्रांचा आवाज आळीपाळीने रात्रभर ऐकू येत होता आणि डॉक्टर सकाळी म्हणत होते की 'रात्रभराच्या विश्रांतीनंतरसुद्धा तुम्हांला थकवा वाटतो का', म्हणून!

बसायच्या खोलीत मी नजर फिरवली. घर मोठे गमतीदार होते. एकतर इथल्या मानाने जुने आणि दुसरे म्हणजे जुन्या धर्तीचा माल विकणाऱ्या बाईचे होते. भिंतींचा रंग मंद होता. खालची जमीन काळसर होती. डोळ्यांना त्रास होईल असा रंग कोठेही नव्हता. शंभर दोनशे वर्षांपूर्वी ज्या तऱ्हेची खुर्च्या-टेबले लोक वापरीत, तशा सामानाने खोली सजली होती. प्रत्येक वस्तू भारी किमतीची, पण हल्लीच्या काळी मोठ्या उपयोगाची नाही अशी. एक बाजाची पायपेटी, एक पियानो. दिसायला फार सुंदर; भारी लाकडाची, गुळगुळीत पॉलिश केलेली; पण ह्यातून सूर निघत नव्हते. गौरीने आल्याबरोबर वाजतात का; ते पाहिले होते. लिहायचे टेबल फार नाजूक पण फार तर एखादे पुस्तक व एखादा कागद मावेल एवढे. बहुतेक जागा लहान लहान ड्रॉवर व मोठाल्या आरशांनीच व्यापलेली. पलीकडल्या भिंतीत एक खोटी खोटी आगोटी. लोखंडी मोठी शेगडी, तिच्यासमोर मोठे नक्षीचे लोखंडी दार, आगटीवर संगमरवरी

फरशी, तीवर चिनीमातीची चित्रे. सगळे काही होते. फक्त आत लाकडे जळत नव्हती व धूर वरती जाण्यासाठी धुराडे म्हणून उभे केले होते त्याला वरती भोकच नव्हते. जेन ऑस्टेनच्या वेळच्या घरातील बैठकीच्या खोलीचा देखावा उभा केला होता. माझ्या थकलेल्या पापण्या जड झाल्या, पण तेवढ्यात मला दिसत होते, त्या चिटुकल्या लिहिण्याच्या टेबलावर बसून ॲन एक चिटुकली चिठ्ठी लिहीत होती. बाजूच्या छोट्याशा टेबलावरील नक्षीच्या फुलदाणीत फॅनी बागेतली गुलाबाची फुले रचीत होती. त्या मोठ्या पियानोशी कोण बरं? एलिझाबेथच ती. एवढ्या मोठ्या पियानोशी बसायचा धीर दुसऱ्या कुणाला होणार? बरं झाल, नॉरीसबाई व बेनेटबाई इंथे कटकट करायला नाही आल्या ते. ह्या पोरी असल्या तरी मला त्यांचा मुळीच त्रास होत नाही.

किती वेळ लोटला होता कोण जाणे. मी परत डोळे उघडले तर संध्याकाळच्या सावल्या घरात शिरल्या होत्या. खोलीच्या कोपऱ्याकोपऱ्यांत अंधार भरला होता. आधीच मंद रंगाच्या भिंती जवळजवळ दिसेनाशा झाल्या होत्या. खिडकीच्या तावदानातून वेलींची पाने झाडांच्या फांद्यांवर घासताना दिसत होती, पण त्यांचा आवाज आत ऐकू येत नव्हता. मी सगळीकडे नजर फिरवली. ॲन, फॅनी, एलिझाबेथ सगळ्या जणी निघून गेल्या होत्या. शंभर वर्षांपूर्वीची टेबले, खुर्च्या, आगोटी पुसटपुसट दिसत होती. घरात सगळीकडे नीरव शांतता भरून राहिली होती. माझ्या शेजारी फक्त माझा कायम सांगाती बसून होता– डोळ्याची पापणी न हालवता सारखा बघत होता. "बघ, सारखा बघत राहा. मी उपभोगणारी आणि तू बघणारा."

मी समाधाने पुटपुटले, "मला आवडलं घर. छान आहे. मरायलाही छान आहे न् जगायलाही छान आहे."

१९५९

*

डॉ. इरावती कर्वे.



जन्म: १५ डिसेंबर १९०५  मृत्यू: ११ ऑगस्ट १९७०

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.